**सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)**

**सभागृहातील कोरम बाबत**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहामध्ये कोरम नाही. सदनामध्ये कोरम ठेवण्याची केवळ आमची जबाबदारी नाही. सत्ताधारी पक्षाचे एकही सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत. त्यांच्यामध्ये सरकार चालविण्याची क्षमता नाही, तुम्ही सरकार चालविण्याच्या लायकीचे नाही. तसेच या शासनाला जनतेच्या कोणत्याही प्रश्नांच्या बाबतीत काही देणे-घेणे नाही अशा प्रकारे नादानपणे हे सरकार वागत आहे आणि त्याचे आज आपल्यासमोर उदाहरण आहे. याठिकाणी दोन सन्माननीय मंत्री महोदय उपस्थित आहेत पण ते विधानसभेचे सदस्य आहेत. त्यांचा आणि या सभागृहातील कोरमचा काहीही संबंध नाही. सभापती महोदय, त्यामुळे आपण सदनाचे कामकाज 10 मिनिटांसाठी स्थगित करावे आणि माननीय संसदीय कार्य मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांना सदनामध्ये ताबडतोब बोलविण्यात यावे. तसेच याबाबत माफी मागितली पाहिजे. सदनामध्ये हे काय चालले आहे? मी गेले आठवडाभर हे पहात आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आपल्याला ही बाब सातत्याने पहावयास मिळत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी सतत सभागृहाचा अपमान केला जात आहे.

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी तहकूब करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक 9.32 ते 9.42 पर्यंत स्थगित झाली.)

------

यानंतर श्री.बरवड . . .

.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

**पृ. शी.** : वीज दरवाढीमुळे निर्माण झालेली परिस्थिती व आदिवासी विकास विभागातील खरेदीत झालेला भ्रष्टाचार

**मु. शी.** : वीज दरवाढीमुळे निर्माण झालेली परिस्थिती व आदिवासी विकास विभागातील खरेदीत झालेला भ्रष्टाचार या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र. पाटील, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ. दीपक सावंत, श्री. रामनाथ मोते, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. चंद्रकांत पाटील, ॲड. अनिल परब, सर्वश्री विजय गिरकर, विनायक राऊत, डॉ. रणजित पाटील, श्री. गोपीकिसन बाजोरिया, ॲड. आशिष शेलार यांचा प्रस्ताव

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, विरोधी पक्षातर्फे नियम 260 अन्वये जो प्रस्ताव देण्यात आलेला आहे तो महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. असा महत्वाचा प्रस्ताव असताना त्या प्रस्तावावर ज्यांचे नाव प्रथम क्रमांकावर आहे ते माननीय विरोधी पक्ष नेते सभागृहात उपस्थित नसणे ही या प्रस्तावाच्या दृष्टीने दुर्दैवाची बाब आहे. त्यामुळे याची आपण गांभीर्याने दखल घ्यावी. जोपर्यंत माननीय विरोधी पक्ष नेते सभागृहात येत नाहीत तोपर्यंत हा प्रस्ताव मांडण्यास परवानगी देऊ नये.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, काल सत्ताधारी पक्षाकडून जो प्रस्ताव मांडण्यात आला त्यावेळी सुध्दा ज्यांनी प्रस्ताव दिला होता ते सदस्य उपस्थित नव्हते.

**तालिका सभापती** : हा अत्यंत महत्वाचा प्रस्ताव आहे त्यामुळे या प्रस्तावावरील चर्चा आपण सुरु करावी. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी प्रस्ताव मांडावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"गत 36 महिन्यात विजेचे दर 12 वेळा वाढल्याने, राज्यातील सामान्य जनतेचे वीज दरवाढीमुळे खर्चाचे अंदाजपत्रक कोलमडणे, औद्योगिक विजेचे दर देखील शेजारील राज्यांपेक्षा अधिक असल्याने सर्व उद्योजकांनी एक दिवसाचा लाक्षणिक संप पुकारून तो यशस्वी करणे, डिसेंबर, 2012 अखेर राज्य भारनियमन मुक्त करण्याची घोषणा वारंवार करून देखील महानिर्मितीच्या औष्णिक विद्युत निर्मिती प्रकल्पांची वीज निर्मिती सन 2008 च्या तुलनेत कमी होणे, प्रत्यक्ष वीज निर्मितीत वाढ न झाल्याने राज्य भारनियमन मुक्त करण्याची घोषणा फसवी ठरणे, कृषी पंपांना मोफत वीज पुरविण्याची घोषणा सार्वत्रिक निवडणुकीच्यापूर्वी करून देखील कृषी पंप धारकांकडून वाढीव दराने वीज बिल आकारण्यात येणे, महाराष्ट्रातील महावितरण, महापारेषण व महाजनको या तीनही कंपन्यांचे कामकाज इतर राज्यांच्या तुलनेत समाधानकारक नसल्याचे शुंगलु समितीने आपल्या अहवालात नमूद करणे, तसेच आदिवासी विकास विभागामार्फत करण्यात आलेल्या ब्लँकेट खरेदी, औषध खरेदी, जनरेटर खरेदी, इत्यादी वस्तुंच्या खरेदीमध्ये भ्रष्टाचार होत असल्याचे उघडकीस येणे, सन 2006 ते 2009 या कालावधीत आदिवासी विकास विभागांतर्गत करण्यात आलेल्या खरेदीमध्ये 6 हजार कोटी रूपयांचा भ्रष्टाचार झाल्याबाबत मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात येणे, या जनहित याचिकेत सादर करण्यात आलेल्या पुराव्यानुसार मा.उच्च न्यायालयाने प्रथम दर्शनी या खरेदी प्रक्रियेमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे मान्य करणे, आदिवासी विकास विभागातील या भ्रष्टाचारामुळे दरवर्षी हजारो कोटी रूपये आदिवासी बांधवांकरिता विविध योजना राबविण्याच्या नावाखाली खर्च होऊन देखील त्यांच्या परिस्थितीत कोणताही बदल झालेला नसणे, विजेशी संबंधित तीनही कंपन्यांमधील भ्रष्टाचारामुळे वाढत्या वीजदराचा बोजा सामान्य जनतेवर पडत असल्याने त्यांच्यात निर्माण झालेला तीव्र असंतोष तसेच आदिवासी बांधवांच्या नावावर हजारो कोटी रूपये खर्च करूनही त्यांना याचा कोणताही लाभ मिळत नसल्याने त्यांच्यात निर्माण झालेला असंतोष, यामुळे या दोन्ही विभागातील कारभाराबाबत श्वेतपत्रिका काढण्याची होत असलेली मागणी व या मागणीनुसार सदर प्रकरणी श्वेतपत्रिका काढण्याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना विचारात घेण्यात यावी. "

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. रामदास कदम ....

सभापती महोदय, आज देखील ग्रामीण भागामध्ये जवळजवळ 10 ते 12 तास आणि शहरामध्ये 3 ते 5 तास लोड शेडींग चालू आहे. 1999 सालापर्यंत म्हणजे जोपर्यंत महाराष्ट्रात युतीचे शासन होते तोपर्यंत महाराष्ट्रामध्ये आपण 24 तास वीज देत होतो. परंतु 1999 पासून 2012 पर्यंत म्हणजे 13 वर्षामध्ये आपण महाराष्ट्राच्या जनतेला सातत्याने काळोखात ठेवण्याचे पाप केलेले आहे. आपण 2001-2002, 2002-2003, 2003-2004 या वर्षातील विजेच्या संदर्भातील माननीय मंत्री महोदयांची उत्तराची भाषणे पाहिली तर त्यामध्ये एका वर्षात आम्ही संपूर्ण महाराष्ट्र लोड शेडींगमुक्त करणार अशा घोषणा आपल्याला पहावयास मिळतात. मी सर्व भाषणे आणलेली आहेत पण वेळ जाऊ नये म्हणून मी ती वाचून दाखवित नाही. फक्त या सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेची दिशाभूल करावयाची, असत्य आश्वासने द्यावयाची, जनतेला फसवावयाचे, मते घ्यावयाची आणि नंतर पुन्हा जैसे थे परिस्थिती ठेवावयाची अशा पध्दतीचे काम सातत्याने विजेच्या बाबतीत पहावयास मिळते. त्यामुळे अनेक अडचणी निर्माण झाल्याचे दिसून येते.

सभापती महोदय, खरे तर महाराष्ट्राच्या वीज क्षेत्राला प्रगतीकडे नेण्यासाठी जे नियोजन केले पाहिजे ते दुर्दैवाने आपल्याकडून केले जात नाही असे मी म्हणेन. वीज खरेदीचे नियोजन, अकार्यक्षमतेमुळे भराव्या लागणाऱ्या किंमतीवर नियंत्रण आणि भांडवली खर्च व वीज पुरवठा सेवेच्या दर्जाची कठोर समीक्षा या बाबींवर जरी आपण अधिक लक्ष दिले असते तरी निश्चितपणे याच्या अगोदर विजेचा प्रश्न सुटला असता असे मला वाटते. मला कल्पना आहे की, आदरणीय श्री. शरद पवार यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्या दिवशी संपूर्ण महाराष्ट्र आम्ही लोड शेडींग मुक्त करणार अशी घोषणा करण्यात आली होती आणि ती घोषणा अतिशय जबाबदारीने करण्यात आली होती. आपले जे उद्दिष्ट आहे त्याप्रमाणे जवळजवळ 14 हजार 500 किंवा 15 हजार हजार मेगावॅट वीज पाहिजे ते उद्दिष्ट निश्चितपणे पूर्ण होईल अशी महाराष्ट्र शासनाची अपेक्षा होती. परंतु आश्वासन देऊन सुध्दा दुर्दैवाने माननीय श्री. शरद पवार यांच्या वाढ दिवसाच्या दिवशी सुध्दा महाराष्ट्राला काळोखामध्ये ठेवण्याचे पाप आपण केले. म्हणजे आपणच दिलेल्या आश्वासनाला आपणच हरताळ फासण्याचे काम केले असे जर मी म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

सभापती महोदय, ही वेळ आपल्यावर का यावी ? ज्या पध्दतीने आपल्याकडे कोळशाचे नियोजन असावयास पाहिजे, ज्या प्रतीचा कोळसा पाहिजे तो आपल्याला मिळत नाही, चांगल्या

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

प्रतीचा कोळसा आपल्याला मिळत नाही त्यामुळे आज आपल्याला जेवढी वीज मिळावयास पाहिजे त्याच्या 50 टक्केच वीज मिळते. दुसऱ्या बाजूला विदर्भामध्ये, मराठवाड्यामध्ये पाण्याची मोठी समस्या आहे. आपण आपल्या भाषणामध्ये उल्लेख केला. पाणी नसल्यामुळे फक्त 50 ते 60 टक्केपर्यंतच वीज आपल्याला मिळते. म्हणजे पाणी आणि कोळशाचे नियोजन नसल्यामुळे घोषणा करुन देखील आपण दुर्दैवाने आज महाराष्ट्र लोड शेडींगमुक्त करु शकलो नाही. याचा अर्थ आपल्याकडे नियोजनशून्य कारभार चालतो हे महाराष्ट्रातील जनतेला दाखवून देण्याचे काम आपण केले.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये आज एका बाजूला मोठ्या प्रमाणावर सातत्याने 13 वर्षे लोड शेडींग आपल्याला पहावयास मिळते आणि दुसऱ्या बाजूला आपल्याला मोठ्या प्रमाणावर विजेची दरवाढ झाल्याचे पहावयास मिळते. एका बाजूला काळोखामध्ये राहावयाचे आणि दुसऱ्या बाजूला जी काही तुटपुंजी वीज मिळते त्यामध्ये आपण 10 ते 14 वेळा विजेची दरवाढ करीत असाल तर हा कारभार म्हणजे मोगलाई आहे. हे सुलतानी काम आहे. मोगलशाहीमध्ये देखील अशा पध्दतीने अन्याय होत नव्हता तशा पध्दतीचा अन्याय आपण महाराष्ट्राच्या जनतेवर करीत आहात. आपण कशा पध्दतीने दरवाढ केली या बाबतची सर्व आकडेवारी सांगणार आहे. मार्च, 2009 ते मार्च, 2010 या एक वर्षामध्ये सातवेळा विजेची दरवाढ करण्यात आली. म्हणजे एका वर्षामध्ये जर आपण सात वेळा विजेची दरवाढ करता आणि दुसऱ्या बाजूला आपण सांगता की, ज्या माणसाची महिन्याची कमाई 600 रुपये असेल तो दारिद्र्य रेषेखाली बसत नाही. या ठिकाणी मात्र आपण एका वर्षात सात वेळा विजेची दरवाढ करता. मग तो माणूस आपल्या घरामध्ये कशी काय वीज पेटवू शकेल हे आपण सांगावे. ते शक्यच नाही.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

सभापती महोदय, 1998 मध्ये वीज नियामक मंडळाची स्थापना झाली. त्यावेळी आजच्या रिलायन्स कंपनीच्या माध्यमातून 6 वर्षात वीज दरवाढ करण्यात आली नव्हती. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की, हे नियामक मंडळ अस्तित्वात आल्यापासून ही वीज दरवाढ सुरु झाली. खरे म्हणजे या मंडळाचे काम वीज दरवाढ नियंत्रित ठेवणे हे आहे. या वीज नियामक मंडळाचा कारभार नेमका उलट सुरु आहे. वीज कंपन्या अडीच वर्षानी वीज दरवाढीची मागणी शासनाकडे करीत असत. परंतु हे वीज नियामक मंडळ आल्यानंतरच या वीज कंपन्यांना दरवर्षी वीज दरवाढ करुन घेत आहेत, त्याशिवाय त्यांना कामकाज करणे शक्य होत नाही. हे गौडबंगाल नेमके काय आहे ? या वीज नियामक मंडळाचे काम या वीज दरवाढीवर अंकुश ठेवणे हे आहे. हे वीज नियामक मंडळ अस्तित्वात आल्यापासून ही वीज दरवाढ होत आहे. वाढीव खर्चापोटी 758 कोटी रुपयांचा भूर्दंड वीज ग्राहकांवर कोसळण्याची लक्षणे मधल्या काळात होती. याबाबत माननीय मंत्री महोदयानी खुलासा करण्याची आवश्यकता आहे. वीज बिलामध्ये जो स्थीर आकार बसविलेला आहे तो 30रुपया ऐवजी 40 रुपये केलेला आहे. याबाबत देखील स्पष्टता होणे गरजेचे आहे. इंधन समायोजन आकाराच्या थकबाकीसह महावितरणाची एकूण 6723 कोटी रुपयाची मागणी होती. जून महिन्यामध्ये इंधन समायोजनापोटी 1483 कोटी रु. वसूल करण्यास मान्यता दिली. आता 6921 कोटी रुपयाच्या वसुलीस मान्यता दिलेली आहे. म्हणजे 8404 कोटीची वीज दरवाढ झाली. वीज दरवाढ केवळ 6 टक्के करण्यात आलेली आहे असे जरी शासनाने सांगितले तरी प्रत्यक्षात 21 टक्के दरवाढ झालेली आहे. मागील दरवाजाने ही दरवाढ करुन राज्यातील वीज ग्राहकाचे कंबरडे मोडण्याचे काम शासनाच्या माध्यमातून होत आहे. या बाबतीत शासनाची भूमिका काय आहे हेही स्पष्ट होण्याची गरज आहे.

सभापती महोदय, गुजरात राज्यामध्ये निवडणुका झाल्या आणि श्री. नरेंद्र मोदी हे तिस-यांदा निवडून आले. आपण त्यांच्याकडून काही शिकणार आहात की नाही ? मला या ठिकाणी राजकारणावर बोलायचे नाही. परंतु एक गोष्ट स्पष्टपणे सांगितली पाहिजे ती म्हणजे राज्यामध्ये उद्योग येऊन बेरोजगारांच्या हाताला काम मिळावे या दृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे. आज गुजरातने उद्योगासाठीचे वीज दर आपल्या राज्यातील उद्योगासाठी असलेल्या वीज दरापेक्षा दोन ते अडीच रुपये कमी ठेवलेले असल्यामुळे महाराष्ट्रातील उद्योग बंद पडून गुजरातमध्ये जात आहेत.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

आता सूतगिरण्या गुजरातमध्ये येण्यासाठी पुन्हा सूतगिरण्यांच्या वीज दरामध्ये एक रुपया कमी केला म्हणजे एकूण साडेतीन रुपये कमी केले. एका बाजूला विविध उद्योग आणि दुस-या बाजूला वस्त्रोद्योग देखील महाराष्ट्रातून गुजरातमध्ये जात आहेत. गुजरातमध्ये उद्योगासाठी सर्व सोयीसवलती दिल्या जात आहेत. महाराष्ट्रामध्ये उद्योग येण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या सोयीसवलती दिल्या जात नाहीत. येथे केवळ कायद्यानेच बोलावे लागते. गुजरातमध्ये उद्योगांना प्रत्येक युनिटमागे साडेतीन रुपये कमी दर आकारण्यात येत असेल तर महाराष्ट्रामध्ये उद्योग कशासाठी राहातील, ते सहाजिकच गुजरातमध्ये जातील. एका बाजूला उद्योगांना प्रोत्साहन देण्याची भाषा बोलत असताना या उद्योगांच्या वीजदरामध्ये केलेली वाढ राज्याला शोभादायक नाही. याबाबतीत आपली नेमकी काय भूमिका आहे हे स्पष्ट करण्याची आवश्यकता आहे. पाण्याअभावी 1200 मे.वॅट वीज निर्मिती धोक्यात आलेली आहे. त्याबाबतीत नेमका कोणता निर्णय घेण्यात येणार आहे. बीईएसटी, टाटा आणि रिलायन्समध्ये विजेचे वेगवेगळे दर आकारण्यात येत आहेत. हे दर या कंपन्यानी समान आकारावेत अशी भूमिका घेतली जाईल असे राज्य शासना मार्फत सांगण्यात आले होते. त्याबाबतीत देखील मंत्री महोदयांनी खुलासा करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये 32,98,143 कृषिपंपधारक आहेत. निवडणुकीपूर्वी शासनाने सांगितले होते की, महाराष्ट्रातील शेतक-यांना जगविण्यासाठी, आत्महत्या थांबविण्यासाठी, शेतकरी राजाला वाचविण्यासाठी सर्व कृषिपंपाचे वीज बिल माफ करण्यात येईल. ही भूमिका घेतलेली असताना देखील आज राज्यामध्ये दुष्काळामध्ये कृषिपंपाचे वीज कनेक्शन तोडण्याचे पाप या शासनाकडून केले जात आहे. फक्त निवडणुकीच्या तोंडावर गोंडस घोषणा देऊन, शेतक-यांना आकर्षित करुन त्यांची मते घ्यायची, निवडून यायचे आणि निवडून आल्यानंतर मात्र शेतक-यांकडे दुर्लक्ष करायचे ही गोष्ट शासनाला भूषणावह नाही...(अडथळा) आज राज्यातील कृषिपंपधारकांची काय अवस्था आहे ? या कृषिपंपधारकांच्या बाबतीत शासनाची भूमिका आता बदलली आहे काय ? राज्यातील शेतक-यांना आपण जगविणार आहात ती मारणार आहात ? आज विजेअभावी शेतक-यांचे शेतातील उभे पीक उद्‌ध्वस्त होताना दिसत आहे. या शेतक-यांना आत्महत्या करण्यास हे शासन प्रवृत्त करणार आहे काय ? म्हणून या बाबतीत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करण्याची आवश्यकता आहे.

..3..



MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. बरवड 09:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

सभापती महोदय, स्वातंत्र्यानंतर आतापर्यन्तच्या 60-65 वर्षाच्याकाळामध्ये आदिवासींच्या कल्याणासाठी शासनाने अब्जावधी रुपये खर्च केलेले आहेत. अब्जावधी रुपये खर्च केलेले असताना आज देखील आदिवासीची लंगोटी जाऊ शकलेली नाही. राज्यातील आदिवासींची लोकसंख्या 84.88 लाख आहे. मला माननीय आदिवासी विकास मंत्री महोदय श्री. बबनराव पाचपुते यांना विचारावयाचे आहे की स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या 60-65 वर्षामध्ये या आदिवासी विकासासाठी काय केले ? या आदिवासी विकासाच्या कारभारामध्ये किती भ्रष्टाचार झालेला आहे याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. पण एक गोष्ट मात्र नक्की की, स्वातंत्र्यानंतरच्या 60-65 वर्षाच्या काळामध्ये अब्जावधी रुपये खर्च करुन देखील या आदिवासीची लंगोटी गेलेली नाही. माननीय मंत्री महोदय असे म्हणत असतील की या खात्यामध्ये भ्रष्टाचार झालेला नाही, तर मग हे इतके अब्जावधी रुपये कुठे गेले. या आदिवासींच्या राहणीमानामध्ये का बदल झालेला नाही ? याला कोण जबाबदार आहे ? आज देखील अशी परिस्थिती आहे की, दिवसभर काबाडकष्ट केल्यानंतर शंभर सव्वाशे रुपये हातात पडल्यानंतर तो चूल पेटवून आपली आणि आपल्या कुटुबीयांच्या पोटाची आग शमवितो. मागासवर्गीयांची देखील परिस्थिती याहून वेगळी नाही. तेव्हा मागासवर्गीयांसाठी खर्च केलेला पैसा आणि आदिवासीसाठी खर्च केलेला पैसा कुठे गेला हे माननीय मंत्री महोदयांनी स्पष्ट करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आदिवासी मुलांचे कुपोषण होऊ नये म्हणून कोटयवधी रुपयाच्या योजना शासनाने राबविल्या. असे असताना त्यांचे कुपोषण थांबलेले आहे काय ? या आदिवासी विकास विभागातील कारभाराबाबत मी विरोधी पक्षाचा असल्यामुळे एक वेळ असत्य माहीत देत आहे असे जरी गृहीत धरले तरी उच्च न्यायालयाने या आदिवासी विभागातील विनानिविदा झालेल्या खरेदीवर ताशेरे ओढलेले आहेत. मग हे शासन आदिवासींच्या बाबतीत किती संवेदनशील आहे असा आम्हाला प्रश्न पडतो ? 50 लाख रु.च्या वरील खरेदीसाठी ई-निविदा काढल्या पाहिजेत अशी वित्त विभागाची मार्गदर्शक तत्वे आहेत.

अस्सुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

....नंतर श्री. गिते....

श्री.रामदास कदम....

या गोष्टी आदिवासी विकास विभागाकडून पाळल्या जात नाहीत. सर्व गोष्टी मॅनेज करुन केल्या जातात. गेल्या वर्षाच्या अनुसूचित जनजाती सल्लागार समितीच्या बैठकीत माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी ई-निविदा पध्दतीने खरेदी करावी अशा प्रकारचे आदेश दिले होते. माननीय मुख्यमंत्र्यांचे आदेश धाब्यावर बसविण्याचे काम आदिवासी विकास विभागाकडून होत आहे हे मला या ठिकाणी आवर्जून सांगावे लागेल.

सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाने कुपोषित बालकांच्या अनुषंगाने एक धक्कादायक अहवाल सरकारला दिलेला आहे. कुपोषित बालकाचा घास कंत्राटदारांच्या घशात अशा प्रकारचे वाक्य सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीच्या तोंडातून बाहेर येते तर या बाबतीत या ठिकाणी काय बोलावयाचे असा प्रश्न आमच्या समोर उभा राहिला आहे. कोटयावधी रुपयांच्या घोटाळयांमुळे महाराष्ट्राची बेअब्रू झाली. प्रगत महाराष्ट्रात कुपोषित बालकांची स्थिती ओरिसा,छत्तीसगड पेक्षाही दारुण आहे हे पुन्हा स्पष्ट होण्याचे काम या सरकारच्या माध्यमातून झाले आहे.

सभापती महोदय, कुपोषणावर आळा घालण्यासाठी 11 कोटी रुपयांचे लिक्वीड निविदा न काढता तीन दिवसात खरेदी करण्यात आले. 11 कोटी रुपयांची लिक्वीड खरे्दी निविदा न काढता तीन दिवसात का करण्यात आली, या संदर्भातील पैसे कोणाच्या खिशात गेले, कोणाच्या फायद्यासाठी ही खरेदी करण्यात आली या गोष्टींचा खुलासा माननीय आदिवासी विकास मंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा. अधिकारी, राजकारणी आणि ठेकेदार यांच्या संगनमताने हा आदिवासींचा पैसा लुटण्याचे काम या राज्यात होत आहे.

सभापती महोदय, अंगणवाडीतील 43 लाख बालके तसेच गरोदर स्तनदा माता यांना पूरक पोषण आहार देण्यासाठी आलेल्या तरतुदीतून 550 कोटी रुपयांचा गैरव्यवहार झालेला आहे. या संदर्भात सर्व पुरावे उपलब्ध असतानाही गैरव्यवहार करणाऱ्यांवर अद्यापपर्यंत का कारवाई होत नाही, त्या व्यक्तींना पाठीशी का घातले जाते आहे याबाबतची माहिती माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावी.

सभापती महोदय, राज्यात 550 कोटी रुपयांचे कंत्राट तीन महिला मंडळांना दिले गेले. दोन वर्षापासून ही योजना चालू आहे. उपमा, शिरा पीठ, सुकडी या खाद्यांचा बंद पिशवीतून वर्षातून सहा वेळा पुरवठा केला जातो. बालक व मातेसाठी प्रतीदिन 5 रुपयांप्रमाणे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

वर्षात 1800 रुपये खर्च केला जातो. या तीन महिला मंडळाच्या नावाने या योजनेवर 550 कोटी रुपये खर्च झालेला आहे. त्या खर्चाचा अहवाल आम्हाला सभागृहात दिला तर बरे होईल.

सभापती महोदय, अंगणवाडीशी निगडीत टेक होम या पूरक पोषण आहारामध्ये गैरव्यवहार झाल्याची याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली. त्यावर चौकशीसाठी आयोग नेमला होता. आयोगाने या गैरव्यवहाराबाबतीत गंभीर स्वरुपाचे निष्कर्ष काढले आहेत. महिला व बालकल्याण विभागाने इरादा पत्रे भरुन धुळे येथील महाराष्ट्र महिला सहकारी गृहउद्योग संस्था, लातूर येथील व्यंकटेश महिला सहकारी गृहउद्योग संस्था, नांदेड येथील महालक्ष्मी महिला बहुउद्योगीय सहकारी संस्था यांना पूरक पोषण आहार पुरविण्याचे कंत्राट दिले. या तिन्ही मंडळांनी संस्था स्थापन करताना महिला असा शब्द वापरला. ही महिला मंडळे नाहीत. महिला बचत गट देखील नाहीत. पूरक पोषण आहाराचे कंत्राट मिळावे म्हणून या तिन्ही मंडळांनी महिला असा शब्द वापरला, महिलांचे मंडळ भासविले आणि हे कंत्राट मिळविले. हे निष्कर्ष आयोगाने काढलेले आहेत.रामदास कदम यांनी हे निष्कर्ष काढलेले नाहीत. या मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सहकार कायद्याचे उल्लंघन करुन उप समित्या स्थापन करुन त्यावर नातेवाईकांची वर्णी लावली. त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याऐवजी त्यांना पुन्हा कंत्राट देण्याचे काम विभागाकडून होत आहे. या मंडळाच्या लोकांनी सरकारला फसविले आहे, विभागाचे मंत्री म्हणून आपल्याला फसविले आहे, म्हणून त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले पाहिजेत. त्यांना अटक करुन जेलमध्ये पाठविले पाहिजे. महिला असा शब्द वापरुन महिला मंडळांच्या नावाने आदिवासी महिलांचा पैसा हडप केला आहे. या मंडळावर काय कारवाई केली जाणार आहे या बाबतचा देखील माननीय मंत्र्यानी आपल्या उत्तराच्या भाषणात खुलासा करावा.

सभापती महोदय, ही सगळी खरेदी झाली, त्या खरेदीच्या नमुन्यांचे दिल्ली येथून टेस्टींग रिपोर्ट आणले. सदर खरेदी बाबत महाराष्ट्रातील प्रयोगशाळेत टेस्टींग करण्यात आहे, ते सगळे नमुने फेल गेले आहेत असाही निष्कर्ष आयोगाने काढला आहे. एवढा प्रचंड भ्रष्टाचार आदिवासी विकास विभागात होत असेल तर हे शासन डोळे झाकून काम करीत आहे काय याबाबतचा देखील खुलासा माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात करावा.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाचा दीड लाख क्विंटल तांदूळ गोदामामध्ये

3...



ABG/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 10:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

सडून गेला. जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीत पालक मंत्री डॉ.विजयकुमार गावित यांनी ही बाब मान्य केली आहे. एका बाजूला राज्यातील आदिवासींच्या पोटात भुकेने आगडोंब उसळतो आहे आणि दुसऱ्या बाजूला मात्र दीड लाख क्विंटल तांदूळ सडतो आहे ही अतिशय निंदनीय बाब आहे. एवढया प्रचंड प्रमाणात तांदूळ सडला या गोष्टीस कोण जबाबदार आहे, जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द काय कारवाई करण्यात येणार आहे याची माहिती माननीय आदिवासी विकास मंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावी.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाकडे जनरेटर, आयुर्वेदिक बिस्किटे, ड्रेस, स्वेटर, पुस्तके, लोखंडी पेटी, इंग्रजी पुस्तके, बेंचेस इत्यादी वस्तूच्या खरेदीसाठी 350 कोटी रुपये प्राप्त झाले होते, त्यापैकी 120 कोटी रुपयांचीच प्रत्यक्षात सदर साहित्यांची खरेदी झालेली आहे. या खरेदीच्या बाबतीत निविदा कशा पध्दतीने काढल्या, सदर साहित्य पुरविण्याबाबत कोणाला कंत्राट देण्यात आले, खरेदी संदर्भात न्यायालयाने ज्यांच्यावर ठपका ठेवला आहे, आयोगाने देखील ज्यांच्यावर ठपका ठेवला आहे त्यांनाच सदर साहित्य पुरविण्याचे कंत्राट देण्यात आले आहे काय, या बाबतीत वस्तुस्थिती नेमकी काय आहे याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात करावा.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाकडून नेमके कोणासाठी काम केले जाते आहे ही गोष्ट या निमित्ताने स्पष्ट होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, कुपोषित बालकांना अन्न मिळण्यासाठी का अडचणी येतात, या योजनेत घोटाळा कसा होतो हे शोधण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने तज्ज्ञांची समिती नेमली होती. त्या समितीने अहवालात नेमके काय म्हटले आहे या बाबतची माहिती माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात सांगावी. अन्नधान्य पुरवठा करणारे ठेकेदार, कंत्राटदार, महिला मंडळाच्या संस्था आणि काही राजकारणी व अधिकारी यांचे साटेलोटे करुन आदिवासींचे पैसे लाटले जात आहेत असे तज्ज्ञ समितीने अहवालात नमूद केलेले आहे. आदिवासी विकास विभागात अशा प्रकारचे घोटाळे होत आहेत आम्ही विरोधी पक्षाचे सदस्य आहोत म्हणून बोलत नाही. तज्ज्ञ समिती, सर्वोच्च न्यायालय यांनी हा निष्कर्ष काढलेला आहे. हे शासन या सर्व घोटाळयांवर पाघरुण टाकण्याचे काम करीत असेल तर ते बरोबर नाही. मांजर डोळे झाकून दूध पिते, तिला वाटते की, आपल्याला

4..

21-12-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) D-4

ABG/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 10:00

श्री.रामदास कदम...

कोणी बघत नाही अशा प्रकारे आदिवासी विकास विभागाचा कारभार सुरु आहे. माननीय आदिवासी विकास मंत्री आपण पंढरपूरला वारीमध्ये चालत जाता, तुम्ही चांगल्या प्रकारचे भजन म्हणता, कीर्तन म्हणता, ह.ब.भ.प.म्हणवून घेता. परंतु आदिवासींच्या मुळावर आपला विभाग उठला आहे त्याचे काय करावयाचे ? आपला स्वभाव आणि आपल्या विभागाकडून होत असलेले कामकाज यामध्ये विसंगती दिसून येते. याबाबतीत स्पष्टता होणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, एका गॅस शेगडीची बाजारातील किंमत 500 ते 800 रुपये असताना प्रति शेगडी 1400 रुपये भावाने खरेदी केली. शेगडया खरेदीमधील दलाली कोणी खाल्ली ? आदिवासींच्या पैशांमध्ये दलाली खाण्याचे काम सरकार करीत आहे. 1लाख शेगडया गोदामात पडून आहेत.

यानंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सन 2005 पासून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सुरु असलेले सत्र

**मु.शी.** : सन 2005 पासून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सुरु असलेले सत्र या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. दीपक सावंत, श्री. रामनाथ मोते, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.चंद्रकांत पाटील, ॲड. अनिल परब, सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर, विनायक राऊत, डॉ.रणजित पाटील, श्री. सुमंत गायकवाड, ॲड. आशिष शेलार, वि.प.स. यांचा प्रस्ताव
( चर्चा पुढे सुरु )

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, केला इशारा जाता जाता याप्रमाणे विदर्भाच्या शेतकऱ्यांच्या संदर्भात विधानपरिषद सभागृहाची अवस्था झालेली आहे. खालच्या सभागृहात काय झाले त्याचा या सभागृहाशी संबंध नसला तरी विदर्भातील शेतकऱ्यांच्या प्रश्नावर त्या सभागृहात मध्यरात्री 2.00 वाजेपर्यंत चर्चा सुरु होती. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस असताना काही तासामध्ये कामकाज आवरते घेण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत चर्चा घेण्यात येत आहे.

सभापती महोदय, मी मागील वेळी बोललो होतो, विदर्भ असा की मराठवाडा असो, कृषी मंत्री अत्यंत कार्यक्षमतेने बियाणे आणि खताच्या वितरणाकडे लक्ष देत असल्यामुळे पूर्वी खते आणि बियाण्यांची उलाढाल ज्या बेकायदेशीर पध्दतीने होत होती त्याला बऱ्याच प्रमाणात आळा बसला आहे. आजच्या प्रस्तावामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बि-बीयाणे, खते, अवजारे आदी विषयांचा समावेश आहे. विदर्भातील आमचे मित्र श्री.किशोर तिवारी यांच्याकडून प्राप्त होणारी माहिती शासनाकडे देखील असते. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबाबत त्यांनी संपूर्ण भारताचा अभ्यास केलेला आहे. त्यांच्या माहितीनुसार महाराष्ट्रामध्ये 2004 ते 2010 या काळात 8004 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात शासनाने आर्थिक पॅकेज जाहीर केल्यानंतर त्या बाबतीत सभागृहात चर्चा देखील झालेली आहे. नेमेचि येतो पावसाळी या उक्तीप्रमाणे हिवाळी अधिवेशनात शेतकऱ्यांचे प्रश्न आणि दुष्काळ या विषयावर आम्हाला चर्चा हवी

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

अशी आम्ही मागणी करतो. सरकारकडून कोणतेही ठोस धोरण पुढे येत नसल्यामुळे आम्हाला ही मागणी करावी लागते. काही गोष्टींबाबत कायमस्वरुपी उपाययोजना जाहीर होणे आवश्यक असताना सरकार त्याकडे दुर्लक्ष करते ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, अवकाळी पाऊस आणि अतिवृष्टीमुळे निर्माण झालेली परिस्थिती तसेच पाऊस न येणे या फेऱ्यामध्ये शेतकरी वर्ग सापडला आहे. माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी आपल्या भाषणातून ग्लोबल वॉर्मिंगबद्दल उद्‌बोधक मार्गदर्शन केले आहे. पॅकेज हे मानव निर्मित असून ते शेतकऱ्यांच्या मदतीकरिता जाहीर केले जाते. सरकारने जाहीर केलेल्या पॅकेजचे काय झ ाले याबाबत भयावह वस्तुस्थिती भविष्यात आपल्यासमोर येण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रस्तावातील विषयाबाबत अनेक खात्यांचा संबंध असल्यामुळे एकतर्फी निर्णय होणे शक्य होत नाही. वेगवेगळ्या खात्यात झालेल्या गैरकारभाराचा फटका शेतकऱ्यांना भोगावा लागतो. सरकारच्या विविध खात्यामध्ये एकसंघपणाने मॉनिटरिंग करणे शक्य होत नसल्यामुळे पॅकेज जाहीर करणे थांबत नाही, त्यामुळे चर्चा करणे थांबत नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, कापूस, धान आणि सोयाबीन या पिकांचा विषय आमच्या दृष्टीने कायम चिंतेचा बनलेला आहे. गेल्या दीड दोन महिन्याच्या काळात ऊसाचे आंदोलन महाराष्ट्रात झाल्याचे आपण अनुभवले आहे. माननीय विरोधी पक्षनेते आणि मी देखील आंदोलनामध्ये सहभागी झालो होतो. ऊस उत्पादकांना अधिक भाव मिळावा म्हणून आंदोलन सुरु होते. एका बाजूला 50 ते 60 एकर क्षेत्रात ऊस लागवड करणारा शेतकरी , 300 ते 400 एकर क्षेत्रात ऊस लागवड असणारे मंत्री यांचा विचार केला तर लाखाच्या घरात लोळणारा आंदोलनातील शेतकरी आणि दुसऱ्या बाजूला आपण पिकविलेल्या शेती मालाला मिळणाऱ्या पैशातून जगायचे कसे याची भ्रांत असणारा विदर्भातील शेतकरी या संदर्भात कृषी विभागामार्फत कोणता धोरणात्मक निर्णय घेतला जाईल हा मुद्दा आहे. कापूस, धान पिकाला अधिक भाव मिळण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. एका एकर क्षेत्रात 22 ते 23 क्विंटल कापूस पिकविला जात आहे. कापसाचे उत्पादन घेण्यास सुरुवात झाली त्यावेळी एकरी किमान 10 क्विंटल उत्पादन निघाले पाहिजे अशी अपेक्षा होती. विदर्भातील एका शेतकऱ्याने अभ्यासपूर्ण पध्दतीने एकरी 20 क्विंटल बी.टी.कॉटनचे उत्पादन केले. त्या अनुरोधाने भावाचे चक्र सुरु झाले. किमान 5000 ते 5500 रुपये क्विंटलला भाव मिळाला पाहिजे अशी

..3..



SGB/ D/ KTG/पूर्वी श्री.गिते 15:30

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

शेतकऱ्यांची मागणी होती. अशा वेळेला सरकारने 3435 रुपये क्विंटलला भाव जाहीर केला. या वर्षी शेतकऱ्यांचे आंदोलन होऊ नये म्हणून सुरुवातीलाच सरकारने 3960 रुपये भाव जाहीर केला. कापसाला खऱ्या अर्थाने 6000 रुपये प्रती क्विंटल भाव मिळाला पाहिजे अशी मागणी झाली त्यावेळी सरकारने 3960 रुपये भाव जाहीर केला. आंध्रप्रदेशातील व्यापाऱ्यांनी राज्याच्या सीमेवर येऊन 4000 रुपये क्विंटल या दराने कापूस खरेदी करण्यास सुरुवात केली.

सभापती महोदय, सोयाबीनचा विषय पुढे आला. किमान 3000 रुपये प्रती क्विंटल भाव जाहीर झाला पाहिजे अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती. सध्या 2200 ते 2300 रुपये प्रती क्विंटल भाव दिला जात आहे. सुरुवातीला 2700 रुपयांपर्यंत भाव दिला गेला होता. काही सौदे शेतकऱ्यांच्या बांधावर झालेले आहेत, ते शेतकरी अडचणीत आले. एक गोष्ट माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या नजरेतून सुटली कशी याचे मला आश्चर्य वाटते. विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशातील कापूस उत्पादक शेतकरी यांच्या संदर्भात वस्त्रोद्योग धोरणाबाबत चर्चा झाली. माननीय मुख्यमंत्र्यांकडे आम्ही सातत्याने आग्रह धरल्यानंतर वस्त्रोद्योग धोरण मांडण्यात आले. माननीय मुख्यमंत्र्यांनी "कॉटन हब" असा शब्द वापरला होता. ज्या भागात मोठ्या प्रमाणात कापूस पिकतो तेथेच कापसावर प्रक्रिया करण्याचा निर्णय घेऊन कापड उद्योगाला चालना देण्याची त्यांनी सभागृहात घोषणा केली होती. आम्हाला असे वाटले की, मुंबईतील कापड गिरण्या बंद झाल्यामुळे लाखो कामगार बेकार झाले, विदर्भामध्ये कापसावर प्रक्रिया करुन कापड तयार करणारे उद्योग सुरु झाले तर 22 लाख सुशिक्षित तरुणांना रोजगार उपलब्ध होईल. नव्याने काही लूम्स सुरु होतील. त्या माध्यमातून उद्योग सुरु होतील. परंतु जाहीर झालेल्या धोरणाचा पाळणा हललेला आम्हाला दिसून आला नाही. वस्त्रोद्योग मंत्र्यांनी या संदर्भात ठोस भूमिका सभागृहात मांडणे आवश्यक आहे. कापसाला भाव वाढवून मिळावा म्हणून मागणी होत असताना या विदर्भात कापसावर प्रक्रिया करुन कापड तयार करणारे उद्योग सुरु झाले तर हजारो हाताना काम मिळेल.

सभापती महोदय, थेट विदेशी गुंतवणुकीबद्दल खूप कौतुक झाले. देशाच्या पार्लमेंटचे कामकाज थेट विदेशी गुंतवणुकीच्या मुद्यावरुन 15 दिवस बंद पाडण्यात आले. शेवटच्या प्रयत्नात चर्चा निर्माण झाली आणि जितं मया, जितं जया करुन सरकारने दोन्ही सभागृहात प्रस्ताव मांडला. मायावती आणि मुलायम सिंह यांचे भांडण आपण रोज पहात होतो.

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वीज दरवाढीमुळे निर्माण झालेली परिस्थिती व आदिवासी विकास विभागातील खरेदीत झालेला भ्रष्टाचार

**मु. शी.** : वीज दरवाढीमुळे निर्माण झालेली परिस्थिती व आदिवासी विकास विभागातील खरेदीत झालेला भ्रष्टाचार या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र. पाटील, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ. दीपक सावंत, श्री. रामनाथ मोते, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. चंद्रकांत पाटील, ॲड. अनिल परब, सर्वश्री विजय गिरकर, विनायक राऊत, डॉ. रणजित पाटील, श्री.गोपीकिसन बाजोरिया, ॲड. आशिष शेलार यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु..........

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये विरोधी पक्षाने मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. मी सभागृहाचा अधिक वेळ न घेता महत्वाचे 3 मुद्दे आपल्या माध्यमातून सरकारच्या निदर्शनास आणून देणार आहे.

सभापती महोदय, वीज बिलाच्या बाबतीत काल जी चर्चा झाली होती त्या चर्चेत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांचा मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरामध्ये खुलासा करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, राज्य सरकारने मराठवाडयातील 3299 गावे 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी असल्याचे जाहीर केलेले आहे. ज्या गावांची आणेवारी 50 टक्क्यापेक्षा कमी आहे त्या गावात दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे तेथील शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन खंडित करणार नाही, अशी घोषणा मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात करावी, अशी विनंती आहे. "जी" कॅटेगरीमध्ये मराठवाडयातील बहुतेक तालुक्यांचा समावेश आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. काल या विषयावर सभागृहात चर्चा झाली होती तसेच या चर्चेला मंत्री महोदयांनी उत्तरही दिले होते. त्या उत्तराने सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले होते. दुष्काळाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांचे एकदा समाधान झालेले असताना आज पुन्हा तोच मुद्दा ते कसे काय उपस्थित करु शकतात ?

..2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, आज जो नियम 260 चा प्रस्ताव देण्यात आलेला आहे. त्यामध्ये वीज दराचा विषय व आशय असल्यामुळे मी त्या विषयावर माझे विचार व्यक्त करीत आहे. विरोधी पक्षाने मांडलेल्या प्रस्तावाचे गांभीर्य त्यांनाच नाही. कारण, माननीय विरोधी पक्ष नेते सुध्दा या चर्चेसाठी हजर नाहीत.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलत असतात.)

सभापती महोदय, "जी" कॅटेगरीतील तालुक्यांना संध्याकाळी 7 ते 10 वाजेपर्यंत वीज दिली जात नाही. आता परीक्षेचे दिवस आहेत. परीक्षेचे दिवस असताना 7 ते 10 या वेळेत वीज नसल्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यास करता येत नाही. आपल्याकडे वीज उपलब्ध आहे, वीज शिल्लक आहे, असे आमच्या ऐकण्यात आले आहे. जे भाग नियमितपणे वीज बिल भरणा करीत नाहीत, अशा भागांना "जी" कॅटेगरीमध्ये टाकले जाते व या "जी" कॅटेगरीतील भागांना सायंकाळी 7 ते 10 या वेळेत वीज दिली जात नाही. परीक्षेचा कालावधी असल्यामुळे तसेच दुष्काळी भागातील गावे असल्यामुळे या गावांतील वीज पुरवठा सायंकाळी 7 ते 10 या वेळेत खंडित केला जाणार नाही, अशी घोषणा मंत्री महोदयांनी करावी, अशी मी या प्रस्तावाच्या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, परळी औष्णिक वीज केंद्राची स्थापीत क्षमता 1130 मे.वॅट आहे. परंतु या केंद्रातून 600 ते 650 मे.वॅटच्या वर वीज निर्मिती होत नाही. या वर्षी पाणी कमी असल्यामुळे या ठिकाणावरुन केवळ 450 मे.वॅट वीज निर्माण केली जात आहे. विजेची जनरेशन कॉस्ट 3 रुपये 30 पैसे असताना आपण बाहेरुन 3 रुपये 90 पैसे प्रती युनीट या दराने वीज विकत घेतो. पर्यायाने प्रती युनीट मागे 60 पैशांचे नुकसान सामान्य माणसाचे, शासनाचे होत आहे. त्यामुळे परळीचे औष्णिक विद्युत केंद्रातून पूर्ण स्थापीत क्षमतेएवढी वीज निर्मिती सुरु करावी, अशी माझी सूचना आहे. या केंद्राला पाणी उपलब्ध झाले तरी तयार होणाऱ्या विजेची प्रॉडक्शन कॉस्ट कमी होत नाही. दिवसेंदिवस विजेची निर्मिती जेवढी कमी होईल, तेवढी विजेची कॉस्ट वाढत जाणार आहे. परळी औष्णिक विद्युत केंद्रातून 60 टक्क्यांपेक्षा जास्त प्रमाणात वीज कधीही निर्माण झालेली नाही. परळी औष्णिक विद्युत केंद्रातून नेहमीच 40 टक्क्यांनी वीज कमी निर्माण होत असते. परंतु, खाजगी वीज केंद्रातून मात्र 110 टक्क्यापर्यंत वीज निर्माण होत असते. यामुळे 60 पैसे प्रती युनीट एवढ्या अधिक दराने आपण जी वीज खरेदी करतो, त्यामुळे पर्यायाने शेतकऱ्यांचे आणि शासनाचे

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SGJ/ KTG/ KTG/ D/ D/ प्रथम श्री. भोगले.... 10:20

नुकसान होते. या संदर्भात शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. केवळ, परळी औष्णिक विद्युत केंद्रातूनच कमी प्रमाणात वीज निर्माण होत आहे, असे नाही तर शासनाच्या सर्व वीज केंद्रांची अशीच परिस्थिती आहे. त्यामुळे या विषयाबाबत शासनाने विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मी जे मुद्दे उपस्थित केले आहेत, त्या मुद्यांचा खुलासा मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषाणात करावा, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------

....4.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यात विजेचे दर सन 2010-2011, 2011-2012 व 2012-2013 या 4 वर्षाच्या कालावधीत 13 वेळा वाढविण्यात आलेले आहेत. विजेचे दर मोठया प्रमाणात वाढवल्यामुळे औद्योगिक क्षेत्रात असंतोष निर्माण झाला. या गोष्टीचा निषेध म्हणून त्यांनी आपल्या कंपन्या संपूर्ण एक दिवस बंद ठेवल्या होत्या.

सभापती महोदय, ज्या राज्यांना कोळसा उपलब्ध होत नाही, अशा गुजरात व कर्नाटक राज्यामधील लोकांना स्वस्त दराने वीज मिळू शकते. आपल्याकडे पुरेशा प्रमाणात कोळसा उपलब्ध असतांना आपल्या लोकांना वीज महागड्या दराने कशी दिली जाते, याचा विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रात घरगुती वापराच्या विजेसाठी 7 रुपये 26 पैसे प्रती युनीट व उद्योगांसाठी 7 रुपये 68 पैसे प्रती युनीट, असा दर आहे. कर्नाटक राज्यात घरगुती वापराच्या विजेसाठी 5 रुपये प्रती युनीट तर उद्योगांसाठी 6 रुपये प्रती युनीट, असा दर आहे. गुजरात राज्यात घरगुती वापराच्या विजेसाठी 5 रुपये प्रती युनीट व उद्योगांसाठी 5 रुपये 50 पैसे प्रती युनीट, असा दर आहे. आंध्र प्रदेशामध्ये घरगुती वापराच्या विजेसाठी 5 रुपये 70 पैसे प्रती युनीट व उद्योगांसाठी 6 रुपये प्रती युनीट, असा दर आहे. नव्याने निर्माण झालेल्या छत्तीसगड राज्यामध्ये घरगुती वापराच्या विजेसाठी 4 रुपये 50 पैसे प्रती युनीट व उद्योगांसाठी 4 रुपये 85 पैसे प्रती युनीट, असा दर आहे. गोव्यात घरगुती वापराच्या विजेसाठी 4 रुपये 30 पैसे व उद्योगांसाठी 4 रुपये 50 पैसे प्रती युनीट, असा दर आहे.

सभापती महोदय, या राज्यांना वीज स्वस्त पडते तर आपल्या राज्यात कोळसा उपलब्ध असतांना आपल्याला वीज महाग का पडते ? वीज दरवाढीचा सर्वात जास्त फटका घरगुती वीज वापर करणाऱ्या ग्राहकांना बसतो. तसेच, लघुउद्योगांनाही बसतो. या शासनाचे पाप सामान्य जनतेच्या माथी मारुन महाराष्ट्रातील लोकांना लुटले जात आहे, हा खरा या प्रस्तावातील विषयाचा आशय आहे.

...5....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.............

सभापती महोदय, आपण पहिल्यांदा "डी " ग्रेडचा कोळसा वापरत होतो. त्यामध्ये मोठया प्रमाणात उष्मांकाचे प्रमाण होते. या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चाही झालेली आहे. परंतु आता आपण "एफ " ग्रेडच्या कोळशाचा वापर वीज निर्मितीसाठी करीत आहोत. "एफ " ग्रेड कोळशामध्ये 1000 टक्क्यांनी उष्मांकाचे प्रमाण कमी असते. या "एफ" ग्रेडच्या कोळशात कमी उष्मांक असतो. मात्र, राख मोठ्या प्रमाणात निर्माण होते. तसेच "एफ" ग्रेडचा कोळसा वापरल्यामुळे जास्त खर्च येतो व उत्पन्नाचे प्रमाण कमी होते. परिणामी, वीज महाग होत चालली आहे.

सभापती महोदय, सन 2007-2008 मध्ये वीज उत्पादन क्षमता 100 टक्के करण्यात आलेली आहे, असे सांगण्यात आले होते. परंतु प्रत्यक्षात ती 76.10 टक्केच होती.

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस..

अशाप्रकारचे आमच्याकडील कार्यालये बंद होत असतील, कनिष्ठ अभियंत्यांची पदे रिक्त राहणार असतील तर मग आपण विदर्भाला वीज कशाला देता ? कशाला आमच्यावर उपकार करता ? आम्ही कोळसा देणे बंद करतो आणि आपल्याला वीज बंद करायला लावतो. ज्या विभागातून उत्पन्न मिळते,जेथून कच्चा माल मिळतो त्या विभागावर आपण अन्याय करीत आहात. तेव्हा माझी एकच मागणी आहे की, विदर्भ एकदा मोकळा करावा आणि आपल्यातून आम्हाला स्वतंत्र करावे एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव आणलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, ऊर्जा आणि आदिवासी विभाग या विभागांच्या प्रश्नासंबधी प्रस्तावामध्ये उल्लेख आहे. महाराष्ट्र राज्याची सातत्याने प्रगती होत आहे आणि त्या ठिकाणी झपाट्याने नागरिकरण वाढत आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने वीज निर्मिती करण्याच्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न सुरु केले आहेत. वेगवेगळ्या माध्यमातून वीज निर्मिती करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पवन ऊर्जेचा वापर मोठ्या प्रमाणावर केलेला आहे. परंतु औद्योगिकीकरण आणि नागरिकरण इतक्या झपाट्याने वाढत आहे की, आपणास आण्खी वीज निर्मिती केल्याशिवाय पर्याय नाही. आज जवळपास 50 टक्के नागरिकरण झालेले आहे. त्यामुळे विजेची गरज सातत्याने वाढत आहे. यावर एकच उपाय म्हणजे आपणास अधिक वीज निर्मिती केली पाहिजे.

सभापती महोदय, या ठिक्‌ाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, विजेची गळती थांबली पाहिजे. ती गोष्ट बरोबर आहे. आपणास वीज वितरण व्यवस्था अधिक निर्दोष करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, वीज निर्मितीसाठी राज्य शासन प्रयत्न करीत आहे परंतु त्यामध्ये राजकारण आणले जात आहे. आपणा सर्वांना तो विषय माहीत आहे. त्या विषयावर सभागृहात अनेकदा चर्चा झालेली आहे. मग त्यामध्ये जैतापूरचा प्रकल्प असेल, त्यापूर्वीचा दाभोळचा प्रकल्प बंद पाडण्याचा प्रयत्न झाला त्यानंतर तो पुन्हा सुरु करण्यात आला. राज्याच्या आणि देशाच्या दृष्टीने अतिशय महत्वाच्या असलेल्या या प्रकल्पांमध्ये राजकारण आणून ते बंद पाडले जात आहेत. आज विजेची टंचाई लक्षात घेता जैतापूरचा अणुऊर्जा प्रकल्प होणे खूप गरजेचे आहे. आपणास देशाच्या विजेची गरज भागवावयाची असेल तर अणुऊर्जेपासून वीज करण्यापासून पर्याय नाही. अणुऊर्जा प्रकल्प सुरक्षित असल्याची हमी विविध शास्त्रज्ञांनी दिलेली आहे. परंतु त्याची बाजू ऐकून न घेता केवळ राजकारणासाठी विरोध करण्याचे धोरण आमच्या विरोधी पक्षानी सोडले तर आपणास निश्चितपणे वीज निर्मिती वाढविता येईल आणि आघाडी सरकारने भारनियमन रद्द करण्याचे जे आश्वासन दिलेले आहे ते निश्चितपण पूर्ण होऊ शकेल.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे...

सभापती महोदय, प्रस्तावातील दुसरा विषय आदिवासी विकास विभागाशी संबंधित आहे. राज्यात 1200 आदिवासी आश्रमशाळा आहेत याबद्दल महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन केले पाहिजे. लोकसंख्येच्या प्रमाणात त्याचे आर्थिक नियोजन केले जाते. 1200 आदिवासी आश्रमशाळांमध्ये लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आपणास त्या समाजाची खऱ्या अर्थाने उन्नती करायची असेल तर त्यांना उत्तम दर्जेदार शिक्षण देण्यावाचून पर्याय नाही. तेव्हा आदिवासी मुला-मुलींना उत्तम दर्जेदार शिक्षण देण्याचे काम आदिवासी आश्रमशाळेत झाले पाहिजे अशी माझी आदिवासी विकास विभागाच्या मंत्री महोदयांना विनंती आहे. आपण संख्या खूप वाढविली परंतु त्या ठिकाणी अधिक काम करण्याची गरज आहे, दर्जा वाढविण्याची गरज आहे.

सभापती महोदय, आदिवासी आश्रमशाळांच्या अनेक मागण्या आहेत आणि त्या वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. स्त्रिया आणि मुलींवर होणाऱ्या अत्याचाराचे वाढते प्रमाण लक्षात घेता मुलींच्या आश्रमशाळेत महिला अधीक्षिका असावी ही मागणी त्यांच्याकडून किती तरी वर्षापासून केली जात आहे, परंतु आमच्या मागणीकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे. तेव्हा आमची ही मागणी शासनाने पूर्ण करावी अशी विनंती करतो आणि आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझ भाषण पूर्ण करतो.

-------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, वीज आणि आदिवासी विभाग या विभागाच्या प्रश्नासंबधी प्रस्तावामध्ये उल्लेख आहे. मी आदिवासी विकास विभागावर बोलणार आहे.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागामध्ये सहा हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झ ाला. हा भ्रष्टाचार एका वर्षात झालेला नसून तो मागील तीन वर्षात झालेला आहे. न्यायमूर्ती विद्याधर कानडे आणि न्यायमूर्ती प्रमोद कोदे यांच्या खंडीपीठासमोर श्री.बळीराम मोतीराम यांनी एक जनहित याचिका दाखल केली होती. त्यावेळी ख्ंडपीठाने सांगितले की, जर दरवर्षी दोन हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असेल तर ही केस मागील तीन वर्षातील आहे, तेव्हा हा सहा हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार असू शकतो. हे खंडपीठाचे स्टेटमेंट आहे, आपणास पाहिजे असेल तर त्याची कॉपी आपणास देतो. न्यायालयाने आपल्या सहा फाईल्स जप्त केलेल्या आहेत. आपणास त्या फाईल्सची फोटो कॉपी देखील काढू दिली नाही. जर न्यायालयाने असे म्हटले असेल तर त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक क्रमांक 26 वर "आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे जेवण दिल्याबाबतचा" तारांकित प्रश्न आहे. शासनाने उत्तरामध्ये म्हटले आहे की, आदिवासी आश्रमशाळेत जेवणात काचेचे तुकडे, दगड आढळल्याची बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द झाली त्याची चौकशी केल्यानंतर त्यामध्ये सत्यता आढळून आल्यानंतर संस्थेला कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे." याचा अर्थ आपण आश्रमशाळेतील मुलांना चांगल्या दर्जाचे जेवण देखील देत नाही.

सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील मोखाडा येथील पळसुंडे आश्रमशाळेला मी स्वत: भेट दिली असता तेथील सोलर पॅनल मागील आठ दिवस बंद असल्याचे मला आढळून आले. सोलर पॅनल बंद का आहे असे मी अधीक्षकांना विचारले असता त्यांनी मला सांगितले की, "वातावरण ढगाळ आहे, सूर्यप्रकाश मिळत नाही, पावसाळ्याचे दिवस आहेत. सोलर पॅनलवर वीज कशी तयार करणार ? " महाराष्ट्रातील प्रत्येक आश्रमशाळेत असे सांगितले जाते. जून-जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर या महिन्यात पाऊस पडतो. आकाशात ढग असल्यामुळे सूर्य प्रकाश मिळत नाही. ऑक्टोबर

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

महिन्यात थंडी असते आणि त्यावेळी विद्यार्थ्यांना गरम पाण्याची आवश्यकता असते. पण त्यांना गरम पाणी मिळत नाही. शासनाने करोडो रुपये खर्च करुन सोलर पॅनल उभारली आहेत ती फक्त ठेकेदाराला कमिशन देण्यासाठी आहेत असा माझा स्पष्ट आरोप आहे.

सभापती महोदय, पळसुंडे आश्रमशाळेत बायो-मेट्रीक सिस्टीम बसविली आहे. माननीय मंत्री महोदयांनी या सभागृहात सांगितले होते की, आम्ही सर्व आश्रमशाळेत बायो-मेट्रीक सिस्टीम बसविली आहे. ती बायो-मेट्रीक मशीन माझ्या गाडीत आहे. तीन वर्षापूर्वी मी सभागृहात अशीच एक वस्तू आणली होती तेव्हा माननीय सभापतींनी मला सांगितले होते की, अशाप्रकारच्या वस्तू सभागृहात आणू नका म्हणून मी ती बायो-मेट्रीक मशीन येथे आणलेली नाही. वाटल्यास ती मशीन मी आपल्या कार्यालयात देतो. त्या बायो-मेट्रीक मशीनच्या मागे कोणत्याही कंपनीचे नाव नाही. ही मशीन कोठून खरेदी करण्यात आली ? त्या बायो-मेट्रीक मशीनमध्ये लहान लहान मुलांची बोटे जातात काय ? या बायो-मेट्रीकवरील नोंदी नुसार आपण विद्यार्थ्यांना उपस्थिती भत्ता देतो. आता आपण ती पध्दत बंद केलेली आहे. आता तो भत्ता दुसऱ्या हेडखाली दिला जातो. शिक्षक मुलाचे बोट मशीनवर दाबून ठेवतो मग त्याच्या बोटाचे इम्प्रेशन येते. आपण अशाप्रकारची कामे करता.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुधीर तांबे हे डॉक्टर आहेत. मी त्यांना आपल्यामार्फत विचारु इच्छितो की, आयुर्वेदीक बिस्कीटे असे कधी त्यांनी ऐकले होते काय ? आयुर्वेदिक औषधे देऊन सार्वजनिक आरोग्य विभागाचा जन्म गेला. परंतु आदिवासी विभागाने 22 कोटी रुपयांची आयुर्वेदिक बिस्किटांची खरेदी केलेली आहे. कशाला कागदावर खरेदी करता ?

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

मंत्रीमहोदय, तुम्ही लिक्विड प्रोटीन खरेदी केले. त्याबाबत या सभागृहामध्ये प्रचंड गदारोळ झाला होता. त्यावेळी माननीय श्री. हर्षवर्धन पाटील साहेब हे महिला व बाल विकास खात्याचे मंत्री होते आणि माननीय डॉ. विजयकुमार गावित साहेब हे आदिवासी विकास खात्याचे मंत्री होते. तुमचे प्रत्येक खाते लिक्विड प्रोटीन खरेदी करते, तुम्ही खरेदी करता, सामाजिक न्याय विभागामार्फत खरेदी केले जाते, शालेय शिक्षण विभागामार्फत खरेदी केले जाते, महिला व बाल विकास विभागामार्फत खरेदी केले जाते. तर मग इतके करोडो रुपयांचे लिक्विड प्रोटीन कुठे जाते? प्रोटीन युक्त पदार्थ खाल्यामुळे आदिवासी मुलांचे कुपोषण कमी झाले आहे, ती तंदुरुस्त व गुटगुटीत झाली आहेत, त्यांनी वेगळया प्रकारचे बाळसे धरले आहे असे आपण सांगता. सभापती महोदय, हा खेळ आता थांबविला पाहिजे. तुमच्या घरातील तुमच्या मुलाला, तुमच्या नातवाला हे लिक्विड प्रोटीन देऊन पहा. त्यावर काय लिहिले आहे ते वाचून पहा. माननीय सदस्य डॉ. तांबे साहेब सभागृहात उपस्थित आहेत त्यांनी त्या लिक्विड प्रोटीनच्या बाटलीवर काय लिहिले, कोणते घटक लिहिले आहेत ते सांगावे. मी सांगत असलेली माहिती असत्य असेल तर मी राजीनामा देऊन निघून जातो. त्या लिक्विड प्रोटीनने मुलांची तब्येत कशी सुधारणार आहे? तुम्हाला जर त्यांना द्यायचेच असेल तर प्रोटीनयुक्त पेप्टीन बिस्कीटे खायला द्या. त्यांच्या पोटामध्ये काही तरी प्रोटीन जाईल. परंतु अशाप्रकारचा खेळ आपण खेळू नका. तुम्ही पंढरीचे वारकरी आहात, तुम्हाला हे शोभत नाही. तिकडे हरिनामाचा जप करता आणि इकडे मुलांना लिक्विड प्रोटीन खायला घालता?

सभापती महोदय, तुमच्या काळात आश्रम शाळेतील 118 आदिवासी बालके एका वर्षामध्ये मेली याला तुम्ही जबाबदार आहात. त्याचे पाप तुमच्या डोक्यावर आहे. ही मुले सर्पदंशाने मरतात. तुम्ही बांधलेल्या आश्रमशाळांच्या दरवाजांना फटी आहेत, खिडक्यांना तावदाने नाहीत, छपरामधून आतमध्ये साप येतात. त्या सर्पदंश झालेल्या लहान मुलाला आश्रमशाळेचा अधीक्षक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कसा घेऊन जातो? मोटार सायकलवर त्याला पाठीमागे टाकतो किंवा सायकलवर घेऊन जातो. त्याला एखाद्या कापडाने आपल्या कमरेभोवती बांधतो व तसाच सायकलवरुन घेऊन जातो. तो मुलगा रस्त्यामध्ये केव्हा प्राण सोडतो हे त्या सायकल चालविणाऱ्याला किंवा मोटार सायकल चालविणाऱ्याला समजत नाही. आजच्या तारांकित प्रश्नामध्ये त्या संदर्भात प्रश्न विचारण्यात आला आहे. त्या प्रश्नाला उत्तर देतांना आपण म्हटले आहे की,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

"तोंडाला फेस आल्याचे शालेय प्रशासनाच्या लक्षात येताच तत्काळ तिला प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले" . त्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अँटी स्नेक व्हेनम नसते. याला तुम्ही जबाबदार असल्यामुळे आणि 118 मुले मारण्याचे पाप तुम्ही केल्यामुळे तुमच्यावरच कलम 302 खाली गुन्हा दाखल केला पाहिजे. तुमच्या आदिवासी विकास विभागावर गुन्हा दाखल केला पाहिजे.

सभापती महोदय, काही मुले अतिसाराने मेली तर काही मुले न्यूमोनियाने मेली आहेत. ही मुले न्यूमोनियाने कशी मेली आहेत? सोलर हिटर नसल्यामुळे थंडीमध्ये सुध्दा थंड पाण्याने आंघोळ करावी लागते, न्हाणीघर नसल्यामुळे नदीवर जाऊन नदीच्या पाण्यामध्ये मुलींनी आंघोळ करावयाची. त्या मुलांना अंगावर ओढण्याकरिता ब्लँकेट दिले जात नाही. तुम्ही त्या मुलांना स्वेटर पुरविल्याचे सांगत आहात. कोणत्या शाळेतील मुलांना स्वेटर पुरविले हे आपण आम्हाला दाखवा. तुम्ही सांगता आदिवासींना आम्ही किटकनाशक असलेली मच्छरदाणी देतो. कोणता आदिवासी मच्छरदाणीमध्ये झ ोपतो. गेल्या काही वर्षापासून फक्त कागदावरच करोडो रुपयांची खरेदी करीत आहात. माननीय सदस्य श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी मला सांगावे की, कोणत्या आश्रमशाळेतील मुलगी रात्री नाईट ड्रेस नेसून झोपते? तुम्ही थोडी तरी लाज ठेवा.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी शब्द जरा जपून वापरावेत. त्यांना पूर्ण वेळ चर्चा करण्याची व भाषण करण्याची परवानगी आहे. परंतु अशाप्रकारे लाज वगैरे असंसदीय शब्द वापरणे बरोबर नाही. ते आपण सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावेत. मी आपले सर्व ऐकून घेणार आहे व त्यावर उत्तर देखील देणार आहे.

डॉ. दीपक सावंत : लाज हा शब्द असंसदीय होऊ शकत नाही. सभापती महोदय, मी कधीही असंसदीय बोलत नाही.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, लाज हा संसदीय शब्द आहे. शासनाला जर लाज वाटत असेल तर शासनाने तसे काम करावे. शासनाला याची लाज वाटली पाहिजे की, या सर्व गोष्टींचे आपण उत्तरदायी आहोत. तर मग तुम्हाला लाज का वाटते?

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपल्याला जर तो शब्द कामकाजातून काढावयाचा असेल तर काढू शकता.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : ज्यावेळी 118 आदिवासी मुले मरतात त्यावेळी त्याची आपल्याला लाज वाटत नाही आणि लाज या शब्दाची आपल्याला लाज वाटते?

**तालिका सभापती** : ठीक आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मुलांना बसण्यासाठी दिल्या जाणाऱ्या मॅटमध्ये घोटाळा झाला आहे. विरोधी पक्ष नेते माननीय श्री. विनोद तावडे यांनी गॅसच्या बर्नरमध्ये घोटाळा असल्याचे सांगितले. गॅस बर्नर कसे पडले आहेत हे एबीपी माझा या न्यूज चॅनेलने टीव्हीवर दाखविले आहे. तुम्ही हे बर्नर कशासाठी खरेदी केले? गॅस सिलेंडरचे दर वाढल्यामुळे आता आश्रमशाळेला लागणाऱ्या गॅस सिलेंडरचे आपण काय करणार आहात? सरपण वापरणार काय? म्हणजे पुन्हा वृक्षतोड कायदा आपण मोडणार काय? तुमच्या आश्रमशाळांना गॅस सिलेंडर पुरविण्यासाठी आपल्या शासनाने विशेष तरतूद केली आहे काय?

सभापती महोदय, शासनाने निर्गमित केलेल्या जी.आर. मधील चार गोष्टी मी याठिकाणी सांगणार आहे. 1) वर्षातून एकदा वूलन जर्सी 2) बूट, सॉक्स आणि बनियन 3) वॉटर फिल्टर, प्रेशर कूकर 4) मुलींसाठी नाईट गाऊन आणि खेळाचे साहित्य पुरविले पाहिजे. सभापती महोदय, आपण 50 टक्के नाही तर 80 टक्के शाळांमधून मुलांना वरील साहित्य देत असाल तर मी राजीनामा देण्यास तयार आहे. तर मग तुम्ही हे कशासाठी लिहित आहात? या वस्तू खरेदी केल्यानंतर त्याचे पैसे कुठे जातात?

सभापती महोदय, शासनाने नवनीत प्रकाशनची स्पीकवेल ही पुस्तके विकत घेतली, नवनीत प्रकाशनच्या डिक्शनऱ्या घेतल्या. ही पुस्तके आपण कशी आणि कोणत्या कागदाचा वापर करुन घेतली? त्या पुस्तकांचे नंतर काय होणार आहे? मंत्रीमहोदय मी आपणास एकच गोष्ट सांगतो की, आपल्याला खरोखर वाटत असेल की, आपण आदिवासी विकास मंत्री आहात. आपल्या राज्य शासनाने पूर्वीचे स्वत: आदिवासी असलेल्या माननीय डॉ. विजयकुमार गावित साहेबांनी व्यवस्थित कारभार केला नाही म्हणून बिगर आदिवासी असलेल्या आपल्याला हे मंत्रीपद दिले आहे. हा आपल्याला मिळालेला सन्मान असून यामध्ये आपण खूप पुण्याईचे काम करु शकता परंतु आपण ते काम करीत नाही. आपण कुणाला कंत्राटे वाटली आहेत? आणि खरेदी काय करीत आहात?

सभापती महोदय, आश्रमशाळेतील मुलांना मांसाहार देणे आवश्यक असतांना कोणत्या आश्रमशाळेमध्ये मुलांना नियमितपणे अंडी व चिकन दिले जाते? जर दिले जात असेल तर आपण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

मला त्या ठिकाणी नेऊन दाखवावे. सभापती महोदय, याचबरोबर आदिवासींना दुभती जनावरे देण्यात आली त्याची माहिती याठिकाणी देतो. गेल्या वर्षी मेळघाटमध्ये रात्री 12 वाजता आदिवासींना जनावरे वाटण्यात आली. शासनाच्या जी.आर. नुसार आदिवासींच्या घरी जाऊन जनावरे वाटावयाची असतात. दोन गाई, दोन शेळया ज्या काही दिल्या जात असतील त्या देण्याबाबत माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे साहेब या ठिकाणी माझ्यापेक्षा जास्त चांगले सांगू शकतील. तुम्ही रात्री 12 वाजता सर्व भाकड जनावरे आणून ती एका चौकामध्ये उभी केली, त्या ठिकाणी चॅनेलच्या शूटिंग करणाऱ्या माणसाला सुध्दा बोलाविले आणि जनावरांचे वाटप करीत असतांना त्याचे शूटिंग केले. ज्या प्रकल्प अधिकाऱ्याने हे काम केले तो निघून गेला.

श्री.बबनराव पाचपुते (बसून) : जनावरांचे वाटप करणे मागील दोन वर्षापासून बंद केले आहे.

डॉ.दीपक सावंत : दोन वर्षापासून बंद आहे? ठीक आहे. मी आपल्याला त्या बाबतची तारीख आणि सर्व पुरावे सादर करतो. तुमच्या केबिनमध्ये येऊन तुम्हाला फोटो दाखवितो. तुमच्या मेळघाटच्या प्रकल्प अधिकाऱ्याने रात्री 12 वाजता ही जनावरे आदिवासींना दिली. तो लष्करामधून निवृत्त झाल्यानंतर वन विभागामध्ये कार्यरत होता, त्याला तिकडून उचलून आदिवासी विकास विभागामध्ये आणून बसविला. मी सांगत असलेली माहिती खरी आहे की नाही हे आपण मला सांगावे. सभापती महोदय, अशाप्रकारे आदिवासी विकास विभागामध्ये हा केवळ 4 हजार कोटींचा भ्रष्टाचार नसून हे तर हिमनगाचे टोक आहे. या शासनाने थोडी जरी जागरुकता दाखविली, थोडी जरी संवेदनशीलता दाखविली, या चार हजार कोटी रुपयांमधील एक रुपया जरी त्या आदिवासी मुलांपर्यंत पोहोचविला तर ते पुण्याईचे काम होईल. आश्रमशाळेतील 118 मुलांच्या मृत्यूला जबाबदार असलेल्या आदिवासी विकास विभागावर कलम 302 अन्वये गुन्हा दाखल करणे आवश्यक आहे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, औद्योगिक क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात विजेची दर वाढ झाली. त्यामुळे महाराष्ट्रातील आणि प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रातील उद्योगधंदे मोठया प्रमाणावर राज्याबाहेर जातील किंवा बंद पडतील अशी स्थिती निर्माण झाली आहे. प्रामुख्याने कोल्हापूर, सांगली, पुणे या भागामध्ये मोठया प्रमाणावर विजेच्या आधारावर सुरु असलेले उद्योग आहेत. सभापती महोदय, विजेची दरवाढ किती झाली आहे? यापूर्वी औद्योगिक क्षेत्रामध्ये 390 पैसे प्रति युनिट हा दर होता तो 506 पैसे झाला आहे. म्हणजे त्यामध्ये 69 टक्के दरवाढ झ ाली आहे. त्यामुळे या सर्व विभागामध्ये वार्षिक जवळ जवळ 6 टक्के प्रॉडक्शन कॉस्टमध्ये वाढ होणार आहे. यामुळे मोठया प्रमाणावर उद्योग महाराष्ट्राच्या बाहेर जावयास निघाले आहेत हा राज्याच्या दृष्टीने चिंतेचा विषय झाला आहे. वीज दरवाढीवर आपण तत्काळ उपाय योजना केली नाही , या संपूर्ण अधिवेशनामध्ये वीज दरवाढी बाबत काही घोषणा केली नाही .....

(अपूर्ण -- यानंतर श्रीमती रणदिवे)

,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील .. . .

तर मग मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे बंद पडतील किंवा बाहेर जातील. एकट्या पश्चिम भागातील कोल्हापूर आणि सांगली भागामध्ये फाऊंड्री इंडस्ट्रीमध्ये डायरेक्ट एम्प्लॉई हे 1 लाखापेक्षा जास्त कामगार असून त्यांच्यावर अवलंबून असलेले जवळजवळ 1 लाख अशी दोन लाख संख्या आहे. याठिकाणी विजेची दरवाढ मोठ्या प्रमाणात करण्यात आली. पण याबाबतीत नेमके काय झाले की, ज्यामुळे ही दरवाढ करण्यात येत आहे आणि त्याबाबतीत कोणती उपाययोजना केली तर ही दरवाढ कमी करता येईल याबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडली आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित असे म्हणाले की, आज आपल्याकडे वीज निर्मिती करण्यासाठी जी व्यवस्था आहे त्याबाबत सांगावयाचे तर ती व्यवस्था पूर्णपणे वापरली जात नाही. याबाबतीत 2010-2011 मधील सरासरी काढली तर त्यातून केवळ 55 टक्के वीज निर्मिती त्या-त्या ठिकाणी होत आहे. मग परळी असेल किंवा चंद्रपूरमध्ये असेल. त्यामुळे बाकीचे सर्व खर्च तेच रहातात आणि वीज निर्मिती कमी होते. तसेच आपण वीज निर्मिती पूर्ण क्षमतेने करत नसल्यामुळे आपल्याला 50 ते 75 पैसे प्रति युनिट जास्त दर द्यावा लागतो. राष्ट्रीय प्रकल्पासाठी 2 रुपये 31 पैसे दर आहे आणि महाराष्ट्रामध्ये वीज निर्मितीचा दर 3 रुपये 14 पैसे इतका होतो. त्यामुळे सगळयात महत्वाची बाब अशी आहे की, ज्या-ज्या ठिकाणी वीज निर्मितीची केंद्रे आहेत, ती जर आपण पूर्ण क्षमतेने चालविण्याचा विचार केला नाहीतर सामान्य ग्राहकाचा आणि उद्योजकांचा काय दोष आहे? त्यांना बाकीच्या राज्यापेक्षा अडीच ते तीन रुपये अशा जास्त दराने वीज मिळत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी वेगवेगळ्या राज्यांमध्ये विजेचे दर काय आहेत याची माहिती दिली असल्याने मी पुन्हा त्याबाबत बोलत नाही. परंतु महाराष्ट्रातील उद्योगांना सरासरी अडीच ते तीन रुपये अशा जास्त दराने वीज मिळते. महावितरणचे मध्यम व अल्प मुदतीच्या वीज खरेदीबाबत कोणत्याही प्रकारचे प्लॅनिंग नसल्यामुळे ती अल्प मुदतीसाठी 4 रु.10 पैसे आणि मध्यम मुदतीसाठी 4 रु.50 पैसे दराने घेतली जाते. वितरण गळतीच्या बाबतीत कोणतीही उपाययोजना केली जात नाही. पण वितरण गळतीचा जो चार्ज आहे तो डिस्ट्रीब्युट करताना मात्र प्रामुख्याने ग्राहकांमध्ये डिस्ट्रीब्युट करतो.पण ग्राहकांची संख्या मोठी असल्यामुळे तो चार्ज प्रत्येकाच्या वाट्याला कमी प्रमाणात येतो.संपूर्ण ग्राहकांच्या संख्येच्या तुलनेमध्ये एकूण ज्या इंडस्ट्री आहेत त्यांची संख्या 6 ते 10 टक्क्यापर्यंत असल्यामुळे त्यांच्यावर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील . . . .

जेव्हा आपण गळतीचा भार डिस्ट्रीब्युट करतो, तेव्हा तो जास्त प्रमाणात केला जात आहे. तसेच सर्वात महत्वाचे म्हणजे महावितरणचा एकूण प्रशासकीय खर्च पाहिल्यावर जर तो कमी केला नाहीतर आपल्याला यापेक्षाही जास्त दर द्यावे लागतील.

सभापती महोदय, एकंदर 14,226 कोटी रुपयांची थकबाकी आहे. पण याला थकबाकी म्हणावयाचे की आणखी काही म्हणावयाचे हा प्रश्न आहे. या थकबाकी वरील व्याजाचा भार सामान्य नागरीक आणि इंडस्ट्री यांच्यावर टाकला जात आहे. ज्याप्रमाणे महाराष्ट्रामध्ये मराठा आरक्षणाच्या बाबतीत मुद्दा निघाल्यानंतर मराठ्यांना कशासाठी आरक्षण द्यावयाचे असा मुद्दा नेहमी उपस्थित होतो. मराठ्यांची पूर्वी जी स्थिती होती, तशी ती आज राहिलेली नाही. गावातील सामान्य मराठा माणूस मरणाच्या स्थितीत आहे. तसेच पश्चिम महाराष्ट्राचा विकास झाला पाहिजे असे म्हणत असताना तेथील विकास प्रामुख्याने शेतीवर आधारीत आहे आणि आज आपण शेतीसाठी वीज देऊ शकत नाही. जर दिली तर ती वाढीव दराने दिली जाईल. पश्चिम महाराष्ट्राचा विकास प्रामुख्याने उद्योगांमुळे झाला.कोल्हापूर येथील इंडस्ट्री ही महाराष्ट्रातील सर्वात जुनी इंडस्ट्री मानली जाते. त्याचा दर अडीच रुपये, तीन रुपये प्रति युनिट जास्त केल्यामुळे वार्षिक सहा-सात टक्के प्रॉडक्शन कॉस्ट वाढत आहे. आज ग्रामीण भागामध्ये मराठ्यांची अशी स्थिती झाली आहे की, तो नावाला मराठा पण आज त्याला दोन वेळचे जेवण मुष्किल झाले आहे.

सभापती महोदय, तसेच पश्चिम महाराष्ट्राचा विकास असे म्हणत असताना जर आपण विजेचे दर कमी केले नाहीत तर तेथील संपूर्ण इंडस्ट्री बंद पडेल असे मला वाटते. त्यामुळे या संपूर्ण विषयामध्ये प्रामुख्याने आदिवासी आणि वीज याचा अंतर्भाव असला तसेच ग्राहकांना आणि उद्योगांना देण्यात येणाऱ्या विजेचा मुद्दा असला तरी एक दिवस जेव्हा महाराष्ट्रातील सर्व इंडस्ट्रीमधील वीज सामुहिकरित्या बंद केली जाते, त्यावेळी या विषयाच्या संबंधातील गंभीरता शासनाच्या लक्षात आली पाहिजे. आज लोक मनामध्ये या विषयाच्या बाबतीत तीव्र भावना आहेत. त्यामुळे 14 हजार कोटी रुपयांची थकबाकी असेल किंवा मोठ्या प्रमाणात ट्रान्समिशन मध्ये होणारे लॉसेस असतील किंवा विविध भागामध्ये वीज निर्मिती पुरेशा प्रमाणात होत नसेल तर या सगळया बाबींचा विचार करता एकंदरीत हे दर कधीच कमी होणार नाहीत असे वाटते. त्यामुळे औद्योगिक सेक्टरला, कारखान्यांना मिळणारी वीज इ.बाबत माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये उद्योजकांना काहीतरी दिलासा दिल्याशिवाय हा विषय संपणार नाही असे मला वाटते.





असुधारीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, या सदनामध्ये नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आला आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सदनाचा जास्त वेळ घेण्याची माझी इच्छा नाही.याबाबतीत आपल्याकडून, शासनाकडून जे काही करणे अपेक्षित आहे,ते आपण कशा प्रकारे पूर्ण करणार आहोत या संबंधातील काही मुलभूत प्रश्नांना येथे वाचा फोडणार आहे आणि माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये त्या विषयांच्या संबंधातील अहवाल द्यावा अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, याठिकाणी नियम 260 अन्वये जी चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. त्यामध्ये या सदनासमोर दोन गंभीर विषय मांडण्यात आले आहेत. पहिला विषय म्हणजे 36 महिन्यामध्ये विजेचे दर 12 वेळा वाढलेले असणे. तसेच औद्योगिक विजेचे दर शेजारील राज्यांपेक्षा अधिक असणे आणि या विरोधात उद्योजकांनी एक दिवसाचा लाक्षणिक संप पुकारणे आणि त्यामुळे येथील उद्योगधंदा कदाचित बाहेर जाईल की काय अशा पध्दतीची परिस्थिती निर्माण होणे या संबंधात सदनामध्ये गंभीर चिंता व्यक्त करावी अशा प्रकारची अपेक्षा विरोधी पक्षाने केली आहे. तसेच दुसरा विषय आदिवासींच्या संबंधातील असून त्याबाबत सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी भाष्य केले असल्यामुळे मी त्याबाबत बोलणार नाही.

सभापती महोदय, आपल्या सर्वांनाच ही माहिती आहे. पण या विषयाचे गांभीर्य निदर्शनास आणून देण्यासाठी मी हा विषय शासनासमोर मांडत आहे. एका रिपोर्टमध्ये असे म्हटलेले आहे की, "The State's heavily industrialised economy produces 13.2 percent of India's GDP." भारताच्या जी.डी.पी.पैकी 13.2 टक्के महाराष्ट्रातील इंडस्ट्रीलायझेशनमुळे देशाला मिळत असतात.अशा प्रकारचा एक व्यावहारिक रिपोर्ट भारतासमोर, महाराष्ट्रासमोर आणि या सदनासमोर आहे.म्हणूनच माझी चिंता महाराष्ट्रापुरती आहे.अशा प्रकारच्या गोष्टी होत असतील आणि जर भारतातील महाराष्ट्रातील व्यवसाय अन्य राज्यामध्ये गेला तर त्यामुळे महाराष्ट्राबरोबरच आपल्या सर्वांवर त्याचा काय परिणाम होईल ही चिंतेची बाब आहे.

सभापती महोदय, माझ्याकडे दोन महत्वाचे डॉक्युमेंटस् असून ही बाब शासनाने गांभीर्याने घेतली पाहिजे असे माझे मत आहे आणि तेवढ्यापुरतेच मी बोलणार आहे.पहिली गोष्ट म्हणजे 2004 मध्ये एम.ई.आर.सी.ने "Recommendations of the MERC for restructuring of MSEB. या अंतर्गत काही स्पेसिफिक शिफारसी शासनाकडे तसेच एम.एस.ई.बी कडे केल्या आहेत



ॲड.आशिष शेलार ....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

सभापती महोदय, दुसरा मुद्दा असा की, या देशामध्ये 2010 मध्ये शुंगुल समिती निर्माण झ ााली.त्या शुंगलु समितीने सर्व राज्य सरकारांना रेकमेंडेशन केल्या आहेत.त्याबाबत राज्य शासनाने नेमकी कोणती भूमिका घेतली आहे या दोन विषयांपुरते मी माझे विवेचन करणार आहे. सभापती महोदय, एम.ई.आर.सी.ने ज्या स्पेसिफीक रेंकमेंडेशन केल्या, त्यामध्ये सगळ्यात पहिली गोष्ट नमूद केली की, "At the heart of MSEB's problems is the poor efficiency in operation." एम.एस.ई.बी.चे ऑपरेशन हे खूप पुअर आहे आणि त्यामध्ये लॅक ऑफ  अकाऊंटेबिलिटी आहे. त्यामुळे एम.एस.ई.बी. ला जो तोटा होतो त्याची ही दोन कारणे आहेत. त्याचे सर्व सन्माननीय सदस्यांनी विश्लेषण केले. मी त्या विश्लेषणामध्ये जाणार नाही. एम.ई.आर.सी.ने जी मॅन्डेटरी रेकमेंडेशन केली, आपली अकाऊंटॅबिलिटी एस्टॅब्लीश करण्यासाठी, आपला तोटा कमी करण्यासाठी आणि आपली एफीशिअन्सी इन ऑपरेशन वाढविण्यासाठी, त्यामध्ये कदाचित माननीय मंत्री महोदय आपल्या उत्तरामध्ये भिवंडी आणि ट्रान्समिशन ॲण्ड डिस्ट्रीब्युशन लॉसेस कमी करण्यासाठी आम्ही प्रायव्हेट पार्टी कशा आणल्या यासंबधात माहिती देतील.पण ही बाब तेवढ्यापुरती सीमित न रहाता पुढील रेकमेंडेशन मध्ये सुध्दा एम.ई.आर.सी.ने असे म्हटलेले आहे की, आपल्याला एक अल्टनेटीव्ह रुरल सप्लाय सिस्टीम डेव्हलप करावी लागणार आहे आणि ही रुरल सप्लाय सिस्टीम ही कन्व्हेन्शनल सप्लाय सिस्टीम पेक्षा वेगळी असेल. त्यानुसार आपली रुरल सप्लाय सिस्टीम ही कन्व्हेन्शल सप्लाय सिस्टीम पासून वेगळी करण्यासाठी राज्य शासनाने काय केले असा माझा दुसरा प्रश्न आहे.

सभापती महोदय, तिसरा प्रश्न असा आहे की, राज्य सरकारने यासाठी स्टडी ग्रुप स्थापन केला.त्यामध्ये मुळा-प्रवरा इलेक्ट्रीक कॉर्पोशन सोयायटीचा अभ्यास स्टडी ग्रुपने केला आहे. त्यामुळे मुळा-प्रवरा सोसायटीच्या माध्यमातून केलेल्या स्टडी ग्रुपमध्ये एम.ई.आर.सी.ने अशी कल्पना केली की, ॲडमिनिस्ट्रेटीव्ह लेव्हलला रि-स्ट्रक्चरींग करुन इंटीग्रेटेड छोट्या स्वरुपा मध्ये डिस्ट्रीब्युशन सिस्टीम केली पाहिजे.

(सभापतीस्थानी - माननीय उप सभापती)

यानंतर श्री.बरवड . . . .



ॲड. आशिष शेलार ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्य सरकारने मुळा-प्रवरा कोऑपरेटिव्ह सोसायटीच्या सिस्टिममधून नेमका काय उद्‌बोध घेतला आणि त्याबाबतीत काय अंमलबजावणी केली हे मला जाणून घ्यावयाचे आहे.

सभापती महोदय, दुसरे डॉक्युमेंट शुंगलु समितीचे आहे. श्री. मॉन्टेकसिंग अहलुवालिया यांनी ही समिती नेमली. प्लानिंग कमिशनने जे काम अपेक्षित केलेले होते त्यानुसार त्यांच्या टर्म ऑफ रेफरन्समध्ये सर्व राज्य सरकारांनी 2017 पर्यंत आपला प्रोजेक्ट आणि 2017 पर्यंतची आपली फायनान्शियल व्हायेबिलिटी चेक करावी अशी कल्पना केलेली आहे. शुंगलु समितीने अपेक्षित केल्याप्रमाणे राज्य सरकारने 2017 पर्यंतची फायनान्शियल व्हायेबिलिटी आणि आपला रोडमॅप तयार केला आहे का आणि त्याबद्दल राज्य सरकारचे नेमके काय धोरण आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे. त्यामध्ये "Poor managerial and operational practice for Distribution Companies." याबद्दल महाराष्ट्राने चिंता व्यक्त करावी असे 2004 नंतर पुन्हा 2010 मध्ये शुंगलु समितीने आणि प्लानिंग कमिशनने म्हटले आहे. अजूनही राज्य सरकार त्या बाबतीत गंभीर असल्याचे दिसत नाही.

सभापती महोदय, त्यामध्ये आणखी चौथा मुद्दा "Irrational tariff fixed by Regulators." या संदर्भात उपस्थित केलेला आहे. आपण या ठिकाणी 12 वेळा दर वाढविले अशा पध्दतीचे त्यांनी म्हटले आहे. शुंगलु समितीने म्हटले आहे की, इरॅशनल पध्दतीने टॅरिफिंग होत आहे. त्यावर राज्य सरकारने भूमिका घेणे आवश्यक आहे. त्या बाबतीत राज्य सरकार नेमके काय धोरण घेणार आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे. शुंगलु समितीने असेही म्हटले आहे की, ज्या ठिकाणी हेवी लॉसेस आहेत त्या विभागामध्ये लॉस सरचार्ज लावावा. राज्य सरकार हे करणार आहे का ? राज्य सरकार जर ते करणार असेल तर त्याचा महाराष्ट्रातील अन्य जिल्ह्यामध्ये काय परिणाम होणार आहे याची माहिती राज्य सरकारने गांभीर्यपूर्वक द्यावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, या सर्व विषयावर चर्चा करीत असताना शुंगलु समिती आणि एमईआरसीने 2004 ला दिलेल्या डॉक्युमेंट बाबत अंमलबजावणी रिपोर्ट राज्य सरकारने द्यावा अशी मी मागणी करतो. त्याचबरोबर इचरलकरंजी आणि भिवंडी या भागामधील यंत्रमागांना आपण सवलतीच्या दरामध्ये वीज देत होतो. एका बाजूला आपण वस्त्रोद्योग धोरण जाहीर करतो आणि दुसऱ्या बाजूला भिवंडी असेल, इचलकरंजी असेल किंवा अन्य भागामध्ये यंत्रमागांना सवलतीच्या

...2...



ॲड. आशिष शेलार ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दरात वीज देत आहोत की ती बंद करीत आहोत आणि राज्य शासनाचे या बाबतीत नेमके काय धोरण आहे हे सुध्दा समोर येणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, शेवटचा पण गंभीर मुद्दा असा आहे की, राज्य शासनाच्या ऊर्जा विभागाने एक प्रस्ताव तयार करुन माननीय मुख्यमंत्र्यांकडे पाठविला. त्यामध्ये महाजनकोने अदानी ग्रुप बरोबर जॉइन्ट व्हेंचर पार्टनरशिप करण्याचे धोरण ऊर्जा विभागाने निश्चित करुन माननीय मुख्यमंत्र्यांकडे पाठविले आहे. ओरिसामधून येणारा कोळसा राज्य सरकारला सवलतीच्या दराने मिळावा असे त्यामध्ये आहे. 75 टक्के अदानी, 25 टक्के आम्ही त्यामुळे त्यामध्ये होणारा जो आर्थिक व्यवहार आहे त्यात अदानीला फायदा होणार आहे की, राज्य सरकारला फायदा होणार आहे ? ऊर्जा विभागाने आपले धोरण स्पष्ट केले आहे तरी माननीय मुख्यमंत्र्यांनी अजूनही त्याला मान्यता दिलेली नाही. या बाबतच्या व्यवहाराबद्दल या ठिकाणी राज्य सरकारने स्पष्टीकरण द्यावे अशी मी मागणी करतो. पुन्हा एकदा शुंगलु समिती आणि एमईआरसीच्या बाबतीत अंमलबजावणी रिपोर्ट राज्य सरकारने द्यावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी भाषण न करता एक मिनिटामध्ये माझ्या सूचना करणार आहे. माझा पहिला मुद्दा आदिवासी भागातील आश्रमशाळांच्या संदर्भात आहे. त्यांच्या भोजनाच्या, आरोग्याच्या, शिक्षणाच्या आणि अन्य काही बाबींच्या संदर्भात सातत्याने चर्चा होते. आदिवासी आश्रमशाळेचा प्रश्न आला नाही असे एकही अधिवेशन जात नाही. माझे या निमित्ताने दोन प्रश्न आहेत. त्याचा उल्लेख माननीय मंत्री महोदयांनी आपल्या भाषणात करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, संपूर्ण आदिवासी विभागातील ज्या आश्रमशाळा आहेत, मग बेसिक आश्रमशाळा असतील, माध्यमिक आश्रमशाळा असतील, उच्च माध्यमिक आश्रमशाळा असतील, या सर्व आश्रमशाळाचे नियंत्रण करण्याचे काम सध्या आपल्या प्रकल्प अधिकाऱ्यांकडे किंवा आयुक्तालयाकडे दिले आहे. या आश्रमशाळांच्या शिक्षणाच्या संदर्भात आणि विद्यार्थ्यांच्या संदर्भात शासन वेगळे शिक्षण आयुक्तालय स्थापन करणार का ?

सभापती महोदय, आपल्याकडे जसे प्रत्येक जिल्हा स्तरावर शिक्षण अधिकारी आहेत त्याच पध्दतीने प्रकल्प अधिकारी स्तरावर एक शिक्षण अधिकारी नेमण्याच्या संदर्भात शासन कार्यवाही करणार आहे आहे का ? या दोन मुद्याच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे अशी मी विनंती करतो.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी भाषण न करता एक मिनिटांमध्ये पाच मागण्या मांडणार आहे. पहिली मागणी अशी आहे की, महाजनको, महापारेषण आणि महावितरण या तीनही कंपन्यांमध्ये कोणत्याही प्रकारचा समन्वय दिसून येत नाही. हे जे लॉसेस वगेरे होतात त्याचे कारण हेच आहे. त्यांच्यामध्ये चांगल्या पध्दतीचा समन्वय निर्माण करण्याची आवश्यकता आहे. अजूनही वीज चोरी हा प्रकार सर्रासपणे चालू आहे. त्यावर थोडेसे नियंत्रण आले आहे पण पूर्णांशाने नियंत्रण आलेले नाही. वीज चोरीवर नियंत्रण आणण्याकरिता खास मोहीम उघडण्याची आवश्यकता आहे. वीज पुरवठा करणारी वायर्स असतील, खांब असतील किंवा इतर जी साधनसामुग्री आहे ती केव्हा तरी पुरविलेली असते. अजूनही ती सामुग्री दुरुस्त केलेली नाही. त्याचा गॅरंटी पिरियड संपलेला आहे. ती सामुग्री ताबडतोब रिप्लेस करण्याची व्यवस्था केली पाहिजे. कारण त्यातून प्रचंड प्रमाणावर अपघात होत आहेत. शेतकऱ्यांची 10-10 एकर ऊसाची शेती जळून खाक होत आहे. त्यामुळे ही साधनसामुग्री रिप्लेस करण्याची आवश्यकता आहे. चौथा मुद्दा असा की, या तीनही कंपन्याचे उच्चपदस्थ अधिकाऱ्यांपासून चतुर्थश्रेणीचे कर्मचारी सुध्दा सेवक म्हणून वावरत नाहीत. ते मालक म्हणून वावरतात. या सर्वांना चांगल्या पध्दतीने वागणे शिकवण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आदिवासी विभागाच्या संदर्भात माझी एक सूचना आहे. आमच्या शाळांची पटपडताळणी झाली. आदिवासी शाळांची पटपडताळणीच नव्हे तर भौतिक पडताळणी सुध्दा करण्याची खास आवश्यकता आहे. या दोन्ही गोष्टी केल्या तर वस्तुस्थिती समोर येईल. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ( मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी फक्त तीनच सूचना करणार आहे. पहिली सूचना वीज बिलाच्या संदर्भात आहे. वाढत्या वीज दराने जसा शेतकरी पिचला आहे तशा या राज्यातील शाळा सुध्दा पिचल्या आहेत. एक तर या सर्व शाळांचे वीज बिल देण्याची व्यवस्था शासनाने करावी किंवा त्यांचे वीज बिल पूर्णपणे माफ करावे. कारण त्यांना वेतनेतर अनुदान देणे बंद केले आहे. आता जे वेतनेतर अनुदान देऊ केले आहे त्यामध्ये वीज बिल सुध्दा भरणे शक्य नाही. आज माननीय ऊर्जा मंत्र्यांनी किमान या संदर्भात राज्यातील सर्व शाळांना मोफत वीज दिली जाईल किंवा त्यांची बिले शासन भरील याची घोषणा करावी.

सभापती महोदय, आदिवासी आश्रमशाळांच्या संदर्भामध्ये मघाशी माननीय आदिवासी विकास मंत्री उत्तेजित झाले. त्यांना ती गोष्ट लागली. कारण 118 मुले साप चावून मरणे ही काही शोभादायक बाब नाही. याची किमान खंत वाटली पाहिजे. मला असे वाटते की, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना या बाबत निदान खंत तरी व्यक्त करावी आणि आपले हे अपयश आहे याची कबुली द्यावी. यापुढे एकही मुलगा साप चावून मरणार नाही, एकही मुलगा कुपोषणाने मरणार नाही याची जबाबदारी शासनाने घ्यावी.

सभापती महोदय, खाजगी शिक्षण संस्थांकडे ज्या आदिवासी आश्रमशाळा दिलेल्या आहेत या सर्व सरकारने ताब्यात घ्याव्यात. कारण काहीही झाले तरी आम्हाला सरकारशी भांडण करता येते पण खाजगी संस्थांशी भांडण करता येत नाही. त्यामुळे या सर्व आश्रमशाळा शासनाने ताब्यात घ्याव्यात. त्यामुळे किमान भांडता तरी येईल. यापुढे कोणतीही सरकारी आश्रमशाळा शासनाने काढू नये. आदिवासी मुले सुध्दा रेग्युलर शाळेमध्येच शिकली पाहिजेत. शासनाने वसतिगृहांची व्यवस्था करावी पण ती मुले रेग्युलर शाळेतच शिकली पाहिजेत. त्यांच्यासाठी वेगळ्या आश्रमशाळा काढून त्यांचे दुय्यम शिक्षण होता कामा नये. कोणत्याही वंचित वर्गाला दुय्यम शिक्षण मिळता कामा नये अशी सूचना करुन मी माझे भाषण संपवितो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते ( आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यामध्ये आदिवासी विकास विभागाच्या संदर्भात काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. साधारणत सुकथनकर समिती नेमल्यानंतर आदिवासीसाठी 9 टक्के बजेट देण्याचा निर्णय झाला. 9 टक्के बजेट देण्याचा निर्णय झाल्यानंतर आतापर्यंत तशा प्रकारचे पैसे या खात्याला मिळत राहिले आहेत. काही प्रमाणात पैसे कमी मिळाले पण काही ठिकाणी वेळेवर तशा प्रकारचे पैसे मिळालेले आहेत. गेल्या दोन ते अडीच वर्षापासून मी या विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर आश्रमशाळांच्या संदर्भामध्ये, खात्यातील खरेदीच्या संदर्भात अनेकवेळा वेगवेगळ्या पध्दतीच्या तक्रारी आल्या आणि त्या संदर्भात चर्चा झालेली आहे.

सभापती महोदय, एक तर मी सुरुवातीला आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या तपासली तेव्हा या आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या 9 लाख 34 हजार होती. आज आश्रमशाळा, वसतिगृहे आणि जिल्हा परिषदेच्या शाळा या सर्व ठिकाणी या दोन अडीच वर्षामध्ये विद्यार्थ्यांसाठी काही नवीन योजना राबविल्या आणि आता विद्यार्थ्यांची संख्या 9 लाख 34 हजारवरुन 18 लाख 46 हजारापर्यंत पोहोचलेली आहे. साधारणत: 10 लाख विद्यार्थ्यांपर्यंत आपण पोहचू शकलो. त्याची कारणे शोधलेली आहेत. आदिवासींचा विकास व्हावा, त्यांना मुख्य प्रवाहात आणावे म्हणून त्यांना 9 टक्के बजेट दिलेले आहे. आश्रमशाळा काढण्याचा निर्णय 1972 साली झाला.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ KTG/ D/ D/ पूर्वी श्री. बरवड 11:20

श्री. बबनराव पाचपुते....

त्यावेळी काढलेल्या बहुतेक आश्रमशाळा ह्या जंगलामध्ये आहेत. त्या आश्रमशाळा अडचणीच्या काळात काढलेल्या होत्या. त्यावेळी गरज होती म्हणून त्या काढल्या. आता कोणतीही आश्रमशाळा काढायची असेल तर ती तालुक्याच्या ठिकाणी किंवा मोठया गावामध्ये काढली गेली पाहिजे असा निर्णय शासनाने घेतलेला आहे. आपण आश्रमशाळेतील मुलांना सर्वकाही एकाच ठिकाणी देणार असू तर मग त्या आश्रमशाळा ग्रामीण भागातील जंगलामध्ये कशासाठी ? त्यांना शहराच्या जवळ आणण्याचा निर्णय घेतला आणि तशा प्रकारचे काम सुरु झालेले आहे. शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळांची संख्या 1100च्या वर आहे. साधारणत: 5 लाख विद्यार्थी विद्यार्थींनी या आश्रमशाळेत शिकतात. या आश्रमशाळेच्या इमारती 1972 मध्ये किंवा त्यानंतर बांधलेल्या आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सर्पदंशाचा उल्लेख केला. ही गोष्ट खरी आहे की, या आश्रमशाळा अडचणीच्या ठिकाणी जंगलामध्ये असल्यामुळे सर्पदंश होतात. अशा प्रकारच्या अडचणी आहेत. या अडचणीवर उपाययोजना करण्याची गरज आहे. राज्यातील शासकीय आश्रमशाळा तीन वर्षामध्ये बांधून पूर्ण करायची असा निर्णय घेतलेला असून त्यासाठी मोठ्या निधीची तरतूद सुध्दा केलेली आहे. 135 आश्रमशाळा बांधून तयार झालेल्या आहेत आणि 129 आश्रमशाळांचे काम सुरु झालेले आहे. या आश्रमशाळांसाठी जमिनीची अडचण होती. पण बहुतेक सर्व ठिकाणी आम्ही जमिनी प्राप्त करुन घेतलेल्या आहेत. काही सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, आश्रमशाळेतील मुलांना आंघोळीसाठी गरम पाणी मिळत नाही. गरम पाणी मिळण्यासाठी तेथे लाईट दिली पाहिजे. ही समस्या दूर करण्यासाठी विंड आणि सोलर असा हायब्रीड वीजप्रयोग केलेला असून तीन आश्रमशाळांमध्ये हा प्रयोग यशस्वी झालेला आहे. जेथे आपण वीज देऊ शकत नाही तेथे हा प्रयोग राबविण्याचे काम सुरु झालेले आहे. काही ठिकाणी सोलर सिस्टिम बसविली होती ती बंद पडली.

सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, 2005-06मध्ये 6 हजार कोटी रुपयांचा घोटाळा झालेला आहे. वस्तुस्थिती मात्र वेगळी आहे. 2005-06, 2006-07 आणि 2008-09 या तीन वर्षामध्ये या खात्याला एकूण 6416 कोटी रुपये मिळाले आणि प्रत्यक्षात 5937 कोटी रु.ची तरतूद झाली. हायकोर्टामध्ये जी पीआयएल दाखल करण्यात आली त्यामध्ये 4 मुद्यांची मागणी केलेली आहे. एकूण झालेला खर्च 72 कोटी रुपये आहे आणि यामध्ये 6 हजार कोटी रुपयाचा घोटाळा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

झालेला आहे असे सांगितलेले आहे. हायकोर्टाने फाईल्स जप्त करुन त्या परत केल्या. त्या फाईल्स बाबत मी माहिती घेतली. मी स्वत: त्या फाईल्स पाहिल्या. अशा प्रकारच्या सगळया अडचणीमधून आम्ही पुढे जात आहोत.

विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी देखील काम करण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी मेळघाट, धारणी मधील कुपोषणाचा मुद्दा उपस्थित केला. हे कुपोषण फक्त आदिवासी मुलांचेच आहे काय ? माझ्या जिल्हयात देखील कुपोषणाचा प्रश्न आहे. कुपोषित मुलांचे आरोग्य सुधारावे यासाठी तीन-चार गट केलेले आहेत. त्याना दुपारचा चांगला आहार देण्यास सुरुवात केली. लोकवर्गणी देखील सुरु केली. या कुपोषणातून बाहेर येण्याचे प्रयत्न आम्ही करीत आहोत. लवकर लग्न होणे आणि लवकर मुले होणे ही देखील त्यामागची काही कारणे आहेत. या अडचणीतून बाहेर पडण्यासाठी हा विषय महिला बाल कल्याण विभागाकडे दिलेला असून तो विभाग ज्या प्रमाणे मागणी करतो त्याप्रमाणे त्या विभागाला निधी उपलब्ध करुन दिला जातो.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी येथे बायोमॅट्रिक मशिनचा मुद्दा उपस्थित केला. सगळया आश्रमशाळा जंगलामध्ये आहेत. त्या गावात नाहीत. या आश्रमशाळांना मी स्वत: भेटी दिलेल्या आहेत. अशा शाळांतून शिक्षक केव्हा येतात नि केव्हा जातात हे कोण पाहाणार ? मी विद्यार्थ्यांना शाळा केव्हा भरते आणि केव्हा सुटते असे विचारल्यानंतर विद्यार्थ्यांनी सांगितले की, शिक्षक आल्यावर शाळा भरते आणि शिक्षक गेल्यावर ती सुटते, ज्या दिवशी शिक्षक नसतात त्या दिवशी शाळेला सुट्टी असते. या सगळया गोष्टी कोण पहाणार ? कागदोपत्री तर सर्व व्यवस्थित चालले आहे असे दाखविले जाते. म्हणून शिक्षक, विद्यार्थी शाळेत केव्हा येतात आणि केव्हा जातात यांची नोंद प्रत्येक आश्रमशाळेतून ठेवण्यासाठी बायोमॅट्रिक मशिन्स खरेदी करण्यात आल्या.

डॉ. दीपक सावंत : बायोमॅट्रिक मशिनवर कंपनीचे नाव नव्हते असा माझा मुद्दा होता.

श्री. बबनराव पाचपुते : कुठे एखादे तसे मशिन असेल तर त्याबाबतीत चौकशी करण्याची माझी तयार आहे. या मशिन्स लावताना माझ्यावर आरोप झाले. अनुदानित आश्रमशाळांतील मुलांसाठी 630 रुपये दिले जातात..

डॉ.दीपक सावंत : माझा विषय एवढाच होता की, ज्या मशिन्स खरेदी केल्या त्यावर कंपनीचे नाव नव्हते....

..3..



MSS/ KTG/ KTG/ D/ D/ पूर्वी श्री. बरवड 11:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते : या बायोमॅट्रिक मशिन्स आरसी प्रमाणे खरेदी केलेल्या आहेत. राज्य शासनाच्या एका विभागामार्फत हे आरसी केले जाते. तरी सन्माननीय सदस्य सांगतात त्याप्रमाणे काही असेल तर त्याबाबतीत चौकशी करुन जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. सभापती महोदय, या बायोमॅट्रिक मशिनमुळे किती फायदे झालेले आहेत याबद्दल कुणीच काही बोलत नाही. या बायोमेट्रिक मशिनमुळे आश्रमशाळांतून विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या हजेरीचे प्रमाण वाढलेले आहे. सर्व आश्रमशाळातून बायोमेट्रीक मशिन लावलेल्या आहेत. त्यासाठी 15 ऑगस्ट ही शेवटची तारीख दिलेली होती. हजेरीची माहिती आम्ही एटीसी कडून घेतो. ह्या गोष्टी कोण करणार आणि ही कोणाची जबाबदारी आहे ? अनुदानित आश्रमशाळेतील मुलासाठी 630 रुपये देण्यात येतात. मी आश्रमशाळांची पटपडताळणी केली. त्यावेळी पटावर 300 मुले आणि प्रत्यक्षात मात्र 160 मुले, 70 मुले आढळून आली. ह्या गोष्टी कोण पाहाणार ? या आश्रमशाळेतील मुलांसाठी दिल्या जाणा-या अनुदानामध्ये वाढ करण्यात आलेली आहे. पूर्वी 630 रु. देण्यात येत होते आता 900 रु. दिले जातात. तरी सुध्दा गेल्या वर्षी पेक्षा खर्च अधिक झालेला आहे. याचा अर्थ कामे करण्याच्या संदर्भात निर्णय घेण्याचे काम आम्ही केलेले आहे.

सभापती महोदय, सन 2006-07 आणि 2007-08 मध्ये खरेदी केलेल्या शेगडी संबंधीचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित करण्यात आला. एक बर्नर-दोन बर्नरच्या शेगड्या आरसीने खरेदी केल्या. त्या शेगड्या पडून होत्या हे खरे आहे. आपण 87 हजार शेगड्या खरेदी केल्या. या शेगड्या एकाच वेळी खरेदी करण्याची आवश्यकता होती की नव्हती हा वादाचा विषय आहे. कनेक्शन न मिळाल्यामुळे या शेगडया पडून होत्या. त्या परत देण्याची व्यवस्था केली. तीन प्रकारचे टेंडर काढले होते. हे प्रकरण कोर्टामध्ये असल्यामुळे त्यावर जास्त भाष्य करणे उचित ठरणार नाही.

सभापती महोदय, विधानसभेमध्ये देखील आश्रमशाळेतील मुलींना देण्यात येणा-या ड्रेसचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. आश्रमशाळेतील मुली त्याच ड्रेसवर झोपतात आणि त्याच ड्रेसवर शाळेत येतात असे सांगण्यात आले. आश्रमशाळेतील मुला-मुलींसाठी कोणकोणत्या सुविधा द्याव्यात यासंबंधी मला पत्रे लिहिलेली आहेत. या मुलींना नाईट ड्रेस दिला, आदिवासींच्या मुलींनी नाईटड्रेस घालायचा नाही काय ?....

..4..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : तुम्ही खरेदी करता, परंतु ते मुलांपर्यंत पोहोचत नाही..

श्री. बबनराव पाचपुते : मी आश्रमशाळांना भेटी देऊन पाहिलेले आहे. माझी सन्माननीय सदस्यांना बरोबर घेऊन भेट देण्याची तयारी आहे.

डॉ. दीपक सावंत : ज्या वस्तू खरेदी करता त्या मुलांना मिळत नाहीत, याबाबतीत माझे आपणास आव्हान आहे..

श्री. बबनराव पाचपुते : सन्माननीय सदस्यांचे आव्हान मी स्वीकारतो. त्यांच्या बरोबर जाऊन पाहणी करण्याची माझी तयारी आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी ब्लँकेटचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. मी वनमंत्री असताना मेळघाटमध्ये गेलो होतो. त्यांनी माझा सत्कार केला. आम्ही त्यांना लाकूड दिले. त्यांना आनंद झाला. मी त्यांना त्याबाबत विचारणा केली. त्यांनी सांगितले की, आमच्याकडे रात्री खूप थंडी असते. आमच्याकडे कपडे नसतात त्यामुळे घरामध्ये आम्ही शेकोटी तयार करतो. 5 डिग्री सेल्सियस एवढी थंडी असताना मी पुन्हा त्या खारी गावात गेलो. टेण्ट टाकून मुक्काम केला. गावातील प्रमुखांना घेऊन वस्त्यातून फिरलो. त्यावेळी घराघरात अशा शेकोट्या केलेल्या दिसल्या. किती तरी मुले भाजलेली देखील आढळली. नंतर मी या खात्याचा मंत्री झाल्यानंतर आदिवासींसाठी ब्लँकेटची योजना सुरु केली. आधी ही योजना नव्हती. आता माझ्याकडे माननीय विरोधी पक्षनेत्यांसह 9 आमदारांनी ही ब्लँकेट योजना मोठ्या प्रमाणावर राबविण्यासाठी पत्रे दिलेली आहेत. अशा गोष्टी करण्याची आवश्यकता आहे आणि त्या केल्या पाहिजेत. हे करीत असताना काही अडचणी निर्माण होतात.

..नंतर श्री गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते...

सभापती महोदय, या ठिकाणी जनरेटर खरेदीच्या संदर्भात सांगण्यात आले. जनरेटर खरेदी करण्यासाठी वैधानिक विकास मंडळाच्या वतीने पैसे देण्यात आलेले आहेत. या खरेदीच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांची एक कमिटी होती. या खरेदीच्या बाबतीत चौकशी करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली होती, या खरेदी संदर्भात चौकशी लावण्यात आली आहे. ही खरेदी कशा पध्दतीने केली आहे, किती खरेदी केली आहे, यासंबंधी एसीबी चौकशी करीत आहे. त्या चौकशीचा रिपोर्ट लवकरच प्राप्त होणार आहे. ज्या अधिकाऱ्यांनी ही खरेदी केली आहे, आपण ज्या अधिकाऱ्यांचे नाव घेतले त्या अधिकाऱ्यांची बदली करुन त्यांना त्यांच्या विभागाकडे परत पाठविण्यात आलेले आहे. या प्रकरणी चौकशी लावलेली आहे, कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. विधानसभेचे विरोधी पक्ष नेते त्यांनी देखील सांगितले की,...

डॉ.दीपक सावंत : श्री.वरणकर या अधिकाऱ्यांनी ही खरेदी केलेली आहे, त्यांच्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : त्या अधिकाऱ्याचे नाव वरवंटकर असे आहे. श्री.वरवंटकर यांची तातडीने बदली केलेली आहे. त्यांना वन विभागाकडे पाठविण्यात आले असून या प्रकरणी त्यांची चौकशी सुरु आहे. आपण आरोप करावयाचे आणि त्यासंदर्भात खुलासा ऐकून घेत नाहीत हे बरोबर नाही.आपण दोन्ही गोष्टी केल्या पाहिजेत.

श्री.रामदास कदम : माझा हरकतीचा मुद्दा आहे. ज्या अधिकाऱ्यांने भ्रष्टाचार केला त्याची फक्त बदली करण्यात आली आहे. बदली ही काय शिक्षा होऊ शकते काय ? खरे तर त्यांना निलंबित केले पाहिजे. त्यांच्याकडून पैसे वसूल करा.

**उप सभापती** : राज्य शासनाला वाटले त्याप्रमाणे त्यांनी योग्य ती कारवाई केलेली आहे. त्याच्या उत्तरावर आपण हरकतीचा मुद्दा उपस्थित करु शकत नाही.

श्री.बबनराव पाचपुते : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी आश्रमशाळेच्या बाबतीत मुद्दे उपस्थित केलेले आहेत. आश्रमशाळांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपल्या बरोबर केव्हाही चर्चा करण्यास मी तयार आहे. आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढली पाहिजे अशीही सूचना त्यांनी केली. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्याचे काम आदिवासी विकास विभागाच्या मार्फत होत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

श्री.दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदय व त्यांचा विभाग किती चोखपणे काम करीत आहे हे सांगण्याचा प्रयत्न या ठिकाणी होत आहे. आदिवासींच्या बाबतीत प्रामाणिकपणा दाखविला पाहिजे. अशी पध्दत आहे की, प्रथम दर्शनी भ्रष्टाचार सिध्द झाला, दुसऱ्या अहवालात भ्रष्टाचार सिध्द झाला, आयुक्तांच्या चौकशी अहवालात भ्रष्टाचार सिध्द झाला तर त्या अधिकाऱ्यास तातडीने निलंबित करुन त्याची खातेनिहाय चौकशी करणे हा यातील उपाय असतो. बदली हा उपाय नसतो. आमची तशीच मागणी आहे की, संबंधित अधिकाऱ्यास निलंबित करुन त्याची खातेनिहाय चौकशी करण्यात यावी. परंतु माननीय मंत्री महोदयांकडून सांगितले जात आहे की, या संदर्भात चौकशी लावली आहे व त्या अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे. दुसरीकडे जाऊन तो अधिकारी तेथे भ्रष्टाचार करण्यास मोकळा झाला. तुम्ही त्या अधिकाऱ्याला संरक्षण देत आहात असा आम्ही संशय व्यक्त केला तर तुम्हाला वाईट वाटते. तो अधिकारी तुमचा आणि माझा कोण लागतो? तुम्ही सरकार चालवित आहात आणि आम्ही विरोधी पक्षात बसून अशा गोष्टींवर निर्बंध आणण्याचे काम करीत असतो. आजच त्या अधिकाऱ्याची निलंबनाची घोषणा करा, निलंबनानंतर त्यांची चौकशी केली जाईल अशाही प्रकारची घोषणा आपण करावी. बदली हा काही त्यावर उपाय होऊ शकत नाही. माननीय श्री.अजितदादा पवार यांनी जबाबदारी घेतलेली आहे. आपल्या नेत्यांनी सोपविलेली जबाबदारी तुम्ही पार पाडत नाही.

श्री.बबनराव पाचपुते : श्री.वरवंटकर हे आयएफएस अधिकारी आहेत. त्यांना आपल्याला... (अडथळा) आपण माझे पूर्णपणे ऐकून घ्यावे. सन्माननीय सदस्यांनी न ऐकता..(अडथळा) मला बोलू न देण्याचे ठरविले असेल तर माझा नाईलाज आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विधानसभेत चंद्रपूर जिल्यातील तत्कालीन जिल्हाधिकारी यांना निलंबित केले. ते देखील आयएएस अधिकारी होते. हे सभागृह मोठे नाही काय, हे सदन मोठे नाही काय, तो आयएएस अधिकारी मोठा आहे काय ? त्या अधिकाऱ्याचे निलंबन जाहीर करा.

( गोंधळ )

श्री.रामदास कदम : सरकारकडून भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यास पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला जातो आहे... (अडथळा)

3...



ABG/ D/ D/ KTG/ KTG/ प्रथम श्री.शिगम 11:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते : तीन ठिकाणची बिले दिलेली नाहीत. त्या अधिकाऱ्यांची ए.सी.पी मार्फत चौकशी चालू आहे. मी काल देखील या बाबतीत माहिती घेतली. चौकशीचा रिपोर्ट येत्या आठ दिवसात मिळणार आहे. तो रिपोर्ट आल्याबरोबर आम्ही त्या अधिकाऱ्यावर कारवाई करु. कोणालाही पाठीशी घालणार नाही.

(गोंधळ)

श्री.दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदय म्हणाले की ते आयएएस अधिकारी आहेत. आयएएस अधिकारी सभागृहापेक्षा मोठा आहे असे सांगण्याचा दुर्देवी प्रयत्न माननीय मंत्री महोदयांकडून होत आहे. सरकार आयएएस अधिकाऱ्यांना घाबरते ही विशेष गोष्ट आहे. ते आयएएस अधिकारी आहेत असे आपण बोलला आहात ते रेकॉर्डवर आलेले आहे.ते आयएएस अधिकारी नाहीत. तुम्ही सभागृहात दिशाभूल करणारी माहिती दिल्यामुळे तुमच्या विरुध्द आम्ही हक्कभंगाची सूचना देऊ.

श्री.बबनराव पाचपुते : ते आयएफएस अधिकारी आहेत असे मी बोललो आहे.

श्री.दिवाकर रावते : विधानसभेत आयएएस अधिकाऱ्यास निलंबित केले. हे सभागृह आयएफएस अधिकाऱ्यांस निलंबित करु शकत नाही काय ? ते आयएफएस अधिकारी असले तरी त्यांचे निलंबन आज झाले पाहिजे. असे कसे चालेल..

श्री.बबनराव पाचपुते : ते वन विभागाचे अधिकारी आहेत. त्याचे तातडीने निलंबन करण्यात यावे अशा प्रकारचा प्रस्ताव मी वन विभागाकडे पाठविला आहे. त्यांच्या विरुध्द कारवाई करण्याची जबाबदारी माननीय वन मंत्र्यांची आहे.

(गोंधळ)

**उप सभापती** : माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे, मी माननीय वन मंत्र्यांना बोलाविणे पाठवितो. माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे उत्तर पूर्ण होईपर्यंत ते येतील. माननीय मंत्र्यांनी आपले उत्तर पूर्ण करावे.

श्री.बबनराव पाचपुते : या बाबतीत आमच्याकडून कोणत्याही प्रकारची हयगय केली गेली नाही. कोणालाही पाठीशी घातलेले नाही. सदर खरेदीत भ्रष्टाचार झाल्याचे समजल्या बरोबर त्यांची सगळी बिले थांबविण्यात आलेली आहेत. त्या अधिकाऱ्यांची चौकशी सुरु केलेली आहे.

4...



श्री.बबनराव पाचपुते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चौकशीचा अहवाल येण्यापूर्वी सदरच्या अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावे अशा प्रकारचा वन विभागाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. प्रस्तावाच्या बाबतीत पुढील कारवाई करण्यासंबंधीचे अधिकार वन विभागास आहेत.

डॉ.दीपक सावंत : तीन अधिवेशनापासून त्या अधिकाऱ्यांची चौकशीच सुरु आहे...

, श्री. बबनराव पाचपुते : त्यांची बिले थांबविलेली आहेत. एक नवा पैसा देखील त्यांना देण्यात आलेला नाही. पैसे जर दिले असते तर भ्रष्टाचार झालेला आहे असे मी सांगू शकलो असतो. सदर खरेदीचे पैसे आदिवासी विकास विभागाने दिलेले नाहीत. सदरची खरेदी वैधानिक विकास मंडळाच्या निधीतून झालेली आहे. (अडथळा)

**उप सभापती** : वन मंत्र्यांना मी बोलावणे पाठविलेले आहे. ते येईपर्यंत माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, दुधाळ जनावरे खरेदी योजनेच्या संदर्भात कोर्टात पीआयएल दाखल झालेली आहे. त्या संदर्भात या ठिकाणी बोलणे बरोबर होणार नाही. हा विभाग माझ्याकडे आल्याबरोबर ही योजना आम्ही बंद केली. ही योजना पशुसंवर्धन विभागाकडून राबविली जात असून त्यासाठी त्या विभागास आदिवासी विकास विभागाकडून निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून योजना राबविण्यात येत असल्यामुळे या बाबतीत चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

सभापती महोदय,गॅस शेगडया खरेदी संदर्भातील मुद्याची माहिती मी याठिकाणी दिलेली आहे. ऑईल इंजिनचे दर कृषि विभागाकडून ठरविले जातात. त्याप्रमाणे ऑईल इंजिनचे दर कृषि विभागाने ठरविलेले आहेत. त्यासंदर्भात आमच्याकडे आर.सी.आलेल्या आहेत. जनरेटर खरेदीच्या बाबतीत मी मघाशी सांगितले की, ही खरेदी वैधानिक विकास मंडळाच्या निधीतून करण्यात आली आहे. आश्रमशाळांच्या तपासणीचा कार्यक्रम विभागाने हाती घेतला होता. सर्व अनुदानित आश्रमशाळांची विभागाने तपासणी केली आहे. 9 अनुदानित आश्रमशाळा विभागाने रद्द केलेल्या आहेत.

महोदय,काल सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी नांदेड जिल्हयातील एका अनुदानित आश्रमशाळेचा तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. त्या आश्रमशाळेची मान्यता रद्द

5..

21-12-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) M-5

ABG/ D/ D/ KTG/ KTG/ प्रथम श्री.शिगम 11:30

श्री.बबनराव पाचपुते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्याचा निर्णय लागलीच घेतला गेला. जंगलात राहणारे लोक आहेत, त्यांना आपल्या बरोबर आणावयाचे आहे.

महोदय,आदिवासी समाजाला मूळ धारेमध्ये आणावयाचे असेल तर त्यांच्यासाठी नवीन नवीन योजना सुरु करणे आवश्यक आहे. त्यांना जमीन वाटपाच्या संदर्भात निर्णय घेतला आहे. 97 टक्के जमिनीचे वाटपाचे काम पूर्ण झालेले आहे. कौशल्य विकासासाठी 1लाख विद्यार्थ्यांची निवड केली आहे. आदिवासी समाजाला मूळ प्रवाहामध्ये आणण्यासाठी शासनाकडून सर्व स्तरावरुन प्रयत्न करण्यात येत आहेत. सन्माननीय सदस्यांच्या मनात ज्या काही शंका असतील, त्यांनी जरुर विचाराव्यात. त्या शंकांना उत्तरे देण्यास मी तयार आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी ज्या सुधारणा सुचविल्या आहेत, त्या प्रमाणे जरुर सुधारणा करु. आपल्याला वेळ असेल त्या दिवशी मी आपल्या समवेत आश्रमशाळांना भेटी देण्यास तयार आहे. अनेक आश्रमशाळांचे निकल 71 टक्के, 75 टक्के लागले आहेत. आश्रमशाळांमधील शिक्षकांना आम्ही प्रशिक्षण देण्याचे काम करीत आहोत. ज्या सन्माननीय सदस्यांच्या सूचनांना उत्तर देण्याचे राहिले असेल त्यांच्या सूचनांना लेखी उत्तरे देण्यात येतील. धन्यवाद.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक ( ऊर्जा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, आज नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव सभागृहात सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी मांडला. त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.सुधीर तांबे, डॉ.दीपक सावंत, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, श्री.भगवान साळुंखे, श्री.कपिल पाटील यांनी सहभाग घेतला व अतिशय चांगल्या सूचना मंडळांच्या संदर्भात केलेल्या आहेत.

सभापती महोदय, वीज वितरण कंपनी, वीज निर्मिती कंपनी आणि पारेषण कंपनी यांच्या कारभारा संदर्भात या ठिकाणी चर्चा झाली. वीज दरात सातत्याने वाढ होत असल्याबाबतची चर्चा या सभागृहात मोठया प्रमाणात झाली. कोळशाच्या अनुषंगाने काही मुद्दे उपस्थित करण्यात आले, काही समित्यांनी दिलेले निर्देश आहेत त्याचे अनुपालन केले आहे की नाही याबाबतची देखील चर्चा उपस्थित करण्यात आली अशा विविध विषयांबाबतीत चर्चा करण्यात आली आहे.

सभापती महोदय, राज्यातील सामान्य जनतेवर मागील 36 महिन्यांमध्ये 12 वेळा वीज दर वाढीचा बोजा टाकण्यात आलेला आहे या संदर्भातही चर्चा झाली. वीज दरवाढ करावयाची असेल तर आपण एमईआरसीकडे जातो. निर्मिती कॉस्टमध्ये एक्सलेशन होत असते. विजेची प्रॉडक्शन कॉस्ट वाढत असते. त्यामुळे गॅप निर्माण होत असते, ती पूर्ण करण्यासाठी तसेच क्रॉस सबसिडी जे अंतर येते ते भरुन काढण्यासाठी विजेची दरवाढ साधारणत: आपण करीत असतो.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक..........

ते करण्यासाठी एमईआरसी ही रेग्युलेटरी ॲथॉरिटी केंद्र शासनाच्या मान्यतेनुसार या राज्यामध्ये स्थापन झालेली आहे. त्यांच्याकडे आपण अपील दाखल करतो. त्या माध्यमातून वीज दरवाढ करण्यास परवानगी दिली जाते. कृषी आणि औद्योगिक क्षेत्रातील विजेच्या दरात वाढ झाल्याबाबत चर्चा करण्यात आली.

सभापती महोदय, दरवर्षी अपेक्षित खर्च, त्यावर मिळणारा महसूल विचारात घेऊन अपेक्षित खर्चाच्या पूर्ततेसाठी आवश्यक असणारा अतिरिक्त महसूल मिळावा यासाठी महावितरण कंपनी आयोगासमोर अपील दाखल करते. 3 डिसेंबर, 2009 मध्ये अपिलीय प्राधिकरणाकडे आरजीपीपीएल कंपनीच्या स्थिर आकारच्या वाढीच्या मान्यतेसाठी अपिलामध्ये गेलो, त्यानुसार विजेच्या दरामध्ये वाढ झाली. मार्च, 2010 मध्ये अपिलामध्ये गेलो होतो. 31 मार्च, 2011 मध्ये महानिर्मिती कंपनीच्या सप्टेंबर, 2010 च्या वीज दराच्या आदेशाच्या त्रुटींचे निराकरण करण्यासाठी एमईआरसीकडे गेलो होतो. 26 जुलै, 2011 मध्ये सीपीआर अहवालानुसार महानिर्मिती कंपनीच्या संदर्भातील विद्युत अपिलीय प्राधिकरणाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी एमईआरसीकडे गेलो होतो. या सर्व बाबी लक्षात घेता झालेला सर्व खर्च आपल्याला वसूल करता यावा म्हणून दरवेळी वीज दरवाढ करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, गेल्या सहा आठ महिन्यात महावितरण कंपनीच्या नाकर्तेपणामुळे 10 हजार कोटी रुपयांची वीज दरवाढ झालेली आहे. माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी जे मुद्दे मांडले आहेत, त्या मुद्यांबाबत मंत्री महोदयांनी उत्तर दिले तर बरे होईल. आज सामान्य लोकांनी विजेचा वापर कसा करावा असा प्रश्न निर्माण झाला आहे. 10 हजार कोटी रुपयांची वीज दरवाढ समर्थनीय आहे का?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी तीनही कंपन्यांची माहिती संक्षिप्त स्वरुपात सांगतो. त्यानंतर माननीय सदस्यांनी जे जे मुद्दे मांडले आहेत त्या मुद्यांबाबत विस्तृत उत्तर निश्चितपणे देण्याचा प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये निश्चितपणे वीज दरवाढ झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी लोड शेडिंगबाबत आपले विचार मांडले आहेत. इतिहासाची पाने चाळून पाहिली तर मागील काही वर्षांमध्ये राज्यात लोड शेडिंगचे प्रमाण अधिक होते. दिवसाला 15-15 तास लोड



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक..........

शेडिंग केले जात होते. वीज निर्मिती संचामध्ये आपण क्षमता वाढ केली. कोराडी, परळी, पारस, खापरखेडा, सीटीपीएस चंद्रपूर या सर्व प्रकल्पांची क्षमता वाढ केली. त्यामुळे राज्यात दरवर्षी 10 टक्के विजेची गरज वाढते, हे लक्षात घेऊनही मागील पाच-सहा वर्षात होणाऱ्या लोड शेडिंगच्या प्रमाणात घट झाली आहे. डिसेंबर महिन्यापर्यंत जी लोड शेंडिंग होत होती ती शिस्त आणण्यासाठी केली जात होती.

सभापती महोदय, ऊर्जा विभागाने राज्याची ए, बी, सी आणि डी अशा चार भागात वर्गवारी केली आहे. विजेची गळती कमी आहे, वसुली चांगल्या प्रमाणात होते अशा ए,बी,सी आणि डी या चार भागांना लोड शेडिंगमधून वगळले आहे. इ आणि एफ भागात काही तासांचे लोड शेडिंग केले जात आहे. जी.1, जी.2 आणि जी.3 या भागात त्यापेक्षा काही तास अधिक लोड शेडिंग केले जाते.

**उप सभापती** : सभागृहाच्या विशेष बैठकीची वेळ दुपारी 12.00 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, पूर्वी राज्यात झोननिहाय लोड शेडिंग केले जात होते. त्या काळात अशी ओरड सुरु झाली की, जे फिडर्स चांगल्याप्रकारे पेमेंट करतात, गळतीचे प्रमाण कमी आहे अशा फिडर्सवर लोड शेडिंग का केले जाते? त्या फिडर्सना झोनमधून बाहेर काढण्यात आले. त्यानंतर ज्या फिडर्सवर वसुली कमी आहे, गळतीचे प्रमाण जास्त आहे तेथे लोड शेडिंग केले जाते. भविष्यामध्ये डी.पी.पर्यंत जाण्याचे नियोजन करीत आहोत. शिस्त आणण्यासाठी हा उपाय करणे अत्यंत आवश्यक झालेले आहे. राज्यात जे वीज निर्मिती संच आहेत ते चालविण्यासाठी कोळसा विकत घ्यावा लागतो. कोळसा एल.सी.वर घ्यावा लागतो. वीज निर्मिती केंद्र चालविण्यासाठी लागणारा खर्च वितरण कंपनी जी वीज विकते त्यातून येणाऱ्या महसुलातून भागविला जातो. आज राज्याची एकूण वीज निर्मिती क्षमता आणि विजेची गरज यामध्ये 700 मे.वॅट एवढा फरक आहे. हा फरक भरुन काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. राज्याकडे पुरेशी वीज नाही म्हणून लोड शेडिंग केले जाते असे नाही. सध्या जे लोड शेडिंग केले जाते ते वर्गवारीनुसार केले जात आहे.





श्री.राजेंद्र मुळक..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, शेतीला साधारणपणे दिवसाला 8 ते 10 तास वीज पुरवठा केला जात आहे. औद्योगिक क्षेत्रात इतर राज्यांच्या तुलनेत काही प्रमाणात वाढ झालेली आहे हे खरे आहे. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात ओरड सुरु आहे. महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे, ज्या राज्यात आठवड्याचे सातही दिवस 24 तास उद्योग क्षेत्राला वीज पुरवठा केला जात आहे. कृषी पंपांना जी क्रॉस सबसिडी दिली जाते ती उद्योग क्षेत्राच्या माध्यमातून प्राप्त होत आहे. एक नवीन उपाययोजना करण्याचा विचार आहे. रात्रीच्या स्लॉटमध्ये जर काही कॉम्पेन्सेट बिल कमी करण्यामध्ये होऊ शकले तर अधिक उपयोगी होईल. म्हणून एमईआरसीकडे अपील केले आहे. निर्णय झाल्यानंतर औद्योगिक रेटमध्ये निश्चितपणे बदल करुन कॉम्पेन्सेट करण्याचा प्रयत्न आहे.

सभापती महोदय, कोळशाच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी विचार मांडले आहेत. राज्याला निरनिराळ्या खाणीतून कोळसा पुरवठा होत असतो. कोळशाचे उत्खनन होते त्या सर्व कोळसा कंपन्या 70 ते 75 टक्क्यापर्यंत आपले लक्ष्य गाठू शकतात. आवश्यक असलेल्या कोळशापैकी 70 ते 75 टक्के कोळसा आपल्याला प्राप्त होत असतो. त्यामुळे काही प्रमाणात कोळसा आयात करावा लागतो. डब्ल्यूसीएल, सिगारेनी कोळसा खाणीतून येणारा कोळसा, आयात केलेला कोळसा मिश्रित करुन पीएलएफची कॅलेफेरिक व्हॅल्यू मेंटेन करण्याचा प्रयत्न केला जातो. खापरखेडा, सीटीपीएस, परळी, पारस, एकलहरे या सर्व वीज निर्मिती संचांना कोळसा पुरविण्याचे काम या कोळसा खाणीच्या माध्यमातून होते. मध्यंतरी केंद्रीय कोळसा मंत्री यांच्यासमवेत एक बैठक झाली होती. याचे सिन्क्रोनायझेशन होणे आवश्यक आहे. आपल्या भागातील कोळसा इतर राज्यांमध्ये जातो.

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक .....

आपल्याला इतर राज्यातून कोळसा आणा लागत असल्यामुळे ट्रान्स्पोर्टचा खर्च जास्त येतो तसेच ट्रान्स्पोर्टसाठी अनेक वेळा रॅक्स भेटत नाही. त्यामुळे आम्ही केंद्रशासनाला विनंती केली आहे की, आपल्या राज्यातून परराज्यात जो कोळसा जातो तो परराज्यात न जाता आपल्या राज्यातील वीज प्रकल्पांना मिळाला तर ट्रान्सपोर्टेशनचा खर्च वाचेल तसेच विजेच्या दरात सुध्दा फरक पडू शकेल. तसेच आपण ज्या राज्यातून कोळसा आणतो तो कोळसा त्या राज्यातील वीज केंद्रांना मिळावा यासाटी आम्ही केंद्राकडे विनंती केलेली आहे. संपूर्ण देशाचे सिंक्रोनायझेशन व्यवस्थित व्हावे यासंदर्भात आपण भूमिका घेतलेली आहे. देशातील कोलमाईन्सचे सिंक्रोनायझेशन झाले तर आपल्या राज्यात निर्माण होणारा कोळसा आपल्या राज्याला सहा महिन्यात मिळू शकेल अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, आपल्या वीज केंद्राची क्षमता वाढवित आहोत. खापरखेडा विद्युत केंद्रामध्ये 500 मे.वॅटने क्षमता वाढवली आहे. या केंद्राचे सिंक्रोनायझेशनही झालेले आहे तसेच सीओडी सुध्दा झालेले आहे. खापरखेडयाचा प्रकल्प आपल्या सेवेत आता दाखल झालेला आहे. सीटीपीएसमध्ये 9 आणि 10 क्रमांकाचे नवीन संच निर्माण करीत असून त्यातूनही आपली वीज क्षमता वाढणार आहे. कोराडीयेथे सुपर क्रिटीकल संचांचे काम सुरु आहे. साधारणत: एक वर्षाने येथून वीज मिळण्यास सुरुवात होईल. आपल्या संचांची क्षमता वाढवून त्यातून आपण अधिक वीज निर्माण करीत आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी जैतापूर येथे ॲटोमिक पॉवर प्रोजेक्ट सुरु झाला पाहिजे असा उल्लेख केलेला आहे. भविष्यामध्ये आपल्याला ॲटोमिक एनर्जीच्या माध्यमातून वीज निर्माण करावी लागणार आहे. कोळसा ही नैसर्गिक संपत्ती आहे. कोळसा आपल्याला किती दिवस भेटू शकेल हे सांगता येत नाही. जेथे जेथे कोळसा खाणी आहेत त्या ठिकाणी अडचणी निर्माण होण्यास सुरुवात झालेली आहे. ज्या पध्दतीचा कोळसा पाहिजे त्या पध्दतीचा कोळसा आपल्याला प्राप्त होत नाही. जययतापूरचा ॲटोमिक एनर्जीचा प्रकल्प पूर्ण झाला तर त्यातून निर्माण होणाऱ्या विजेतून आपल्या वाटयाला वीज मिळू शकेल. जैतापूर प्रकल्पाचे सेफ्टी प्रकल्पही चेक करण्यात आलेले आहेत. या प्रकल्पाला फार चांगली साईट मिळाली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक .....

जैतापूर प्रकल्पाची जागा समुद्र सपाटीपासून 20 मीटर उंच असल्यामुळे या प्रकल्पाला त्सुनामीचा धोका पोहचणार नाही. जैतापूर प्रकल्पाच्या संदर्भात चर्चा झाली असून या प्रकल्पाला निधी सुध्दा उपलब्ध झालेला आहे तसेच या प्रकल्पासाठी लागणारी जमिनीच्या संदर्भात सुध्दा कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. भविष्यामध्ये हा प्रकल्प सुरु होईल अशी आशा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी एमईआरसीच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, विजेच्या दरवाढीसाठी तसेच अपिलीय बाबीच्या संदर्भात आपण एमईआरसीकडे जात असतो. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम साहेबांनी शेतकऱ्यांची वीज कनेक्शन्स तोडली जात आहे असा उल्लेख केलेला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, ज्या भागांमध्ये वीज बिल वेळेवर भरले जात नाही अशा भागांमध्ये वीज कनेक्शन कापण्याची कारवाई शासनाने केलेली आहे. अशा प्रकारची कारवाई केली जात असतांना आपण शेतकऱ्यांना बिलांचे हप्ते पाडून बिल भरण्याची सुध्दा मुभा वितरण कंपनीने दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी कोळशाच्या नियोजनाच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. कोळशाच्या नियोजनाच्या संदर्भात मी या ठिकाणी अगोदरच माहिती दिलेली आहे. आपल्याला ज्या क्षमतेचा कोळसा पाहिजे असतो त्या क्षमतेचा कोळसा मिळत नाही. या विषयाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांबरोबर बैठक घेतली होती व या बैठकीमध्ये सिंक्रोनायझेशन करण्याचा मुद्दा उपस्थित केला असून यासंदर्भात निश्चित मार्ग काढला जाणार आहे. एनटीपीसीला सुध्दा कोळसा मिळत नाही. मौदा येथे एनटीपीसीचा एक प्रकल्प सुरु होत असून या प्रकल्पाचे सिंक्रोनायझेशन झाले असून या प्रकल्पातून आपल्याला 30 टक्के वीज जास्त मिळणार आहे. एनटीपीसीला कोल इंडिया ही कंपनी कोळसा पोहचू शकत नाही अशी परिस्थिती आहे. कोळशाची समस्या संपूर्ण देशात निर्माण झालेली आहे. अल्टर्नेट अरेंजमेंटसाठी सिंक्रोनाईज केले, ज्या राज्यात कोळशाची निर्मिती होते तो कोळसा त्याच राज्यातील वीज प्रकल्पांना मिळावा यासाठी गांभीर्याने चर्चा सुरु असून यातून निश्चितपणे तोडगा निघू शकेल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी ट्रान्सफॉमर्सच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, आपल्याकडे जी काही

...3...

श्री. राजेंद्र मुळक .....

ट्रान्सफॉमर्स लावले जातात त्यांची चांगली देखभाल करण्याच्या सूचना निश्चितपणे देण्यात येतील. ज्या ठिकाणी ट्रान्सफॉर्मसची क्षमता वाढवण्याची गरज असेल अशा ठिकाणी ट्रान्सफॉमर्सची क्षमता वाढवून देण्यासंदर्भात कार्यवाही केली जाणार आहे. ट्रान्सफॉमर्सवर लोड आल्यामुळे ट्रान्सफॉमर्स ट्रीप होतात, खराब होत असतात त्यामुळे ट्रान्सफॉमर्सची क्षमता वाढवून देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. काही ट्रान्सफॉमर्सची क्षमताही वाढवून देण्यात आलेली आहे. ट्रान्सफॉमर्सच्या संदर्भात धडक कार्यक्रम आम्ही सहा महिन्यात राबविणार आहे. ज्या ट्रान्सफॉमर्सची क्षमता वाढविण्याची गरज असेल अशा ठिकाणच्या ट्रान्सफॉमर्सची क्षमता सहा महिन्यात वाढवून दिली जाणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी कोळसा चांगल्या दर्जाचा मिळत नसल्याची बाब निदर्शनास आणली असून यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, आपल्याला "डी" ग्रेडचा कोळसा सुध्दा मिळत नाही. "डी" ग्रेड पेक्षाही कमी दर्जाचा कोळसा आपल्याला प्राप्त होत आहे. आपल्याला "सी" व "डी" ग्रेडचा कोळसा मिळावा अशी मागणी आपण केंद्राला केलेली आहे. ज्या खाणींशी आपली लिंकेज आहे त्या लिंकेज प्रमाणे आपल्याला कोळसा मिळत असतो. आता आपल्याला ग्रेडेशनमध्ये बदल करता येणार नाही परंतु आपले जर सिंक्रोनायझेशन झाले तर आपल्या येथील जो चांगल्या प्रतीचा कोळसा आहे तो आपल्याला मिळू शकेल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमर पंडित यांनी परळीच्या वीज केंद्राचा उल्लेख केलेला आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, या प्रकल्पाला पाणी उपलब्धता नसल्यामुळे परळी औष्णिक केंद्राच्या स्थापीत क्षमतेच्या 50 टक्केच वीज निर्माण होत आहे. डिसेंबर महिन्याच्या एंडपासून परळी औष्णिक केंद्रातून 600 मे.वॅट वीज निर्माण होणार आहे. परळी केंद्राच्या बाजूला असलेल्या मुदगल बॅरेजमधून परळी औष्णिक केंद्राला पाणी पुरवठा करण्याचा निर्णय झालेला आहे. त्यामुळे या केंद्रातून आपल्याला जास्तीत जास्त वीज उपलब्ध होणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी औद्योगिक टॅरिफमध्ये वाढ झाल्यामुळे कोल्हापूर, सांगलीतील उद्योगांना फटका बसत आहे असा मुद्दा उपस्थित केलेला आहे. औद्योगिक वापराच्या विजेच्या दरात वाढ झालेली आहे परंतु हे दर कमी करण्याच्या संदर्भात

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक .....

आम्ही चर्चा करीत आहोत व त्यासंदर्भात आम्ही एमईआरसीकडे एक पिटीशन सुध्दा दाखल केलेले आहे. रात्री विजेचा वापर कमी प्रमाणात होत असतो तसेच रात्री कमी दराने उद्योगांना वीज उपलब्ध करुन देण्याच्यासंदर्भात निर्णय घेण्यात आलेला आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : मंत्रिमहोदय सभागृहाची वेळ संपत आली आहे. मी आपणास ऑन लेग ठेवू का ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी दोन मिनिटात माझे भाषण पूर्ण करणार आहे.

**उप सभापती** : ठीक आहे. सभागृहाची वेळी 5 मिनिटांकरिता वाढविण्यात येत आहे.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी शाळेचे बिल माफ करावे असा मुद्दा उपस्थित केला होता. शाळांची वेगळी वर्गवारी आपण केलेली आहे. त्यात त्यांचे टॅरिफ कमी केले आहे. त्यामुळे त्यांना मदत होत आहे.

सन्माननीय सदस्य ॲड्.आशिष शेलार यांनी 2-3 महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. MERC चे रि-स्ट्रक्चरिंग करावे अशी सूचना केली आहे. त्याचे आपण रि-स्ट्रक्चरिंग केलेले आहे. शुंगळू समितीच्या शिफारशी अंमलात आणण्याचा निर्णय घेतलेला आहे. आल्टर्नेट रूरल सप्लाय सिस्टीम करण्यासंबंधी, जी कन्व्हेन्शियल सिस्टीम आहे ती लक्षात घेऊन करण्याचा विचार सुरू आहे.

सभापती महोदय, अदाणी आणि जनकोच्या J.V.संदर्भात सन्माननीय सदस्यांनी विचार मांडले आहेत. तशा प्रकारचे कोणतेही J.V.करायचे नाही अशा प्रकारचा निर्णय आम्ही घेतलेला आहे. अदाणी कंपनीचे हे स्वत....

**उप सभापती** : मंत्री महोदय, रामटेक येथील लोक कोळशाच्या खाणीत रहात आहेत.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, रेल्वे सायडिंगच्याबाबत आम्ही निर्णय घेतलेला आहे. त्यांचे स्वत:चे रेल्वे सायडींगचे काम सुरू आहे. एक महिन्यच्या आत रेल्वे सायडिंगचे काम पूर्ण होईल.

**उप सभापती** : मी स्वत: तेथे साईट व्हिजिट केली आहे. लोक कोळशाच्या खाणीत रहात आहेत. लोक अक्षरश: वैतागले आहेत. तो पर्यंत ते काम बंद करायला सांगा.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सध्या तेथे फॉगर्स लावून वेट करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यांचे स्वत:चे सायडिंग 20-25 दिवसात सुरू झाल्यानंतर हा प्रकार संपून जाईल. अदाणी आणि जनको यांचे J.V. होणार नाही. अदाणी स्वत:च ट्रान्समिशन लाईन उभारणार आहे. तशा प्रकारचा निर्णय झालेला आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : मी माननीय वन मंत्री श्री.पतंगराव कदम यांना सांगू इच्छितो की, सभागृहा पुढे एक प्रश्न निर्माण झाला आहे. त्यांनी एका IFS अधिकाऱ्याचा निलंबनाचा प्रस्ताव पाठविला आहे. सभागृहाचे असे म्हणणे आहे की, भ्रष्ट अधिकाऱ्याला तातडीने निलंबित केले पाहिजे. हा प्रश्न आपल्या विभागाशी संबंधित असल्यामुळे व आपल्या कर्तृत्वाबद्दल सन्माननीय सदस्यांचा भरवसा असल्यामुळे त्यांनी आपणास पाचारण करायला सांगितल्यामुळे मी आपणास विनंती करतो की, कृपया त्यांची समस्या सोडवावी.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, हा विषय काय आहे हे मला माहीत नाही. हा प्रस्ताव आमच्याकडे आला असेल..... (अडथळा ) ..... येथे हायकोर्टाचा देखील संदर्भ देण्यात आला आहे. आमच्या विभागाकडे प्रस्ताव आला असेल तर तो तपासून पुढील कार्यवाही केली जाईल.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, विदर्भ वैधानिक विकास मंडळाचा निधी होता. त्यातून खरेदी झालेली आहे. खरेदी करताना काही तक्रारी झाल्या. त्यासंबंधी कलेक्टरने रिपोर्ट दिला आहे. आर.सी.पेक्षा 105 रूपयाने कमी केले आहे. भ्रष्टाचार व गैरव्यवहार झाला म्हणून मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडे याचिका क्रमांक 62/2011 दाखल केली होती. ती दिनांक 27.7.2012 रोजी उच्च न्यायालयाने खारीज केली आहे. तरी सुद्धा यासंबंधी कोणता निर्णय घ्यायाचा आहे तो आपण घ्यावा असा प्रस्ताव आम्ही त्यांच्याकडे पाठविला आहे. तो प्रस्ताव तपासून त्यावर जो काही निर्णय घ्यायचा असेल तो त्यांनी घ्यावा.

**उप सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

सभागृहाची बैठक दुपारी 12.30 वाजेपर्यंत स्थगित होत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.04 ते 12.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**सभापती** : आता दिनांक 17 डिसेंबर, 2012 रोजी स्थगित ठेवण्यात आलेला ता.प्र.क्र.33812 घेण्यात येईल.

**"राज्यातील कुपोषणामुळे होत असलेले बालमृत्यू रोखण्यासाठी करावयाची उपाययोजना"**

**<u>राखून ठेवलेला ता.प्र.क्र.33821</u>**

सर्वश्री.संजय दत्त, चरणसिंग सप्रा, अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, प्रा.सुरेश नवले, श्री.जयप्रकाश छाजेड, श्री.मोहन जोशी, श्री.सुभाष चव्हाण् : सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

1) राज्यात सन 2010-2011-2012 मध्ये शून्य ते एक वयोगटातील 4 हजार 120 बालकांच्या तर एक ते सहा वयोगटातील 1 हजार 725 बालकांचा कुपोषणाने मृत्यू झाल्याचे माहे सप्टेंबर, 2012 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

2) असल्यास, अनेक योजना आणि कोट्यवधी रुपये खर्च करुनही महाराष्ट्रातील बालमृत्यू आणि मातामृत्यू रोखण्यास आरोग्य विभाग अपयशी ठरत आहे, हे ही खरे आहे काय,

3) असल्यास, राज्यातील बालमृत्यू रोखण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

4) अद्याप याबाबत कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे् काय आहेत ?

**श्री.सुरेश शेट्टी** : 1) राज्यात झालेल्या बालमृत्युची माहिती पुढील प्रमाणे आहे.

| सन | अर्भक मृत्यू (0 ते 1 वर्ष ) | बालमृत्यू ( 1 ते 5 वर्षे ) |
|---|---|---|
| 2010-2011 | 25327 | 5427 |
| 2011-2012 | 29818 | 5327 |
| 2012-2013<br>सप्टेंबर, 2012 अखेर | 10153 | 3029 |

तथापि हे बालमृत्यू जन्मत: कमी वजन, जंतूसंसर्ग, अपुऱ्या दिवसांचा जन्म व श्वसनदाह इत्यादी कारणांमुळे झालेले आहेत. ..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राखून ठेवलेला ता.प्र.क्र.33812...

श्री.सुरेश शेट्टी.....

2) नाही.

3) बालमृत्यू रोखण्यासाठी पुढील प्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

1) जन्मलेल्या बालकांसाठी बेबी वॉर्मरची संस्थेमध्ये व्यवस्था व लसीकरण

2) कुपोषितम सॅम व मॅम बालकांकरिता गाव पातळीवर व्ही.सी.डी.सी. व आजारी सॅम व मॅम बालकांकरिता सी.टी.सी. शिबिरांचे आयोजन.

3) आजारी नवजात शिशूंसाठी जिल्हा रुग्णालयात विशेष उपचार कक्ष.

4) आजारा बालकांच्या उपचारासाठी एकात्मिक व्यवस्थापन (आयएमएनसीआय)

5) मातांना योग्य स्तनपानाबाबत समुपदेशन

6) राज्यात आदिवासी जिल्ह्यात जिल्हा सामान्य रुग्णालय स्तरावर गंभीर कुपोषित आजारी बालकांसाठी पोषण पुनर्वसन केंद्र.

7) 9 महिने ते 5 वर्षे वयोगटातील बालकांसाठी "अ" जीवनसत्व मोहीम व 1 ते 6 वयोगटातील बालकांसाठी जंतनाशक औषधी मोहीम.

4) प्रश्न उद्‌भ्वत नाही.

श्री.संजय दत्त : सभ्‍ापती महोदय, देशातील सर्वात प्रगतशील असलेल्या महाराष्ट्रामध्ये आज सुध्दा कुपोषणामुळे हजारो बालमृत्यू होत आहेत ही बाब आपणा सर्वांना शरमेने मान खाली घालायला लावणारी आहे. माझा हेतू हेत्वारोप करण्याचा नाही. मुंबई सारख्या आंतरराष्ट्रीय शहरातील गोवंडी भागात कुपोषणाच्या केसेस आढळून आल्या आहेत. या प्रश्नाच्या अनुषंगाने सभागृहात दिशाभूल करणारी उत्तरे मिळत असल्यामुळे आपण हा प्रश्न राखून ठेवला त्याबद्दल मी आपला आभारी आहे. मला एक बाब लक्षात आणून द्यावयाची आहे की, कुपोषणामुळे किती बालकांचा मृत्यू झाला त्याचे उत्तर देण्यात आलेले नसून बालमृत्यू कशामुळे झाले त्याची वेगवेगळी कारणे दिलेली आहेत. परंतु कुपोषणामुळे मृत्यू झाल्याचे मान्य करण्यात आलेले नाही. कुपोषण होऊ नये म्हणून प्रेगनन्सी काळात काळजी घ्यावयाची असते त्यामध्ये कुठेतरी कमतरता आहे. या योजनासंबंधीची माहिती लोकांपर्यंत पाहोचत नाही. तेव्हा या संबधी लोकांमध्ये जनजागृती करण्याची आवश्यकता आहे.....

..3..



AJIT/ KTG/ D/ पूर्वी श्री.भारवि.. 12:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राखून ठेवलेला ता.प्र.क्र.33812...

**सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी नेमका प्रश्न विचारावा. आपण प्रश्न डेव्हलप करण्यामध्ये चार मिनिटे घे्त असाल तर अन्य प्रश्नांना न्याय मिळणार नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, राज्यामध्ये ही समस्या डेव्हलप झालेली आहे. राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सुविधा नाहीत. तेथे् डॉक्टर नाहीत, औषधे नाहीत. माझे प्रश्न आहेत की, लाखो रुपये खर्च करुन सुध्दा या आजाराचे निवारण होत नाही त्याची कारणे काय आहेत, या कारणाचा शोध घेण्याचा तसेच अभ्यास करण्याचा शासनाने प्रयत्न केला आहे काय, ज्या परिसरामध्ये कुपोषणाच्या केसेस आढळतील तेथील अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करणार आहात काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी कुपोषणाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. मला त्याबाबत एवढेच सांगावयाचे आहे की, हा प्रश्न फक्त आरोग्य विभागाशी संबंधित नाही. यामध्ये अनेक विभागाचा संबंध येतो. या प्रश्नाच्या संदर्भात तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांनी महिला व बाल विकास मंत्री यांना नोडल एजन्सी म्हणून नेमले होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली जे कुपोषणासंबंधी काम करतात त्या आठ ते नऊ विभागांचा समावेश करण्यात आला होता. त्यामध्ये आरोग्य विभागाचा समावेश आहे. ग्रामीण भागातील जनतेच्या आरोग्याची काळजी घेणे आणि त्यांना आरोग्य विषयक सुविधा पुरवणे, गर्भवती महिलांना आरोग्य विषयक सुविधा पुरवणे हे आरोग्य विभागाचे काम आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारले की, प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सुविधा उपलब्ध नाहीत त्यासाठी कोणता कार्यक्रम राबविण्यात येत आहे.हा प्रश्न प्रथम चर्चेला आला होता त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी प्रश्न विचारला होता की, कुपोषणामुळे किती बालकांचा मृत्यू झाला त्याची आकडेवारी सभागृहात द्यावी. त्याबाबत सांगू इच्छितो की, आपण कोणतेही डॉक्युमेन्टेशन करताना कुपोषणामुळे मृत्यू झाला असे डॉक्युमेन्टेशन करीत नाही. एखाद्या अर्भकाचा मृत्यू झाल्यानंतर कोणत्या बाबीमुळे त्याचा मृत्यू झाला त्याची कारणे आपण डेथ ऑडीटमध्ये देतो. मी आपणास सांगू इच्छितो की, आता आदिवासी तालुक्यामध्ये डेथ ऑडीट

..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अनिवार्य केलेले आहे. जिल्ह्यातील दोन तालुक्यांमध्ये डेथ ऑडीट अनिवार्य करण्याचा निर्णय घेतलेला आहे. अन्य जिल्हयांमध्ये प्रत्येकी एका तालुक्यामध्ये डेथ ऑडीट अनिवार्य केलेले आहे. त्याशिवाय आपण प्रत्येक मृत्यूचे रेकॉर्डींग आरोग्य विभागामध्ये करतो. ग्रामीण भागात शंभर टक्के डेथ रेकॉर्डींग करतो. परंतु नागरी भागात मग मुंबई महानगरपालिका, पुणे महानगरपालिका, नागपूर महानगरपालिका किंवा स्थानिक महानगरपालिका ही कामे करतात त्यांच्याकडून राज्य सरकारकडे वेळेवर माहिती प्राप्त होत नाही. त्यासाठी आम्ही अधिवेशनापूर्वी मिटींग घेऊन अतिरिक्त मुख्य सचिव व महानगरपालिकांच्या आयुक्तांना सूचना दिलेल्या आहेत की, डेथ ऑडीट आणि डेथ रिपोर्टींगची माहिती महाराष्ट्र शासनाला दिली पाहिजे.

सभापती महोदय, डेथ रिपोर्टींचे ऑडीट करताना बालमृत्यू होण्याची जी 11 कारणे आहेत त्यामध्ये ॲक्सिडेन्टल कॉज, सेफ्टेसिनिया, डायरिया, अस्फेक्सीया, न्युमोनिया, स्नेकबाईट, लो-बर्थ-वेट, प्री मॅच्युअर डिलिव्हरी आणि मिसीलिनिअस कॉज अशी कारणे आहेत. यामध्ये क्लासिफिकेशन करताना Premature delivery is basically because of malnutrition.
आईचे मालन्यूट्रेशन असेल तर आपोआप बाळाचे मालन्यूट्रेशन होते. लो बर्थ वेटची नोंदणी करताना 100 टक्के लो बर्थ वेटची बालमृत्यु होतात ती कुपोषणा मुळेच होतात. आपण टोटल फिगर पाहिली तर 60 टक्के मृत्युची कारणे ही कुपोषणात आहेत. 60% deaths are caused due to mal nutrition, early marraige and various other social problems.माल न्युट्रेशनमुळे बालकांचा मृत्यू झाला अशी नोंदणी होत नाही. पण राज्यासंबंधी बोलताना इन्फंट मोर्टालिटीचा रेट पाहिला तर हा रेट हजारामागे 25 वर आलेला आहे. हा रिपोर्ट केंद्र सरकार करते. महाराष्ट्र सरकार करीत नाही. 2005 मध्ये इन्फंट मोर्टालिटी रेट 36 होता. 2006 मध्ये देखील 36 होता. 2009 मध्ये 31 झाला आणि 2010 मध्ये 28 वर आला. 2011 मध्ये 25 वर आला आहे. आपणाला ही आकडेवारी आण्खी खाली आणायची आहे. आपणास ती संख्या 17 ते 18 वर आणावयाची आहे. त्यासाठी आपण आदिवासी विभागामध्ये जास्त लक्ष देत आहोत.

..5..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी....

सभापती महोदय, विदर्भ आणि आदिवासी भागामध्ये एसएनसीयुच्या अपग्रेडेशनचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे.

यानंतर श्री.सरफरे..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33812....

श्री. सुरेश शेट्टी....

त्यासाठी आपल्याला केंद्र सरकारकडून टोटल फंडींग मिळाले आहे. आता आपण 23 जिल्हा रुग्णालयामध्ये, 8 महिला रुग्णालयामध्ये, 3 उप जिल्हा रुग्णालयामध्ये नवीन एस.एन.सी.यू. ज्याला आपण स्पेशल न्यू बोर्न केअर युनिट म्हणतो ते मॉडर्नाइज करण्याचे काम हाती घेतले. त्यामध्ये ऑक्टोबर 2012 पर्यन्त 20 हजार 710 बालकांवर ट्रिटमेंट केलेली आहे. त्याचप्रमाणे आपण व्ही.सी.डी.सी. चा कार्यक्रम हाती घेतला. या कार्यक्रमासाठी आम्ही फंडींग करीत असलो तरी तो अंमलात आणण्याचे काम महिला व बाल विकास विभागाच्या अंगणवाडयांमार्फत करण्यात येत आहे. सद्या अंगणवाडयांमध्ये लहान मुलांना जो आहार दिला जातो त्यापेक्षा अतिरिक्त 4 पदार्थ त्या मुलांना दिले जातात.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे आपण चाईल्ड ट्रिटमेंट सेंटरचा कार्यक्रम हाती घेतला आहे. जी कुपोषित बालके आहेत त्यांना आपल्या गाडीमधून हॉस्पिटलमध्ये नेणे आणि जोपर्यंत ते 100 टक्के नॉर्मल होत नाहीत तोपर्यंत त्यांना 100 टक्के मोफत ट्रिटमेंट दिली जाते. या कार्यक्रमामध्ये ऑक्टोबर 2012 पर्यंत 13 लाख 28 हजार 83 बालकांवर उपचार केले आहेत आणि त्याकरिता 279 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आपण 15 आदिवासी जिल्ह्यांमध्ये न्युट्रिशन अँड रिहॅबिलिटेशन सेंटर सुरु केले आहेत. त्यामध्ये 570 बालकांनी त्याचा फायदा घेतला आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रीमहोदय प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देत आहेत काय?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, शासनातर्फे कोणता कार्यक्रम राबविण्यात येत आहे असा प्रश्न विचारला असल्यामुळे मी उत्तर देत आहे. आपण म्हणत असाल तर सर्व माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : मंत्रीमहोदयांचे सविस्तर उत्तर आपण ऐकून घ्यावे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, डी-वर्मिंग आणि व्हिटामीन-ए चा कार्यक्रम आपण हाती घेतला. त्यामध्ये 3.03 लाख मुलांना त्याचा लाभ झाला आहे. "Integrated Management of New born childhood illness." हा कार्यक्रम आपण हाती घेतला. त्या कार्यक्रमामध्ये प्रत्येक एएनएमने व्हिजिट करावयाची असते. त्यामुळे त्यांच्या व्हिजिटचा कार्यक्रम आपण हाती घेतला. त्याचप्रमाणे "infant child feeding" चा कार्यक्रम हाती घेतला, ज्याला आपण ब्रेस्ट



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33812....

श्री. सुरेश शेट्टी....

फिडिंग म्हणतो त्याचा अवेरनेस कार्ग्रक्रम संपूर्ण राज्यामध्ये घेतला आहे. त्याचा सक्सेस रेट 76 टक्के आहे. हे सर्व कार्यक्रम राबवितांना सर्व माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हा फार महत्वपूर्ण कार्यक्रम असून त्यासाठी राज्य शासन आणि केंद्र शासनाकडून जो काही निधी उपलब्ध करुन द्यावा लागेल तो देण्याचा महाराष्ट्र शासनाचा मानस आहे. हा कार्यक्रम आदिवासी भागामध्ये आणि बिगर आदिवासी भागामध्ये बळकट करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, हा प्रश्न दोन गोष्टींमुळे पुढे ढकलण्यात आला आहे. अर्भक मृत्यू आणि बालमृत्यू यामध्ये फरक असतो. सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी सविस्तर माहिती दिली आहे "Underline cause is malnutrition." पेशंट कोणत्या आजाराने मेला किंवा बालमृत्यू कशामुळे झाले हे आपण मृत्यूच्या दाखल्यावर लिहितो. "Because of cardiac respiratory failure." त्यामध्ये हार्ट अटॅक असेल, हायपरटेंशन असेल अशी अनेक कारणे आहेत. यापैकी एक कारण हे माल न्यूट्रीशनचे असलेच पाहिजे. असा आमचा दावा आहे. हे कारण आपण मान्य करणार काय? दुसरा प्रश्न असा की, आपण बेबी वॉर्मरची व्यवस्था केली आहे काय? आपल्या दृष्टीने बेबी वॉर्मरची संकल्पना काय आहे, हे मला जाणून घ्यावयाचे आहे? आपल्या संकल्पनेप्रमाणे एक बिछाना, त्यावर एक चादर, त्यावर एक मेनकापड आणि वर एक 100 व्होल्टचा बल्ब अशी आहे काय? असेल तर ती चुकीची आहे. याचे कारण त्या ठिकाणी स्पेशलाईज वॉर्मर असणे आवश्यक आहे. याकरिता सर्व ठिकाणी असलेली 100 व्होल्टच्या बल्बचे वॉर्मर आपण बदलणार काय?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी दोन प्रश्न उपस्थित केले. पोस्ट मार्टेम रिपोर्टमध्ये कुपोषणाचे कारण नमूद करणे हा एक तांत्रिक विषय आहे. याबाबत महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या तज्ज्ञांकडे हा विषय रेफर करण्यात येईल. त्याबाबत त्यांचे ओपिनियन घेऊन जो काही निर्णय होईल त्याची माहिती पुढील अधिवेशनामध्ये या सभागृहामध्ये देण्यात येईल. सभापती महोदय, त्यानंतर माननीय सदस्यांनी बेबी वॉर्मर संबधीचा विषय सभागृहात मांडला आहे. जुन्या वॉर्मरमध्ये 100 व्होल्टचा बल्ब लावला जात होता. आता नवीन एस.एन.सी.यू. कार्यक्रमामध्ये व्हेंटिलेटरसह असलेले नवीन बेबी वॉर्मर खरेदी केले आहेत. त्याही पुढे जाऊन सांगू इच्छितो की, आमची परवा मिटींग झाली आहे. मी जुगार्ड नावाचे एक पुस्तक वाचले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33812....

श्री. सुरेश शेट्टी....

त्यामध्ये "Innovative programmes in the world." बाबत माहिती दिली आहे. त्यामध्ये एका माणसाने असे वॉर्मर बनविले आहे की, त्यामध्ये गरम पाणी घालावे लागते. त्याची किंमत सुध्दा 10 हजार रुपये आहे. त्याचे सॅंपल मागवून आम्ही ग्रामीण भागात पुरविणार आहोत. अतिशय टॉप क्वॉलिटीचे ते वॉर्मर असून त्याचे व्हिडिओ प्रेझेंटेशन सुध्दा माझ्या आयपॉडमध्ये आहे. सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर आपण माझ्या दालनात आल्यास मी ते आपल्याला दाखवितो. त्याची सर्व माहिती मी घेतली आहे, कलकत्त्यामध्ये त्या कंपनीचे डिलर आहेत. त्यांच्यासोबत चर्चा करुन आपण खरेदी करु.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मंत्रीमहोदय अतिशय कार्यक्षम आहेत त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका नाही. त्यांनी सांगितलेल्या योजना कागदावर चांगल्या आहेत. मी माझा मुद्दा सांगत होतो की, या योजनांची अंमलबजावणी ग्रास रुटवर नीट होत नाही. ती का होत नाही याचा शोध त्यांनी घ्यावा. हा गंभीर प्रश्न असल्यामुळे ज्या ज्या भागामध्ये या प्रश्नासंबंधी तेथील अधिकाऱ्यांवर जबाबदारी टाकली आहे, त्यांनी चांगले काम केले असेल तर त्यांना इन्सेटिव्ह देण्यात यावे परंतु जर ते कमी पडले तर ते अकार्यक्षम असल्याबाबत त्यांच्यावर अकाऊंटिबिलिटी फिक्स करणार काय? दुसरा प्रश्न असा की, जे भरारी पथक नेमण्यात आले आहेत ते नॉन फंक्शनल आहेत, त्यांना फंक्शनल केले जाईल काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आपण आपल्या राज्यात "Mother and child tracking system" सुरु केली आहे. त्या करिता एक इनोव्हेटिव्ह कार्यक्रम आपण राज्यामध्ये राबवीत आहोत. त्या बाबत माननीय सदस्यांकरिता सांगू इच्छितो की, प्रत्येक गर्भवती महिलेचे व डिलिव्हरी झालेल्या बाळाचे आपल्या राज्यात ट्रॅकिंग होते. त्याबाबत डेली डाटा एंट्री होऊन डायरेक्टरच्या कार्यालयामध्ये त्याची माहिती येते. मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण माझ्या डायरेक्टोरेटमध्ये एकदा यावे. त्या ठिकाणी संपूर्ण राज्याची माहिती आपल्याला देण्यात येईल. मी माननीय सदस्यांना नम्रपणे सांगू इच्छितो की, आदिवासी भागामध्ये माझा दौरा असेल त्यावेळी माननीय सदस्यांनाही सोबत घेऊन जातो. ग्रामीण भागामध्ये आमच्या सार्वजनिक आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी काम करीत आहेत त्यांच्या कामाचा आढावा त्यांच्या सोबत घेण्यात येईल.

------

21-12-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) R 4

DGS/ D/ KTG/ 12:40

**औरंगाबाद येथील रेल्वे मालधक्क्यावर मध्यप्रदेशाच्या मानमंडीतून गोरगरीबांसाठी**

**आलेला शेकडो क्विंटल गहू सडत असल्याबाबत"**

विधानपरिषद अल्पसूचना प्रश्न क्रमांक 36539 डॉ. नीलम गोऱ्हे, विधान परिषद सदस्य : सन्माननीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

1) औरंगाबाद येथील रेल्वे माल धक्क्यावर मध्य प्रदेशाच्या मानमंडीतून गोरगरीबांसाठी आलेला शेकडो क्विंटल गहू दि. 5 ऑक्टोबर, 2012 रोजी वा त्या सुमारास पावसात भिजला आहे, हे खरे आहेकाय,

2) असल्यास, सदरहू गहू हा हुडेकऱ्यांनी वेळेत उचलला नसल्याने हे नुकसान झाले आहे, हेही खरे आहे काय,

3) असल्यास, गहू वेळेवर न उचलण्याची कारणे काय आहेत,

4) तसेच या मालधक्क्याववर येणारे धान्य, खत सुरक्षित ठेवण्यासाठी गुडशेडची लांबी वाढविण्याची गेल्या अनेक वर्षापासून रेल्वे बोर्डाकडे मागणी करुनही याबाबत कोणतीच कार्यवाही होत नाही, हे ही खरे आहे काय,

5) असल्यास, या मागणीचा पाठपुरावा केंद्र शासनाकडे राज्य शासन करणार आहे काय?

**श्री. अनिल देशमुख, (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री)** : (1) नाही.

(2) नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

(4) व (5) सदर बाब ही रेल्वे प्रशासनाच्या अखत्यारीतील असून महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाकडून रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या घटना वारंवार घडतात. त्यामध्ये केवळ रेल्वे बोर्डाकडे जबाबदारी टाकून रेल्वे प्रशासनाबरोबर पाठपुरावा करीत असल्याचे आपण सांगितले आहे.माझा प्रश्न असा आहे की, रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर माल उतरविल्यानंतर हुंडेकरी ट्रकवाले उपलब्ध होत नसल्यामुळे दिरंगाई झाली आहे. दुसरे असे की, या कंत्राटदारांनी तो माल उचलून तुमच्या वखार महामंडळामध्ये नेऊन द्यावयाचा आहे. यामध्ये एफ.सी.आय., महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ आणि वाहतूक कंत्राटदार यांची संयुक्त जबाबदारी असते. त्यामुळे या ठिकाणी 2 हजार 643 टन गहू उचलण्याची जबाबदारी ज्या कंत्राटदारावर होती, त्यांच्यावर आपण कोणती

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अ.सू.प्र.क्र. 36539...

डॉ. नीलम गोऱ्हे...

कारवाई केली? एफ.सी.आय. ची जबाबदारी कोणत्या विभागाकडे आहे याची आपल्याला कल्पना आहे. त्यामुळे हे धान्य वाहतुकीमध्ये खराब होणार नाही या दृष्टीने राज्य वखार महामंडळ कोणती दक्षता घेत आहे?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.36539 .. . . .

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाला लेखी उत्तरामध्ये सविस्तर उत्तर दिलेले आहे.सन्माननीय सदस्यांनी प्रश्नामध्ये म्हटले आहे की,"औरंगाबाद येथील रेल्वे मालधक्क्यावर मध्य प्रदेशच्या मंडीतून आलेला शेकडो क्विंटल धान्य खराब झाले."परंतु अशा प्रकारे धान्य खराब झालेले नाही. ते धान्य मध्य प्रदेश मधून औरंगाबाद येथे आले होते. भारतीय अन्न महामंडळ म्हणजे एफ.सी.आय.यांची याबाबत सगळी जबाबदारी असते. आम्ही त्यांच्याकडून माहिती घेतली असून याबाबत राज्य शासनाची काही जबाबदारी नाही. एफ.सी.आय.च्या माध्यमातून बाहेरच्या राज्यातून धान्य येथे आल्यानंतर ते वखार महामंडळाकडे पाठविले जाते आणि मग तेथून आपल्याला त्याची डिलीव्हरी मिळते. याबाबतीत आम्ही भारतीय अन्न महामंडळाकडून सर्व माहिती घेतली असता त्यांनी असे सांगितले की, एकंदर 52,640 पोती आली होती. ही पोती ज्या दिवशी आली त्याच दिवशी ती जाधववाडी येथील गोडाऊन मध्ये हलविण्यात आली. सन्माननीय सदस्यांनी कॉन्ट्रॅक्टरच्या बाबतीत प्रश्न मांडले किंवा हुंडेकरांच्या बाबतीत सांगितले. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे खरे आहे की, जे कॉन्ट्रॅक्टर आहेत त्यांनी आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. आम्ही या संबंधातील सूचना वखार महामंडळाला देऊ. जे कॉन्ट्रॅक्टर काम करणार नाहीत त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे.

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, गोदामामध्ये धान्य, गहू सडून जात आहे. अशा प्रकारे गहू सडून जाण्यापेक्षा त्याचे गरिबांना वितरण करावे अशा पध्दतीचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले होते. शासनाने उच्च न्यायालयाच्या निकालानुसार त्यादृष्टीने कार्यवाही केलेली आहे काय? असल्यास, अशा प्रकारे सडून जाणारा गहू गरिबांना कशा प्रकारे आणि किती प्रमाणात वाटप करण्यात आला आहे ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, याठिकाणी औरंगाबादच्या बाबतीत प्रश्न विचारला आहे. या बाबतीत सन्माननीय सदस्यांना स्वतंत्रपणे प्रश्न विचारता येईल.

----

.. . .एस-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नागपूर सेवाग्राम येथील महात्मा गांधीचे वास्तव्य असलेल्या
बापू कुटीचे रक्षण व व्यवस्थेसाठी करावयाची उपाययोजना

**(1) *34635 श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.मोहन जोशी , प्रा.सुरेश नवले , श्री.सुभाष चव्हाण** : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नागपूर सेवाग्राम येथील महात्मा गांधीचे वास्तव्य असलेली बापू कुटी जीर्णावस्थेत असल्याची बाब माहे ऑगस्ट, 2012 च्या पहिल्याच आठवडयामध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शासनाने याची पाहणी वा चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, बापू कुटीच्या रक्षण व व्यवस्थेसाठी शासन कोणती कार्यवाही वा उपाययोजना करणार आहे वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, उक्त प्रकरणी होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील, श्री.जयंत पाटील यांच्याकरिता** : (1) नाही.

(2) प्रश्न उद्‌भवत नाही.

(3) सेवाग्राम येथील बापुकुटी या स्थळाच्या रक्षण व व्यवस्थेसाठी सन 2010-11 मध्ये जिल्हा योजनेतून पर्यटन स्थळाच्या विकासाअंतर्गत खालील कामे करण्यात येत आहेत :-

अ) सेवाग्राम येथे उगले ले.आऊट ते शेताकडील रस्ता बांधकाम - सदर काम प्रगतीपथावर आहे.

ब) सेवाग्राम आश्रम येथे सि.नाली व पेव्हींग ब्लॉकचे बांधकाम करणे - सदर काम पूर्ण झाले आहे.

क) बापुकुटीरच्या बाहेर वॉल कंपाऊंड बांधणे - सदर काम प्रगतीपथावर आहे.

ड) बापु कुटीचे सौंदर्यीकरण करणे - सदर काम पूर्ण झाले आहे.

इ) स्वच्छतागृह बांधणे - सदर काम पूर्ण झाले आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या कुटीच्या संदर्भातील हा प्रश्न आहे.जवळपास 13 वर्षे वास्तव्य केलेल्या बापूंनी सुरु केलेल्या स्वातंत्र्याच्या लढ्याच्या बाबतीत जेथे ऐतिहासिक निर्णय घेण्यात आले. तिथे बाजूला पवनार आश्रम आहे म्हणजे महात्मा गांधी यांच्या संपूर्ण आयुष्याच्या लढ्याचे मूळ ठिकाण कोणते असेल तर ते सेवाग्राम आहे. जेथे त्यावेळचे जगातील सर्व स्वातंत्र्य सेनानी आले आणि इंग्रजांच्या विरोधात लढा दिला गेला.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याच्या बाजूला विनोबा भावे यांचा पवनार आश्रम आहे. वर्धा, पवनार हा भाग महात्मा गांधी यांच्या विचारांचे केंद्र असणारा आहे. पण दुर्दैवाने आज बापूंची कुटी आहे त्याच्या भिंती पडतील की काय अशी स्थिती निर्माण झाली आहे. तेथील झाडे कुटीच्या छतावर आली आहेत अशा प्रकारे या कुटीची जीर्ण अवस्था झाली आहे. ज्यांच्या अहिंसेच्या विचाराने जग प्रभावित झाले आणि जगातील वेगवेगळया देशांमध्ये, शहरांमध्ये महात्मा गांधींचे स्मारक म्हणून मोठमोठे पुत्ळे उभे करण्यात आले.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, सेवा ग्राम येथील जी कुटी आहे, तेथे अनेक पर्यटक येतात, आंतरराष्ट्रीय पर्यटक येतात. अशा वेळी बापूजींच्या कुटीची अशा प्रकारे दुर्दशा होणे ही गंभीर बाब आहे म्हणून मी सरकारला आपल्यामार्फत प्रश्न विचारु इच्छितो की, बापूंच्या विचाराचा प्रसार करण्याच्या दृष्टीकोनातून केवळ त्यांची कुटी दुरुस्त करण्याऐवजी, वर्धा ते पवनार येथील जो सगळा परिसर महात्मा गांधी यांच्या विचाराने, त्यांच्या वास्तव्याने पुनित झालेला आहे, प्रभावित झालेला आहे, तेथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे कन्व्हेन्शन सेंटर किंवा एखादी चांगली लायब्ररी तयार करावी जेणेकरुन महात्मा गांधी यांच्या विचारांचा अभ्यास करण्यासाठी कुठूनही लोक आले तरी त्यांना सर्व साधने उपलब्ध करुन देता आली पाहिजेत. यादृष्टीने सर्व गोष्टी करण्यासाठी शासनाने काही आराखडा तयार केला आहे काय? असल्यास, आराखड्याच्या अंमलबजावणीस कधी सुरुवात होणार आहे? तसेच सध्या महात्मा गांधी यांच्या कुटीची जी अवस्था झाली आहे ती पाहता तेथे केवळ कम्पाऊंड वॉल बांधणे म्हणजे एखाद्या झोपडपट्टीची दुरुस्ती करावी अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे.या बाबतीत नव्याने सगळा आराखडा तयार करुन गांधीजींची कुटी सुव्यवस्थित करण्यासाठी सरकार काय करणार आहे?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाचा विषय उपस्थित केला आहे. महात्मा गांधी यांच्याविषयी सर्वांनाच आस्था आहे. म्हणून आजपर्यंत राज्य शासनाने तेथे अनेक कामे केली आहेत. मग त्यामध्ये कम्पाऊंड वॉल असेल, कॉटेजेसची कामे असतील, यात्री मार्गदर्शक फलक असेल, पाण्याच्या टाकीचा विषय असेल किंवा तेथील सौंदर्यीकरण असेल किंवा तेथील संस्थेने जी वेगवेगळी कामे सुचविली आहेत त्या सर्व कामांना



APR . 12.50



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पर्यटन विभागाच्या माध्यमातून मंजुरी देऊन सदरहू कामे कार्यान्वित करण्यात आली आहेत. आदरणीय बापूजींच्या तेथील वास्तव्याला 75 वर्षे पूर्ण झाली असल्याने राज्य शासनाने याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन त्याठिकाणी जास्त निधी देण्याची भूमिका स्वीकारली. त्यानुसार राज्य शासनाने डी.पी.आर.मार्फत या संपूर्ण परिसराचे नियोजन करण्याचे प्रायोजित केले आहे. हा डी.पी.आर.येत्या 15 दिवसामध्ये राज्य शासनाला सादर केला जाईल आणि या माध्यमातून अनेक जणांनी ज्या भावना, ज्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत त्या दृष्टीकोनातून आपण तेथे एक विस्तृत असा प्रकल्प राज्य शासनाच्या वतीने करणार आहोत. आदरणीय बापूजींच्या कुटीची व्यवस्था तेथील ट्रस्टच करीत आहे. त्यासाठी देखील राज्य शासनाची मदत करण्याची निश्चित भूमिका आहे. तेथील संस्थेने काही कामे सुचविली असून त्यालाही आपण प्राधान्य देत आहोत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे तेथे येणारे जे पर्यटक असतील, त्यांना बापूजींच्या संबंधातील, त्यांच्या कार्याबाबत माहिती मिळावी यासाठी तेथे एक इंटरनॅशनल सेंटर व्हावे अशा पध्दतीची राज्य शासनाची भूमिका आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सेवाग्राम हे महात्मा गांधी यांचे स्थान आहे हे त्यांची कुटी पाहिल्यानंतर सर्वांच्या लक्षात येते आणि ही कुटी पहाण्यासाठीच तेथे मोठ्या प्रमाणात लोक जातात. पण या कुटीला 3-4 वर्षापूर्वी उधई लागली होती. त्यामुळे त्या कुटीचा जीर्णोध्दार करावा यासंदर्भात अगोदर देखील प्रश्न मांडण्यात आला होता. परंतु अजूनपर्यंत त्या कुटीकडे दुर्लक्ष करुन बाकीच्या ठिकाणी विकासाचे आणि पर्यटनाच्या दृष्टीकोनातून काम सुरु आहे. परंतु अगोदर त्या कुटीची दुरुस्ती करुन, त्याचे नूतनीकरण करुन गांधीजींचे जे जुने स्थान आहे, ते कायम ठेवणार आहात काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, कुटीच्या सर्व दुरुस्तीच्या संबंधातील कामे ट्रस्ट स्वत: करीत आहे.तसेच माझ्याकडे कुटीचे नुकतेच काढलेले फोटो आहेत आणि तेथे कुटीच्या दुरुस्तीचे काम चांगल्या प्रकारे केलेले आहे.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी सेवाग्राम आश्रम स्थापन केला आणि आचार्य विनोबा भावे यांनी पवनार आश्रम स्थापन केला. परंतु राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी या आश्रमामध्ये 13 वर्षे वास्तव्य केले आणि आज त्या घटनेला 75 वर्षे पूर्ण होत आहेत.



ता.प्र.क्र.34635 . . . .

श्री.मोहन जोशी . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आपल्या महाराष्ट्राला आणि देशाला भूषण असणारा असा हा एक ऐतिहासिक परिसर आहे आणि स्वातंत्र्य संग्रामाचे मंदिर आहे. त्या मंदिराच्या सुशोभिकरणाबाबत माननीय मंत्री महोदयांनी मघाशी उत्तर दिले आहे. पण आपल्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी खोटी उत्तरे कुठे द्यावयाची याचे सुध्दा भान ठेवले पाहिजे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये ज्या तीन गोष्टी सांगितल्या त्या बरोबर आहेत. पण एक गोष्ट अशी आहे की, याठिकाणी सौंदर्यीकरण केले आहे असे सांगण्यात आले आहे. पण ते पूर्णपणे चुकीचे आहे. मी चार दिवसापूर्वी पवनार येथे स्वत: गेलो होतो. त्याठिकाणी सौंदर्यीकरण झालेले नाही. माझी माननीय मंत्री महोदयांना एवढीच विनंती आहे की, त्यांनी विभागाच्या अधिकाऱ्यांना सांगावे की, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या बाबतीत तरी खोटे बोलू नका. माझा स्पेसिफीक प्रश्न आहे की, या संपूर्ण परिसरामध्ये तसेच वर्धा शहरातील चौका-चौकामध्ये स्वातंत्र्यासाठी सभा झाल्या असतील, ज्योत पेटवली असेल आणि . . . .

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, मी शासनाला विनंती करतो की, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी ज्या पवनार आश्रमामध्ये 13 वर्षे वास्तव्य केले त्या घटनेला 75 वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून वर्धा शहराचा पूर्ण विकास करावा. कारण तेथे जवळजवळ 3 लाखाच्या आसपास आंतरराष्ट्रीय पर्यटक येत असतात. अशा वेळी नागपूर ते सेवाग्राम व्हाया बुटबोरी हा जो रस्ता आहे त्या रस्त्याला "राष्ट्रपिता महात्मा गांधी अहिंसा मार्ग"असे नाव देऊन सदरहू रस्ता चार लेनचा करणार आहात काय? असा माझा पहिला प्रश्न आहे आणि दुसरा प्रश्न असा आहे की, पवनार आश्रमाच्या अजूबाजूला यात्री निवास आहे. तेथे पाण्याची कमतरता आहे. यासाठी 2 कोटी 26 लाख रुपयांचे अंदाजपत्रक शासनाकडे सादर करण्यात आले आहे. वर्धा जिल्ह्याचे पालक मंत्री आणि राज्याचे अर्थ नियोजन मंत्री सदनामध्ये उपस्थित आहेत. त्यामुळे 2 कोटी 26 लाखाचा हा जो छोटा प्रकल्प आहे तो महिन्याभरामध्ये मार्गी लावण्यात यावा आणि मी ज्या रस्त्याच्या बाबतीत मघाशी उल्लेख केला आहे, त्याबाबतीत शासनाने सकारात्मक प्रतिसाद द्यावा. तसे शासन करणार आहे काय?



ता.प्र.क्र.34635 . . . .

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, नुकतेच काही दिवसापूर्वी तेथील पालक मंत्री माननीय श्री.राजेंद्रभाऊ मुळक यांच्याशी माझी चर्चा झाली आहे. सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशीसाहेब

असुधारीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यांनी जो उल्लेख केला आहे, त्याबाबत सांगावयाचे तर या प्रकल्पाच्या कामामध्ये सर्व बाबींचा अंतर्भाव केला आहे. ही बाब ताबडतोब होणार नाही पण यासंबंधातील एकत्रित प्रस्ताव नियोजन मंत्री म्हणून मला दाखविण्यात आलेला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी एकदा तेथे भेट दिली पाहिजे म्हणजे चुकीचे उत्तर येणार नाही. त्यामुळे आपण तेथे भेट द्यावी.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मी तेथे भेट दिली आहे पण सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत, तसे मला काही दिसले नाही. याठिकाणी सौंदर्यीकरणावर वेगवेगळ्या हेडमधून खर्च झालेला आहे. त्या ठिकाणी तेथील डी.पी.डी.सी.मधून काही खर्च करण्याची मुभा आहे. त्यातून गेल्या दोन-चार वर्षामध्ये काही खर्च झाला आहे. कुटीच्या सौंदर्यीकरणाचे काम झालेले नाही. कारण कुटीचे काम तेथील ट्रस्ट पहात असतो आणि तेच त्या ठिकाणी सुधारणा करतात. मात्र तेथील कुटी आहे, ती तशीच ठेवण्याचा त्यांचा नेहमीचा प्रयत्न आहे. त्या व्यतिरिक्त आश्रमातील उरलेला जो भाग आहे, त्याठिकाणी जशी गरज लागेल आणि मागणी येईल त्यानुसार डी.पी.डी.सी.मधून आणि जिल्हा नियोजन मधून खर्च करण्यात आला आहे. त्याची कागदपत्रे आणि आकडेवारी आपल्याकडे आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी साहेबांनी जो मुद्दा मांडलेला आहे, त्याप्रमाणे एक कन्व्हेन्शन हॉल आणि वर्धा शहरातील काही चौकांचे सुशोभिकरण करणे तसेच तेथे मोठ्या प्रमाणात येणाऱ्या यात्रेकरुंना सुविधा उपलब्ध करणे अशा प्रकारचा एक प्रस्ताव विचाराधीन आहे.

यानंतर श्री.बरवड . . ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 34635 ......

आणि त्या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांसाठी सुविधा अशा स्वरुपाचा एक प्रस्ताव विचाराधीन आहे. राज्याचा नियोजन मंत्री या नात्याने तेथील पालकमंत्र्यांनी मला प्रस्ताव दाखविला होता. त्याला मी स्वीकृती दिलेली आहे. त्याप्रमाणे ते तपशीलवार नवीन प्रस्ताव तयार करणार आहेत. त्याला राज्य सरकार लवकर मान्यता देईल जेणेकरुन महात्मा गांधींसाठी त्या ठिकाणी येणाऱ्या आणि सेवाग्रामला भेट देणाऱ्या सर्वच भाविकांची व्यवस्था व्हावी. त्या ठिकाणी येणाऱ्या लोकांना भविष्य काळातही महात्मा गांधींच्या विचारांची, त्यांनी केलेल्या कार्याची सर्वच माहिती मिळावी असा एक फार मोठा प्रकल्प राज्य सरकारने हाती घेण्याचे ठरविले आहे. त्याची सुरुवात झालेली आहे. त्याला राज्य सरकार लवकर मान्यता देईल अशी मला खात्री आहे.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**खेड (जि. रत्नागिरी) तालुक्यातील विविध रस्त्याच्या कामांना मंजुरी मिळणेबाबत**

**(२) * ३४३८३ श्री.रामदास कदम :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि. रत्नागिरी) तालुक्यातील (१) घेरापलगड ते किल्लेमाची रस्ता, (२) आंबये नातुनगर रस्ता व जामगे बौध्दवाडी ते राजपुरेवाडी रस्ता या विकास कामांना मंजुरी मिळणेकरिता लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना वारंवार निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांना मंजुरी मिळणेबाबत अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यांना लवकरांत लवकर मंजूरी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील, श्री.जयंत पाटील याच्याकरिता :** (१) होय.

(२) प्रश्नाधीन घेरापलगड किल्लेमाची रस्त्यावर सन २०१०-११ मध्ये गट-अ व गट-ई कार्यक्रमातंर्गत मंजूर कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. सन २००९-१० मध्ये या रस्त्यावर गटर काढणे, संरक्षक भिंत बांधणे इत्यादी कामे मंजूर असून काम प्रगतीत आहे.

आंबये नातुनगर व जामगे बौध्दवाडी राजपुरेवाडी या रस्त्यांवर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कामे मंजुर असून सदर कामे प्रगतीत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, या तीन रस्त्यांबाबत मी जवळजवळ 20 वेळा विधिमंडळामध्ये प्रश्न विचारलेला आहे परंतु दुर्दैवाने ही कामे होऊ शकलेली नाहीत. किल्लेमाची रस्त्याचे जे नाव दिलेले आहे तो रस्ता नवेवाडी ते किल्लेमाची असा फक्त 500 मीटरचा रस्ता आहे. त्यासाठी 10 लाख रुपये लागणार आहेत. दुसरा आंबये-नातूनगरचा जो रस्ता आहे त्यामध्ये 4 किलोमीटर रस्ता झालेला आहे आणि आणखी एक किलोमीटरचा रस्ता झाला तर आम्ही सरळ मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर येतो आणि आमचा 20 किलोमीटरचा फेरा वाचतो. 4 किलोमीटरचे काम झालेले आहे. फक्त एक किलोमीटरचे काम बाकी आहे. त्या बाबत मंत्री महोदयांनी सांगावे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, एक किलोमीटर रस्त्याचे काम जर नॉनप्लॅनमधील असेल तर सन्माननीय सदस्यांनी त्या संदर्भात मला एक स्वतंत्र पत्र द्यावे. नॉनप्लॅनसाठी दुसऱ्या एखाद्या हेडमधून पैसे देऊन तो रस्ता जोडण्याचे काम पूर्ण करु. घेरापलगड-मोरेवाडी-किल्लेमाची रस्ता 500 मीटरचा आहे असे सांगितले. हा रस्ता जर 500 मीटरचाच असेल तर त्या बाबतीत सुध्दा मला स्वतंत्र पत्र द्यावे. या दोन्ही कामांसाठी सभागृहाचा वेळ घेण्याची आवश्यकता नाही.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

ता. प्र. क्र. 34383 ......

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, जामगे बौध्दवाडी ते राजपुरेवाडी या रस्त्याचेही एक काम आहे.

श्री. जयंत पाटील : योजेनांतर्गत काम असेल तर अडचण नाही. ते काम जर योजनाबाह्य असेल तर थोडी अडचण येईल. आपण मला भेटलात तर हे सर्व मार्ग करु. यासाठी सभागृहाचा वेळ घेण्याची आवश्यकता नाही.

श्री. रामदास कदम : मी आपल्याला भेटतो.

----

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

**राज्यात शिष्यवृत्ती वाटपात पारदर्शकता आणण्यासाठी**
**करावयाची उपाययोजना**

**(३) * ३४६७६ श्री.सुभाष चव्हाण , श्री.संजय दत्त , श्रीमती अलका देसाई , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , डॉ.सुधीर तांबे , श्री.चरणसिंग सप्रा :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १९९४ पासून सलग १८ वर्षे व्यावसायिक व इतर अभ्यासक्रमांमधील लाखो विद्यार्थ्यांच्या नावे शेकडो शिक्षण संस्थांना किमान २ हजार कोटी रूपये शासनाची कुठलीही मंजुरी नसताना शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क/परीक्षा शुल्कापोटी वाटण्यात आली असल्याने शिक्षण संस्थांनी शासनाची कोटयावधी रुपयांची फसवणूक केली असल्याचे दि. ५ ऑगस्ट, २०१२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच ओबीसी, एनटी, व्हीजेएनटी आणि एसटी ईबीसी विद्यार्थ्यांना नियमात बसत नसतानाही शिष्यवृत्ती दिलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश होऊनही त्याच्यावर कारवाई केली नसल्याचे माहे सप्टेंबर २०१२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी दोषी आढळून आलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) तसेच शिष्यवृत्तीत पारदर्शकता आणण्याबाबत शासनाने काय उपाययोजना केली आहे वा करणार आहे,

(६) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवाजीराव मोघे** :

(१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी असलेली स्कॉलरशीप व फ्रीशीपच्या वाटपात पारदर्शकता आणण्यासाठी शासनाने ई-शिष्यवृत्ती योजना कार्यान्वित केली आहे. त्यानुसार शिष्यवृत्तीची रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या बँका खात्यावर आणि शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम थेट महाविद्यालयाच्या बँक खात्यावर जमा होत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी दिलेले उत्तर पूर्णपणे चुकीचे आहे. कारण सामाजिक न्याय राज्यमंत्र्यांनी या प्रश्नाच्या बाबतीत जी कबुली दिलेली आहे त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, "मंजुरी नसताना कोट्यवधी रुपये वाटण्यात आल्याचे लक्षात आले. त्या अधिकाऱ्यांनी सोयीनुसार शासकीय आदेशाचा अर्थ लावला आणि कोट्यवधी रुपये वाटून टाकले. त्यांच्या विरुध्द निश्चितच कारवाई केली जाईल." विनाअनुदानित संस्थांमधील ओबीसी, व्हिजेएनटी, एस.टी, ईबीसी यांना नियमामध्ये बसत नसताना शिष्यवृत्ती दिलेली आहे, ही बाब खरी आहे का ? ही बाब खरी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असल्यास त्या संबंधित संस्थांवर आणि ज्यांनी शिष्यवृत्ती दिलेली आहे त्या अधिकाऱ्यांची सीआयडी चौकशी करुन कारवाई करणार का ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, 2 हजार कोटी रुपयांचा जो उल्लेख केलेला आहे त्या संदर्भात 'नाही' असे उत्तर दिलेले आहे. परंतु ही जी बातमी आलेली आहे ती वर्धा जिल्ह्याच्या संदर्भात आहे. आपण ती वाचली असेल. अशी अनियमितता झाल्याबद्दल एक समिती नेमली होती. त्यामध्ये सहायक संचालक (लेखा), दोन निरीक्षक आणि वरिष्ठ लिपिक अशा चार लोकांची समिती नेमली होती. त्यांना सकृतदर्शनी असे वाटले की, काही जे कोर्सेस आहेत त्यांना शिष्यवृत्ती द्यावयास नको होती. एमएसबीटी किंवा डिप्लोमा इन ड्रेस डिझायनिंग अँड मॅन्युफॅक्चरीग असे दोन वर्षाचे 24-25 कोर्सेस आहेत. यामध्ये आपल्याला अनुसूचित जातीसाठी 2 लाख रुपये देता येतात पण बाकीच्यांना देता येत नाहीत असा नियम होता. परंतु यामध्ये काही संस्थांनी एकच विद्यार्थी अनेक ठिकाणी दाखविले. अशा बऱ्याच अनियमितता त्यामध्ये दाखविल्या, असे या समितीच्या लक्षात आल्या बरोबर या संदर्भात कोण कोण जबाबदार आहेत हे ठरविण्यासाठी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. त्या समितीमध्ये संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती हे आहेत तसेच काही आय.टी.चे लोक आहेत. एकूण 9 लोकांची समिती केलेली आहे. त्यामध्ये कोणते अधिकारी जबाबदार आहेत, कोणत्या संस्था जबाबदार आहेत याची सखोल चौकशी होईल. कारण एकाच संस्थेच्या तीन तीन, चार चार संस्था आहेत असे पहिल्याच चौकशीमध्ये आढळून आले आहे. आम्ही आधीच सहा अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. तीन कर्मचाऱ्यांना निलंबित केलेले आहे. काही संस्था असे म्हणतील की, आम्हाला विचारलेच नाही. म्हणून आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली जी समिती नेमलेली आहे ती समिती सखोल चौकशीमध्ये त्यांचेही म्हणणे ऐकून घेईल आणि जबाबदारी निश्चित करील.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना असे म्हटले आहे की, शिष्यवृत्तीची रक्कम आताच्या पध्दतीनुसार त्या विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येते. उत्तरात पुढे असे म्हटले आहे की, परीक्षा फी आणि शिक्षण शुल्काची रक्कम संबंधित महाविद्यालयाच्या खात्यावर जमा केली जाते. एका बाजूला या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून प्रवेश घेतानाच शिक्षण शुल्क घेतले जाते, परीक्षा फी सुध्दा घेतली जाते, शासनाकडून वेळेवर त्याची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 34676 ..... श्री. शिवाजीराव मोघे ....

प्रतिपूर्ती होत नाही आणि दुसऱ्या बाजूला शेवटी ती रक्कम संस्था चालकांना, महाविद्यालयांना देतो. म्हणजे त्या महाविद्यालयांचा दुहेरी फायदा होतो. त्यांना विद्यार्थ्यांकडूनही फी मिळते आणि शासनाकडूनही मिळते. आलेली फी त्या विद्यार्थ्यांना परत केली जात नाही. या मागासवर्गीयांच्या फीची प्रतिपूर्ती जर शासनाकडून होत असेल तर प्रवेश घेताना त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क घेऊ नये आणि त्याची योग्य पध्दतीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश शासनाच्या वतीने संबंधित महाविद्यालयांना या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या बाबतीत देणार का ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, यामध्ये ऑनलाईन व्यवस्था आहे का असा प्रश्न विचारलेला आहे. ऑनलाईनची व्यवस्था आहे. मागच्या वर्षी 15 लाख विद्यार्थ्यांना 1800 कोटी रुपये ऑनलाईन पध्दतीने दिले. आता 2012-2013 मध्ये 16,31,703 अर्ज आलेले आहेत त्यांना देणार आहोत. या वर्षात 1785 कोटी रुपये देणार आहोत. आता दरमहा नाही तर वर्षाची स्कॉलरशीप एकदाच देणार आहोत. मी विधानसभेत सुध्दा सांगितले की, काही कॉलेजेस मुलांकडून फी वसूल करतात. आम्ही असे सांगितले आहे की, जी महाविद्यालये अशा प्रकारे विद्यार्थ्यांकडून फी वसूल करतील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. आमच्याकडे तक्रार द्यावी. याचे कारण असे की आपण 1800 कोटी रुपये दिले. यामध्ये महत्वाचा भाग असा आहे की, आपण खाजगी मेडिकल, इंजिनिअरींग कॉलेजला पैसे देतो. एवढी मोठी स्कॉलरशीप देत असताना त्यांना थोडाही धीर नाही. ही गोष्ट खरी आहे की, पैसे नसल्यामुळे काही महाविद्यालयांना उशिरा पैसे देतो पण त्यांनी तेवढा धीर धरावयास पाहिजे. बहुतेक महाविद्यालये धीर धरतात पण काही महाविद्यालये धीर धरत नाही. याबाबत तक्रारी आल्यानंतर त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. दुसरी गोष्ट अशी की, तुमचे ॲडमिशन रद्द करु किंवा आणखी काही करु असे जर कोणी म्हणत असतील किंवा धमकावल्याची जरी तक्रार आली तरी त्या महाविद्यालयावर कठोर कारवाई करण्यात येईल.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, 5 ऑगस्ट 1912 चा जो अहवाल आहे त्यानुसार शासनाने 2 हजार कोटी रुपये 1995 सालापासून वाटले. या पैशाचे वाटप होत असताना शासनाचे आदेश नसताना सुध्दा वाटप झाले त्या संस्था कोणत्या, त्या संस्था महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्यात आहेत आणि त्या संस्था कोणत्या प्रकारचे शिक्षण देतात ?

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34676...

श्री. शिवाजीराव मोघे : सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाचे उत्तर मी दिलेले आहे. 2 हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. ई-स्कॉलरशीप योजना 11 जानेवारी 2010 पासून लागू केलेली आहे. सांगायला आनंद वाटतो की गव्हर्नमेंट ऑफ इंडियाकडून बेस्ट परफॉर्मर ॲवार्ड मिळालेले आहे. सन 2012चे कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडियाचे एक्सलन्स ॲर्वार्ड मिळालेले आहे.

श्री. वसंतराव खोटरे : वैद्यकीय महाविद्यालये आणि अभियांत्रिकी महाविद्यालये यामधून ओबीसी विद्यार्थी शिक्षण घेतात. ज्यांच्या जवळ ओबीसी प्रमाणपत्र आहे अशा विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क भरले जाते. या विद्यार्थ्यांसाठी अर्धी फी असते. परंतु काही महाविद्यालये या विद्यार्थ्यांना पूर्ण फी भरण्यास सांगतात. अशा विद्यार्थ्यांनी भरलेली फी त्यांना अद्याप परत मिळालेली नाही. याबाबतीत शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री. शिवाजीराव माघे : याही प्रश्नाच्या संदर्भात मी उत्तर दिलेले आहे. आमच्याकडून स्कॉलरशीप उशिरा जाते म्हणून ओबीसी विद्यार्थ्यांना अर्धी फी भरावी लागते. खरे तर त्या महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून पैसे घेता कामा नये. यामध्ये विद्यार्थ्यांचा कोणताही दोष किंवा संबंध नाही. यामध्ये संबंधित संस्था आणि शासन असा संबंध आहे. तेव्हा असे पैसे घेतल्याच्या तक्रारी दिल्या तर त्याबाबतीत कठोर कारवाई करण्यात येईल.

श्री. निरंजन डावखरे : सन 2011-12 या आर्थिक वर्षात विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली आहे काय ? मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासनाने ई शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. त्या योजनेचे मी स्वागत करतो. काही विद्यार्थ्यांचे बँकेत अकौण्ट नाही. अशा विद्यार्थ्यांना झिरोबॅलन्स अकौण्ट काढण्याची परवानगी देण्यात येईल काय ? सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांच्या खेड तालुक्यातील खेड गावामध्ये अपुरा विद्युत पुरवठा होतो, तसेच तेथे संगणकांची कमतरता आहे. त्या गावामध्ये ई शिष्यवृत्ती योजनेचा लाभ किती विद्यार्थ्यांना मिळालेला आहे ?

श्री. शिवाजीराव मोघे : विद्यार्थ्याने राष्ट्रीयकृत बँक खाते उघडले पाहिजे ही पहिली अट आहे. राष्ट्रीयकृत बँका तालुक्याच्या ठिकाणी असल्यामुळे विद्यार्थ्यांना थोडा त्रास होत असला तरी ही शिष्यवृत्ती वर्षातून एकदा दिली जाणार आहे. एससीचे 100 टक्के पैसे आलेले आहेत. त्यांच्यासाठी परीक्षा आणि शैक्षणिक शुल्काचे शंभर टक्के पैसे दिले जातात. या वेळी ओबीसीसाठी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जवळ जवळ 800 कोटीपेक्षा जास्त पैसे बजेटमधून आलेले आहेत. 200 कोटी रुपये सप्लीमेण्टरी बजेटमधून आलेले आहेत. पैस वाटपाचे काम 80 टक्के झालेले आहे. मी महाविद्यालयांना सांगत असतो की मुलांकडून लवकर फॉर्म भरुन घ्या. हे पैसे दरमहा दिले गेले असते. परंतु त्यामध्ये खूप वेळ जातो. ज्या मुलांचे फॉर्म राहिलेले असतील त्यांना देखील फॉर्म भरण्यासाठी मुदत देतो. मुलांना त्यांच्या अकौण्टमध्ये पैसे मिळाले पाहिजेत ही शासनाची भूमिका आहे.

डॉ. रणजित पाटील : अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या वेळी दिनांक 17 मार्च रोजी या सभागृहामध्ये एका प्रश्नाला उत्तर देताना असे सांगितले होते की, सहायक आयुक्तांची चूक झालेली आहे. त्यांच्यावर निश्चित कारवाई करु. हे सांगून वर्ष उलटले. अद्याप कारवाई झालेली नाही. अकोला येथील सहायक आयुक्तांना सस्पेण्ड करु असा शब्द या सभागृहाला दिला होता. त्याबाबतीत काही कारवाई केलेली आहे काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : असा शब्द दिला असेल आणि त्याला सस्पेण्ड केले नसेल तर 7 दिवसाच्या आत त्याला सस्पेण्ड करु.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**मराठवाडा वैधानिक विकास महामंडळास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४) * ३४६९९  श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाला सन २०१५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाडा विभागातील विकासात्मक कामे करण्यासाठी महामंडळाला सन २०११ पासून किती विकास निधी शासनाने वितरित केला आहे,
(३) नसल्यास, मराठवाडा विभागातील विकासाचा अनुशेष दूर करण्यासाठी शासन महामंडळाला निधी वितरित करणार आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त महामंडळ कार्यान्वित करण्यासाठी अध्यक्ष व इतरांची निवड शासन केंव्हा करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेंद्र मुळक, श्री.जयंत पाटील यांच्याकरिता** : (१) विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळानी एप्रिल, २०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
(२) विकास कमासाठीचा निधी विकास मंडळाकडे दिला जात नाही.
(३) मराठवाडा विभागातील अनुशेष दूर करण्यासाठी संबधित प्रशासकीय विभागांना निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.
(४) विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांवरील तज्ञ सदस्यांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या असुन अध्यक्ष व अन्य सदस्यांची नियुक्तीची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रा. सुरेश नवले : मराठवाड्याच्या दृष्टीने हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. वैधानिक विकास महामंडळाची स्थिती दात आणि नखे नसलेल्या वाघासारखी आहे. या महामंडळाला अध्यक्ष नाही आणि सदस्यही नाहीत. माननीय राज्यपालांच्या अभिभाषामध्ये जाहीर केलेल्या निकषानुसार या वैधानिक विकास महामंडळाला मराठवाड्याचा अनुशेष दूर करण्यासाठी आवश्यक असलेला निधी देण्यात येईल काय,मराठवाड्याचा भौतिक अनुशेष दूर करण्यात येईल काय, मराठवाड्याचा भौतिक अनुशेष किती आहे ?

श्री. राजेंद्र मुळक : भारताच्या संविधानानुसार माननीय राष्ट्रपतींनी १९९४मध्ये विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्राकरिता महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार माननीय राज्यपालांनी १९९४ मध्ये विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्राकरिता स्वतंत्र विकास महामंडळांची स्थापना केली. या विकास महामंडळांची मुदत २०१५ पर्यन्त वाढवण्यात आलेली आहे. माननीय राज्यपालांनी निश्चित केलेल्या सूत्रानुसार मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्रामध्ये

..४..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

विकासात्मक निधी वाटप करण्यात येतो आणि हा निधी संबंधित प्रशासकीय विभागाला देण्यात येतो. सन २०११-१२ करिता अनुशेष निर्मूलन करण्यासाठी मराठवाडयाकरिता उच्च व तंत्र शिक्षण विभागासाठी ३५ कोटी रुपये, सार्वजनिक बांधकाम विभागासाठी ६४.४३ कोटी रुपये दिलेले आहेत. एकूण ८०.४३ कोटी रुपये दिलेले आहेत. सन २०१२-१३साठी मराठवाडयकरिता उच्च व तंत्रशिक्षण विभागसाठी १६.४८ कोटी रुपये आणि सार्वजनिक बांधकाम विभागासाठी २९.३० कोटी असे एकूण ४७.५४ कोटी रुपये दिलीले आहेत.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, भौतिक अनुषाच्या बाबतीत मी प्रश्न विचारलेला आहे..

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी माननीय मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घ्यावे.

श्री. जयंत पाटील : माननीय राज्यमंत्री महोदय चांगल्या प्रकारे उत्तर देत आहेत. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, माननीय राज्यमंत्री महोदयांचे उत्तर ऐकल्यानंतर त्यांनी उपप्रश्न विचारावेत.

श्री. राजेंद्र मुळक : जलसिंचनासाठी विदर्भातील तीन जिल्ह्यासाठी सन 2011-12मध्ये 500 कोटी रुपये आणि सन 2012-13मध्ये 750 कोटी रुपये दिलेले आहेत. संकल्पना अशी आहे की, माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार हा सर्व निधी या पुढे विभागाला देण्याच्या संदर्भात निर्णय घेण्यात आला आणि त्याप्रमाणे हा निधी देण्यात येत आहे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : एकूण अनुशेष किती आहे ? मराठवाडा आणि विदर्भाला मागील तीन वर्षामध्ये वैधानिक विकास महामंडळाच्या माध्यमातून किती निधी देण्यात आला याची माहिती मंत्री महोदय पटलावर ठेवतील काय ?

श्री. राजेंद्र मुळक : निधीच्या संदर्भात मी उत्तर दिलेले आहे. सन 2010-11 ते 2012-13 पर्यंत बजेटच्या माध्यमातून किती निधी देण्यात आला याची माहिती मी सन्माननीय सदस्यांना देतो आणि पटलावर ठेवतो.

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34699..

श्री.जयवंत जाधव : सभापती महोदय, आतापर्यंत सगळया कमिटयांनी जे कंझर्व्हेटिव्ह एस्टीमेट केले आहेत, त्यात हजारो कोटी रुपयांचा अनुशेष आहे. माननीय मंत्री महोदय या ठिकाणी सांगत आहेत की, 2010-11 मध्ये 43 कोटी, 2011-12 मध्ये 49 कोटी रुपयांचा अनुशेष आहे. नक्की अनुशेष किती आहे, हा अनुशेष कधी पर्यंत चालणार आहे ? अनुशेष नक्की किती आहे व कधी पर्यंत भरुन काढला जाईल याची निश्चित माहिती सांगा अन्यथा ही महामंडळे बरखास्त करा.

श्री.राजेंद्र मुळक :सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या निर्देशानुसार जुना आणि नवीन अनुशेष काढण्यासंदर्भात डॉ. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. जुना आणि नवीन अनुशेषाच्या बाबतीत एकत्रित अहवाल 2013 पर्यंत प्राप्त होईल व तो अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवला जाईल.

श्री.विनायक मेटे : माननीय मंत्री महोदय अतिशय गोलगोल असे उत्तर देत आहेत. माननीय राज्यपाल महोदयांनी वैधानिक महामंडळाबद्दल कामकाजाच्या बाबतीत, निधीच्या बाबतीत काही आक्षेप घेतले आहेत काय, असल्यास, कोणत्या प्रकारचे आक्षेप घेण्यात आले आहेत ? शासन ही वैधानिक विकास महामंडळे बंद करण्याचा विचार करीत आहे काय, नसल्यास, या महामंडळांना पूर्वी प्रमाणेच निधी उपलब्ध करुन दिला जाईल काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, राज्यातील सर्व महामंडळांना पूर्वी 100 कोटी रुपयांचा निधी देण्यात येत होता. हा निधी खर्च करीत असताना त्याबद्दलच्या तक्रारी महामहिम राज्यपाल महोदयांकडे गेल्या. सर्वांना या निधीचे सम प्रमाणात वाटप व्हावे अशी मागणी होती. मी 100 कोटी निधीच्या बाबतीत बोलतो आहे. या महामंडळांना अनुशेष दूर करण्यासाठी निधी लागतो तो वेगळा आहे आणि मी जो 100 कोटी रुपयांचा निधीची माहिती देतो आहे तो निधी वेगळा आहे. महामंडळाला खर्च करण्याचे अधिकार दिलेले आहेत, त्यासाठी देण्यात येणारा निधी बंद करण्यात आलेला आहे.(अडथळा) माननीय राज्यपालांना लिहिलेल्या पत्राची चर्चा या ठिकाणी होऊ शकत नाही.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मराठवाडयातील अनुशेष दूर करण्यासंबंधीचा हा प्रश्न आहे. मी या निमित्ताने सन्माननीय नियोजन मंत्र्यांना सांगू इच्छितो की, अनुशेषाचा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. मराठवाडयातील अनुशेषाच्या बाबतीत मराठवाडयातील सर्व आमदारांना आपल्या दालनात बोलवून या बाबतीत त्यांच्या अपेक्षा, निधीची उपलब्धता या बाबतीत चर्चा करावी व महत्वाच्या प्रश्नाच्या बाबतीत आपण जरुर लक्ष घालावे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, आपल्या आदेशाप्रमाणे आज दुपारी 3.00 वाजता बैठक बोलाविण्यात येईल. मराठवाडा वैधानिक विकास महामंडळास मुदतवाढ व निधी खर्च करण्याचे अधिकार या अनुषंगाने या प्रश्नाचा रोख होता. अनुशेषाच्या संदर्भात माननीय राज्यपालांनी दिलेल्या निर्देशानुसार आपण बजेटींग करतो. त्यात कोणतेही डेव्हिएशन नाही. सन्माननीय सदस्यांना अधिकची माहिती हवी असेल तर दुपारी 3.00 वाजता माझ्या कार्यालयात यावे. त्या ठिकाणी तुम्हाला तत्काळ माहिती उपलब्ध दिली जाईल.

------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**श्रीक्षेत्र देहू, आळंदी,पंढरपूर, भंडारा, डोंगर, नेवासा या तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी कामांना गती देण्याबाबत.**

**(5) * 33737 श्री.मोहन जोशी , श्री.संजय दत्त , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , डॉ.सुधीर तांबे** : सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) श्रीक्षेत्र देहू, आळंदी,पंढरपूर, भंडारा, डोंगर, नेवासा या तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी शासनाचा 352 कोटी रुपयांचा निधी कार्यकारी समितीकडे प्राप्त झालेला असताना यातील केवळ 29 कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आल्याची बाब माहे ऑगस्ट, 2012 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, निधी उपलब्ध असतानाही विकासकामांचा वेग मंदावण्याची कारणे काय आहेत,

(3) असल्यास, तीर्थक्षेत्र विकास कामांना गती देण्यासाठी शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र मुळक,श्री. जयंत पाटील यांच्याकरिता**: (1) होय.

(2) शासन निर्णय, दि. 6 जुलै, 2010 नूसार मंजूर करण्यात आलेल्या श्रीक्षेत्र देहू, आळंदी, पंढरपूर, भंडारा, डोंगर,पालखीतळ, मार्गविकास आराखड्याची व्याप्ती दि. 15 जून,2011 तसेच दि. 29.11.2011 च्या शासन निर्णयान्वये वाढविण्यात आली आहे. मूळ आराखडा व सुधारित आराखडा यास मान्यता प्राप्त झाल्यानंतर अंदाजपत्रके, भूसंपादन निविदा प्रक्रिया इ. अनुसरुन कामांच्या अंमलबजावणीस सन 2011-2012 या वित्तीय वर्षात सुरुवात करण्यात आली. या कारणांमुळे अपेक्षेनूसार आराखड्यातील कामे 3 वर्षात पूर्ण करणे शक्य झाले नाही.

(3) विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समिती यांच्याकडून आराखड्यातील कामांचा वेळोवेळी आढावा घेतला जातो. माहे नोव्हेंबर, 2012 पर्यंत एकूण रु. 162.15 कोटी किंमतीच्या कामांचे कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे. सुरु असलेल्या कामाकरिता रु. 32.88 कोटी निधी वितरित करण्यात आला आहे. शासनाने या आराखड्याची मुदत सन 2013-2014 पर्यंत वाढविली असून त्या मुदतीत आराखडा पूर्ण करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात येत आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, श्रीक्षेत्र देहू, आळंदी, पंढरपूर, भंडारा, डोंगर, नेवासा या तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी या शासनाने चार वर्षापूर्वी एक 352 कोटी रुपयांचा आराखडा तयार केला होता व त्यास चार वर्षाचा कालावधी होऊन गेला आहे. सदरहू आराखडा स्व.विलासराव देशमुख हे या राज्याचे मुख्यमंत्री असताना झाला. त्यावेळी माननीय श्री.जयंत पाटील हेच वित्त मंत्री होते. या तीर्थक्षेत्रांचा विकास कामांसाठी शासनाने 352 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. परंतु 32 कोटी रुपये एवढाच निधी विकास कामांवर खर्च केला गेला आहे. या संपूर्ण तीर्थक्षेत्राच्या विकास कामांना उशीर का होतो आहे, विशेषत: आळंदी नगरपालिकेचा डेव्हलपमेंट प्लॅन आहे, तो मंजूर न झाल्यामुळे सुध्दा ही कामे ठप्प आहेत काय, तीर्थक्षेत्र विकासाच्या कामात पिण्याचे पाणी, घनकचरा निर्मूलन या बाबींचा समावेश आहे काय, या तीर्थक्षेत्राचे दर्शन घेण्यासाठी लाखो भाविक येतात, त्यांच्यासाठी शौचालये, वाहनतळ, बसस्थानके कुंभमेळाव्याच्या धर्तीवर करण्यात येतील काय, देहू आणि इतर तीर्थक्षेत्रांच्या विकासाची कामासंदर्भात आराखडा तयार झालेला आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन,विकास कामे करण्यासाठी टाईम बाऊंड प्रोग्राम तयार करुन ही विकास कामे एका वर्षाच्या आत पूर्ण करण्यात येतील काय ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, 2009-10 मध्ये 140 कोटी, 2010-11मध्ये 140 कोटी आणि 2011-12 मध्ये 72 कोटी असा एकत्रित 352 कोटी रुपयांचा निधी पीएलएमध्ये जमा करण्यात आलेला आहे. 2012-13 या वर्षासाठी 78 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

निविदा कार्यवाही पूर्ण झालेल्या कामांची किंमत 162.72 कोटी रुपये एवढी असून कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. यातून आतापर्यंत 43.88 कोटी रुपयांचा निधी खर्च झालेला आहे. शासनाने मान्यता दिलेल्या देहू,आळंदी येथे भूसंपादनासाठी 40 कोटी रुपयांचा निधी खर्च होणार आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या कामांचा उल्लेख केलेला आहे, ती सर्व कामे याच्यामध्ये अंतर्भूत करण्यात आली आहेत. सन्माननीय सदस्यांच्या नव्याने काही सूचना असतील त्या सूचनांचा गांभीर्याने विचार करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी कामे पूर्ण करण्यासंदर्भात कालावधी विचारलेला आहे. सदर आराखडा पूर्ण करण्यासाठी साधारणत: एक ते सव्वा वर्षाचा कालावधी लागेल. त्यानंतर ही संपूर्ण विकासाची कामे करण्यात येतील. या तीर्थक्षेत्राच्या काही ठिकाणी

5...



ता.प्र.क्र.33737...

श्री.राजेंद्र मुळक...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भूसंपादनाच्या बाबतीत काही अडचणी आलेल्या आहेत. त्या तातडीने निकाली काढण्यासंदर्भात विभागाला निर्देश देण्यात येतील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, श्रीक्षेत्र देहू, आळंदी, पंढरपूर, भंडारा, डोंगर, नेवासा या तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी आराखडा मंजूर केलेला आहे. नोव्हेंबर, 2012 पर्यंत एकूण 162 कोटी रुपयांच्या कामांची वर्क ऑर्डर दिली आहे. त्याप्रमाणे विकास आराखडे मंजूर होतात, तीर्थक्षेत्र विकासाची कामे त्या त्या ठिकाणी सुरु आहेत. सभापती महोदय,आपल्या आदेशानुसार शेगाव विकास आराखडा मान्य केला गेला. त्या ठिकाणी काही विकास कामांची वर्क ऑर्डर दिली गेली आहे. श्रीक्षेत्र देहू, आळंदी, पंढरपूर, भंडारा, डोंगर, नेवासा या ठिकाणी कामांच्या वर्क ऑर्डर दिल्या आहेत, परंतु प्रत्यक्षात कामांवर खर्च होत नाही. तीन, तीन वर्षांपासून ही विकास कामे रखडलेली आहेत. शेगाव विकास आराखडयातील 250 कोटी पैकी फक्त 60 कोटी रुपयांचा निधी खर्च झालेला आहे. आपण इतर विभागात ही कामे वाटून देतो. त्या विभागात कर्मचाऱ्यांची संख्या अपूर्ण असते. म्हणून तीर्थक्षेत्र विकासाची कामे होत नाहीत. उदाहरण द्यावयाचे झाले तर भूसंपादनाचे काम हे वर्षानुवर्षे चालत असते. या विकास कामांसाठी विशेष कर्मचाऱ्यांचा फोर्स उपलब्ध करुन दिला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी विचारले की, एका वर्षात ही कामे पूर्ण करण्यात येतील काय ? मी त्यांना सांगू इच्छितो की, ही विकास कामे एका वर्षात पूर्ण होऊ शकत नाही. सर्व तीर्थक्षेत्राची विकास कामे पूर्ण करण्यासंदर्भात अतिरिक्त कर्मचारीवर्ग उपलब्ध करुन देऊन ती कामे युध्द पातळीवर पूर्ण करण्यात येतील काय ?

श्री.राजेंद्र मुळक : या प्रश्नात शेगाव तीर्थक्षेत्राचा उल्लेख नाही. परंतु मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आज नियम 93 च्या सूचना आलेल्या आहेत, त्यात शेगाव तीर्थक्षेत्र विकासासंदर्भात एक सूचना आलेली आहे. ती सूचना येईल चर्चेला त्यावेळी या संदर्भात मी सविस्तर माहिती देईन. ज्या कामांच्या वर्क ऑर्डर दिलेल्या आहेत, वर्क ऑर्डरप्रमाणे वेळेच्या आत कामे पूर्ण झ ाली पाहिजेत अशा प्रकारचे निर्देश देण्यात येतील.

यानंतर श्री.भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33737..... श्री.राजेंद्र मुळक.....

कालबध्द कार्यक्रम तयार करुन देऊन ताबडतोब अधिवेशन संपल्यानंतर मी स्वत: या संदर्भातील बैठक घेतो. संबंधित अधिकाऱ्यांना जो कार्यकाळ निश्चित केला आहे त्याच्या सूचना देतो आणि कालबध्द कार्यक्रम करुन वेळेत पूर्ण करण्याचे लक्ष्य ठरवून देऊ.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: औरंगाबाद येथील हज हाऊस इमारत बांधकामाच्या जागेसंबंधी

**मु.शी.**: औरंगाबाद येथील हज हाऊस इमारत बांधकामाच्या जागेसंबंधी माननीय अल्पसंख्याक विकास मंत्र्यांचे निवेदन

श्री.नसीम खान (अल्पसंख्यांक विकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/पूर्वी श्री.गिते

13:30

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तराची 25 वी यादी सभागृहासमोर ठेवणे

सहसचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची 25 वी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तराची 25 वी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी)

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांचा सन 2010-2011 या वर्षाचा वार्षिक लेखा व लेखा परीक्षण अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखा व लेखा परीक्षण अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

---

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 च्या कलम 321 च्या पोटकलम (4) अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा आणि नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पध्दत) (सुधारणा) नियम, 2012 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एमएमसी.2012/223/प्र.क्र.68 /2012/नवि-32(2), दिनांकित 4 जुलै, 2012 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

---

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र सागरी मंडळाचा सन 2009-2010 या वर्षाचा प्रशासकीय अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : प्रशासकीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचा सन 2009-2010 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

..5...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील अधिकारी/कर्मचारी (वर्गीकरण सेवाभरती व पदोन्नती) विनियम-2012 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक सीडीए.2008/प्र.क्र.668(भाग.1)/उद्योग.14, दिनांक 3 डिसेंबर, 2012 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

---

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे**

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "दाई किटच्या खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबतच्या तपासाची सद्य:स्थिती तसेच सी.आय.डी. चौकशीचा अहवाल" या विषयावरील डॉ.दीपक सावंत, वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याबाबत दिनांक 13 डिसेंबर, 2010 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबतची माहिती छापावी)

..7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, तीन वर्षापूर्वी म्हणजे डिसेंबर, 2010 च्या हिवाळी अधिवेशनात सदर अहवालाची मी मागणी केली होती. सभापतीस्थानी माननीय उप सभापती विराजमान होते, माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील सभागृहात उपस्थित होते. हा विषय अतिशय संवेदनशील असताना अहवाल तयार करण्यासाठी तीन वर्षाचा विलंब लागला आहे. याची चौकशी करण्याची आवश्यकता आहे.

**सभापती** : गृह मंत्र्यांना मी सूचना देतो की, महत्वाच्या आणि संवेदनशील विषयावरील अहवाल तीन वर्षे प्रलंबित राहिला याची कारणे काय आहेत हे सन्माननीय सदस्यांना आपल्या दालनामध्ये बोलावून अवगत करावे.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, होय.

----------

..8..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे (पुढे सुरु.......**

श्री.भास्कर जाधव (वने राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड यांचा सन 2010-2011 या वर्षाचा अडतिसावा वार्षिक अहवाल आणि हिशेब सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सहा महिन्यापूर्वी शासनाने कायद्यात तरतूद केलेली आहे. त्यानुसार सर्व कायद्यांची इंग्रजी नावे मराठी भाषेत बदलण्यात आली आहेत. त्याच धर्तीवर या महामंडळाचे मराठी भाषेत नामांतर होणे आवश्यक आहे. मी काल हा प्रश्न सभागृहात उपस्थित केला असताना सभापतीस्थानावरुन माननीय उप सभापतींनी मराठी भाषांतर केल्यानंतर ही बाब सभागृहाच्या पटलावर सादर करण्याचे निदेश दिलेले होते.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या विषयाबाबत मी काल खुलासा करणार होतो, परंतु त्याच वेळेला विधानसभेमध्ये माझ्या विभागाशी संबंधित लक्षवेधी सूचना चर्चेला आल्यामुळे मला तातडीने त्या सभागृहात जावे लागले.

सभापती महोदय, कंपनी ॲक्टनुसार ही कंपनी रजिस्टर झालेली आहे. कंपनी ॲक्टनुसार जेव्हा कंपनी रजिस्टर होते त्या कंपनीच्या नावात बदल करावयाचा असेल तर पुन्हा कंपनी ॲक्टनुसार कंपनी रजिस्ट्रारकडे यांच्या मान्यतेनंतरच नाव बदलता येते.

**सभापती**: तातडीने बदल कसा करुन घेता येईल या दृष्टीने प्रयत्न करावा. वार्षिक अहवाल आणि हिशेब सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

---

श्री.बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळाचा सन 2007-2008 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, 2005 च्या कलम 6(1) नुसार सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा व खर्चाच्या अर्धवार्षिक आढाव्याचे निष्कर्ष दर्शविणारे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

---

नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीच्या सन 2001-2002 या वर्षाच्या आठव्या अहवालातील परिच्छेद क्र. 1.28 मध्ये समितीने केलेल्या शिफारसींनुसार सर्व मंत्रालयीन विभागांनी सन 2011-2012 या वित्तीय वर्षात केलेल्या पुनर्विनियोजनाबाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** :पुनर्विनियोजनाबाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा दिनांक 31 मार्च, 2011 रोजी संपलेल्या वर्षाचा स्थानिक संस्था अहवाल क्रमांक 5 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** :स्थानिक संस्था अहवाल क्रमांक 5 सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचा सन 2010-2011 चा अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन 2010-2011 चा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. गुलाबराव देवकर ( कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचा सन 2011-2012 चा बारावा वार्षिक अहवाल व वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल व वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विधेयकांना संमती

**सभापती** : विधान परिषदेने पारित केलेल्या पुढील विधेयकांना विधानसभेकडून संमती मिळाल्याची यादी सह सचिव वाचून दाखवतील.

सह सचिव : विधान परिषदेने पारित केलेली पुढील विधेयके विधानसभेकडून संमत करण्यात आली.

1) सन 2012 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 7- महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) विधेयक 2012
2) सन 2012 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 13- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा ) विधेयक 2012
3) सन 2012 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 14- महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (तिसरी सुधारणा) विधेयक 2012.

---------

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** :औचित्याचे मुद्दे

**सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. अमरावती विभागांतर्गत यवतमाळ जिल्हयात मागील 5 ते 10 वर्षापासून तासिका तत्वावर, अल्पशा मानधनावर शिक्षक कार्यरत असणे, कित्येक शिक्षकांची वय मर्यादा ओलांडण्याची स्थिती असणे, तसेच यवतमाळ जिल्हयामध्ये यवतमाळ जिल्हा परिषदेअंतर्गत अद्यापि 133 पदे रिक्त असणे, सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत संबंधित शिक्षक संघटनेने तासिका तत्वावर असलेल्या शिक्षकांना नियमित करण्याबाबत प्रशासनाकडे वारंवार मान्य होऊनही त्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने तासिका तत्वावर असलेल्या शिक्षकांना न्याय देण्याची आवश्यकता या करिता मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे :सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. ठाणे जिल्हयातील कासारवाडी येथील पार्श्वनाथ अभियांत्रिकी महाविद्यालयाला सन 1994 मध्ये अभियांत्रिकी प्रशिक्षणाकरिता 140 विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याच्या अटीवर परवानगी देण्यात आली होती. सन 2004 मध्ये सदर महाविद्यालयाकरिता नवीन इमारतीची आवश्यकता असल्याने महाविद्यालय स्थालांतरित करुन इमारत बांधण्याबाबातचा प्रस्ताव एआयसीटीई कडे सादर करण्यात आला. एआयसीटीई कडे सादर केलेला प्रस्ताव मंजुरीसाठी समितीकडे आला असता पार्श्वनाथ महाविद्यालयाच्या प्रस्तावित इमारतीची जागा ही पर्श्वनाथ ट्रस्टला भाडेतत्वावर दिली असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सदरच्या भाडेतत्वावरील जागेवर महाविद्यालय सुरु करण्यासाठी पार्श्वनाथ ट्रस्टने केलेला भाडेकरार मान्य करता येणार नसल्याचा निष्कर्ष समितीने काढला. सदरील महाविद्यालयाला प्रस्तावित जागेत स्थलांतरित करुन इमारत बांधण्याकरिता उक्त जागा बक्षीसपत्राने किंवा खरेदीखताने प्रतिज्ञा पत्र देणे बंधनकारक असल्याची जाचक अट समितीने घातली. सदरच्या बाबीमुळे विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान होणार आहे व सदरच्या महाविद्यालयातील अभियांत्रिकी प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात गेले आहे. विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल होण्याकरिता व त्यांचे नुकसान व मानसिक खच्चीकरण टाळण्याकरिता शासनाने हस्तक्षेप करुन अखंड परिश्रम करुन प्रवेश मिळविलेल्या विद्यार्थ्यांना न्याय मिळावा व सामान्य कुटुंबातील अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात येऊ नये व त्यांचे नुकसान होऊ नये यासाठी कासारवाडी येथील पार्श्वनाथ महाविद्यालयाला एआयसीटीई ची मान्यता तातडीने मिळावी यासाठी सदर बाब औचित्याच्या मुद्याद्वारे मी उपस्थित करीत आहे.

------

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर 1675 साली हैद्राबाद पासून 250 कि.मी. अंतरावर असलेल्या श्री क्षेत्र शैल्यम (कर्नाटक राज्य ) येथील बारा ज्योतिर्लिंगाला त्यांनी भेट दिली होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्या ठिकाणी काही दिवस वास्तव्य केले होते ही बाब लक्षात घेऊन त्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे खूप चांगले स्मारक उभे राहिले आहे. राज्याचे मुख्यमंत्रीपदी श्री. वसंतदादा पाटील असतांना त्यांनी या स्मारकाला मदत केली होती, मा.श्री. शरद पवार हे राज्याचे मुख्यमंत्री असतांना त्यांनी सुध्दा या मंदिराला मदत केली होती. या स्मारकाचे सर्व कामे पूर्ण झाली आहेत परंतु काही कामे बाकी राहिलेली आहेत. अपूर्ण् राहिलेली कामे पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने निधी द्यावा अशी मी विनंती करतो.

--------

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यात विशेषत: मुंबई महापालिकेच्या वतीने 15 औषधांची अनुसूची बनवून त्याआधारे औषधे व शस्त्रक्रिया सामुग्री पुरवली जाण्याचा निर्णय धे्तला आहे. मात्र महापालिकेने 15 औषधांची अनुसूची बनवली असली असली तरी प्रत्यक्षात केवळ 12 अनुसूचीवरीलच औषधे खरेदी करुन रुग्णांना पुरवली जात असणे, प्रत्यक्षात महापालिकेच्या रुग्णालयात जाऊन उपचार घेणाऱ्या रुग्णांना महापालिका रुग्णालयामार्फत 15 अनुसूचीनुसार औषधे मिळत नसल्याचे दिसून येणे, तसेच रुग्णांपेक्षा औषधाचा पुरवठा करणाऱ्या कंपन्यांचे हित मुंबई महानगरपालिकेकडून जपले जात असल्याने सर्व साधारण गरजू मुंबईकर मात्र वंचित राहत असून कोटयावधी रुपये खर्च करुनही गरिबांना वेळेवर औषधे मिळत नाही, औषधे मिळाली तरी ती दुय्यम दर्जाची असतात असे लेखापरिक्षण अहवालात स्पष्ट झाले असून औषध कंपन्याची पाठराखण करणारी महापालिका मोफत औषधांच्या नावावर रुग्णांच्या जीवाशी खेळत असणे, याबाबत महापालिका प्रशासनामार्फत मान्यता देण्यात आलेल्या सूचीप्रमाणे औषधे मिळतात किंवा कसे याबाबत सखोल चौकशी करुन गरीब रुग्णांना मोफत औषधे व शस्त्रक्रिया मिळण्याची आवश्यकता, अशी मागणी मी औचित्याद्वारे करीत आहे.

----------

..7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यात दारुबंदी असलेल्या जिल्हयात दारुची चोरटी वाहतूक थांबविण्यात अपयशी ठरलेल्या राज्य उत्पादन शुल्क विभागाने गेल्या 10 महिन्यात दारु वाहतुकीचे तब्बल 1027 परवाने वाटयाला प्रकार डिसेंबर 2012 रोजी निदर्शनास आलेला आहे. चंद्रपूर जिल्हयातील दारुची वाहतूक रोखण्यासाठी तेथील श्रमिक एल्गार या संघटनेच्या नेत्या परमिता गोस्वामी गेल्या 12 वर्षापासून लढा देत आहेत. दोन वर्षापूर्वी 5 हजार महिला चंद्रपूर ते नागपूर पायी चालत आल्या होत्या. हा लढा अजूनही थांबलेला नाही. या संघटनेने 12 तारखेला मोर्चा काढला होता व त्यामध्ये 800 ग्रामपंचायती पैकी 580 ग्रामपंचायतींनी ग्रामसभा घेऊन दारुबंदीच्या संदर्भात ठराव केले आहेत. यामध्ये राज्य शासनाने सकारात्मक भूमिका घेऊन चंद्रपूर येथे दारु बंदीचा निर्णय घ्यावा यासाठी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधत आहे.

----

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राज्याची आय.टी.सिटी म्हणून ओळख असलेले पुणे शहर सायबर क्राईम मध्ये देखील अव्वल असून मागील दोन वर्षात 53 गुन्ह्यावरून ही संख्या अनेक पटीने वाढली आहे. ही वाढ 77 टक्क्यांनी वाढली असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. सायबर क्राईममध्ये सर्वाधिक गुन्हे संगणक उद्ध्वस्त करून त्याचा स्वत:साठी उपयोग करणे, हा असून संगणकाचा वापर करून फसवणूक करण्यात येत आहे. अकौंटमधून पैसे गायब करणे, बनावट कागदपत्र तयार करणे, बनावट चलनी नोटा तयार करणे, स्टॅम्प तयार करणे, तसेच मूळ माहिती नष्ट करणे, संगणकावर अश्लील वाड़मय प्रसिद्ध करणे असे प्रकार पुणे शहरामध्ये वाढत आहेत. मागील दोन वर्षापासून शासनाकडे व विधान मंडळ सभागृहात पुणे शहराकरिता दोन स्वतंत्र सायबर पोलीस ठाणे स्थापन करण्यात यावे व महत्त्वाचे म्हणजे पोलीस भरती करताना किमान 2 टक्के संगणक अभियंत्यांची भरती करावी अशी मागणी केली जात आहे. याबाबत शासनाने लवकरात लवकर लक्ष घालून यासंबंधी पाऊले उचलावीत अशी मी या औचित्याच्या माध्यमातून विनंती करीत आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माहितीचा मुद्दा**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मघाशी मी औचित्याचा मुद्दा मांडावयाचे आहे असे म्हणालो. परंतु, आता मला माहितीचा मुद्दा म्हणजे पॉईंट ऑफ इन्फर्मेशन मांडावयाचा आहे. या सदनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.रघुवंशी नाहीत. या सदनामध्ये माननीय मंत्री श्री.गावित साहेब यांच्या संबंधी चर्चा झाली होती. संजय गांधी निराधार योजनेसंबंधी सगळी चर्चा झाली होती. पण काही केले नाही. संभाजीनगर उच्च न्यायालायाने त्यांच्या विरूद्ध ताबडतोब पोलीस ठाण्यामध्ये एफआयआर दाखल करावा असे निदेश शासनाला दिले होते. त्याची अंमलबजावणी न केल्यामुळे आज पुन्हा एकदा सरकारला आदेश दिले आहेत की, तातडीने त्यांच्याविरूद्ध एफआयआर दाखल करावा. एक गुन्हेगार मंत्री आमच्या सदनामध्ये आहेत म्हणून माझी विनंती आहे की, त्या संबंधातील एक निवेदन शासनाच्यावतीने सदनामध्ये होणे अत्यंत आवश्यक आहे. ही बातमी दूरदर्शनच्या माध्यमातून प्रदर्शित करण्यात येत आहे. 600 कोटी रूपयाच्या भ्रष्टाचारासंबंधी उच्च न्यायालयाने शासनाला काल आदेश दिले आहेत अशा आशयाची ती बातमी आहे. तेव्हा त्यासंबंधी निवेदन होणे आवश्यक आहे म्हणून मी आपल्या मार्फत शासनाला विनंती करीत आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, अशाच स्वरूपाचा माझा देखील मुद्दा आहे. अधिवेशनाचा पहिला आठवडा हा सिंचनावर गोंधळ घातल्यामुळे वाया गेला आहे. आजच विदर्भ इरिगेशन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या संदर्भातील टाईम्स ऑफ इंडियामध्ये बातमी आली आहे की, या सदनातील एक सन्माननीय सदस्य श्री.मितेश भांगडिया यांनी चांगल्या प्रतीचे काम केले नाही अशा स्वरूपाचे प्रतिज्ञापत्र हायकोर्टात दाखल केले आहे. सदन चालू असल्यामुळे या बाबतची वस्तुस्थिती काय आहे, ती सभागृहा समोर आली पाहिजे अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : आपल्याकडे जी कागदपत्रे आहेत ती माझ्याकडे द्यावीत.

श्री.विनोद तावडे (बसून) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या सदनातील एका सन्माननीय सदस्यांचा उल्लेख केला आहे. त्याबाबत त्यांनी नोटीस दिली आहे काय ?

**सभापती** : सभागृहाच्या कामकाजाच्या पद्धती प्रमाणे एखाद्या सन्माननीय सदस्यांसंबंधी कोणताही मुद्दा उपस्थित करण्या अगोदर माननीय सभापतींकडे नोटीस देण्याची प्रथा आहे. आपण हे इनोसेंटली मांडले आहे असे गृहीत धरले तरी.....

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, मी वस्तुस्थिती सांगितली आहे. कोणतेही आरोप केलेले नाहीत.

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आपण त्यांचे नाव घेतले आहे ते टाळणे गरजेचे होते.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, मी ते नाव मागे घेतो.

**सभापती** : ठीक आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आम्ही खूप स्पष्ट भूमिका घेतली आहे की, जे चूक असेल त्याची चौकशी झाली पाहिजे. येथे कुणालाही पाठीशी घालण्याचा मुद्दा नाही. त्यामुळे आम्ही ही जी भूमिका घेतली आहे ती तुम्ही सुद्धा घ्यावी. चूक तर चूक पण श्री.अजितदादांना आत म्हणजे आपण मंत्रिमंडळामध्ये घेतले आहे.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याचे मुद्दे**

(पुढे सुरू.....

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

भिवंडी जिल्हा ठाणे येथे मोठ्या प्रमाणावर छोटे-छोटे पॉवर लुम्सचे उद्योग असून वाढत्या वीज बिलामुळे त्यांचे उद्योग धोक्यात आले आहेत. छोटे छोटे पॉवरलूमधारक सर्वसाधारण गरीब वर्गातील असल्यामुळे दिवसेंदिवस वाढत असलेले वीज बिल भरणे शक्य नसल्याने अनेक पॉवर लूम्स बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे पॉवरलूम धारकांवर व विणकरांवर बेरोजगाराची तसेच उपासमारीची वेळ आलेली आहे म्हणून पॉवरलूम धारकांनी वीज दरात सवलत मिळण्यासंबंधी तसेच सन 2007 पासून जादा दराने वसूल करण्यात आलेली वीज बिलाची रक्कम मिळण्याबाबत मागणी केलेली आहे. त्यावर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. तेथे चिंतेचे वातावरण पसरले आहे. संबंधित विभागाचे मंत्री आता सभागृहात उपस्थित आहेत. मी आपल्या मार्फत त्यांना विनंती करतो की, या महत्त्वाच्या प्रश्नाकडे त्यांनी लक्ष केंद्रीत करावे.

...........

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभाताई फडणवीस : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

गडचिरोली हा मागासलेला व आदिवासी जिल्हा असून नक्षलग्रस्त प्रभावी जिल्हा म्हणून प्रसिद्ध आहे. त्या जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात धानखरेदी होत असते. शासनाने विशेषत: आदिवासी विकास विभागाने आदिवासी विकास महामंडळाची 84 धान खरेदी केंद्र मंजूर करूनही केवळ 9 केंद्र सुरू आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात व्यापाऱ्यांनी खरेदी क्षेत्र वाढून त्यांनी मातीमोल भावात हमी किंमती पेक्षा कमी किंमतीत धान खरेदी करून जवळपास साडेतीन लाख धानाची खरेदी केली आहे. गडचिरोली हा आधीच मागासलेला जिल्हा आहे. त्यातही आदिवासींच्या धानाची बेभाव खरेदी होऊन आदिवासी शेतकरी नागावला जात आहे. त्यामुळे शासनाने याची चौकशी करून आदिवासींना न्याय देण्याची आवश्यकता आहे. तसेच, आदिवासींची लूट थांबविण्याची गरज असल्याने शासनाने यावर ताबडतोब कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. या राज्यातील जळगाव जिल्ह्यातील पिंपळगाव या गावात आजही दलितांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याचा निंदनीय प्रकार विधि मंडळाचे अधिवेशन सुरू असतानाच्या कालखंडात म्हणजे दिनांक 17 डिसेंबर 2012 रोजी वा त्या दरम्यान उघडकीस आला आहे. पिंपळगावाची लोकसंख्या सुमारे 1300 ते 1400 असून गेल्या अनेक वर्षापासून दलितांना सार्वजनिक विहिरींवर पाणी भरू दिले जात नाही. पाणी भरण्यासाठी दलित गेल्यास त्यांना मारहाण करण्यात येऊन त्यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात येते. या गंभीर व निंदनीय प्रकरणाची दलितांनी गटविकास अधिकारी व तहसीलदार, जालना यांच्याकडे तक्रार केली. त्याच प्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जालना व पोलीस निरीक्षक, सेवली यांच्याकडेही पाण्याचा प्रश्न सोडविण्याबाबत व दलितांवर ग्रामस्थ यांनी घातलेल्या बहिष्काराबाबत तक्रार करण्यात येऊनही अद्यापि याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. यामुळे त्यांच्यात दहशतीचे व भीतीचे वातावरण पसरले आहे. यामुळे या गावातील दलितांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी तसेच त्यांना संरक्षण मिळण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता आहे. तसेच दलितांवर बहिष्कार आणि दहशतीचे व भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्यांविरूद्ध ॲट्रॉसिटीचे गुन्हे दाखल करावेत अशी माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे.

..7

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राज्य शासनाने वर्ग 1 व 2 च्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचे अधिकार आपणाकडे घेतले आहेत. त्यानुसार साधारण दरवर्षी नवीन आर्थिक वर्षारंभी शासन प्रशासकीय व सोयीच्या बदल्या करीत असते. केलेल्या बदल्यांची अंमलबजावणी तातडीने व्हावी अशीच शासनाची अपेक्षा असते. आजकाल शासनाने केलेल्या बदल्या मान्य नसल्यामुळे हे अधिकारी आजारपणाचे निमित्त करून बदली रद्द करणे किंवा सोयीच्या ठिकाणी करवून घेणे यासाठी मंत्रालयाकडे सहा सहा वेळा चकरा मारतात. त्यामुळे प्रशासकीय कामकाजावर फार मोठ्या प्रमाणात विपरित परिणाम होतो. या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मी शासनास अशी विनंती करतो की, शासनाने बदली विषयक कार्यप्रमाणालीमध्ये सर्वांच्या सहविचाराने योग्य ते बदल करून प्रशासकीय कामकाजास गती द्यावी.

............

.....8

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

पूर्वी आपल्या शालेय अभ्यासक्रमात हिंदी-संस्कृत असे संयुक्त भाषा विषय घेता येत होते. सध्या ती मुभा नाही. माझी आपल्या मार्फत माननीय शिक्षण मंत्री व शासनाला विनंती आहे की, सहावी ते दहावी या अभ्यासक्रमामध्ये हिंदी-संस्कृत, हिंदी-उर्दू, हिंदी-पाली, हिंदी-अरेबिक किंवा अन्य भाषा असे संयुक्त भाषा विषय जेथे मागणी असेल तेथे शिकवण्यास मुभा द्यावी.

.....

..9

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

केंद्र शासनाने वैद्यकीय प्रवेशासाठी नीट ही परीक्षा ठेवलेली आहे. MBBS ला नीट आहे, त्याप्रमाणे P.G.ला देखील नीट येणार आहे. वैद्यकीय प्रवेश परीक्षेबाबत अजूनही कोणतीही सुस्पष्टता नाही. त्यामुळे अनेक विद्यार्थी सेंट जॉर्जेस रूग्णालय येथे असलेल्या आरोग्य संचालनालयामध्ये जाऊन चौकशी करतात. पण तेथून त्यांना कोणताही प्रतिसाद मिळत नाही. कोर्टाने सांगितले की, तुम्ही परीक्षा घ्या, पण निकाल जाहीर करू नका. म्हणजे नेमके काय आहे ? कुठली परीक्षा घ्यायची व कुठला निर्णय लावयाचा नाही यासंबंधी विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

तेव्हा राज्य शासनाने अशाप्रकारची माहिती वर्तमानपत्राद्वारे किंवा टी.व्ही.वर,विविध चॅनल्सवर दिल्यास लोकांना त्याबाबत माहिती होऊ शकेल.

माझा दुसरा एक विषय आहे. खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेशाचा प्रश्न प्रलंबित राहिला आहे. लोकांकडून पैसे घेऊन त्यांना इरेग्युलर प्रवेश दिले म्हणून न्यायालयाने एक समिती नेमावयास सांगितले होते. परंतु त्या समितीने अजूनही त्यांचा निकाल दिलेला नाही. त्यामुळे प्रवेश रखडलेले आहेत. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी यामध्ये ताबडतोब हस्तक्षेप करुन हे प्रवेश लवकरात लवकर सुरु करावेत अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करीत आहे.

------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, कोकणामध्ये विशेषत: रत्नागिरी जिल्ह्यातील डोंगराळ भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाऊस पडतो. त्यामुळे तेथील रस्ते मोठ्या प्रमाणावर खराब होतात. आज रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक रस्ते खराब असल्यामुळे त्या ठिकाणी एस.टी.जाऊ शकत नाही. त्यामुळे लोकांना 10-10 कि.मी. अंतर पायी जावे लागत आहे. ग्राम विकास विभागाने रस्त्यांच्या कामासाठी फक्त 20 लाख रुपयांचा निधी दिलेला आहे. इतक्या छोट्या निधीमध्ये तेथील रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे होऊ शकणार नाहीत. माझ्या खेड तालुक्यातील प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक 8, इतर जिल्हा मार्ग क्रमांक 15 आणि ग्रामीण मार्ग क्रमांक 48 हे रस्ते पूर्णपणे नादुरुस्त झालेले असल्यामुळे तेथे एस.टी.जाऊ शकत नाही. तेव्हा या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी मिळणे आवश्यक आहे. मागील दोन वर्षापासून या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी मिळत नाही. कोकणाकडील समस्यांकडे दुर्लक्ष न करता तेथील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी भरीव निधी द्यावा अशी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधीत आहे.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, शासनाने राज्यात गुटखा विक्रीस बंदी केली आहे. सदर गुटखा पानपट्टी ऐवजी गावठी दारु प्रमाणे वेगवेगळ्या अड्डयांवर सर्रासपणे विकला जात आहे. दोन रुपयाची पुडी पंधरा ते वीस रुपयांना विकण्याचा काळा धंदा फोफावला आहे. जुलै 2010 पासून डिसेंबर 2012 पर्यंत शासनामार्फत टाकलेल्या वेगवेगळ्या धाडीत अंदाजे 11 कोटी 22 लाख 43 हजार 434 इतक्या किंमतीचा गुटखा जप्त केलेला आहे. यामुळे धाडी टाकणे हा एक शासनाचा देखावा असल्याची सर्वसामान्यांची भावना होत असून शासनाने या बाबत कठोर कारवाई करावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास विनंती करीत आहे.

-------

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, स्वच्छ मुंबई, सुंदर शहर मुंबई व्हावी म्हणून मुंबई शहराला विळखा देऊन वसलेल्या झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करुन मुंबईचे शांघाय व्हावे या उदात्त हेतूने झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाची स्थापना झाली. मात्र, या योजनेचा फायदा एस.आर.ए.मधील अधिकारी, कर्मचारी व विकासक हेच घे्त आहेत. एस.आर.ए.च्या अधिकाऱ्यांकडून झोपडपट्टीधारकांना मदत न होता विकासकालाच योजनेचा फायदा कसा होईल या दृष्टीने हितसंबंध जपले जात आहेत. सांताक्रुझ, मुंबई येथील खोतवाडी भीमवाडा झोपडपट्टी पुनर्विकास समिती सहकारी गृहनिर्माण संस्थेची मे.चौहान बिल्डर्स इंडिया हाऊसिंग डेव्हलपमेंट प्रा.लि. या विकासकाने एस.आर.ए. योजनेच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करुन या योजनेत स्वत:ची पाच नावे परिशिष्ट-2 मध्ये समाविष्ट करणे, रोमेल सहकारी गृहनिर्माण संस्था, नगर भूमापन क्रमांक 368 आंबोली, तालुका अंधेरी या संस्थेचे पदाधिकारी, वास्तुविशारद व विकासक यांनी करुन ठेवलेले प्रचंड घोटाळे, सहकारी गृहनिर्माण संस्थेत घुसविण्यात आलेले 34 बोगस सदस्य, माथाडी कामगारांच्या गृहनिर्माण संस्थेसाठी राज्य शासनाने नगरभूमापन क्रमांक 343 व 823-अ, गाव चेंबूर, तालुका कुर्ला, मुंबई उपनगर जिल्हा ही जमीन सन 1988 मध्ये दिलेली असतानाही त्यावर अन्य विकासकांनी तेथील झोपडपट्टीधारकांना हाताशी धरुन या योजनेलाही सुरुंग लावण्याचे विकासक, एस.आर.ए. योजनेचे संबंधित अधिकारी यांच्या अभद्र युतीचे मनसुबे, या तीन ठळक व प्रातिनिधिक उदाहरणांचा आढावा घेतल्यास,विकासकाकडून व त्यांना साथ देणाऱ्या एस.आर.ए.च्या अधिकाऱ्यांकडून त्यांच्या भ्रष्टाचारी आचरणाने एस.आर.ए. योजनेचा जो बट्टयाबोळ केला जात आहे त्या संदर्भात शासनाने करावयाची तातडीची व परिणाकारक उपाययोजना याकडे मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधीत आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, दिनांक 3 ते 5 ऑक्टोबर, 2011 या कालावधीत विद्यार्थी उपस्थिती बाबत राबविण्यात आलेल्या विशेष पटपडताळणी मोहिमेच्या आधारावर राज्यातील 50 टक्के पेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या अनुपस्थिती असलेल्या शाळांमधील कार्यरत शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अतिरिक्त ठरवून त्यांचे समायोजन न करता त्यांच्या सेवा समाप्त करण्यात याव्यात असा आदेश दिनांक 2 मे 2012 च्या शासन निर्णयातील कलम 1.7 मध्ये नमूद केले आहे.

याच शासन निर्णयामध्ये कलम 1.5 नुसार 50 टक्केपर्यंत अनुपस्थिती असलेल्या शाळांमधील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचेच केवळ अन्य शाळेत समायोजन करण्यात यावे असा आदेश आहे.

या दोन्ही कलमातील तरतुदीनुसार शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत भेदभाव निर्माण झालेला आहे. ही बाब अन्यायकारक असून मानवीय दृष्टया अहितकारक आहे.

शासन निर्णय 2 मे 2012 मधील कलम 1.7 रद्द करण्यात यावे व दोन्ही प्रकारच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्यात यावे, अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करीत आहे.

-------

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वयेच्या सूचने संबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे

**सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील एकूण 38 निवेदने प्राप्त झाली आहेत. आज वेळेअभावी या निवेदनांवर चर्चा होणार नाही. ती सर्व निवेदने मी पटलावर ठेवीत आहे. या निवेदनांच्या संदर्भात आपणास एखादी महत्वाची बाब सांगावयाची असेल तर आपण मला जरुर सांगावी. ती बाब मी संबंधित मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देईन.

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, माझी सूचना आहे की, मागील तीन अधिवेशनापासून नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदनावर चर्चा होत नाही. प्रत्येक दिवशी सांगण्यात येते की, उद्या निवेदने घेण्यात येतील, परंतु ती घेतली जात नाहीत आणि अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी जास्त निवेदने आल्यास त्यावर चर्चा होत नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया मला दालनात येऊन भेटले होते. त्यांनी मला त्यांच्यावर झालेला अन्याय सांगितलेला आहे. या संदर्भात जरुर दुरुस्ती होईल यादृष्टीने मी व्यवस्था करतो.

सहसचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक चार (अ) अंतर्गत म.वि.प.नियम 93 अन्वयेच्या क्रमांक 1 ते 38 सूचनांसबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : नियम 93 अन्वयेच्या सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 38 ही निवेदने कृपया छापावीत.)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्याबाबत**

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, मी दोन दिवसांपूर्वी औचित्याच्या मुद्याद्वारे वांद्रे-वरळी सी-लिंक जवळ अचानक 300 ते 400 झोपड्या अचानक वाढल्याचा मुद्दा मांडला होता. त्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे वाढली आहेत, समुद्रात अनधिकृत बांधकामे वाढली आहेत आणि हे सर्व दोन दिवसांत सुरु आहे. तेव्हा या संदर्भात माननीय उपसभापतींनी शासनाला निवेदन करण्यास सांगितले होते. काल देखील माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सांगितले की, मी पोलीस प्रोटेक्शन देईन. परंतु या संदर्भात सरकारकडून अजून निवेदन झालेले नाही.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांना सांगू इच्छितो की, आपण उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भात माझ्या विभागाने संबंधित विभागाला यापूर्वीच कळविलेले आहे. हे अधिवेशन संपण्यापूर्वी निवेदन होण्याच्या दृष्टीने जरुन प्रयत्न होतील.

------

..8..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचने संदर्भातील अधिक माहिती पटलावर ठेवणे

श्री.रणजित कांबळे (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "माथेरान (ता.कर्जत, जि,.रायगड) येथील विश्रामगृह बंद राहिल्यामुळे झालेले नुकसान" या विषयावरील सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स.यांनी उपस्थित केलेल्या नियम 93 अन्वये सूचनेवरील निवेदनावरील चर्चेच्या दरम्यान दिनांक 18 एप्रिल, 2012 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक महिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली अधिकची माहिती छापावी.)

..9..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनांसंबधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेतील बाब क्रमांक पाच (अ)च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 238 या लक्षवेधी सूचनांसंबधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

( प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 238 ही निवेदने कृपया छापावीत )

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचने संदर्भातील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.सुरेश शेट्टी (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मेळघाट, जिल्हा अमरावती येथे कुपोषित बालकांना देण्यात येणा-या दाई कीट खरेदीत झ ाालेल्या गैरव्यवहाराबाबत" डॉ.दीपक सावंत, वि.प.स.यांनी उपस्थित केलेल्या नियम 101 अन्वये लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी दिनांक 11 डिसेंबर, 2009 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : कृपया येथे सोबतची अधिक माहिती छापावी. )

..11..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक (जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी, आपल्या अनुमतीने "जीगाव प्रकल्पाच्या कामामध्ये झालेला करोडो रुपयांचा भ्रष्टाचार" या बाबत सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर व इतर सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या नियम 101 अन्वये लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी दिनांक 17 जुलै 2012 दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली अधिकची माहिती छापावी )

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नियम स्थगित ठेवणे

**मु.शी.**: नियम स्थगित करण्याबाबत ग्राम विकास मंत्र्यांचा प्रस्ताव

श्री. जयंत पाटील (ग्राम विकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानपरिषद नियम 56 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

"महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम 56 अन्वये शासकीय ठरावासंदर्भात विधानपरिषद नियमांतील नियम 106(2) मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे, ती स्थगित करण्यात यावी".

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी**. : महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 ला जोडलेल्या अनुसूचीतील "इमारती व दळणवळण" या शीर्षकाखालील नोंद 50 मधील "(तीन) प्रमुख जिल्हा रस्ते" हा खंड वगळण्यास मान्यता देणे

**मु.शी**.: महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 ला जोडलेल्या अनुसूचीतील "इमारती व दळणवळण" या शीर्षकाखालील नोंद 50 मधील "(तीन) प्रमुख जिल्हा रस्ते" हा खंड वगळण्यास मान्यता देणे यासंबंधी माननीय ग्राम विकास मंत्री यांचा ठराव

श्री. जयंत पाटील (ग्राम विकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 106 अन्वये पुढील ठराव मांडतो.

**"ज्याअर्थी,** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा.५ ) याला जोडलेल्या अनुसूचीच्या नोंद ५० चा खंड (तीन) हा, उक्त अधिनियमाच्या कलम १०० च्या पोट-कलम (२) अन्वये अधिसूचना काढून गाळण्याचे प्रस्तावित केलेले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** पहिल्या अनुसूचीतील कोणतीही नोंद गाळण्यासंबंधीची अशी कोणतीही अधिसूचना राज्य विधानमंडळाच्या पूर्वमान्यतेशिवाय काढता येणार नाही, अशी तरतूद उक्त अधिनियमाच्या कलम १०० च्या पोट-कलम (२) च्या परंतुकाच्या खंड (क) मध्ये करण्यात आलेली आहे;

**त्याअर्थी आता,** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम १०० च्या पोट-कलम (२) च्या परंतुकाच्या खंड (क) च्या तरतुदींना अनुसरुन,

महाराष्ट्र विधानपरिषद याव्दारे, राज्य शासनाने प्रस्तावित केल्याप्रमाणे, उक्त अधिनियमाला जोडलेल्या पहिल्या अनुसूचीतील "इमारती व दळणवळण" या शीर्षकाखालील नोंद ५० मधील "(तीन) प्रमुख जिल्हा रस्ते;" हा खंड वगळण्यास मान्यता देण्यात यावी."

सभापती महोदय, या राज्यातील जिल्हा परिषदांकडे ग्रामीण रस्ते आहेत त्यामधील मेजर डिस्ट्रिक्ट रोड म्हणजे प्रमुख जिल्हा मार्ग या कॅटॅगरीमधील मोठया प्रमाणावरील रस्ते ग्राम विकास

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील...

विभागाच्या म्हणजे जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत होते. त्या रस्त्यांपैकी प्रमुख जिल्हा मार्ग बांधकाम विभागाकडे वर्ग करावेत या करिता हा प्रस्ताव आहे. महाराष्ट्रातील काही जिल्हा परिषदांनी आपल्या सोयीनुसार ठराव करुन काही रस्ते वर्ग केले आहेत. महाराष्ट्राच्या काही जिल्हा परिषदांमध्ये असे निर्णय होत नव्हते. किंवा काही जिल्हा परिषदांनी अर्धवट निर्णय केले होते. त्यामुळे यामध्ये सुसूत्रता यावी आणि बांधकाम विभागाकडे कोणते रस्ते आहेत याचे एकदा निश्चितीकरण व्हावे म्हणून सर्व मेजर डिस्ट्रिक्ट रोड आणि त्यावरील बांधकाम विभागाकडील रस्ते त्या खालील व्हिलेज रोड, अदर व्हिलेज रोड किंवा इतर ग्रामीण मार्ग आणि इतर जिल्हा मार्ग हे रस्ते जिल्हा परिषद म्हणजे पर्यायाने ग्राम विकास विभागाच्या माध्यमातून बघितले जावेत. अशी भूमिका घेऊन या सभागृहासमोर हा ठराव मांडण्यात आलेला आहे. खरे म्हणजे फार मोठया प्रमाणात ग्रामीण विकास मार्ग आणि इतर जिल्हा मार्ग या राज्यात आहेत. महाराष्ट्रात १ लाख ७५ हजार ७३१ कि.मी. ग्रामीण मार्ग आहेत आणि इतर जिल्हा मार्ग ६१ हजार १५८ कि.मी. आहेत. हे रस्ते ग्राम विकास खात्याकडे राहणार आहेत. प्रमुख जिल्हा मार्ग आणि त्यावरील रस्ते हे बांधकाम विभागाकडे राहतील. अशाप्रकारची माहिती सभागृहाला द्यावी म्हणून हा ठराव सभागृहासमोर मांडला आहे. तो सभागृहाने संमत करावा अशी मी विनंती करतो.

ठराव मतास टाकून संमत झाला.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या "अनिस" संस्थेस परदेशातून पैसे मिळण्यासंबंधी चौकशी करण्याबाबत या विषयावरील औचित्याच्या मुद्याला दिलेले चुकीचे उत्तर

**मु.शी.**: डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या "अनिस" संस्थेस परदेशातून पैसे मिळण्यासंबंधी चौकशी करण्याबाबत या विषयावरील औचित्याच्या मुद्याला दिलेले चुकीचे उत्तराबाबत श्री. रामदास कदम, वि.प.स. यांनी श्री. शिवाजीराव मोघे, सामाजिक न्याय मंत्री यांचेविरुध्द दिलेली विशेष हक्कभंगाची सूचना.

**सभापती** :सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी "डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या "अनिस" संस्थेस परदेशातून पैसे मिळण्यासंबंधी चौकशी करण्याबाबत या विषयावरील औचित्याच्या मुद्याला दिलेल्या चुकीच्या उत्तराबाबत सामाजिक न्याय मंत्र्यांविरुध्द विशेष हक्कभंगाची सूचना दिली आहे. सदस्यांना त्यावर आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे.

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानपरिषद नियमावलीतील नियम २४० अन्वये माननीय नामदार श्री. शिवाजीराव मोघे, सामाजिक न्याय मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या विरोधात विशेष हक्कभंगाची सूचना देऊ इच्छितो.

"दि. २१.१२.२०११ रोजी विधानपरिषदेत मी औचित्याच्या मुद्दयाव्दारे "डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या "अनिस" संस्थेस परदेशातून पैसे मिळण्यासंबंधी चौकशी करणे बाबत" हा मुद्दा माहितीच्या अधिकाराने प्राप्त केलेल्या माहितीनुसार मांडला असता या औचित्याच्या मुद्दयाव्दारे माननीय सामाजिक न्याय मंत्री यांच्या कार्यालयातून दि.२५.१०.२०१२ रोजी प्राप्त झालेल्या क्र.विपऔमुद्दा २०१२/प्र.क्र.१५१/सामासु या लेखी पत्रात "डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या संस्थेची पोलीस अधीक्षक सातारा कार्यालयांनी चौकशी केली असता, सदर संस्थेस परदेशातून फंड मिळत असल्याबाबत कागदोपत्री पुरावे सापडलेले नाहीत. त्यामुळे सदर संस्थेवर कार्यवाही करण्याचा वा गुन्हा दाखल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही" असे मला लेखी उत्तर देण्यात आले आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम . . . .

परंतु ऑक्टोबर 2011 मध्ये माहितीच्या अधिकारात जी माहिती मिळाली आहे त्यातून ही बाब उघड झाली आहे. तसेच दाभोळकरांच्या संस्थेविषयी धर्मादाय आयुक्तांकडे सादर केलेल्या वार्षिक हिशेब पत्रकात "सन 2007 पासून ते 2010 पर्यंत" विदेशातून मिळणाऱ्या निधीची सविस्तर माहिती दिली आहे. या वरुन पोलीस अधीक्षक, सातारा यांनी दिलेली माहिती चुकीची आहे.

फॉरेन कॉन्ट्रीब्युशन (रेग्युलेशन) ॲक्ट, 2010 च्या कलम 3 (1)(ब) नुसार कोणत्याही वृत्तपत्राच्या मालक, संपादक, प्रकाशक, वार्ताहर यांना विदेशातून पैसे घेता येत नाहीत. अशा प्रकारे पैसे घेतल्यास कायद्याच्या कलम 35 खाली नियम भंग करणाऱ्यांना 5 वर्षे कारावास किंवा दंड होऊ शकतो असा कायदा आहे.

तसेच केंद्रीय गृह मंत्रालयाने माहे ऑक्टोबर 2011 मध्ये नं.11/21022/92(91)/2011-एफसीआरएक यांच्या पत्रान्वयेही अनिस या संघटनेने फॉरेन कॉन्ट्रीब्युशन (रेग्युलेशन) ॲक्ट, 2010 नुसार दिनांक 19-10-2001 रोजी 083970034 अन्वये रजिस्टर केलेले असणे, तसेच सन 2006-2007 मध्ये 14,61,343.00 व 2007-2008 मध्ये 2,35,635.00 रुपये घेतल्याचे स्पष्ट होते.

अनिस या संघटनेच्या मालकीचे "अंधश्रध्दा निर्मूलन वार्तापत्र" हे मासिक वृत्तपत्र असून फॉरेन कॉन्ट्रीब्युशन (रेग्युलेशन) ॲक्ट, 2010 च्या कलम 3(1)(ब) नुसार या कोणत्याही वृत्तपत्राच्या मालक, संपादक,प्रकाशक, वार्ताहार यांना विदेशातून पैसे घेता येत नाहीत.अशा प्रकारे पैसे घेतल्यास कायद्याच्या कलम 35 खाली नियम भंग करणाऱ्यांना 5 वर्षे कारावास किंवा दंड होऊ शकतो असा कायदा आहे. या कायद्यामध्ये सदरहू संघटना बसत आहे. विधीमंडळ सभागृहात औचित्याचा मुद्दा .....

**सभापती** : याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम जी विशेष हक्कभंगाची सूचना वाचत आहेत, ती आमच्यासमोर आहे, आपण ती दिलेली आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी याठिकाणी जी विशेष हक्कभंगाची सूचना दिलेली आहे. त्याबाबत माझी आपल्याला विनंती आहे की, आपण हे प्रकरण विशेष हक्क समितीकडे पाठवावे आणि याबाबतीत योग्य ती कारवाई व्हावी.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, याबाबतीत निर्णय घेण्यापूर्वी मी तातडीने या संबंधात खुलासा मागवेन आणि आपण सांगत आहात त्याप्रमाणे योग्य ती कारवाई करीन.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : सभागृह नेत्यांच्या घोषणेबाबत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्याच्या संदर्भात माननीय सभापतींचा निर्णय.

**सभापती** : सोमवार, दिनांक 10 डिसेंबर 2012 रोजी विधानपरिषद सभागृह नेत्यांची घोषणा करण्याच्या वेळी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सभागृहाचा सदस्य नसलेल्या सदस्यास त्या सभागृहाचा नेता म्हणून घोषित करण्यासंबंधी मे.कौल आणि शकधर यांच्या "Practice and Procedure of Parliament" या संदर्भ ग्रंथामधील जर सभागृहाचे नेते सदनाचे सदस्य नसतील तर अशा वेळी कोणती तरतूद अवलंबिली पाहिजे याबाबत उल्लेख करुन ही बाब पार्लमेंटमध्ये 1991 मध्ये उपस्थित झाली. त्यावेळी माननीय पंतप्रधान श्री.पी.व्ही.नरसिंहराव हे सभागृहाचे नेते नव्हते आणि सभासदही नव्हते. अशा वेळी त्यांना नेता म्हणून कसे जाहीर करावयाचे असा प्रश्न उपस्थित झाला होता. मग अशा परिस्थितीमध्ये माननीय मनुष्य विकास मंत्री महोदयांना सभागृहाचा नेता म्हणून निवडण्यात आले, या घटनेचा दाखला दिला आहे.

मी येथे स्पष्ट करु इच्छितो की, मे.कौल आणि शकधर यांचा "Practice and Procedure of Parliament" हा संसदेमध्ये अवलंबिण्यात येणाऱ्या प्रथा व कार्यपध्दती विषयी संदर्भ ग्रंथ असून आपल्या नियमांमध्ये एखाद्या बाबीविषयी सुस्पष्टता नसेल तर त्यासंदर्भात कार्यपध्दती ठरविण्यासाठी मार्गदर्शक म्हणून त्याचा आपण आधार घेतो. राज्यसभेच्या "Rules of Procedure and Conduct of Business in the Council of States" यातील नियम 2 मध्ये सभागृह नेता (Leader of the Council) याची व्याख्या दिली असून ती सभागृहाच्या माहितीसाठी येथे उद्धृत करीत आहे : -

"Leader of the Council" means the Prime Minister if he is a member of the Council, or a Minister who is a member of the Council and is nominated by the Prime Minister to function as the Leader of the Council".

या व्याख्येचे सूक्ष्म अवलोकन केले असता, राज्यसभेचे सदस्य असतील तर पंतप्रधान किंवा पंतप्रधानांनी सभागृह नेता म्हणून कार्य करण्यास नामनियुक्त केलेला आणि राज्यसभेचा सदस्य असलेला मंत्री हा राज्यसभेचा सभागृह नेता असतो. या नियमात राज्यसभेचा सभागृह नेता ही व्यक्ती पंतप्रधान व मंत्री देखील असू शकते. परंतु सदर व्यक्ती ही त्या सभागृहाचा सदस्य असणे

असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

ही प्रमुख अट आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी मे.कौल आणि शकधर यांच्या "Practice and Procedure of Parliament" या संदर्भ ग्रंथातील दाखला दिला आहे तो राज्य-
सभा नियमाच्या तरतुदीस अधीन असल्याने त्यांचे म्हणणे राज्यसभेच्या सभागृह नेत्याबाबत योग्य आहे.



**सभापती** . . . .

परंतु महाराष्ट्र विधान परिषद नियमातील नियम 2 (जे-1) या मध्ये "सभागृह नेता" म्हणजे मुख्यमंत्री किंवा मुख्यमंत्र्यांनी नियुक्त केलेला कोणताही मंत्री अशी स्पष्टपणे तरतूद असल्याने मे.कौल आणि शकधर यांच्या संदर्भ ग्रंथामध्ये विशद केलेल्या कार्यपध्दतीचा आधार येथे घेण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार हे जरी या सभागृहाचे सदस्य नसले तरी त्यांना महाराष्ट्र विधान परिषद नियमातील उपरोक्त तरतुदीनुसार या सभागृहाचा नेता म्हणून मी घोषित केले आहे.

तसेच सोमवार, दिनांक 10 डिसेंबर 2012 रोजी सभागृहात माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांना विधान परिषदेचा सभागृह नेता म्हणून घोषित केल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी सभागृहातील सन्माननीय सदस्य श्री.संदीय बाजोरिया यांनी त्यांचे विरुध्द असंसदीय भाषा वापरली होती असा हरकतीचा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी मंगळवार, दिनांक 11 डिसेंबर 2012 रोजी उपस्थित केला होता. या संदर्भात मी, दिनांक 10 व 11 डिसेंबर, 2012 या दोन्ही दिवसांचे विधान परिषदेतील चर्चेचे ध्वनीफित मुद्रणावरुन तसेच लिखित स्वरुपातील कार्यवृत्त तपासले. सदरहू बाबीच्या वेळी सभागृहात बरेचसे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असल्याने गोंधळाच्या वातावरणामुळे नेमके कोण काय बोलत आहे हे त्यावरुन कळत नाही. तसेच कार्यवृत्तावरुन आक्षेपार्ह विधानही दिसून येत नाही.

याच अनुषंगाने मी, महाराष्ट्र विधान परिषद नियमातील "भाग-चार कार्यपध्दतीबाबत सामान्य नियम" याकडे सर्व सन्माननीय सदस्यांचे लक्ष वेधतो. या प्रकरणामध्ये सन्माननीय सदस्यांनी कामकाजात भाग घेताना सभागृहाच्या प्रथा व शिष्टाचाराचे संकेत याबाबत तरतुदी आहेत. माझी सर्व सन्माननीय सदस्यांना सूचना आहे की, आपण सर्वांनी लोकशाहीच्या या सर्वोच्च सभागृहाचा आदर राखून प्रथा व शिष्टाचाराचे संकेत पाळून सहकार्य करावे.

असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

तसेच आज विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येणार नाहीत.अंतिम आठवडा प्रस्तावाबाबत सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांचे भाषण काल अर्धवट राहिले होते. तसेच विशेष उल्लेख सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास काही हरकत नाही.

मी आता सभागृहाची बैठक स्थगित करीत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 3.00 वाजता सुरु होईल.

(यानंतर सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 28 मिनिटांनी, मध्यंतरासाठी 3.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ. शी.** : ॲड. एकनाथ आव्हाड यांच्या गाडीवर करण्यात आलेला गोळीबार

**मु. शी.** : ॲड. एकनाथ आव्हाड यांच्या गाडीवर करण्यात आलेला गोळीबार या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी प्रस्तावावरील चर्चेत उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने माननीय गृह राज्यमंत्र्यांचे निवेदन

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी नियम 260 अन्वये प्रस्तावावर चर्चा सुरु असताना उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भात मी पुढील निवेदन करीत आहे.

दिनांक 5.12.2012 रोजी सायंकाळी मुंबई-पुणे महामार्गावर खारघर येथे थ्री स्टार हॉटेल जवळ ॲड. एकनाथ आव्हाड यांच्या मोटारगाडीवर दुसऱ्या मोटारीने जोरात धडक दिल्याची व गोळीबार केल्याची तक्रार ॲड. आव्हाड यांनी पोलीस अधीक्षक, बीड यांच्याकडे दिनांक 7.12.2012 रोजी दिली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता, अर्जदार ॲड. आव्हाड यांच्या मोटार गाडीवर मुंबई-पुणे महामार्गावर दुसऱ्या मोटारगाडीने जोरात धडक दिल्याचे तसेच बंदुकीच्या अथवा पिस्तुलाच्या गोळीने गोळीबार झाल्याचे आढळून आले नाही.

सदर प्रकरणी अर्जदार यांच्या मालकीच्या स्कॉर्पिओ जीप क्र. एमएच-23-ई-6533 च्या डाव्या बाजूकडील दरवाजाच्या वरील बाजूस पडलेल्या खड्डयाची तपासणी अर्जदार ॲड. आव्हाड यांच्या तक्रारीवरुन न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेतील तज्ज्ञांकडून करण्यात आली आहे. तपासणीमध्ये जीपवर गोळीबार झाला नसून कोणत्यातरी कठीण वस्तूने सदरचा खड्डा पडला असल्याचे निष्पन्न झाले आहे. चौकशीत गुन्हा घडल्याचे निष्पन्न न झाल्याने या प्रकरणी कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

**पृ.शी./मु.शी.** : विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवणे

**सभापती** : आज शुक्रवार, दिनांक 21 डिसेंबर, 2012 रोजी सभागृहात उपस्थित करण्यासाठी अनुमती दिलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील.

सह सचिव : महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, चंद्रकांत पाटील, सतीश चव्हाण, विनायक राऊत, जयवंतराव जाधव, मोहन जोशी, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री श्री. धनंजय मुंडे, जयप्रकाश छाजेड आणि भगवान साळुंखे यांनी दिलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

( प्रेस : येथे सोबत जोडलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना छापाव्यात )

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सन 2005 पासून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सुरु असलेले सत्र

**मु.शी.** : सन 2005 पासून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सुरु असलेले सत्र या विषयावर सर्वश्री. विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र. पाटील, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. दीपक सावंत, श्री. रामनाथ मोते, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.चंद्रकांत पाटील, ॲड. अनिल परब, सर्वश्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, विनायक राऊत, डॉ.रणजित पाटील, श्री. सुमंत गायकवाड, ॲड. आशिष शेलार, वि.प.स. यांचा प्रस्ताव

( चर्चा पुढे सुरु )

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी जो अंतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावावरील त्यांचे भाषण अपूर्ण आहे. या प्रस्तावावरील चर्चा काल सुरु इ ालेली आहे. या प्रस्तावावरील चर्चा सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह पूर्ण करण्याचा प्रयत्न सभागृहाच्या दोन्ही बाजूच्या सदस्यांनी करावयाचा आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, काल या प्रस्तावरील चर्चा सुरु करताना विशेषतः विदर्भातील कापूस, धान, सोयाबीन यांच्या भावासंदर्भात मी मुद्दा उपस्थित केला होता. मागच्या नागपूर अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नावरील प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी मांडला होता आणि त्या प्रस्तावावर चर्चा झाल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी 2 हजार कोटी रुपयांच्या पॅकेजची घोषणा केली होती. त्यावेळी प्रस्ताव मांडत असताना दोन्ही बाजूच्या सदस्यांनी शेतकरी कसे अडचणीत आहेत आणि त्यांना ताबडतोबीने मदत केली पाहिजे असे म्हटले होते. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेले भाषण मी ऐकले. त्यांनी पहिल्यांदा असा उल्लेख केला की, पाटबंधाऱ्यांवर आपले जे पैसे खर्च होत आहेत तितका रिटर्न मिळत नाही. जी चर्चा एसआयटीपर्यंत येऊन थांबली आहे ती तेव्हापासून सुरु झाली होती.

सभापती महोदय, यामध्ये जी तातडीने मदत केली पाहिजे त्यासाठी 2 हजार कोटी रुपयांच्या पॅकेजची घोषणा झाली. त्यामध्ये पहिल्या टप्प्यात केवळ त्यातील 300 कोटी रुपये मिळाले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

श्री. विनोद तावडे .....

होते. मार्चच्या अर्थसंकल्पानंतर 1285 कोटी रुपये दिले गेले. हे 1285 कोटी आणि आधी दिलेले 300 कोटी असे मिळून 1585 कोटी होतात. म्हणजे 2 हजार कोटी रुपयांचे पॅकेज कमी करत करत 1585 कोटी रुपयांवर संपविण्याचा शासनाचा प्रयत्न होता. आम्ही पावसाळी अधिवेशनामध्ये हा विषय पुन्हा लावून धरला. पावसाळी अधिवेशनामध्ये हा विषय लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून तसेच प्रस्तावाच्या माध्यमातून पुन्हा उपस्थित केला. तीनवेळा त्याबाबत पाठपुरावा केल्यानंतर अतिरिक्त 400 कोटी रुपयांचा निधी वितरित केला गेला.

सभापती महोदय, ज्यावेळी आपण या सभागृहात घोषणा केल्यानंतर त्याप्रमाणे शेतकऱ्यांना ताबडतोब मदत पोहोचवावयाची असते पण तशी ती मदत न होता विरोधकांनी प्रस्ताव आणला आहे म्हणून त्यावर बोलण्यासाठी म्हणून उत्तरात सांगावयाचे आणि मग वर्षभर हप्त्याहप्त्याने ते पैसे देत राहावयाचे त्यामुळे शेतकऱ्यांची पुरती वाट लागलेली असते. काल दुष्काळाच्या विषयात असे सांगण्यात आले की, त्याबाबत शासनाला चिंता आहे आणि काही कमी पडू देणार नाही. पण सरकारची घोषणा हवेत विरते की काय याची मात्र नेहमीच चिंता वाटते. त्यामुळे निधीचे वाटप तातडीने करण्याची पध्दत सुरु करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, शासनाने कोरडवाहू मिशनची घोषणा केली होती. कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी कोरडवाहू मिशनची स्थापना करण्यात येईल आणि त्याची सविस्तर रुपरेषा तीन महिन्यात ठरविण्यात येईल असे मागच्या डिसेंबरच्या अधिवेशनात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बोलताना माननीय मुख्यमंत्री महोदय म्हणाले होते. तीन महिन्यात रुपरेषा ठरविण्याची घोषणा केली तरी कोरडवाहू शेती अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या ज्या योजना आहेत त्या सर्व योजनांना प्रशासकीय आणि वित्तीय मान्यता देण्याचा निर्णय आठ दहा दिवसांपूर्वी म्हणजे 4 डिसेंबरला घेतला. त्यामुळे कोरडवाहू मिशन अंतर्गत येत्या पाच वर्षात दहा हजार कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात येईल असे माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषित केले होते. पाच वर्षात दहा हजार कोटी म्हणजे प्रत्येक वर्षाला साधारणत: 2 हजार कोटी रुपये येतात. म्हणजे बांधकाम खात्याचे जे बजेट आहे तेवढी रक्कम या कोरडवाहू मिशनसाठी एका वर्षात मिळतील असे आम्ही गृहीत धरले. परंतु 2012-2013 च्या अर्थसंकल्पामध्ये

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

या कार्यक्रमासाठी केवळ 200 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. आपली राजकीय इच्छा प्रामाणिक आहे का ? आम्ही कोरडवाहू शेतीच्या बाबतीत वेगळे मिशन करीत आहोत असे शब्दांचे फुलोरे येतील, कल्पना येतील पण या मिशनसाठी जे दहा हजार कोटी रुपये देऊ असे आपण सांगितले त्यातील फक्त 200 कोटी रुपये मार्चच्या अर्थसंकल्पात दिले. 4 डिसेंबरला त्यातील फक्त 50 कोटी रुपयांच्या कार्यक्रमाला मान्यता दिली. म्हणजे मूळ भाषणात 10 हजार कोटी रुपयांची घोषणा केली, अर्थसंकल्पीय भाषणात 200 कोटीची तरतूद केली आणि प्रत्यक्ष कागदावर 50 कोटीच्या कार्यक्रमाला मान्यता दिली. शेतकऱ्यांच्या विषयात शासनाची जर अशी नियत असेल तर खरोखरच जे शेतकरी सरकारकडून मदत मिळण्याची अपेक्षा धरुन आहेत त्यांना ती मदत मिळणार का हा खरोखर माझ्यासमोर प्रश्न आहे.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये जवळजवळ गेली आठ वर्षे नागपूरच्या अधिवेशनात तसेच कधी कधी अर्थसंकल्पीय अधिवेशनात सुध्दा कापसाच्या विषयावर चर्चा होत असते. कापूस, धान आणि इतर विषयावर चर्चा होत असताना कापसाच्या विषयात आपल्या कृषी विद्यापीठांचे काय योगदान आहे याचा मी विचार करीत होतो. विशेषत: बीटी कॉटनचा जो मुद्दा आहे त्यामध्ये बीटी कॉटन म्हणजे जे बेसिलस थुरेन्जेनिसिस आहे तो बॅक्टेरियांना मारतो. त्याची निर्मिती मॉन्सेंटो कंपनीने केलेली आहे. या बीटीयुक्त कपाशीवर जर बोंडअळीचा हल्ला झाला तर त्या अळ्या मरतात आणि कापसाचे पीक जास्त येते. आपण वर्षानुवर्षे ते वापरतो पण आपली जी चार कृषी विद्यापीठे आहेत त्यांनी या पध्दतीचे काही संशोधन केले आहे का ?

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

या प्रकारच्या जातीचे बियाणे निर्माण करण्याचे काम आपल्या कृषी विद्यापीठातील संशोधकांनी केलेले आहे काय ? अशा प्रकारचे बियाणे तयार करण्याची आवश्यकता आपल्याला वाटत नाही काय, की परदेशातील मॉन्सेंटो कंपनीकडून ते वर्षानुवर्षे आपण खरेदी करीत रहायचे ? याबाबतीत त्या परदेशी कंपनी आणि आपले संशोधक यांची काही हातमिळवणी झालेली नाही ना अशी माझ्या मनात शंका निर्माण होते.

सभापती महोदय, श्री. अटलबिहारी वाजपेयी हे देशाचे पंतप्रधान असताना इथेनॉलच्या ब्लेंडिगचा निर्णय घेतला आणि नवीन सरकारने तो निर्णय मागे घेतला. त्यावेळी त्या आईल ट्रेडिंग कंपन्या आणि आपले ब्युरोक्रॅटस् यांची हातमिळवणी होती त्यामुळे ते ब्लेंडिंग मागे घेतले. आता जेव्हा अडचण निर्माण झाली त्यावेळी सरकारने गेल्या महिन्यात 5 टक्के वाढ केली. त्यामुळे परदेशातील कंपन्यांशी आपल्याकडील संशोधकांची काही हातमिळवणी असते का अशी शंका यावी इतके या विषयामध्ये आपले संशोधक निरुत्साही दिसतात. खरे तर या विषयामध्ये काही ना काही संशोधन करुन नवीन बियाणे शोधून काढण्याचे काम झाले असते तर आपल्या राज्यातील शेतक-यांचे कोट्यवधी रुपये वाचू शकले असते. आजपर्यंत बी.टी.युक्त कापूस बियाणे विकसित केले गेले नसल्यामुळे मॉन्सेंटो कंपनीला शेतक-यांचे करोडो रुपये जात असतात.

सभापती महोदय, अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या वेळी दुष्काळासंबंधीची जी चर्चा झाली त्यावेळी आपल्या राज्यातील ब्रिटीशकालीन आणेवारी काढण्याची पध्दत बदलण्यात येईल आणि त्यासाठी श्री. विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली जाईल असे सांगितले. ही आणेवारीची पध्दत कशी चुकीची आहे हे अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी वारंवार सांगितलेले आहे. आणेवारी 50 पैशापेक्षा अधिक असल्यामुळे शेतक-यांना दुष्काळाच्या सोईसुविधा प्राप्त होत नाहीत. गेल्या 10 वर्षातील सर्वोत्कृष्ट उत्पन्नाचा आधार देखील ही आणेवारी काढताना घेतला जातो. अमरावती विभागामध्ये प्रति हेक्टर कापसाचे 9 क्विंटल उत्पादन हे सर्वोत्कृष्ट उत्पादन आहे. चंद्रपूरमध्ये प्रतिहेक्टर 8 क्विंटल कापसाचे उत्पादन हे सर्वोत्कृष्ट उत्पादन मानले गेले आहे. कृषी खात्याकडून कृषीपंडित पुरस्कार दिले जातात. एका शेतक-याने एका हेक्टरमध्ये 50 क्विंटल एवढे भरघोस उत्पादन घेतले. त्यास कृषिपंडित पुरस्कार देण्यात आला. मग 10 वर्षातील सर्वोत्कृष्ट उत्पादन 9 क्विंटल आहे की 50 क्विंटल आहे यामध्ये संभ्रम आहे. शेतक-याला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

फायदा होणार नाही अशा पध्दतीने ही आणेवारी काढण्याची पध्दत आहे काय ? मागील 10 वर्षातील कापसाचे सर्वोत्कृष्ट उत्पादन हेक्टरी 9 क्विंटल आहे की 50 क्विंटल आहे याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा....(अडथळा) गेल्या तीन वर्षामध्ये ज्यांना कृषीपंडित पुरस्कार देण्यात आलेले आहेत त्यांची नावे मी माननीय मत्री महोदयांना देतो.

सभापती महोदय, स्वामीनाथन समितीने शासनास शिफारशी केलेल्या आहेत. राष्ट्रीय कृषीमूल्य आयोगाने जो हमीभाव जाहीर केलेला आहे तो उत्पादन खर्चाच्या 50 टक्के अधिक असावा अशी शिफारस स्वामीनाथन समितीने केलेली आहे. या शिफारशींचा शासनाने स्वीकार करावा अशी आम्ही सातत्याने मागणी करीत आहोत. उत्पादन खर्चापेक्षा 50 टक्के अधिक या प्रमाणे शेतक-याच्या मालाला हमी भाव मिळणे आवश्यक असताना तो हमीभाव मिळत नाही. शेतकरी मेहनत करुन, कष्ट करुन जे पिकवितो त्याचा त्याला योग्य मोबदला मिळत नाही ही शेतक-याची शोकांतिका आहे. केन्द्र आणि राज्य शासनाने संयुक्तरित्या किंमत स्थिरीकरण निधी स्थापन केला पाहिजे. त्यातून शेतक-याच्या मालाच्या किंमतीमध्ये होणा-या चढउतारात शेतक-याला संरक्षण दिले पाहिजे, अशी स्वामीनाथन समितीने शिफारस केलेली आहे. पण हा किंमत स्थिरीकरण निधी ना राज्याने स्थापन केला ना केन्द्राने स्थापन केला. शेतक-यांना अल्पदराने कर्ज पुरवठा करुन शेतीमधील पायाभूत सुविधांचा विकास करण्याकरिता शासनाने विशेष लक्ष दिले पाहिजे आणि कोरडवाहू शेतासाठीचे पीक कर्ज हे एक वर्षासाठी न देता चार-पाच वर्षाकरिता दिले पाहिजे अशी स्वामीनाथन समितीने शिफारस केलेली आहे. हा विषय देखील सरकारने विचारात घेतलेला नाही. या स्वामीनाथन समितीने केलेल्या शिफारशींची अंमलबजवणी हे सरकार करणार आहे की नाही हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

सभापती महोदय, केन्द्रीय कृषी मंत्रालयाचे नाव बदलून ते कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय असे करावे असे समितीने सुचविले आहे. आपण देखील "सचिवालय" हे नाव बदलून मंत्रालय केले. पण त्या ठिकाणी कुणाची सत्ता चालते याची मला कल्पना नाही. कृषी विकास हा शेतीच्या उत्पादन वाढीवर न धरता तो शेतक-याच्या एकूण उत्पन्नाशी निगडित असावा अशी स्वामीनाथन समितीने शिफरस केलेली आहे. परंतु सरकारने या शिफारशीची अंमलबजावणी केलेली नाही. भारतातील विविध राज्यामध्ये भिन्न वातावरण आहे. या भिन्न वातावरणामध्ये

..3..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ 15:10

श्री. विनोद तावडे....

वेगवेगळया समस्या निर्माण होतात. या समस्या योग्य प्रकार हाताळण्यासाठी आपण उत्तर शोधून काढले पाहिजे. यासाठी पंचायतीराजच्या माध्यमातून राज्यात जास्तीत जास्त योजना राबविल्या पाहिजेत अशी शिफारस स्वामीनाथन समितीने केलेली आहे. परंतु पंचायतराजच्या माध्यमातून अशा योजना राबविल्याचे दिसून येत नाही. राज्यस्तरावर राज्य शेतकरी आयोगाची स्थापना करावी अशी देखील शिफारस समितीने केलेली आहे. याबाबतीत सुध्दा राज्य सरकारने अद्याप विचार केलेला नाही.

सभापती महोदय, उत्पादन खर्चाच्या अधिक 50 टक्के इतका हमी भाव शेतक-याच्या मालाला मिळाला पाहिजे असे मी सांगितले. सोयाबीनचे हेक्टरी उत्पादन 11.74 क्विंटल धरले आणि प्रतिक्विंटलचा खर्च 2780 असा धरला तर साधारणपणे 4 हजार रु. इतका भाव स्वामीनाथन समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने सोयाबीनला मिळावयास पाहिजे. कापसाचा एकरी खर्च 50700 रुपये आणि हेक्टरी उत्पादन 12 क्विंटल धरले तर प्रति क्विंटल कापसाला 6000 रुपये भाव मिळाला पाहिजे. याप्रमाणे धानासाठी प्रतिक्विंटल अडीच हजार रु. इतका भाव मिळाला पाहिजे आणि हा भाव शेतक-याला मिळेल याची हमी शासनाने घेण्याची गरज आहे.

सभापती महोदय, गेल्यावेळी माननीय कृषी मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये आश्वासन दिले होते की, बियाण्याच्या खरेदी-विक्रीमधील काळाबाजार कमी होऊन शेतक-यांना रास्त दरात चांगल्या प्रतीचे बियाणे मिळावे यासाठी बियाण्याच्या बुकींगवर बंदी घातली जाईल. अंकूर, तुलसी, ब्रह्मा, कावेरी, निर्मल, इगल या कंपन्यानी गतवर्षी पासून कापूस, सोयाबीन, उडिद, तूर, मूग या पिकांच्या बियाणांचे बुकिंग घेतले होते. बियाण्यांच्या बुकिंगवर बंदी घालण्यात येईल अशी घोषणा माननीय मंत्री महोदयांनी केली होती त्याची अंमलबजावणी झाल्याचे दिसत नाही. या वर्षी देखील अंकूर, अजित सीड, या कंपन्यांनी बुकिंग करण्यास सुरुवात केली असून अन्य कंपन्या बुकिंग करणार असे समजते. या कंपन्या राजरोसपणे बुकिंग करीत असताना कृषी अधिकारी मात्र गप्प बसलेले आहेत. कंपन्या व्यापा-यांकडून बुकिंगचे ॲडव्हान पैसे घेऊन बियाणांचा कमी पुरवठा करतात परिणामी बाजारामध्ये बियाण्यांची बाजारात टंचाई निर्माण होते आणि बियाण्याच्या खरेदी-विक्रीमध्ये काळाबाजार करण्यास प्रोत्साहन मिळते. या सर्व बाबीमुळे आधीच संकटात असलेला शेतकरी अधिकच संकटात जात असतो. ॲडव्हान्स बुकिंगवर बंदी घालण्याचा निर्णय शासनाने

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

घेतलेला असताना देखील त्याची अंमलबजावणी झालेली नाही. आता या वर्षी ज्या कंपन्यांनी बुकिंग केलेले आहे त्या कंपन्यावर कृषी मंत्री काय कारवाई करणार हे सभागृहाला समजले पाहिजे.

सभापती महोदय, या नागपूरच्या अधिवेशनामध्ये येत असताना या "संत्रानगरीत आपले स्वागत" अशा प्रकारचे फलक वाचावयास मिळतात. पण खरच या संत्रानगरीची ओळख संत्रानगरी म्हणून राहिली आहे काय ? या संत्रापिकाकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे. सन 2004मध्ये 20 कोटी रुपये खर्च करुन परदेशातून अत्याधुनिक यंत्रसामग्री मागवून संत्राप्रक्रिया उद्योग सुरु केला. हा प्रकल्प एका वर्षातच बंद पडला आणि पश्चिम महाराष्ट्रातील एका कंपनीला साडेसात कोटी रुपयास या प्रकल्पातील सर्व यंत्रसामग्री भंगारमध्ये विकली गेली.

...नंतर श्री. गिते...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

संत्रा उत्पादकांना अनुदान देण्याऐवजी त्या अनुदानातून संत्र्यावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगाची उभारणी करा अशी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांकडून मागणी होत असताना शासनाने अमरावती जिल्हयातील मोर्शी येथे संत्र्यावर प्रक्रिया करणारा उद्योग सुरु केला. परंतु शासनास तो उद्योग एक वर्षाच्या आत बंद करावा लागला.

महोदय,नागपूर जिल्हयातील काटोल असेल, नरखेड असेल, अमरावती जिल्हयातील वरुड, मोर्शी, शेंदुर्णा घाट असेल, या भागांमध्ये संत्रा पिकाचे मोठया प्रमाणात उत्पादन होते. या भागात मोठ्या प्रमाणावर संत्रा उत्पादन होत असल्यामुळे हा संपूर्ण भाग कॅलिफोर्निया करण्यात येईल अशी राजकीय वक्त्यांची भाषणे आपण नेहमी ऐकत असतो. संत्रा पिकामुळे नागपूर शहराला 'ऑरेंज सिटी' म्हणून ओळखले जाते. संत्र्याच्या बाबतीत शासनाचे धोरण अतिशय उदासीनतेचे आहे. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना असे वाटत होते की, संत्रा पिकाचे उत्पादन मोठया प्रमाणात केले, वर्षातून दोन वेळा पीक घेतले तर या ठिकाणी संत्र्यावर प्रक्रिया करणारे उद्योग उभारले जातील, पर्यायाने स्थानिकांना रोजगार मिळेल, संत्र्याला चांगला भाव मिळेल, परंतु या विभागात संत्र्यावर प्रक्रिया करणारे उद्योग न उभारल्यामुळे आजच्या घडीला संत्रा उत्पादक शेतकरी अतिशय चिंताग्रस्त झ ालेला आहे, तसेच संत्रा ठेवण्यासाठी शीतगृहांची व्यवस्था निर्माण होईल अशीही संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची अपेक्षा होती. परंतु शीतगृहांची देखील निर्मिती हे शासन करु शकले नाही ही खेदाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, पाकिस्तान, भूतान या देशांत देखील संत्रा उत्पादन मोठया प्रमाणात होते, त्या ठिकाणी संत्रा पिकाच्या संदर्भात अनेक उपाययोजना केलेल्या आहेत. तशाच प्रकारच्या उपाययोजना आपण सुध्दा करु शकतो. संत्रा उत्पादनासाठी आपल्याकडे काळी जमीन, पूरक पाणी, पोषक वातावरण मोठया प्रमाणात उपलब्ध आहे. या सर्व गोष्टी असताना संत्र्यावर आधारित उद्योग या ठिकाणी नसल्यामुळे अनेक संत्रा बागा खऱ्या अर्थाने डबघाईला आल्या आहेत. विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना खर्चानुसार उत्पन्न मिळत नसल्यामुळे अनेक संत्रा उत्पादक शेतकरी आपल्या बागा नष्ट करण्याच्या मागे लागले आहेत. या गंभीर बाबीकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. नागपूर शहराची ओळख असलेले संत्रा पिकाचे उत्पादन घेणे शेतकरी बंद करतील अशी स्थिती आज निर्माण झाली आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनात शेतकऱ्यांच्या आत्महत्या या विषया बाबत चर्चा होत असते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी आपण भरपूर उपाययोजना केल्या आहेत. त्यासाठी सावकारी प्रतिबंधक कायदा केला आहे. सावकारी प्रतिबंधक विधेयकावर दोन्ही सभागृहात सखोल चर्चा झाली. तो कायदा सांगली जिल्ह्याला लागू आहे की नाही याची मला माहिती नाही. या कायद्याच्या अनुषंगाने माननीय गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी याच सभागृहात जाहीर केले होते की, जो सावकारी प्रतिबंधक कायद्याचे उल्लंघन करील त्याला कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढले जाईल. सावकारी प्रतिबंधक विधेयक दोन्ही सभागृहाने मंजूर केल्यानंतर ते अंतिम मंजुरीसाठी माननीय राष्ट्रपतींकडे पाठविले होते. परंतु अजूनपर्यंत त्या विधेयकास माननीय राष्ट्रपतींची मान्यता घेण्यात हे शासन अपयशी ठरले आहे. या विधेयकाला माननीय राष्ट्रपतींची मान्यता न मिळण्याची कारणे अतिशय थिल्लर आहेत.

महोदय,सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे जे विधेयक केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविले होते, त्या विधेयकाच्या प्रारुपामध्ये मोठया प्रमाणात स्पेलींग मिस्टेक होत्या. त्यामुळे ते प्रारुप केंद्र शासनाकडून राज्य शासनाकडे परत पाठविण्यात आले. केंद्र शासनाने त्या प्रारुपामध्ये थोड्या दुरुस्त्या सुचविल्या होत्या. मुळात त्या प्रारुपामध्ये कर्ज घेणाऱ्या व्यक्तीची व्याख्या करण्यात आलेली नाही. हे विधेयक दि.22 एप्रिल 2010 रोजी विधानसभेने आणि दिनांक 23 एप्रिल 2010 रोजी विधानपरिषदेने संमत केले. तद्नंतर दिनांक 7 मे 2010 रोजी माननीय राज्यपालांनी सही करुन सदर विधेयक माननीय राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी केंद्रीय गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे सादर केले.

महोदय, या निमित्ताने मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, विधिमंडळाने मंजूर केलेले विधेयक केंद्र शासनाकडून राज्य सरकारकडे तीन वेळा परत पाठविण्यात आले. दि.11 नोव्हेंबर, 2011 रोजी केंद्रीय वित्त मंत्रालयाने सदरहू विधेयकाच्या अनुषंगाने काही निरीक्षणे सुचविली. त्यानंतर दि.24 एप्रिल, 2012 आणि तद्नंतर दि.11 मे, 2012 ला निरीक्षणे सुचविली. केंद्र सरकारने सुचविलेल्या निरीक्षणात काही त्रुटी नमूद केल्या होत्या. त्यातील पहिली त्रुटी अशी होती की, सावकारी या व्याख्येमध्ये कंपनी असा शब्दप्रयोग करु नये. कारण कंपनी ही नॉन बँकींग

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

फायनान्शीयल इन्स्टीट्युशन मध्ये मोडते. केंद्रीय कंपनी ॲक्टमधील तरतुदीला बाधा येईल म्हणून कायद्याच्या व्याख्येमध्ये 'कंपनी' असा उल्लेख करु नये. तो उल्लेख दुरुस्त करण्यात यावा असे केंद्र सरकारने सुचविले होते. सहकारी बँका सावकारी व्यवसाय करावयास लागल्या ही बाब केंद्र शासनाने मान्य केली असली तरी सहकारी बँकांना या व्याख्येत टाकता येणार नाही, असे केंद्र सरकारने सुचविले. ती दुरुस्ती करण्याबाबत केंद्र शासनाने राज्य शासनास सूचना केली होती. या विधेयकाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने ज्या काही त्रुटी काढल्या आहेत, त्यांची पूर्तता राज्य शासनाने अद्यापपर्यंत केलेली नाही.

महोदय,एका बाजूला धरणांचे दोन-अडीच हजार कोटी रुपयांचे टेंडर ठराविक कालावधीत मंजूर होताना आपण पाहतो आणि दुसऱ्या बाजूला दि.16 जुलै, 2009 रोजी केंद्र सरकारकडे पाठविलेल्या विधेयकास राज्य शासन मान्यता घेऊ शकत नाही. राज्य सरकारकडून साडेतीन वर्षाच्या कालावधीत या विधेयकातील त्रुटींची पूर्तता केली जात नाही ही अतिशय खेदाची गोष्ट आहे. मी काल वृत्तपत्रात माननीय संसदीय कार्य मंत्र्यांचे स्टेटमेंट वाचले की, सदर विधेयक मंजूर करण्यासाठी राष्ट्रपतींची मदत घेऊ. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, तुम्हाला माननीय राष्ट्रपतींची मदत घेण्याची गरज काय आहे ? वास्तविक पाहता केंद्र सरकारने या विधेयकाच्या अनुषंगाने ज्या त्रुटी काढून दिलेल्या आहेत, त्यांची पूर्तता केली तर त्या विधेयकास माननीय राष्ट्रपती मंजुरी देतील. या विधेयकास माननीय राष्ट्रपतींची मंजुरी मिळावी यासाठी राज्य शासनाने पाठपुरावा केला पाहिजे.

सभापती महोदय, काल शिवरायांच्या स्मारकासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी सचिवांना माहिती विचारल्यानंतर सांगण्यात आले की, बांधकाम विभागाने अमुक अमुक अर्ज पाठवावयास हवा होता. 2009 मध्ये या संदर्भातील कमिटीची बैठक झाली होती, त्या बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभागाने अर्ज पाठवावा असे ठरले होते. सदर बैठकीचे मिनिटस् वाचले त्यात तसा उल्लेख आहे. तशा प्रकारचा अर्ज सार्वजनिक बांधकाम विभागाने का पाठविला नाही, यासंबंधी आम्हाला उत्तरच मिळाले नाही. त्याबाबतीत सामान्य प्रशासन विभागाने त्यांना विचारणा का केली नाही ? या बाबतीत

4...



श्री.विनोद तावडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांनी माननीय गृह मंत्र्याना विचारले की, तुम्ही घोषणा केली आहे, तुम्ही तरी त्यांना विचारले काय ? परंतु ते देखील काहीही माहिती देऊ शकले नाही. या शासनात सर्व आलबेल चालले आहे. शिवरायांच्या स्मारकाबाबत जे चालले आहे तसेच या सावकारी प्रतिबंधक कायद्याबाबत चालले आहे.

सभापती महोदय, राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होऊ नयेत म्हणून शासनाने नवीन काही उपाययोजना केल्या पाहिजेत. एमआरईजीएसच्या माध्यमातून मोठया प्रमाणात विहिरींची कामे हाती घेतली पाहिजेत. खत निर्मिती कंपन्या शासनाशी कोटयवधी रुपयांचा व्यवहार करीत असतात. त्या कंपन्यांनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबास दत्तक घ्यावे म्हणून शासनाच्या माध्यमातून विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे चुकीचे वक्तव्य रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मला थोडे बोलावयाचे आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी बोलताना सांगितले की, सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्ताव पाठवावयाचा होता. मी त्यांच्या निदर्शनास आणून देतो की, समुद्र किनाऱ्यासंदर्भात काही नियम आहेत. त्या नियमांच्या संदर्भातील परवानगी घेण्याचे काम सामान्य प्रशासन विभागाकडे सोपविण्यात आले होते. सामान्य प्रशासन विभाग केंद्रीय पर्यावरण विभागाकडून परवानग्या घेण्याचे काम करीत आहे. माजी मुख्यमंत्री श्री.अशोकराव चव्हाण यांनी केंद्रात जाऊन या कामी पर्यावरण मंत्र्यांची भेट सुध्दा घेतली होती. हा प्रश्न त्या स्तरावरच प्रलंबित होता. केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाची पूर्णपणे परवानगी मिळाल्यानंतर पुढील काम सार्वजनिक बांधकाम विभागाने करावयाचे आहे या गोष्टीची आपणास कल्पना असावी. या संदर्भात चुकीचे रेकॉर्ड होऊ नये आणि गैरसमज होऊ नये म्हणून मी हे स्पष्टीकरण केलेले आहे.

श्री.विनोद तावडे : या संदर्भात माझे माननीय मंत्री महोदयांबरोबर बोलणे झालेले होते. आपण जे मत व्यक्त केलेले आहे तसेच मी माननीय मंत्री महोदयांकडे व्यक्त केले होते. त्यावेळी त्यांनी बैठकीचे मिनिटस् काढले. ते मिनिटस् चुकीचे असतील तर त्याची मला माहिती नाही. आपल्या विभागाचे सचिव काल त्या ठिकाणी उपस्थित होते. वाटल्यास आपण त्यांना विचारु शकता. त्या ठिकाणी मी सांगितले की, माझे या संदर्भात माननीय मंत्री महोदयांशी बोलणे झालेले आहे. यामध्ये बांधकाम खात्याचा टेक्निकल असिस्टन्स आहे. (अडथळा)

5...



श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी मोठ्या प्रमाणात उपाययोजना करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. या बाबत सभागृहात वारंवार चर्चा झालेली आहे. सरकारकडून ज्या घोषणा होतात त्या शिवाजी महाराजांच्या स्मारकांसारख्या, कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढण्याच्या घोषणेसारख्या होता कामा नयेत. या घोषणांचे जसे झाले तसे या घोषणांच्या बाबतीत होऊ नये याची दक्षता शासनाने घेतली पाहिजे. हे शासन दोन पाऊले पुढे न जाता चार पाऊले मागे जात आहे ही गोष्ट मला खेदाने नमूद करावी लागत आहे. या अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने शासन विदर्भाच्या विकासासाठी, विदर्भातील शेतकऱ्यांसाठी ज्या काही घोषणा करेल त्या घोषणांची अंमलबजावणी विहित वेळेत केली जावी अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि या विषयावरील माझे मनोगत पूर्ण करतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

-------

6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानसभा सदस्यांसाठी मार्च, 2013 अखेर पर्यंत दीड कोटी रुपये अतिरिक्त निधी देण्याचा निर्णय घेतलेला आहे. तो निर्णय विधान परिषद सदस्यांनाही लागू करण्याबाबत या सभागृहात आज सायंकाळपर्यंत घोषणा व्हावी व तसे निदेश आपण द्यावेत अशी माझी आपणास नम्र विनंती आहे.

--------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सन 2005 पासून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सुरु असलेले सत्र

**मु.शी.** : सन 2005 पासून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सुरु असलेले सत्र या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. दीपक सावंत, श्री. रामनाथ मोते, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.चंद्रकांत पाटील, ॲड. अनिल परब, सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर, विनायक राऊत, डॉ.रणजित पाटील, श्री. सुमंत गायकवाड, ॲड. आशिष शेलार, वि.प.स. यांचा प्रस्ताव

( चर्चा पुढे सुरु )

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, केला इशारा जाता जाता याप्रमाणे विदर्भाच्या शेतकऱ्यांच्या संदर्भात विधानपरिषद सभागृहाची अवस्था झालेली आहे. खालच्या सभागृहात काय झाले त्याचा या सभागृहाशी संबंध नसला तरी विदर्भातील शेतकऱ्यांच्या प्रश्नावर त्या सभागृहात मध्यरात्री 2.00 वाजेपर्यंत चर्चा सुरु होती. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस असताना काही तासामध्ये कामकाज आवरते घेण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत चर्चा घेण्यात येत आहे.

सभापती महोदय, मी मागील वेळी बोललो होतो, विदर्भ असा की मराठवाडा असो, कृषी मंत्री अत्यंत कार्यक्षमतेने बियाणे आणि खताच्या वितरणाकडे लक्ष देत असल्यामुळे पूर्वी खते आणि बियाण्यांची उलाढाल ज्या बेकायदेशीर पध्दतीने होत होती त्याला बऱ्याच प्रमाणात आळा बसला आहे. आजच्या प्रस्तावामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बि-बियाणे, खते, अवजारे आदी विषयांचा समावेश आहे. विदर्भातील आमचे मित्र श्री.किशोर तिवारी यांच्याकडून प्राप्त होणारी माहिती शासनाकडे देखील असते. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबाबत त्यांनी संपूर्ण भारताचा अभ्यास केलेला आहे. त्यांच्या माहितीनुसार महाराष्ट्रामध्ये 2004 ते 2010 या काळात 8004 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात शासनाने आर्थिक पॅकेज जाहीर केल्यानंतर त्या बाबतीत सभागृहात चर्चा देखील झालेली आहे. नेमेचि येतो पावसाळी या उक्तीप्रमाणे हिवाळी अधिवेशनात शेतकऱ्यांचे प्रश्न आणि दुष्काळ या विषयावर आम्हाला चर्चा हवी

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

अशी आम्ही मागणी करतो. सरकारकडून कोणतेही ठोस धोरण पुढे येत नसल्यामुळे आम्हाला ही मागणी करावी लागते. काही गोष्टींबाबत कायमस्वरुपी उपाययोजना जाहीर होणे आवश्यक असताना सरकार त्याकडे दुर्लक्ष करते ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, अवकाळी पाऊस आणि अतिवृष्टीमुळे निर्माण झालेली परिस्थिती तसेच पाऊस न येणे या फेऱ्यामध्ये शेतकरी वर्ग सापडला आहे. माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी आपल्या भाषणातून ग्लोबल वॉर्मिंगबद्दल उद्बोधक मार्गदर्शन केले आहे. पॅकेज हे मानव निर्मित असून ते शेतकऱ्यांच्या मदतीकरिता जाहीर केले जाते. सरकारने जाहीर केलेल्या पॅकेजचे काय इ ााले याबाबत भयावह वस्तुस्थिती भविष्यात आपल्यासमोर येण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रस्तावातील विषयाबाबत अनेक खात्यांचा संबंध असल्यामुळे एकतर्फी निर्णय होणे शक्य होत नाही. वेगवेगळ्या खात्यात झालेल्या गैरकारभाराचा फटका शेतकऱ्यांना भोगावा लागतो. सरकारच्या विविध खात्यामध्ये एकसंघपणाने मॉनिटरिंग करणे शक्य होत नसल्यामुळे पॅकेज जाहीर करणे थांबत नाही, त्यामुळे चर्चा करणे थांबत नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, कापूस, धान आणि सोयाबीन या पिकांचा विषय आमच्या दृष्टीने कायम चिंतेचा बनलेला आहे. गेल्या दीड दोन महिन्याच्या काळात ऊसाचे आंदोलन महाराष्ट्रात झाल्याचे आपण अनुभवले आहे. माननीय विरोधी पक्षनेते आणि मी देखील आंदोलनामध्ये सहभागी झालो होतो. ऊस उत्पादकांना अधिक भाव मिळावा म्हणून आंदोलन सुरु होते. एका बाजूला 50 ते 60 एकर क्षेत्रात ऊस लागवड करणारा शेतकरी , 300 ते 400 एकर क्षेत्रात ऊस लागवड असणारे मंत्री यांचा विचार केला तर एका बाजूला लाखाच्या घरात लोळणारा आंदोलनातील शेतकरी आणि दुसऱ्या बाजूला आपण पिकविलेल्या शेती मालाला मिळणाऱ्या पैशातून जगायचे कसे याची भ्रांत असणारा विदर्भातील शेतकरी या संदर्भात कृषी विभागामार्फत कोणता धोरणात्मक निर्णय घेतला जाईल हा मुद्दा आहे. कापूस, धान पिकाला अधिक भाव मिळण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. एका एकर क्षेत्रात 22 ते 23 क्विंटल कापूस पिकविला जात आहे. कापसाचे उत्पादन घेण्यास सुरुवात इ ााली त्यावेळी एकरी किमान 10 क्विंटल उत्पादन निघाले पाहिजे अशी अपेक्षा होती. विदर्भातील एका शेतकऱ्याने अभ्यासपूर्ण पध्दतीने एकरी 20 क्विंटल बी.टी.कॉटनचे उत्पादन केले. त्या अनुरोधाने भावाचे चक्र सुरु झाले. किमान 5000 ते 5500 रुपये क्विंटलला भाव मिळाला

श्री.दिवाकर रावते.......

पाहिजे अशी शेतकऱ्यांची मागणी होती. अशा वेळेला सरकारने 3435 रुपये क्विंटलला भाव जाहीर केला. या वर्षी शेतकऱ्यांचे आंदोलन होऊ नये म्हणून सुरुवातीलाच सरकारने 3960 रुपये भाव जाहीर केला. कापसाला खऱ्या अर्थाने 6000 रुपये प्रती क्विंटल भाव मिळाला पाहिजे अशी मागणी झाली त्यावेळी सरकारने 3960 रुपये भाव जाहीर केला. आंध्रप्रदेशातील व्यापाऱ्यांनी राज्याच्या सीमेवर येऊन 4000 रुपये क्विंटल या दराने कापूस खरेदी करण्यास सुरुवात केली.

सभापती महोदय, सोयाबीनचा विषय पुढे आला. किमान 3000 रुपये प्रती क्विंटल भाव जाहीर झाला पाहिजे अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती. सध्या 2200 ते 2300 रुपये प्रती क्विंटल भाव दिला जात आहे. सुरुवातीला 2700 रुपयांपर्यंत भाव दिला गेला होता. काही सौदे शेतकऱ्यांच्या बांधावर झालेले आहेत, ते शेतकरी अडचणीत आले. एक गोष्ट माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या नजरेतून सुटली कशी याचे मला आश्चर्य वाटते. विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशातील कापूस उत्पादक शेतकरी यांच्या संदर्भात वस्त्रोद्योग धोरणाबाबत चर्चा झाली. माननीय मुख्यमंत्र्यांकडे आम्ही सातत्याने आग्रह धरल्यानंतर वस्त्रोद्योग धोरण मांडण्यात आले. माननीय मुख्यमंत्र्यांनी "कॉटन हब" असा शब्द वापरला होता. ज्या भागात मोठ्या प्रमाणात कापूस पिकतो तेथेच कापसावर प्रक्रिया करण्याचा निर्णय घेऊन कापड उद्योगाला चालना देण्याची त्यांनी सभागृहात घोषणा केली होती. आम्हाला असे वाटले की, मुंबईतील कापड गिरण्या बंद झाल्यामुळे लाखो कामगार बेकार झाले, विदर्भामध्ये कापसावर प्रक्रिया करुन कापड तयार करणारे उद्योग सुरु झाले तर 22 लाख सुशिक्षित तरुणांना रोजगार उपलब्ध होईल. नव्याने काही लूम्स सुरु होतील. त्या माध्यमातून उद्योग सुरु होतील. परंतु जाहीर झालेल्या धोरणाचा पाळणा हललेला आम्हाला दिसून आला नाही. वस्त्रोद्योग मंत्र्यांनी या संदर्भात ठोस भूमिका सभागृहात मांडणे आवश्यक आहे. कापसाला भाव वाढवून मिळावा म्हणून मागणी होत असताना या विदर्भात कापसावर प्रक्रिया करुन कापड तयार करणारे उद्योग सुरु झाले तर हजारो हाताना काम मिळेल.

सभापती महोदय, थेट विदेशी गुंतवणुकीबद्दल खूप कौतुक झाले. देशाच्या पार्लमेंटचे कामकाज थेट विदेशी गुंतवणुकीच्या मुद्यावरुन 15 दिवस बंद पाडण्यात आले. शेवटच्या प्रयत्नात चर्चा निर्माण झाली आणि जितं मया, जितं मया करुन सरकारने दोन्ही सभागृहात प्रस्ताव मांडला. मायावती आणि मुलायम सिंह यांचे भांडण आपण रोज पहात होतो.

नंतर श्री.जुन्नरे...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

पाठिंबा मिळवण्यासाठी कॉंग्रेस काहीही करु शकते परंतु राजकीय क्षेत्रामध्ये फसवाफसवी कशी केली जाते याचे परवा दिल्लीमधील मूर्तिमंत उदाहरण आपल्याला पहावयास मिळाले आहे.

सभापती महोदय, मला माननीय मंत्रीमहोदयांकडून जाणून घ्यावयाचे आहे की, शेतकऱ्यांच्या हिताकरिता, शेतकऱ्यांच्या भल्याकरिता एफडीआय आले, एफडीआयमुळे वॉलमार्ट येणार आहे व त्यामुळे शेतकऱ्यांचे भले होणार आहे असे आदरणीय शरद पवार साहेबांनी दिल्लीमध्ये सांगितले आहे. एफडीआय शेतकऱ्यांचा थेट माल घेणार आहे असेही सांगण्यात आले. यासंदर्भात मला माननीय मंत्रीमहोदयांना असे विचारावयाचे आहे की, आमचा विदर्भातील कापूस पिकविणारा शेतकरी कापूस,धान, सोयाबिन पिकवतो. आमच्या कापसाला वॉलमार्टचा काय उपयोग होणार आहे हे सांगणे कठीण आहे. इंग्रजानी मराठवाडयातील कापूस इंग्लंड मधील मॅन्चेस्टरमध्ये नेऊन, प्रोसेस करुन ते कापड हिंदुस्तानमध्ये विकले होते. माननीय मंत्रीमहोदयांनी वस्त्रोद्योग धोरणाबद्दल माहिती दिली होती ते वस्त्रोद्योग धोरण विदर्भात राबविले तर यातून तयार झालेल्या कापडाला वॉलमार्टच्या सहाय्याने रेडीमेड गार्मेंट तयार झाले तर कापसाला अधिक भाव मिळेल. आता आत्याबाईच्या मिशा किती पिळायच्या ? असा प्रश्न आमच्या पुढे निर्माण झालेला आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी संत्रा पिकाच्या संदर्भात विचार मांडलेले आहेत. माननीय मंत्रीमहोदयांनी संत्रा पिकाच्या संदर्भात लक्ष घातले तर काम होऊ शकते. कृषी क्षेत्रातली कारखानदारी कशी चालवावी याचे आपल्याला खानदानी ज्ञान असल्यामुळे आपण विदर्भात संत्रा पिकाच्या संदर्भात लक्ष घातले तर आमच्या विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे भले होईल. विदर्भात काटोल येथे संत्रा पिकावर प्रक्रिया करणारा एक कारखाना निघाला परंतु त्या कारखान्यात आतापर्यंत एकाही संत्र्यावर प्रक्रिया झालेली नाही. त्यामुळे अशा उद्योगाला चालना दिली तर बरे होईल. काल सांगण्यात आले की, "जेथे बुध्दी असते तेथे काम होते". विदर्भातील माणसे ही,उन्हातान्हात राबणारी, अंगमेहनत करणारी आहेत. आम्ही जे पिकवतो ते हातावर घेऊन खाणारी माणसे आहोत. आम्हाला बुध्दीने काम करता येत नाही. आंब्याचे सर्वात जास्त उत्पादन मराठवाडयात होते. सगळयात जास्त आंबा उत्पादन मराठवाडयात आणि त्या आंब्याचा रस काढून परदेशात पाठविण्याचे कारखाने सांगलीमध्ये आहेत. आपल्याला हे कधी समजणार हा खरा प्रश्न आहे. वॉलमार्टच्या सहाय्याने संत्रा उत्पादनाला जर चालना दिली पाहिजे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

गेल्यावर्षी संत्रा पीक उध्वस्त झाले होते. संत्र्याचे एक झाड शेतकऱ्याला 10 वर्षे तरी जगवत असते. आता संत्र्यांची झाडे संपूर्ण वाळून गेली आहेत. या झाडाला आपण 17 रुपये, 150 रुपये नुकसान भरपाई दिलेली आहे. सर्वच नुकसान भरपाई देता येत नसली तरी आता जी काही नवीन झाडे लावली ती पुढच्या पिढीकरिता, दुष्काळातून होरपळलेल्या नवीन उगवणाऱ्या संत्र्यांकरिता उद्योग दिले तर बरे होईल. माननीय कृषीमंत्र्यांनी संत्रा पिकाच्या संदर्भात लक्ष घातले तर पुढच्या पिढीचे भवितव्य निर्माण करणारा कृषीमंत्री या महाराष्ट्राला लाभला होता असा लौकीक घेण्याचे सामर्थ्य आपल्यामध्ये असल्यामुळे आपण ते करणार का ? हे जर मला सांगितले तर मी फार आभारी राहीन.

सभापती महोदय, बी.टी. बियाणे जेनेटीक आहे. बीटीचे उत्पादन अमेरिकेच्या मोन्सेंटो कंपनीने तयार केलेले आहे. त्या कंपनीच्या मान्यतेने तुम्ही बीटी बियाणे निर्माण करु शकत नाही.

सभापती महोदय, बीटी बियाण्यांच्या संदर्भात मी लक्षवेधी सूचना दिली होती त्यावेळी कृषी मंत्री बाळासाहेब थोरात होते. त्यावेळेस बीटी बियाण्यांची बॅग 1600 रुपयांना शेतकऱ्यांना मिळत होती. या लक्षवेधी सूचनेमध्ये सरकारने लक्ष घातल्यामुळे 1650 रुपयांना मिळणारी बीटी बियाण्याची बॅग आता 400 रुपयांना मिळू लागली आहे. मोन्सेंटो कंपनीने महाराष्ट्रातील 365 कंपन्यांना जेनेटीक देऊन बीटी बियाण्याची निर्मिती करण्याची परवानगी दिली. या मोन्सेंटो कंपनीला एका बॅग मागे 100 ते 150 रुपये मिळतात. या देशातील शेतकऱ्याच्या खिशातील करोडो रुपये अमेरिकेच्या मोन्सेंटो कंपनीला मिळतात. जेनेटीकचे विधेयक असतांना मी त्याला विरोध केल्यामुळे ते विधेयक पास होऊ शकले नाही. बीटीमुळे आमची जमीन हळू हळू नापिकीकडे वळणार आहे. ज्या ज्या ठिकाणी बीटीची लागवड केली जाते तेथील सर्व जमीन नापिकी होणार आहे. कृषी विद्यापीठ बीटी बियाणे निर्माण करु शकत नाहीत.

अगोदरच्या काळात कपाशीचे "नांदेड-44" हे बियाणे पहिल्या क्रमांकावर होते परंतु त्या बियाण्याच्या जेनेटीकमध्ये फरक पडल्यामुळे अगोदर जेथे 10 क्विंटल कापूस व्हायचा तेथे आता 6.5 क्विंटलवर आले आहे. नांदेड-44 बियाणे तयार करणाऱ्या संशोधकांना मी स्वत: भेटून विचारले की, हे तुमचे संशोधन आहे, जेनेटीकमुळे उत्पादन घटले आहे त्यामुळे आता आपण काय

...3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करणार आहात असे मी त्यांना विचारले. हे संशोधक जालन्याच्या कंपनीमध्ये आजही नोकरी करीत आहेत. अशा मंडळींना आपण आपल्याकडे घेणार आाहात काय ? शेवटी गावठी कोंबडी आणि इंग्लीश कोंबडीत फरक हा पडतोच. नांदेड-44 जातीवंत बियाणे होते. बीटीच्या कपाशीला फक्त बोंड अळी पडत नाही परंतु तिच्यावर सर्व रोग पडतात व कापूस पीक उध्वस्त होते अशी परिस्थिती आहे. हा जेनेटीक प्रकार थांबविण्यासाठी मंत्री महोदयांनी लक्ष देण्याची गरज आहे. अगोदर शेतकरी घरचे बियाणे वापरत होता. परंतु आता शेतकऱ्यांना रेडीमेड बियाण्यावर अवलंबून रहावे लागते. येणाऱ्या बियाण्यावर त्याला अवंलबून राहण्याची आपण परिस्थिती निर्माण केलेली आहे. शेतकरी पुन्हा घरी बियाणे तयार करु शकेल अशी परिस्थिती आपण निर्माण केली पाहिजे. शेतकऱ्याला रोगराईत ढकलण्यापेक्षा विद्यापीठाच्या माध्यमातून शेतकऱ्याला स्वत:च्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न कृषी मंत्र्यांनी केले तर शेतकऱ्यांवर ते उपकार होतील. पूर्वी तण हाताने काढले जात होते.....

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वांद्रे-वरळी सागरी सेतूसाठी राखीव असलेल्या जागेवर होत असलेले अतिक्रमण**

**उप सभापती** : मी परवा बांद्रे वरळी सागर सेतूच्या बांधकामासाठी जी जागा राखीव ठेवलेली आहे त्या ठिकाणी मोठया प्रमाणात अतिक्रमण होत आहे असे सांगितले होते. या ठिकाणी ज्या झोपडया उभ्या राहत आहेत त्या होऊ नये तसेच त्या ठिकाणी निर्माण झालेल्या झोपडया निष्कासित कराव्यात यासंदर्भात निर्देश दिले होते. माझ्याकडे आता त्यासंदर्भातील अहवाल आलेला आहे. हा अहवाल एमएसआरडीसीने पाठविला आहे. माहीम उड्डाणपुलाच्या खाली 1 एकर जागा असून सदर जागेवर सागरी सेतू प्रकल्पाशी संबंधीत कोणतीही कार्यवाही सुरु नाही. या जागेवर साधारणत: 300 झोपडया उभारण्यात आल्या असून त्या हटविण्यासाठी पोलीस संरक्षणाीच आवश्यकता आहे. असे संरक्षण मिळावे म्हणून पोलीस उपायुक्त, परिमंडळ -9 (वांद्रे) व वरीष्ठ पोलीस निरीक्षक वांद्रे पोलीसदल ठाणे यांच्याकडे वारंवार लेखी मागणी करण्यात आली असून उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक तथा मुख्य अभियंता यांच्या स्तरावर वैयक्तिक रित्या दुरध्वरीद्वारे संपर्क साधून पाठपुरावा करण्यात आला आहे. तथापि अद्यापही पोलीस संरक्षण प्राप्त न झाल्यामुळे अतिक्रमण निर्मुलनाची कार्यवाही करणे शक्य झालेले नाही. त्यामुळे संरक्षक भिंतीचे काम सुरु करता आलेले नाही. पोलीस संरक्षण मिळताच अतिक्रमणे काढण्याची कार्यवाही करण्याची तजवीज करण्यात आली आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती...

या संदर्भात असे नमूद करण्यात येते की, महामंडळातर्फे सुरू करण्यात आलेल्या संरक्षक भिंतीच्या कामावर नियुक्त करण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकावर गेल्या आठवड्यात अतिक्रमणधारकांनी केलेल्या हल्ल्यात त्यास जबर इजा होऊन शेवटी सायन रूग्णालयात त्याचे निधन झाले आहे. त्यामुळे पोलीस संरक्षणाशिवाय अतिक्रमण काढण्याबाबतची कार्यवाही करणे शक्य नव्हते. हे प्रकरण एवढे गंभीर आहे की, ही अतिक्रमणे होण्यामध्ये पोलीस अधिकाऱ्यांचाच हात आहे की काय, इतपत शंका येऊ लागली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्याने वारंवार लेखी पत्र देऊन, दूरध्वनीवरून संपर्क साधून जर पोलीस अधिकाऱ्याने तमा बाळगली नसेल तर संबंधित पोलीस ठाण्याच्या इन्स्पेक्टरवर आणि परिमंडळ 9 चे उपायुक्त यांच्यावर देखील आपण कडक कारवाई करावी. तसेच आम्ही सभागृहात दिलेल्या निदेशाचे तंतोतंत पालन करण्याचे काम त्वरित करावे आणि ते निदेश आपण आजच निर्गमित करावेत. माझ्याकडे अधिकृतरित्या आलेली प्रत मी आपणाकडे पाठवून देतो.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, येथे कालच माननीय गृह मंत्र्यांनी आश्वासित केले होते की, जो पोलीस बंदोबस्त लागेल तो दिला जाईल. यामध्ये तो का दिला नाही याची निश्चितपणे चौकशी केली जाईल व ताबडतोब बंदोबस्त देण्याच्या सूचना दिल्या जातील. या अतिक्रमणाला पोलीस खात्यातून कोणी पाठीशी घालत असेल तर त्याच्या वर देखील निश्चितपणे कारवाई केली जाईल.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, त्या निवेदनाची प्रत माझ्याकडे देखील आहे. आम्ही आपले खरेच कृपाभिलाषी आहोत. येथे माननीय राज्य मंत्री श्री.पाटील साहेब आहेत. त्यांनी सांगितले की, आज संरक्षण मागितले तर ते आज देऊ. ज्याने ही सरकारी जागा प्रोटेक्ट करायची होती त्याने त्या प्रमाणे सुरक्षा रक्षक नेमले होते. तेथील सुरक्षा रक्षकाचा खून झाला. तरी देखील प्रोटेक्शन मिळालेले नाही. झोपड्या तशाच राहतात. मला असे वाटते की, आपण जे निदेश दिले आहेत त्याचे तंतोतंत पालन हे झालेच पाहिजे. ज्यांनी ह्या झोपड्या वाढविल्या आहेत त्यांच्या विरूद्ध जनतेने स्पेसिफिक एन.सी.केली आहे. त्या लोकांवर देखील लगेच कारवाई झाली पाहिजे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, आपण निदेश दिल्यानंतर देखील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी शेवटच्या क्षणाला निवेदन आले आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. पूर्णपणे संरक्षण देऊ असे आश्वासन दिले होते. असे असताना आपल्या हाता खालील प्रशासन आपले आदेश ऐकत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे...

नाही असा अर्थ होतो. वरिष्ठ पातळीवर मागणी करून सुद्धा तेथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक व परिमंडळ 9 चे पोलीस उप आयुक्त जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत हे सिद्ध होत आहे. निदेश देऊन सुद्धा कारवाई होत नाही. तेव्हा हे सभागृह संपण्याच्या आधी कोणती कारवाई केली हे आपण जाहीर करणार आहात काय ? असा माझा प्रश्न आहे. तरच या सभागृहाची आणि आपल्या विभागाची प्रतिमा राहू नकते.

श्री.राम पंडागळे : सन्माननीय सभापती महोदय, हा मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे. शासनाने कारवाई केली पाहिजे. आता बंदोबस्त मागितला तर आम्ही देऊ असे शासनाच्या वतीने सांगितले होते. ते अतिक्रमण बंदोबस्त देऊन ताबडतोबीने हटविणे गरजेचे आहे. आपण इतका खर्च करत असतो की, .... (अडथळा) .... या झोपड्यांच्या पाठीमागे कोण झोपडीदादा आहे त्याची देखील चौकशी झाली पाहिजे. प्रथमत: त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. ज्याअर्थी खून करण्यामध्ये त्यांची मजल जाते त्याअर्थी निश्चितपणे त्याला कोणाचे तरी बळ असणार. त्यामुळे आपण जे निदेश दिले आहेत ते तंतोतंत पाळले गेले पाहिजेत. या पाठीमागे जो झोपडपट्टी दादा असेल त्याला शोधून काढून त्याच्यावर कारवाई केली पाहिजे. तरच झोपडपट्टया होणार नाहीत. ते अतिक्रमण हटविले नाही तर पुढच्या अधिवेशनात आपल्या हाच मुद्दा मांडावा लागेल.

**उप सभापती** : ठीक आहे.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, आपण काल निदेश दिल्या प्रमाणे येथे बंदोबस्त निश्चित दिला जाईल. झोपडपट्टया होऊ नये म्हणून गृह खाते लक्ष देत आहे. तसेच ती पूर्णपणे महानगरपालिकेची देखील जबाबदारी आहे, असे माझे मत आहे. याठिकाणी महानगरपालिकेने कारवाई करणे अपेक्षित आहे. जेथे बंदोबस्त लागेल तेथे तो देण्याची भूमिका आहे. काल आपण निदेश दिल्यानंतर अर्ज आला आणि संरक्षण दिले नाही असे घडले नसणार. ते पूर्वी कधी तरी झाले असेल. आज निश्चितपणे संरक्षण दिले जाईल.

**उप सभापती** : माझ्याकडे त्यांचे उत्तर अर्ध्या तासा पूर्वीच आले आहे व मी लगेच सभागृहामध्ये आलो. उपाध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालक यांनी व्यक्तिगतरित्या पत्र लिहून, दूरध्वनीवरून संपर्क साधून देखील पोलिसांनी कारवाई केली नसेल तर त्यांच्यावर कारवाई होणे हे क्रमप्राप्त होते की नाही, त्याप्रमाणे आपण कारवाई करणार काय ? परिमंडळ उपायुक्त-9 आणि वरिष्ठ पोलीस अधिकारी, वांद्रे यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, संपूर्ण माहिती घेऊन सभागृह संपण्याच्या आधी आपल्याला देण्यात येईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. विधी मंडळामध्ये सन्माननीय मंत्र्यांनी अशी घोषणा केली होती की, मुंबईतील अनधिकृत बांधकाम काढण्यासाठी मुंबई महानगरपालिकेला 15 दिवसाच्या आत 100 पोलीस दिले जातील. त्याचे काय झाले ? एखाद्या वॉर्डमध्ये अनधिकृत बांधकाम झाले तर त्या हद्दीतील पोलीस इन्स्पेक्टरला जबाबदार धरून निलंबित केले जाईल. असिसटंट पोलीस कमिशनरला निलंबित केले जाईल. ही घोषणा सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी केली आहे. येथे येऊन सदनाला चुकीची माहिती द्यायची आणि दिशाभूल करण्याचे काम करायचे. तसे जर होत असेल तर मला आपल्या विरूद्ध हक्कभंग आणावा लागेल. मुंबईत बाहेरचे लोंढे येतात आणि अनधिकृत बांधकामे करतात. ते बांधकाम निष्कासित करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेला 100 पोलीस देणार होता ते कधी देणार आहात ?

**उप सभापती** : आम्ही सभागृहात अशी मागणी केल्यानंतर उद्या आमचा देखील खून होईल. हे सांगता येत नाही. हे जर एवढे माजले असतील तर.....

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, महानगरपालिका अतिक्रमण हटविण्यासाठी ज्या ज्या वेळी मागणी करते त्या त्या वेळी आपण बंदोबस्त देत असतो.

**उप सभापती** : मंत्री महोदय मी आपणास थोडासा प्रश्न समजावून सांगतो. मी स्वत: श्री.सतीश गवई यांना फोन केला. ते म्हाडाचे उपाध्यक्ष आहेत. त्यांनी त्यांच्या सीईओंकडे विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, ही जागा आम्ही MSRDC ला दिलेली आहे. त्यामुळे याबाबतीत MSRDC, MSRTC, MMRDA व MCGM या सर्व यंत्रणा एकत्र येई पर्यंत तेथे इमारती झालेल्या असतील. या मध्ये सर्वात महत्त्वाची कोणती बाब असेल तर ती म्हणजे तेथील अतिक्रमणे निष्कासित करणे. त्या नंतर जमिनीची मालकी कोणाची आहे हा वाद त्या एजन्सी बघून घेतील. शेवटी हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. तेथे सुरक्षेचा देखील महत्त्वाचा प्रश्न आहे. तेथील सुरक्षा रक्षकाचा खून होई पर्यंत पोलीस गप्प बसत असतील तर मला निश्चितपणे वाटते की, पोलिसांवर देखील कारवाई झाली पाहिजे.

..4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी मघाशी म्हटल्या प्रमाणे का बंदोबस्त दिला नाही, या सर्वांची चौकशी करून कारवाई करण्यात येईल याबाबत दुमत नाही. मी येथे अतिरिक्त माहिती देऊ इच्छितो की, आज त्या ठिकाणी कदाचित बंदोबस्त दिला सुद्धा असेल.

**उप सभापती** : ठीक आहे.

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांच्या विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करणे**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, असाच एक गंभीर मुद्दा माझ्याकडे आहे. त्यासंबंधी आपण निदेश द्यावेत अशी माझी अपेक्षा आहे. ठाण्याच्या संदर्भातील अत्यंत गंभीर बाब माझ्या समोर आहे. ठाणे महापालिकेचे आयुक्त श्री.ए.आर.राजीव आहेत. खालच्या सभागृहाच्या संदर्भातील उल्लेख मी येथे करणार नाही. कारण तो आपला अधिकार नसल्यामुळे मी तो मुद्दा येथे मांडत आहे. या आयुक्तांच्या विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल होण्याची गरज आहे अशा प्रकारच्या बाबी मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे. आयुक्त यांनी इलेक्शनच्या कामामध्ये जी-इलेक्स स्कीम राबविताना स्वत:च्या एजन्सीज नेमल्या त्याचे कोणतेही टेंडर वा बेकायदेशीर कॉन्ट्रॅक्ट दिले व सरकारचे 50 लाख फुकट घालविले व स्वत:च्या कंत्राटदाराचा फायदा केला अशा प्रकारचा एक आरोप आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, आयुक्त यांच्या ऑक्ट्रॉय भ्रष्टाचाराबाबत जुलै महिन्यात.. आपल्या याच्याशी संबध नाही, हा गृह विभागाशी संबंधित विषय आहे, आपल्याकडे दिल्यास आपण मिनिटस् बदलता, आपल्यावर भरवसा नाही. दारु-वाईनवर 60 टक्के ऑक्ट्रॉय लागतो. एक्साईज व सेल्सटॅक्सच्या आकडेवारीनुसार 303 कोटी रुपयांची चुकवेगिरी समोर आली होती. ही माहिती वर्तमानपत्रात जाहीर झाली होती. या मध्ये लागू असलेला ऑक्ट्रॉय आणि दहापट दंड नियमाप्रमाणे घेणे आवश्यक असतानाही, आयुक्तांनी 10 कोटी रुपये दंड माफ केला. यामध्ये श्री.नवाजमुल्ला नावाचे मध्यस्थ आहेत. ते व्यापाऱ्यांचे मध्यस्थ आहे आणि त्यांचा स्वत:चा व्यापार आहे. 10 कोटी रुपये दंड माफ करुन दारुवाल्यांचा फायदा करण्यामध्ये आयुक्तांना काय स्वारस्य आहे याचा शोध घेणे अत्यंत महत्वाचे आहे.

सभापती महोदय, के.डी.पी स्कीम रोड वाईडींगमध्ये जमीन विकासक यांच्यामध्ये श्री.नवाजमुल्ला यांनी मध्यस्थी केली. त्यांच्यामध्ये देवाण घेवाण करुन बिल्डरचा फायदा करण्यात आला अशाप्रकारचा आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, आयुक्तांनी जेएनएनयुआरएम अंतर्गत 200 बसगाड्या खरेदी केल्या. नियमाप्रमाणे बसेसची योग्यता नसताना आणि पूर्वीच्या आयुक्तांनी टाटा मोटर्स कंपनीला 11 कोटी रुपयांची पेनॅल्टी लावलेली असताना व त्यांनी त्यातील 3 कोटी रुपये भ्रले असताना आयुक्तांनी बाकीची रक्कम माफ करुन टाटा कंपनीचा फायदा करुन दिला आणि आपल्या महानगरपालिकेमध्ये तेवढी तूट निर्माण केली.

सभापती महोदय, आयुक्त हे पूर्वी ठाणे जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असताना त्यांनी बदलापूर, जिल्हा ठाणे येथे 12 एकरचे फार्म हाऊस घेतले. त्या आदिवासी जमिनीवर आपले व आपल्या पत्नीचे नाव 7/12वर लावले आहे. अशाप्रकारची तक्रार झालेली आहे त्याची शहानिशा होणे अत्यंत आवश्यक आहे. कारण हा कायदेशीर गुन्हा आहे.

सभापती महोदय, आयुक्त हे आर्थिक भ्रष्टाचार व्यवहारात अतिरिक्त आयुक्त श्री.गुप्ता यांच्यामार्फत प्रत्येक फाईल मागे पैसे घेतात अशाप्रकारची तक्रार तेथील सभागृहात संबंधित

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

लोकांनी केलेली आहे. श्री.गुप्ता हे गोंदिया जिल्ह्यातील रॉकेल घोटाळ्यामध्ये दोषी आढळले असताना देखील आयुक्तांनी त्यांना अतिरिक्त आयुक्त म्हणून अधिकार दिलेले आहेत. म्हणज् गोंदिया जिल्ह्यातील एक भ्रष्टाचारी माणूस ठाणे महानगरपालिकेत अतिरिक्त आयुक्त पदी बसून तेथे अगदी पध्दतशीर बसून भ्रष्टाचाराची गंगा वाहतो आहे अशाप्रकारचा त्यांच्यावर आक्षेप आहे.

सभापती महोदय, मी नवीन ठाण्याची वेबसाईट पाहिलेली आहे. नवीन ठाणे बसविण्याची कल्पना चांगली आहे. ती टाकाऊ आहे असे माझे म्हणणे नाही. कारण आता तेथे लोकवस्ती वाढत आहे. परंतु नवीन ठाण्याची संकल्पना शासनाकडे येऊन संबंधित विभागामार्फत कन्सल्टंट नेमून त्या प्रमाण् नियोजन झाले पाहिजे होते. ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये नसलेल्या भागाकरिता कोणतीही निविदा न काढता मे.बेल्जम पोलीसन या कंपनीला साडेतीन कोटीची निविदा त्यांनी स्वत:च्या अधिकारात दिलेली आहे. त्यांच्यावर अशाप्रकारचे आक्षेप आहेत आणि त्याची भ्रष्टाचार प्रतिबंधक खात्याकडून छाननी होणे आवश्यक आहे. जर ते दोषी असतील तर त्यांना दोष द्या. जर आरोप अयोग्य असतील तर त्यांना क्लीनचीट द्या. परंतु याची चौकशी होणे आवश्यक आहे. आपण निर्देश दिले तर त्याचा आदर केला जातो असे आपल्या म्हणण्यावरुन कळले. तेव्हा आपण या संदर्भात निर्देश दिले तर फार बरे होईल. म्हणजे शेतकऱ्यांच्या हिताकरिता जी चर्चा आहे ती आम्हाला सुरु करता येईल.

**उप सभापती** : या संदर्भात रीतसर चौकशी करण्यात येईल.

------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: वांद्रे सी-लिंक जवळील म्हाडा भूखंडावर झालेल्या अनधिकृत झोपड्या

**मु.शी.**: वांद्रे सी लिंक जवळील म्हाडा भूखंडावर झालेल्या अनधिकृत झोपड्या या संदर्भात सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याला अनुलक्षून माननीय नगर विकास राज्यमंत्र्यांचे निवेदन

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, काल आपण, वांद्र सी-लिंक जवळील म्हाडा भूखंडावर झालेल्या अनधिकृत झोपड्या या संदर्भात निवेदन करण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे मी निवेदन करीत आहे.

**उप सभापती** : आपण मघाशी सभागृहात उपस्थित नव्हता. सभागृहात काय झाले ते मी आपणास थोडक्यात सांगतो.

मी या विषयाच्या अनुषंगाने परवा निर्देश दिले होते. त्या संदर्भात जो खुलासा करण्यात आलेला आहे त्याची प्रत मी आपल्याकडे पाठवितो. एमएसआरडीसीचे उपाध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालक व चीफ इंजिनिअर यांनी तेथील पोलीस स्टेशनला वांरवार लेखी पत्र देऊन तसेच त्यांच्याशी वारंवार दूरध्वनीवर संपर्क साधूनही पोलीस प्रोटेक्शन न दिल्यामुळे तेथील अतिक्रमणे ते दूर करु शकले नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे. आता त्याच ठिकाणी संरक्षण भिंत बांधण्याचे काम सुरु असताना त्या ठिकाणी असलेल्या सुरक्षारक्षकाला मारहाण करुन त्याचा खून करण्यात आला असे निवेदनात म्हटले आहे. एमएसआरडीसीच्या व्यवस्थापकीय संचालकांनी पाठविलेले हे निवेदन आहे. त्याची कॉपी माझ्याकडे आहे.

काल देखील या बाबत चर्चा झाली. तेव्हा माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सांगितले की,आम्ही ताबडतोब पोलीस बंदोबस्त देऊ आणि तेथील झोपडया निष्कासित करु. त्यावर आम्ही असे म्हटले होते की, ज्यांनी झोपड्या बांधल्या त्यांच्यावर कारवाई करा. परंतु एमएसआरडीसीने पोलीस बंदोबस्त मागूनही त्यांना पोलीस बंदोबस्त देण्यात आलेला नाही. हा पोलीस बंदोबस्त म्हाडाचे उपाध्यक्ष, म्हाडाचे एम.डी, चीफ इंजिनिअर यांनी लेखी पत्र पाठवून आणि दूरध्वनीवर वारंवार विनंती करुनही त्यांना पोलीस बंदोबस्त दिलेला नाही. तेव्हा ही अतिक्रमणे करण्यामध्ये पोलीस विभागातील अधिकाऱ्यांचा हात आहे किंवा कसे अशी संशय घेण्यास जागा आहे. तसेच या पत्राच्या शेवटच्या परिच्छेदाबद्दल आपण मला सांगावे.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, आपल्याकडे एमएसआरडीसीकडून आलेले निवेदन आहे. माझ्याकडे जे निवेदन आहे ते नगरविकास विभागाचे आहे. तेव्हा मी नगर विकास विभागाच्या वतीने बोलत आहे. एमएसआरडीसीच्या वतीने मी बोलू शकत नाही. आपली परवानगी असेल तर मी हे निवेदन वाचून दाखवितो

वांद्रे पश्चिम येथील सी-लिंक जवळील म्हाडा भूखंडावर झालेल्या अनधिकृत झोपड्यांबाबत दिलेल्या निदेशानुसार

वरील संदर्भीत भूखंड हा म्हाडाच्या मालकीचा असून एमएसआरडीसी या महामंडळास लीजवर सी-लिंक पुलाच्या बांधकामाच्या वापराकरिता देण्यात आला असून तो त्यांच्या ताब्यात आहे. दिनांक 20.12.2012 रोजी "मुंबई मिरर" या वर्तमानपत्रामध्ये या भूखंडावर अंदाजे 400 कच्च्या झोपड्या ( बांबू व ताकोलीन म्हणजे ताडपत्री ) अनधिकृतपणे झालेल्या आहेत अशी बातमी प्रसिध्द झाली आहे. सहाय्यक आयुक्त/एच पश्चिम विभाग यांनी पाहणी केली असता अंदाजे 200 ते 250 झ ोपड्या असल्याचे आढळून आले. तद्नंतर महापालिकेच्या एच पश्चिम विभाग कार्यालयाने ही बाब एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून निष्कासित करण्याची विनंती केली. तेव्हा एमएसआरडीसीचे कार्यकारी अभियंता यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वांदे पोलीस ठाणे् यांना पत्र देऊन पोलीस बंदोबस्त व महानगरपालिकेची यंत्रसामुग्री व मनुष्यबळ यांच्या मदतीने आज रोजी निष्कासित करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : मंत्रीमहोदयांनी रीतसर कारवाई केली असे सांगितले आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, त्यांनी रीतसर कारवाई करतो असे सांगितले आहे परंतु ते मला ऐकू आले नाही.

**उप सभापती** : त्यांनी तसे सांगितले आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: हरकतीच्या मुद्यासंबंधी**

श्री. राम पडांगळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मघाशी माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब बोलत असतांना सन्माननीय मंत्री श्री. भास्कर जाधव सभागृहामध्ये आले व त्यावेळी त्यांनी काही रिमार्क पास केले की, "हे खोटारडे आहेत आणि मिनिट्स बदलतात" जर मिनिट्स बदलत असतील तर ती गंभीर बाब आहे. मिनिट्स बदलतात असे आपण बोललात ना?

श्री. दिवाकर रावते : रेकॉर्ड काढा, काही तरी बोलू नका...

श्री. राम पडांगळे : मिनिट्स बदलतात ना?

श्री. दिवाकर रावते : काढा रेकॉर्ड, काढा रेकॉर्ड...

**उप सभापती** : जाऊ द्या पुढील विषय घ्या.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या विधिमंडळाच्या रेकॉर्डवर बोलावयाची पाळी आली आहे आता. हे विधिमंडळ सुध्दा गहाण पडले आहे. मी माझा आक्षेप या ठिकाणी नमूद करतो. तुम्हाला माहीत आहे का, काय घडत आहे ते? त्यांनाही मान्य नाही ते. अहो, आपण सर्व जण संपणार आहोत. हे विधिमंडळ, येथील सचिवांपासून सगळे सरकारला गहाण पडले आहेत. कशाला तुम्ही बोलता? भविष्यात इथे बसायला नको. तुम्हाला माहीत नसेल तर थांबा जरा. चर्चा करावयाची असेल तर मी 8 वाजेपर्यन्त बसायला तयार आहे. तुम्ही ऐकणार असाल तर तुम्हाला घाम फुटेल. भविष्यात काय घडणार आहे ते. मी जर आपल्याला खोटारडे म्हटले असेल ना...

श्री. भास्कर जाधव : तो मुद्दा नाही. सन्माननीय सभापती महोदय, आदरणीय श्री. रावते साहेबांचा आपण सर्व जण आदर करतो. त्यांचा अभ्यास, त्यांचे सभागृहातील योगदान, त्यांची बिलासंदर्भातील, कायद्यासंदर्भातील तळमळ याबद्दल कुणाच्याही मनामध्ये यत्किंचितही शंका नाही. आता ते जे काही दोन शब्द बोलले ते सात्विक संतापापोटी बोलले. ती टीका आहे असे मी कधीच मानणार नाही, ते सात्विक संतापापोटी बोलले. परंतु माझी त्यांना व सभापती महोदय, आपणास एवढी विनंती आहे की, जरी ते सात्विक संतापापोटी बोलले असले तरी आपण कुणीही त्याबद्दल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव....

आक्षेप घेतला नाही, त्याचा आपण आदरच करतो. परंतु विधिमंडळ गहाण पडले अशाप्रकारचे जे शब्द आहेत तेवढे कृपया आपण काढून टाकू या.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अशाप्रकारचे जे काही असत्य या सदनामध्ये घडत आहे ते विधिमंडळाच्या माध्यमातून....

**उप सभापती** : माननीय राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव यांनी आता जो काही उल्लेख केला तो उल्लेख सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात येईल. त्या ऐवजी आपण असत्य म्हणा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पुढील अधिवेशनामध्ये याच गोष्टीवर मी एक तासाची चर्चा लावणार आहे. मंत्र्यांची विधिमंडळामध्ये अगतिकता कशी निर्माण होते आणि आता या पुढे विरोधी पक्ष आणि सदस्यांची कशी कचरपट्टी होणार आहे, "कचरपट्टी" शब्द रेकॉर्डवर ठेवा. यावर मी पुढील अधिवेशनामध्ये एक तासाची चर्चा लावणार आहे. भविष्यामध्ये हे विधिमंडळ संपेल, अधिकाऱ्यांचे काय होणार आहे हा प्रश्न आहे, हे अधिकारी विधिमंडळाच्या सदस्यांचे आहेत, निवडून आलेल्या सर्व आमदारांचे आहेत. ते ना सत्तारुढ पक्षांचे आहेत ना विरोधी पक्षांचे आहेत. या सदनामध्ये असलेल्या प्रत्येक सदस्यांच्या माध्यमातून जे निर्माण होईल त्याला सुरक्षा देऊन मार्गदर्शन करण्याकरिता विधिमंडळ आहे. आणि आपण नि:पक्षपातीपणे सर्वांना न्याय द्यावा यासाठी आपले आसन आहे. ही गंमत नाही तर हे जे काही खाली घडले आहे ते चुकीचे घडले आहे रामभाऊ.....

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सन २००५ पासून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सुरु असलेले सत्र

**मु.शी.**: सन २००५ पासून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सुरु असलेले सत्र या विषयावर सर्वश्री. विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. दीपक सावंत, श्री. रामनाथ मोते, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.चंद्रकांत पाटील, ॲड. अनिल परब, सर्वश्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, विनायक राऊत, डॉ.रणजित पाटील, श्री. सुमंत गायकवाड, ॲड. आशिष शेलार, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे चालू...)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी मॉन्सेंटो कंपनीच्या संदर्भात उल्लेख करु इच्छितो. या संदर्भात माननीय कृषी मंत्र्यांना माहिती आहे.आपल्याकडे कापसाचे जातिवंत बियाणे होते, त्यामध्ये नांदेड-44 हे बियाणे असेल, पंजाबराव कृषी विद्यापीठाचे बियाणे असेल. सभापती महोदय, आपण जर पंजाबराव कृषी विद्यापीठामध्ये गेला असाल तर त्या ठिकाणी प्रायोगिक तत्वावरील साडे तीनशे बियाण्यांच्या जाती आहेत. त्या विद्यापीठामध्ये आता वृक्षावर संशोधन सुरु आहे ते सर्वात महत्वाचे आहे. एका वृक्षावर कापसाची बोंडे येतात त्या वृक्षावर साडे तीनशे ते साडे चारशे प्रयोग झाले आहेत. ज्या दिवशी त्या प्रयोगाला यश येईल त्या दिवशी हा कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न मिटेल. एकदा लावलेले झाड हे संत्र्यासारखे उगवेल आणि त्याच्यावर किमान दहा वर्षे तरी कापसाचे उत्पादन मिळेल. अशाप्रकारचा एक अभिनव प्रयोग पंजाबराव कृषी विद्यापीठामध्ये सुरु आहे.

बीटी कॉटन व्यतिरिक्त वेगवेगळया साडे तिनशे कापसाच्या जातींवर त्या ठिकाणी प्रयोग सुरु आहेत हे आपण पाहिले असेल. त्या संशोधकांच्या दृष्टीने ही बाब कौतुकास्पद आहे. त्यामध्ये यश येऊन बीटी कॉटनपासून सर्व शेतकऱ्यांची सुटका झाली पाहिजे. योग्य वाणामधून कमी खर्चामध्ये कायम स्वरुपी कसदार कापूस पिकविणारी जात हे विद्यापीठ केव्हा निर्माण करील याची अपेक्षा आम्ही करीत आहोत. त्या संदर्भात मी सतत संबंधितांबरोबर चर्चा करीत असतो, बोलत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

असतो. त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम करीत असतो, माहिती घेण्याचे काम करीत असतो, ज्ञान घेण्याचे काम करीत असतो. आपल्याला शेतकरी जगवावयाचा असेल तर बीटी कॉटन हे बियाणे बाजूला ठेवून कसदार असे भारतीय बियाणे निर्माण केले पाहिजे. शेतकऱ्याला कायम स्वरुपी एकरी पीक सतत मिळत राहिले पाहिजे. ते पीक 15 किलो नको, 25 किलो नको परंतु सातत्याने कमी खर्चामध्ये, कमी खतामध्ये चांगले पीक मिळत राहिले तर हा शेतकरी भविष्यात चांगल्याप्रकारे टिकू शकेल. अन्यथा ही गंभीर परिस्थिती कायम निर्माण होत राहील, तिला कसे तोंड द्यावे हा प्रश्न पडेल.

सभापती महोदय, स्वामिनाथन समितीचा विषय हा नेहमीचा चर्चेचा होत राहिला आहे. तो सभागृहाचा आहे अशातला भाग नाही, तो तज्ज्ञांचा आहे, प्राध्यापकांचा आहे, अनेक संशोधकांचा आहे. पंरतु स्वामिनाथन समितीने जे मान्य केले व सांगितले आहे ते तंतोतंत अंमलात आणणे हे सरकारला कितपत पटणार आहे हा देखील एक चर्चेचा, चिंतनाचा विषय होऊ शकतो. प्रत्येक भागातील अर्थव्यवस्था ही वेगवेगळी असते. विदर्भातील अर्थव्यवस्था वेगळी आहे, मराठवाडयामध्ये वेगळी आहे, खानदेशामध्ये ती वेगळी आहे. आपले बी-बियाणे कोणकोणत्या माध्यमातून व कशा पध्दतीने वेगवेगळया विभागात पोहोचविले जाते, कोणत्या वॅगन किती व कशा लवकर पोहोचतात, त्यामधून उत्पादन खर्चामध्ये विभिन्नता निर्माण होते. म्हणून कृषी खात्याचे हे माध्यम सर्वत्र समान कसे निर्माण करता येईल. वेगवेगळया भागातील वेगवेगळी सबसिडी एकत्र आणून ती एकाच पध्दतीने देता येईल काय, असे विविध विषय त्यामध्ये आहेत. आता मजुरांचा प्रश्न सुध्दा वेगवेगळया भागामध्ये वेगवेगळया पध्दतीने निर्माण झाला आहे.

मघाशी मी कृषी तणाबद्दल सांगत होतो. शेतातील तण काढण्याकरिता महिलांना मजुरी दिली जात होती. मोठया प्रमाणावर महिला मजूर मिळत होते . आता अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, बेकारी मोठया प्रमाणावर निर्माण झाली असल्यामुळे पुरुष देखील तण काढावयास जायला लागले आहेत. मला त्यामध्ये सुध्दा आनंद होत होता, मी ते माझ्या डोळयांनी पहात होतो. पुरुषांना तण काढण्याची मजुरी मिळत असल्यामुळे त्याला चार पैसे घरी घेऊन जाता येतात. त्यावर उपाय म्हणून कोणत्या तरी कंपनीने तणनाशक औषध निर्माण केले. त्या शेतामध्ये तणनाशक औषधांची फवारणी केली की, ते तन निघून जातात. या संदर्भात त्या विद्यापीठाच्या सर्व संबंधित

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

प्राध्यापकांना भेटून मी एक विनंती केली की, हे विष आहे. ते जमिनीमध्ये जात आहे, तण नष्ट करीत आहे. हे विष सतत आणि सातत्याने जमिनीमध्ये मुरत राहिले तर या जमिनीचा कस राहिल काय? यावर आपण संशोधन करा. ते जर अत्यंत घातक

असेल तर मजुरी गेलेली परवडली परंतु शेत गेलेले परवडणार नाही. या बाबत संशोधन करण्याकरिता मी स्वत: संशोधकांना भेटलो. सभापती महोदय, या संदर्भात रासायनिक खते वापरण्याच्या संदर्भात मार्गदर्शन करणारी यंत्रणा आपल्याकडे आहे काय?

कृषी संदर्भात आपली असलेली यंत्रणा ही पावसाच्या प्रमाणामध्ये बी-बियाणे कसे वापरावे या करिता मार्गदर्शन करते. परंतु संपूर्ण शेत उद्ध्वस्त करणारे हे रासायनिक विष संपूर्ण मराठवाडयामध्ये आणि विदर्भामध्ये वापरले जात आहे, त्या संदर्भात या सभागृहात चर्चा झाली. दरवर्षी मराठवाडयामध्ये 20 कोटी आणि विदर्भामध्ये 80 कोटी असे जवळ जवळ दोनशे ते सव्वा दोनशे कोटी रुपयांचे तण नाशक रोखीमध्ये विकत घेतले जाते. म्हणजे केवढा मोठा व्यवहार असेल या बाबत आपण विचार करा. हे रासायनिक औषध कोठून येते? आंध्र प्रदेशमधून, पंजाबमधून, हरियाणामधून येते. ते योग्य आहे की अयोग्य आहे याची चाचणी करणारी यंत्रणा सक्षम नसल्यामुळे ही औषधे खरेदी केल्यानंतर रोग नाहीसा होत नाही म्हणून त्याचा वारंवार वापर केला जातो. त्यामुळे शेतीचा उत्पादन खर्च वाढत आहे. योग्य औषध योग्य किंमतीमध्ये मिळाले तर खर्च कमी होईल. चार चार वेळा फवारणी करण्यापेक्षा एक वेळ फवारणी केली तर ती उपयोगी पडेल. योग्य भावात औषध मिळाले तर शेतकऱ्याची उत्पादनाची किंमत कमी होईल. या संदर्भात आपण एक यंत्रणा उभी केली तर शेतकऱ्यांवर फार मोठे उपकार होतील. आपल्या ऊसाच्या खोडव्यापासून ते ऊसाच्या मुळात आलेल्या किडीपर्यंत मोठया प्रमाणावर रासायनिक औषध वापरले जाते त्यावर योग्य ते नियंत्रण आणले गेले पाहिजे.

बियाण्यांच्या बाबतीत आपण बाजारामध्ये जसे नियंत्रण आणले आहे त्याबाबत मी आपले अभिनंदन केले होते व आजही करतो. अयोग्य बियाणे आल्यानंतर त्या बियाण्यांवर बंदी घालण्याचे काम आपण केले आहे. इतर कंपन्यांना धाक मिळण्यासाठी आपण दोन-चार कंपन्यांवर कारवाई केली असेल. बियाण्यांमुळे कमी उत्पादन आले तर त्या कंपनीला जाब विचारणारी यंत्रणा आपण केली आहे. त्या यंत्रणेचा कितपत उपयोग झाला हे मला माहीत नाही परंतु धाक निर्माण करणे ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

एक महत्वाची प्रक्रिया असते. कृषी मंत्री म्हणून आपण या राज्यामध्ये प्रथमत: हा धाक निर्माण केला आहे. पूर्वीच्या कोणत्याही कृषी मंत्र्यांनी हा धाक दाखविला नव्हता असा माझा दावा आहे. ज्याप्रमाणे बियाण्यांच्या संदर्भात आपण यंत्रणा निर्माण केली त्याप्रमाणे या रासायनिक फवारणीच्या बाबतीत निर्माण केली पाहिजे. ही यंत्रणा निर्माण करुन दाखविली तर ते फार महत्वाचे काम होईल. त्यामधून उत्पादनावरील खर्च कमी होण्यासाठी फार मदत होईल. आपण मागे एकदा घोषणा केली होती. मोठया प्रमाणावर काळाबाजार होत असल्यामुळे आपण बाहेर फिरला होता, मी देखील फिरलो होतो. त्यावेळी नांदेड, बीड व विदर्भामध्ये गेलो होतो. मोठया प्रमाणावर होत असलेला काळाबाजार रोखण्याचे काम आपण केले.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

सभापती महोदय, आपल्याकडे 50 लाख टन साठा खरिपाच्या आणि रब्बीच्या अगोदर जमा झालेला असतो. त्यामुळे काळा बाजार होत नाही. पण आपण असे सांगितले होते की, आता आम्ही शेतकऱ्यांना सबसिडी देणे बंद करुन आता ती शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये जमा करु. याबाबत काय झाले हे मला माहिती नाही. पण ही सबसिडी बंद करुन आता त्यांनी असेल त्या भावामध्ये खत घ्यावे आणि मग शासनाने शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये सबसिडी जमा करण्याचे ठरविले होते. त्या संदर्भात शासनाने काय निर्णय घेतलेला आहे हे आम्हाला समजलेले नाही.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांनी ॲडव्हान्स बुकींगचा मुद्दा मांडला होता, तो मुद्दा फार महत्वाचा आहे असे मला वाटते. हे तुमचे धोरण आहे. बियाण्यांसाठी ॲडव्हान्स घेऊन जर बियाण्यांची कमतरता निर्माण केली जात असेल तर त्या कंपन्यांना महाराष्ट्रामध्ये बियाणे विकण्यास पूर्ण बंदी करण्यात येईल अशा प्रकारचे धोरण शासनाने मागच्या वेळी मांडले होते. पण ते कोणी ऐकत नाही. बिचारा शेतकरी पुढच्या बियाण्याच्या काळजी मुळे भराभरा ॲडव्हान्स बुकींग करतो. माझ्या माहितीप्रमाणे बुलढाणा येथे बियाण्यासाठी 300 कोटी रुपयांचे ॲडव्हान्स बुकींग झाले आहे. कारण शेतकऱ्यांना चिंता वाटते की, मला बियाणे मिळाले नाही तर काय होईल. परंतु प्रत्यक्षात पाहिजे त्या प्रमाणात बियाणांचा पुरवठा होत नाही अशी परिस्थिती आहे. याबाबतीत अशा एकंदर किती कंपन्या आपल्या निदर्शनास आल्या आणि त्याबाबत आपण कोणता बंदोबस्त केला, त्यावर काय उपाययोजना केली आहे हा प्रश्न आहे. कारण हा प्रश्न शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळ्याचा आणि त्यांचे भवितव्य घडविणारा विषय आहे. जर ॲडव्हान्स दिल्यानंतरही शेतकऱ्यांना बियाणे मिळणार नसेल तर त्यांची परिस्थिती काय होत असेल याचा विचार केला पाहिजे. कारण तो शेतकरी एक वर्ष अगोदर कर्ज घेऊन बियाणे खरेदी करीत असतो.

सभापती महोय, आमच्या मराठवाड्यातील सर्व जिल्हा बँका जवळजवळ अवसायनात आहेत. त्यामुळे या बँका शेतकऱ्यांना कर्ज देत नाहीत. आता याठिकाणी माननीय सहकार मंत्री उपस्थित नाहीत. ते असे सांगतील की, आम्ही याबाबत राष्ट्रीयकृत बँकांना सांगितले आहे.पण प्रत्यक्षात शेतकऱ्यांना राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्ज मिळण्याच्या बाबतीत प्रचंड अडचणी आहेत, ते एवढे सोपे नाही. पण जिल्हा बँक शेतकऱ्यांच्या माध्यमातून निवडून आलेल्या संचालकांच्या असतात. त्यामुळे त्यांना शेतकऱ्यांच्या अडचणींची जाणीव असते आणि मग थोडेसे इकडे-तिकडे करुन ते शेतकऱ्यांना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

कर्ज देत असतात.पण दुर्दैवाने या सर्व बँका अवसायनात आल्यामुळे शेतकऱ्यांना कर्ज मिळण्याबाबत अडचणी निर्माण झाल्या आहेत. तसेच त्यांना राष्ट्रीयकृत बँका कर्ज देत नसल्यामुळे शेतकऱ्यांना आज नाईलाजाने सावकाराकडे जावे लागते. या राज्यामध्ये सावकारी बंदी कायद्याची एवढी विटंबना होईल असे वाटले नव्हते. सावकारांच्या बाबतीत 2000 सालापासून दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्य सतत आणि सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. तसेच आज शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रचंड प्रमाणात वाढत आहेत आणि हा आकडा भीषण आहे आणि त्याबाबत येथे माहिती द्यावी असे मला वाटते.

सभापती महोदय, माझ्याकडे श्री.किशोर तिवारी यांचे पत्रक आहे. त्यानुसार अमरावती 1226, अकोला 1096, बुलढाणा 1187, वाशिम 936, यवतमाळ 1988, चंद्रपूर 256, गडचिरोली 144, गोंदिया 140, भंडारा 216, नागपूर 260, वर्धा 555 अशा मिळून संपूर्ण दहा जिल्ह्यामध्ये 2004 ते 2010 पर्यंत एकंदर 8004 आत्महत्या झाल्या आहेत. त्यातून सावकारी विधेयकाचा विषय निर्माण झाला आहे. परंतु सावकारी विधेयक आणले जात नाही, त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी सुटत नाहीत आणि त्यातून तो शेतकरी बाहेर येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची उद्ध्वस्तता वाढत चालली आहे. तसेच सावकाराची जमीन आणि ती शेतकरी कसत आहे अशी स्थिती आहे. त्यामुळे जे धान्य येईल ते सावकार विकत आहे. पण शेतकऱ्याला मात्र त्यातून थोडेसेच मिळत आहे. शेतकऱ्याची स्वत:ची जमीन असून ती गहाण ठेवलेली आहे, अशी परिस्थिती असताना जर सावकारी विधेयक आणले तर शेतकऱ्याच्या जमिनी सुटू शकतील हा महत्वाचा मुद्दा आहे.म्हणून याबाबतीत सदनामध्ये खुलासा होणे आवश्यक आहे. मला कल्पना आहे की, हा माननीय कृषी मंत्र्यांचा विषय नाही. माननीय सहकार मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांचा हा विषय आहे.पण सावकारी विधेयकाबद्दल आमच्यासमोर स्पष्टपणे काही येत नाही आणि जर याबाबत विधानसभेमध्ये घोषणा झाली असेल तर त्याबाबत आम्हालाही कळणे महत्वाचे आहे.

सभापती महोदय, मी या माध्यमातून विनंती करतो की, सावकारी विधेयक आल्यानंतर सुध्दा जेव्हा बँका कमी पडतात तेव्हा शेतकऱ्यांना सावकाराची गरज लागते. म्हणून खाजगी अधिकृत सावकारांना जे लायसन्स दिले जाते, तशा प्रकारे जर मोठ्या प्रमाणात लायसन्स दिले गेले तर अयोग्य पध्दतीने जी सावकारी सुरु आहे, शेतकऱ्यांची लुबाडणूक करणारी जी सावकारी सुरु आहे, उद्ध्वस्त करणारी जी सावकारी सुरु आहे, शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त

करणारी जी सावकारी सुरु आहे ती थांबेल आणि अधिकृत लायसन्स असलेला सावकार असेल तर त्याच्यावर वेगळ्या प्रकारचे नियंत्रण येईल. अशा वेळी त्याला शेतकऱ्याची जमीन गहाण ठेवता येईल पण ती अधिकृतरित्या ताब्यात घेता येणार नाही.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना खाजगी सावकाराची गरज लागतेच. त्या शिवाय काही जमत नाही. याबाबत शासनाचे काय धोरण आहे हे मला समजणे आवश्यक आहे. अधिकृत सावकारी त्याच वेळी बंद होईल जेव्हा आपली अर्थव्यवस्था पहाणाऱ्या विविध बँका किंवा संस्था तशी परिस्थिती योग्य प्रकारे निर्माण करतील आणि तसे होईल अशी मी आपल्याकडून अपेक्षा करतो. शेवटी शेती म्हणजे सिंचन परंतु याच्या खोलामध्ये मी जाणार नाही. म्हणून सिंचनाच्या बाबतीत आमच्याकडे आलेल्या श्वेतपत्रिकेमध्ये 5.13 असे म्हटले आहे. पण माननीय मंत्री महोदय आपण परवा जाहीर केल्याप्रमाणे आर्थिक अहवालामध्ये ते 0.1 इतकेच आहे आणि याबद्दल आपण मार्गदर्शन केले तर बरे होईल. धन्यवाद.

-----

. . . . 4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, याठिकाणी आम्ही नियम 259 अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी संगितले ते खरे आहे की, या सदनामध्ये गेली 5 वर्षे अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सदरहू प्रस्ताव चर्चेसाठी मांडण्यात येतो. विदर्भातील कापूस पिकविणारा शेतकरी, सोयाबीन, धान पिकविणारा शेतकरी यांच्या बाबतीत आम्ही दरवर्षी सदनामध्ये चर्चा करतो. आजच्या प्रस्तावामध्ये आम्ही चार-पाच गोष्टींचा उल्लेख केलेला आहे. पहिली बाब म्हणजे या राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. दुसरे म्हणजे मागच्या वर्षी 23 डिसेंबर रोजी माननीय मुख्यमंत्र्यांनी 623 कोटी रुपयांचे जे पॅकेज घोषित केले, तो विषय देखील आहे. तसेच 10 हजार कोटी रुपयांचे मिशन सुरु करण्यात येईल अशी माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली. त्याचप्रमाणे आणेवारीची पध्दत आणि कृषी विद्यापीठाच्या बी.टी. बियाण्याच्या व्यतिरिक्त कृषी विभाग एकही जात विकसित करीत नाही यासंबंधातील विषय असेल तसेच स्वामीनाथन कमिटीच्या संबंधीचा विषय, विदर्भातील संत्र्यांच्या संबंधातील विषय आणि सावकारी विधेयक असे 5-6 विषय या चर्चेमध्ये समाविष्ट केले आहेत.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांच्या संबंधी मी रिपीटेशन करणार नाही. कारण आपण मला भाषणासाठी 10 मिनिटांचा वेळ दिलेला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंबंधी या सदनामध्ये 2005 पासून सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब असतील किंवा मी असेन, आम्ही सावकारांच्या संबंधात अनेक वेळा चर्चा केली आहे. त्यावेळी शेतकऱ्याच्या आत्महत्येचा प्रश्न इतका ऐरणीवर आला होता की, तेव्हा या देशाच्या माननीय पंतप्रधान यांना विदर्भाचा दौरा करावा लागला. माननीय पंतप्रधान 3 दिवस विदर्भामध्ये राहिले आणि त्यावेळी माननीय पंतप्रधान यांनी 3700 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. मात्र त्या पॅकेजचे पुढे काय झाले हे आम्ही अनेक वेळा सदनामध्ये नावासहित मांडलेले आहे.तसेच हे पॅकेज कोणी कसे लुटले आणि त्या पॅकेजचा सत्यानाश कसा झाला, ते शेतकऱ्यांपर्यंत कसे पोहोचू शकले नाही हे देखील आम्ही नावानिशी मांडले आहे. मी याबाबतीत पुन्हा उच्चार करुन सदनाचा वेळ घेणार नाही. पण शासनाने पॅकेज दिल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या काय तर थांबल्या नाहीत.

सभापती महोदय, आता सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब यांनी जी आकडेवारी दिली आहे, ती अधिकृत आहे.या विदभार्मध्ये 2004 पासून 2012 पर्यंत जवळपास 8 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या.मी या वर्षातील माहिती घेतली असता जानेवारी 2012 ते 17 डिसेंबर



श्री.पांडुरंग फुंडकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2012 पर्यंत 127 आत्महत्या झाल्या आहेत आणि मी याबाबतीत अधिकृत व्यक्तीकडून माहिती घेतली आहे. दर महिन्याला पश्चिम विदर्भामध्ये साधारणपणे ॲव्हरेज 10 आत्महत्या होत आहेत. शासन या आत्महत्या थांबविणार आहे की नाही ? हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, मागच्या वर्षी आत्महत्येचे कारण शोधत असताना दिसून आले की, विदर्भामध्ये दुष्काळ पडला, कापसाचे, सोयाबीनचे, धानाचे पीक गेले त्यामुळे शेतकरी उद्ध्वस्त झ ाला होता. त्यावेळी नैसर्गिक आपत्ती आली आणि त्याबाबत नागपूर येथील अधिवशेनामध्ये चर्चाही झ ाली होती. मागच्या वर्षी 23 डिसेंबर रोजी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी पॅकेज जाहीर केले होते. त्यात पहिले कलम असे होते होते की, कमाल 2 हेक्टर मर्यादेपर्यंत प्रति हेक्टर कापसाला 4000 रुपये, प्रति हेक्टर सोयाबीनला 2 हजार रुपये, प्रति हेक्टर धानाला 2 दोन हजार रुपये याप्रमाणे मदत दिली जाईल. मदतीचे प्रमाण किमान 500 रुपये राहील. तीनही पिकांची मिळून कमाल क्षेत्र मर्यादा प्रती खातेदार 2 हेक्टर पर्यंत ही मर्यादा राहील.

यानंतर श्री.बरवड .. . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या निवेदनामध्ये मुद्दा क्रमांक 3 मध्ये असे म्हटले होते की, "गत दहा वर्षातील उत्कृष्ट तीन वर्षाची सरासरी उत्पादकता प्रमाणभूत मानून प्रत्यक्ष पीक कापणी प्रयोगांमध्ये उत्पादकतेच्या आकडेवारीच्या आधारे 25 टक्के व त्याहून अधिक घट असणाऱ्या तालुक्यात सोयाबीन व धान पिकांना मदत देण्यात येईल." ही यामध्ये मेख मारलेली आहे. आम्ही मागच्या पॅकेजमध्ये सरसकट द्यावे अशी मागणी केली होती. मागच्या तीन वर्षाची तालुक्याची सरासरी काढून मदत न करता शेतकऱ्यांना सरसकट मदत करावी अशी आम्ही मागणी केली होती. पण तसे झाले नाही.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी चौथ्या मुद्यामध्ये असे म्हटले होते की, "जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समिती मार्फत महसूल विभागाकडून प्रत्यक्ष निधी वितरित होईल." तसेच "निधीचे वाटप शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर होईल" असेही त्यांनी म्हटले होते. त्यांनी पुढे असे म्हटले होते की, हे पॅकेज आम्ही ताबडतोब युध्द पातळीवर देऊ. आताच माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, सुरुवातीला 300 कोटी रुपये दिले. त्यानंतर मार्चच्या अधिवेशनामध्ये 1285 कोटी रुपये दिले. असे एकूण 1585 कोटी रुपयांचे वाटप मंजूर केले. अजूनही कापूस उत्पादक, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना त्या पॅकेजचे पैसे मिळालेले नाहीत. या ठरावामध्ये हा विषय घालत असताना अजूनही शेतकरी त्या पॅकेजच्या पैशासाठी तहसीलदार कार्यालयामध्ये चकरा मारत आहेत. पण शेतकऱ्यांना अजूनही पैसे मिळालेले नाहीत. मी माझ्या खामगाव तालुक्याचे उदाहरण सांगतो. शेतकऱ्यांचे दीड कोटी रुपये अजूनही त्या शेतकऱ्यांना मिळालेले नाहीत. शेतकरी सारखे फेऱ्या मारत आहेत. पण त्या शेतकऱ्यांना पॅकेजचे पैसे मिळत नाहीत.

सभापती महोदय, पॅकेज विदर्भाला आणि विदर्भातील शेतकऱ्यांना नवीन नाही. गेली सात वर्षे या विदर्भात जे मुख्यमंत्री येतात ते पॅकेज जाहीर करुन जातात. पण विदर्भातील शेतकऱ्यांना त्या पॅकेजचा कोणताही लाभ होत नाही, अशा प्रकारचा आमचा अनुभव आहे. त्यामुळे विदर्भाच्या शेतकऱ्यांचे गाऱ्हाणे घेऊन वारंवार या ठिकाणी मांडावे लागते. मला माननीय कृषी मंत्र्यांना विचारावयाचे आहे की, कोरडवाहू मिशनचे काय झाले ? माननीय मुख्यमंत्र्यांनी मागच्या अधिवेशनामध्ये घोषणा केली होती की, दहा हजार कोटी रुपयांचा नियतव्यय पाच वर्षात देण्यात येईल. त्यातील

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

एक वर्ष निघून गेले आहे. पाच वर्षामध्ये विदर्भातील कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी दहा हजार कोटी रुपयांचा नियतव्यय आम्ही खर्च करणार आहोत असे सांगितले. त्यासंबंधी त्यांनी एक मिशन जाहीर केले. त्यांनी असे म्हटले की, " या योजनेची सविस्तर आखणी व अंमलबजावणी करण्याकरिता कोरडवाहू शेती मिशनची स्थापना केली जाईल. या कार्यक्रमाची सविस्तर रुपरेषा ठरविण्याकरिता एका तांत्रिक समितीची स्थापना राज्य शासन करील. या समितीने पुढील तीन महिन्यात या विषयी अभ्यास करुन आपला सविस्तर अहवाल सादर करावयाचा आहे. या कार्यक्रमाची व्याप्ती बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये निधीची उपलब्धता लक्षात घेऊन ठरविण्यात येईल." ही जी तांत्रिक समिती शासन स्थापन करणार होते ती समिती स्थापन झाली का ? मागच्या वर्षी घोषणा केली पण माझी अशी माहिती आहे की, ही तांत्रिक समिती अजूनही स्थापन झालेली नाही. त्या तांत्रिक समितीला तीन महिन्यात अभ्यास करुन अहवाल देण्यास सांगितला होता त्याचे काय झाले याची माहिती अजूनही शेतकऱ्यांना मिळालेली नाही. या कोरडवाहू मिशनच्या संदर्भातील माहिती मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात आम्हाला द्यावी अशी आमची मागणी आहे.

सभापती महोदय, विदर्भातील शेतकऱ्यांसाठी आत्महत्या ही बाब नवीन राहिलेली नाही. विदर्भातील शेतकरी आत्महत्या करुन मरत आहेत. तरी सुध्दा शासन विदर्भातील कोरडवाहू शेतीच्या संदर्भात ठोस उपाययोजना करीत नाही. बीटी बियाणांसंबंधीचा विषय सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मांडला. हे बीटी बियाणे कोठून आले ? नांदेड-44 हे मराठवाडा कृषी विद्यापीठाचे बियाणे आले. पंजाबराव कृषी विद्यापीठाने 468 हे बियाणे काढले. पंजाबराव कृषी विद्यापीठाने पीकेव्ही-2 हे बियाणे काढले. हे बियाणे विदर्भातील शेतकऱ्यांना खूप लाभदायक होते आणि या बियाणांवर जर अधिक संशोधन झाले असते, या बियाणांची अधिक उत्पादकता वाढविली असती तर आपलेच बियाणे आपल्याच शेतकऱ्यांच्या उपयोगात आले असते. पण आता आम्हाला 468 हे बियाणे दिसत नाही तसेच पीकेव्ही-2 हे बियाणे दिसत नाही.

सभापती महोदय, अमेरिकेची जी मॅन्सेंटो कंपनी आहे त्या कंपनीचे बीटी बियाणे विदर्भात आले. त्याचे काय काय परिणाम होणार आहेत या बाबत सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सविस्तरपणे सांगितले. त्याचा जेनेटिक कोणत्या स्तरापर्यंत जाणार आहे हे त्यांनी सांगितले.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

पहिल्या वर्षी पीक बरे येते. दुसऱ्या वर्षी थोडेसे बरे पीक येते आणि तिसऱ्या वर्षीपासून या बीटी बियाणाचे उत्पादन कमीकमी होत जाते असा विदर्भातील शेतकऱ्यांचा अनुभव आहे. त्यामुळे मॅन्सेंटो कंपनीच्या मागे लागण्यापेक्षा आपली जी कृषी विद्यापीठे आहेत ती अधिक सक्षम कशी करता येतील, त्यांचा संशोधनाचा भाग अधिक सक्षम कसा करता येईल आणि त्यातून आधुनिक बियाणे कशी तयार करता येतील यावर भर देण्याची गरज आहे. तो विषय मी पुन्हा एकदा आपल्या कानावर घालतो. मागच्या वेळी आपण जाहीर केले की, बुलढाणा जिल्ह्यात बीटी बियाणाचे बुकींग होणार नाही. मी माननीय कृषी मंत्र्यांना अधिकृतपणे सांगू इच्छितो की, या वर्षीच्या हंगामामध्ये एकट्या बुलढाणा जिल्ह्यामध्ये 300 कोटी रुपयांच्या बीटी बियाणाचे बुकींग झाले. आपण घोषणा केली पण त्याची अंमलबजावणी झाली नाही. त्याच्यावर नियंत्रण राहिले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना दुकानदारांकडे बुकींग करावे लागले आणि दुकानदारांनी कंपन्यांकडे बुकींग केले. अशा प्रकारे 300 कोटी रुपयांचा व्यवहार झाला. आता पाऊस कमी पडला आणि कमी पावसामुळे शेतकऱ्यांचे पीक गेले, करपले. दुबार पेरणी झाली.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण थोडक्यात संपवावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आमच्या विदर्भाचा हा प्रस्ताव आहे. आपण अशी घाई करणार असाल तर मी खाली बसतो. आम्ही कशाला या ठिकाणी बोलावयाचे ?

**उप सभापती** : आपण किती बोलता ? आपल्याला त्याचा त्रास होईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : मला काहीही त्रास होत नाही. आपण म्हणत असाल तर मी खाली बसतो.

**उप सभापती** : मला आपली काळजी वाटते.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी फास्ट बोलत आहे. मी सविस्तर बोलत नाही. मी आधीच सांगितले की, मी रिपिटेशन करणार नाही. मला सुध्दा विषय मांडता येतो. आपण जर वारंवार घंटी वाजवित असाल तर ते बरोबर नाही. मी खाली बसतो.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी कृपया आपले भाषण पुढे सुरु करावे. मी घंटी बाजूला काढून ठेवलेली आहे त्यामुळे आपण कृपया आपले भाषण करावे.

...4...

असुधारित प्रत / प्राथमिक नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी पाच मिनिटांमध्ये माझे भाषण पूर्ण करणार होतो. मला पाच मिनिटांपेक्षा जास्त वेळ नको होता. सभापती महोदय, या बीटी बियाणामुळे शेती उद्ध्वस्त होत चालली आहे. याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. ज्याप्रमाणे कर्नाटक राज्याने शेतीच्या संदर्भात स्वतंत्र बजेट मांडले तशा पध्दतीने विदर्भातील शेतकऱ्यांच्या संदर्भात ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. हा विषय मला या ठिकाणी मांडावयाचा होता.

सभापती महोदय, आमच्या प्रस्तावामध्ये स्वामीनाथन कमिटीच्या रिपोर्टचा उल्लेख आहे. आपल्या शासनाने स्वामीनाथन कमिटीच्या शिफारशींवर किती अंमलबजावणी केली ? एक महत्वाचा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मांडला आणि मलाही तो मुद्दा मांडावयाचा आहे. उत्पादन खर्चावर आधारित भावाची शिफारस स्वामीनाथम कमिटीने केली होती. स्वामीनाथन कमिटीने शिफारस केल्याप्रमाणे शेतकऱ्यांच्या पदरामध्ये खरोखरच उत्पादन खर्चावर आधारित भाव पडतो काय याचा विचार माननीय कृषी मंत्र्यांनी करावा. मागच्या अधिवेशनामध्ये माजी सदस्य श्री. पाशा पटेल आणि मी या विषयावर आपल्याशी चर्चा केली होती. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च आता किती वाढत चालला आहे हा विषय सभागृहात मांडला.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे तणनाशक औषध आणून तण काढण्यासाठी लागणाऱ्या बैलाची मजुरी वाचविण्याचा प्रयत्न शेतकरी एकदा करील. तण काढण्यासाठी लागणाऱ्या मजुराची मजुरी वाचविण्याचा प्रयत्न करील पण शेतीतील तण काढण्यासाठी त्याला महागडे कीटकनाशक औषध शेतीमध्ये फवारावे लागेल आणि त्यानंतर शेतीतील तण नष्ट होईल. कापूस वेचण्यासाठीचा खर्च फार वाढत आहे. आता एक क्विंटल कापूस वेचण्यासाठी 500 ते 800 रुपये खर्च येतो. कापसाला प्रती क्विंटल 3900 रुपये भाव मिळतो. एक क्विंटल कापूस वेचण्यासाठी जर 500 ते 800 रुपये लागतात आणि एक लिटर तणनाशक औषधाची किंमत अडीच हजार रुपये आहे. शेतकऱ्याला कपाशीवर एकरी 14 वेळा फवारणी करावी लागते. एका फवारणीचा खर्च अडीच हजार रुपये येतो. कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्याला जर अशा प्रकारे खर्च येत असेल तर आपण जो 3900 रुपये हमी भाव जाहीर केला त्यामुळे शेतकरी कर्जातच जाणार आहे. त्याला शेती न परवडण्यासारखी होणार आहे.

एकीकडे शेतकऱ्याचा उत्पादन खर्च वाढत आहे आणि उत्पादन कमी होत आहे, खर्च जास्त आणि उत्पादन कमी अशी परिस्थिती आहे. अशा परिस्थितीत जर शेतकऱ्याला उत्पादन खर्चावर

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

आधारित भाव न मिळाल्यामुळे शेतीचा व्यवसाय हा आतबट्टयाचा होत चाललेला आहे. त्यामुळे या विदर्भातील शेतकरी कर्जबाजारी होत आहे. सावकाराचे कर्ज असेल किंवा सहकारी बँकेचे कर्ज असेल, शेतकरी जर कर्जबाजारी झाला, जर त्याचे कर्ज फिटले नाही तर त्याला आत्महत्या करावी लागते. अशा प्रकारे विदर्भातील शेतकरी दुष्टचक्रामध्ये सापडलेला आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 16:40

श्री. पांडुरंग फुंडकर....

याबाबतीत हे शासन कोणती उपाययोजना करणार आहे ? आता सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की, मराठवाडयातील बँका अवसायनात निघालेल्या आहेत. त्याच प्रमाणे विदर्भातील बँका अवसायनात निघालेल्या आहेत. माझ्या बुलढाणा जिल्हयातील बँक अवसायनात निघालेली आहे. नागपूर जिल्ह्यातील बँक अवसायनात निघालेली आहे. या वर्षी बुलढाणा जिल्हा सहकारी बँक शेतक-यांना कर्ज पुरवठा करु शकली नाही.

सभापती महोदय, माननीय सहकार मंत्री महोदयांनी सांगितले की, राष्ट्रीयकृत बँका शेतक-यांना कर्ज पुरवठा करतील. आम्ही राष्ट्रीयकृत बँकेकडे गेलो, राष्ट्रीयकृत बँकेने देखील शेतक-याला कर्जपुरवठा केला नाही. शेवटी शेतक-याला सावकाराच्या दारी जावे लागले. आमच्याकडे सावकारी पध्दत आहे. मी तर महाराष्ट्रातील एका बड्या सावकाराच्या गावामध्ये रहात आहे. हा महाराष्ट्रातील एक नंबरचा सावकार आहे. हा सावकार शेतक-यांची शेती कागदोपत्री लिहून घेतो. शेती खरेदी करुन घेतल्यानंतर शेतक-याला पैसे दिले जातात. सावकाराला माहीत असते की, पुढच्या वर्षी पैसे मिळू शकत नाहीत. मग शेती सावकाराच्या मालकीची होते. अशा त-हेने शेतकरी भूमिहीन होत चालला आहे. शेती परत घेता येत नाही म्हणून शेतकरी आत्महत्या करतो, कर्ज फेडता येत नाही म्हणून शेतकरी आत्महत्या करतो.

सभापती महोदय, शेतक-याला या वर्षी दुबार पेरणी करता आली नाही. माझ्या जिल्हयामध्ये 5 शेतक-यांनी त्यांना दुबार पेरणी करता आली नाही म्हणून आत्महत्या केली. शेत पडीक राहिले. अशा त-हेने राज्यातील शेतक-याची अवस्था झालेली आहे. या बाबतीत शासन ठोस उपाययोजना करीत नाही, इतकेच काय आत्महत्या केलेल्या शेतक-याचे अनुदान देखील शासन देत नाही. आत्महत्या केलेल्या शेतक-याच्या नातेवाईकाला 1 लाख रु. अनुदान देण्याचे शासनाने जाहीर केलेले आहे. अर्ध्या केसेस जिल्हाधिकारी कार्यालयामध्येच गाळल्या जातात. दारुमुळे आत्महत्या केली, व्यसनामुळे आत्महत्या केली असे सांगून अनुदान नाकारले जाते. हा प्रस्ताव आणण्याचा आमचा मूळ उद्देश हा आहे की राज्यामध्ये जी कोरडवाहू शेती आहे, सोयाबीन, कापूस, धान या पिकाचे जे उत्पादन होते त्याबाबत ठोस उपाययोजना करुन हा शेतकरी जगेल असे निश्चित धोरण आखले पाहिजे. या बाबतीत केन्द्र सरकारशी बोलण्याची आवश्यकता आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, विदर्भातील शेतक-याच्या मालाचा भाव का कमी होतो ? विदर्भ हा कापूस पिकविणारा प्रदेश आहे. जेव्हा विदर्भातील शेतक-याच्या घरामध्ये कापूस येतो त्यावेळी निर्यात बंदी होते. जेव्हा शेतक-याच्या घरात कांदा येतो त्यावेळी निर्यात बंदी होते. जेव्हा शेतक-याच्या घरात धान येते त्यावेळी निर्यात बंदी होते. विदर्भामध्ये जे जे पिकते ते पीक जेव्हा शेतक-याच्या घरात येते त्यावेळी त्याला निर्यात करण्याची परवानगी मिळत नाही. त्यामुळे कापसाचे, धानाचे, सोयाबीनचे भाव पडतात. 5 हजार रुपये क्विंटलला विकले जाणारे सोयाबीन आज 2000 ते 2200 रुपयास विकावे लागत आहे. कापसाची निर्यात झाली. महाराष्ट्रातील कापूस जेव्हा बांगला देशमध्ये निर्यात झाला, चीनमध्ये निर्यात झाला, पाकिस्तानमध्ये निर्यात झाला त्यावेळी विदर्भातील कापूस उत्पादक शेतक-याला प्रति क्विंटल 6 हजार रु. भाव मिळाला. परंतु निर्यात बंदी करुन महाराष्ट्रातील आणि विशेषत: विदर्भातील शेतक-याची कोंडी केली. निर्यातीच्या संदर्भात केन्द्र सरकारला सांगण्याची गरज आहे.

सभापती महोदय, मागच्या वेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी या सभागृहामध्ये असे सांगितले होते की मी दिल्लीत जाऊन पंतप्रधानांशी आणि कृषी मंत्र्यांशी बोलेन, कापसाची निर्यात बंदी उठविल्या शिवाय राहाणार नाही. परंतु या वर्षी पुन्हा ये रे माझ्या मागल्या प्रमाणे पुन्हा कापूस उत्पादक शेतक-याला त्याचा कापूस तीन ते साडेतीन हजार रुपयास विकावा लागत आहे. माननीय कृषी मंत्र्यांनी दोन महिन्यापूर्वी कबूल केले होते की महाराष्ट्रामध्ये आणि या विदर्भामध्ये सव्वाशे कापूस खरेदी केन्द्रे सुरु केली जातील. एक तरी खरेदी केन्द्र आता पर्यन्त सुरु झालेले आहे काय ? सरकारने शेतक-याचा 100 क्विंटल तरी कापूस खरेदी केलेला आहे काय ? एकही कापूस खरेदी केन्द्र सुरु झालेले नाही. शेतक-याला आपला कापूस खेडाखरेदीवाल्याला विकावा लागत आहे. अशा प्रकारे शेतक-याच्या कापसाचे मार्केटिंग उद्ध्वस्त झालेले आहे. या शेतक-याला कुणी वाली राहिला नाही. कापूस उत्पादक शेतक-याला शासनाने वा-यावर सोडलेले आहे.

सभापती महोदय, हे शासन कापूस पणन महासंघाला पोसत आहे. कापूस पणन महासंघ कोणतेही काम करीत नाही. ते सांगतात की आम्ही नाफेडला खरेदी करण्यास लावू. काही ठिकाणी ज्वारीची खरेदी करण्याचा देखावा शासनाने केला. खरेदी केन्द्रावर शेतक-यांना जे सांगितले गेले त्याची माननीय कृषी मंत्री महोदयांनी नोंद घ्यावी. खरेदी केन्द्रावर शेतक-याला सांगितले गेले की,

..3..



MSS/ पूर्वी श्री. बरवड 16:40

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

प्रत्येक शेतक-याची फक्त 6 क्विंटल ज्वारी खरेदी केली जाईल. माझ्या शेतात 50 क्विंटल ज्वारी झाली असेल तर त्यापैकी फक्त 6 क्विंटल ज्वारी खरेदी केली जाते. बाकीची ज्वारी मला व्यापा-याला विकावी लागते. विदर्भामध्ये पिकणा-या ज्वारी, कापूस, सोयाबीन, धान या पिकाच्या बाबतीत ठोस असे धोरण आखले पाहिजे. माननीय मंत्री महोदय हे जाणकार आहेत. त्यांचा शेतीचा खूप अभ्यास आहे. विदर्भातील, मराठवाड्यातील कापूस उत्पादक शेतकरी आज जगला पाहिजे यासाठी कापसासंबंधी केवळ वस्त्रोद्योग धोरण आणून चालणार नाही. तर जो शेतकरी शेतातून कापूस पिकवितो, त्या अन्नदात्या शेतक-यासाठी वेगळे धोरण आखले पाहिजे. आपले जे धोरण आहे ते सूतगिरण्यांसाठी, जिनिंग प्रेसिंगसाठी, लूमसाठी आहे. त्यांना आपण विविध सवलती देता. पण या वस्त्रोद्योग धोरणातून शेतक-याला काहीही मिळत नाही. म्हणून शेतामध्ये घाम गाळून, कष्ट करुन कापूस, ज्वारी, सोयाबीन, धान पिकविणा-या शेतक-यासाठी काही धोरण आखता येईल का याचा विचार शासनाने करावा यासाठी हा प्रस्ताव या ठिकाणी आणलेला आहे.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. शासनाने सावकारी बंदी विधेयक 2010मध्ये आणले. हा कायदा सरकारला खरोखरच करायचा आहे काय की आम्हाला दाखविण्यासाठी, आमची दिशाभूल करण्यासाठी हे विधेयक आणण्याचे नाटक केलेले आहे ? विधानसभा आणि विधानपरिषदेमध्ये या सावकारी पद्धतीबद्दल खूप गदारोळ झाला होता. म्हणून हे सावकारी बंदी विधेयक 2010मध्ये शासनाने आणले. त्यावेळी माननीय मंत्री महोदय श्री. आर.आर.पाटील यांनी सांगितले की, शेतक-याला नागवणा-या सावकाराला कोपरापासून ढोपरापर्यन्त सोलून काढले जाईल. हे विधेयक आणण्याचे शासनाने केवळ नाटक केलेले आहे असे मी का म्हणतो ते आपणास पुढील घटनाक्रमावरुन समजून येईल.

सभापती महोदय, शासनाने सन 2010मध्ये हे विधेयक आणले. 22 एप्रिल 2010रोजी हे विधेयक विधानसभेने संमत केले, 23 एप्रिल 2010 रोजी ते विधानपरिषदेने संमत केले. 7 मे 2010ला माननीय राज्यपालांनी सही करुन गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे माननीय राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी सादर केले. दिनांक 6 जुलै 2011रोजी मुख्य सचिवाच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. दिनांक 11 ऑगस्ट 2011 रोजी मुख्य सचिवांनी कॅबिनेट सचिवांना पत्र दिले. दिनांक 20 सप्टेंबर 2011 ला माननीय मुख्यमंत्र्यांनी, केन्द्रीय गृहमंत्र्याना या प्रकरणी लक्ष

..4.



श्री. पांडुरंग फुंडकर....

घालण्याची विनंती केली. 14 डिसेंबर 2011 रोजी माननीय मुख्यमंत्र्यांनी केन्द्रीय गृहमंत्र्यांना पुन्हा या प्रकरणी लक्ष घालण्याची विनंती केली. दरम्यान 11 नोव्हेंबर 2011 रोजी केन्द्रीय गृहमंत्रालयाकडून माननीय राज्यपालांच्या सचिवांना काही मुद्यावर अभिप्राय मागविण्याचे पत्र आले. हे काय चालले आहे ? 2010ला हे विधेयक संमत झाले. आता 2012 वर्ष संपत आले. या दोन वर्षात या विधेयकाचा मुंबई-दिल्ली असा प्रवास सुरु आहे. या शासनाला हा कायदा आणायचा असेल तर त्यास माननीय राष्ट्रपतींची संमती घेण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. अन्यथा विदर्भातील शेतक-याला शासनाने सांगावे की सावकारी बंदी विधेयक आणण्यासाठी शासन काही करु इच्छित नाही, तुम्हाला वाटेल त्या पध्दतीने सावकाराला जमिनी विका, आत्महत्या करा, मरा, या शासनाला त्याची काही चिंता नाही असा तरी संदेश राज्यातील शेतक-यांना द्या किंवा हा कायदा तीन महिन्याच्या आत महाराष्ट्रामध्ये लागू करु अशा प्रकारचे आश्वासन द्यावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

--

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, नियम 259 अन्वये आणलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, नागपूर मधील अधिवेशनाचा हा शेवटचा दिवस आहे. वर्तमानपत्रे आणि अन्य अनेक माध्यमातून ही भावना व्यक्त केली जाते की, आता हे अधिवेशन संपले की, आमदार पुढील वर्षी पुढील अधिवेशनाच्या निमित्तानेच नागपूरमध्ये येतील. दरम्यानच्या वर्षभराच्या काळात विदर्भ तसाच राहील. गेल्यावर्षी मी एक छोटासा संकल्प केला. मी मुद्दाम यवतमाळ मधील पांढरकवडा येथील हजार शेतकरी महिलांबरोबर काम करणारे विदर्भ जन आंदोलनाचे किशोर तिवारी यांच्या बरोबर जाऊन अनेक गावांना भेटी दिल्या. ज्या कुटुंबामध्ये शेतक-यांनी आत्महत्या केलेली आहे अशा कुटुंबातील विधवा महिलांचे मनोगत समजून घेतले. त्यांच्या अपेक्षा या सभागृहामध्ये मांडणे अत्यावश्यक आहे असे मला वाटते. म्हणून त्या मी येथे थोडक्यात मांडते. पश्चिम विदर्भामध्ये 8400 शेतक-यांनी आत्महत्या केल्या.

...नंतर श्री. गिते....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 16:50

डॉ.नीलम गोऱ्हे...

त्याच्या पैकी पूर्व विदर्भात गेल्या 9 वर्षात 303 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. यातील 104 आत्महत्या शेतकरी फक्त आत्महत्येच्या निकषामध्ये पात्र झालेले आहेत. बाकीची प्रकरणे प्रलंबित आहेत.

सभापती महोदय, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याची पत्नी श्रीमती अपर्णा माळीकर यांची के.बी.सी.मध्ये श्री.अभिताभ बच्चन यांनी मुलाखत घेतली. ती मुलाखत बघून संपूर्ण देशातील लोकांच्या डोळयामध्ये पाणी आले. आत्महत्याग्रस्त कुटुंबामधील ही जी सून आहे. त्या महिलेच्या पतीने आत्महत्या केली आहे, परंतु एकत्र कुटुंबात त्या महिलेचा जमिनीवरील अधिकार दिले जात नाही. मला अनेक महिला अशा भेटल्या आहेत की, त्या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वृध्द आई-वडिलांचा सांभाळ करीत आहेत, लहान लहान मुले सांभाळून संसार करीत आहेत. काही गांवामध्ये 25-25 महिला विधवा आहेत, त्यांच्या शेतकरी पतीने आत्महत्या केलेल्या आहेत. त्यांचे कुंटुंबीय अतिशय हलाखीचे जीवन जगत आहेत. मला माननीय कृषि मंत्र्यांना दोन-तीन प्रश्न विचारावयाचे आहेत. एखादी नैसर्गिक आपत्ती येते. लातूर जिल्हयात झालेल्या भूकंपामध्ये 9 हजार पुरुष दगावले. तेवढया महिला विधवा झाल्या. आपण या ठिकाणी पॅकेज जाहीर करता. परंतु अशा प्रकारच्या विधवा महिलांसाठी देखील एखादे पॅकेज जाहीर करावे.

महोदय,या निमित्ताने माझी मागणी आहे की, एकत्र कुटुंबातील शेतकऱ्याने आत्महत्या केली असेल तर त्याच्या पत्नीचे नाव 7/12 उताऱ्यावर लावण्यात यावे. त्या 7/12च्या उताऱ्यावर कुटुंब प्रमुखाचे नाव लावलेले असते. त्या महिलेच्या शेतकरी पतीने आत्महत्या केल्यानंतर त्याच्या जमिनीच्या 7/12 च्या उताऱ्यावर त्या महिलेचे नाव शेतकरी म्हणून का लावले जात नाही याचा माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात खुलासा करावा. या बाबतीत शासनाची अनेक परिपत्रके आहेत, परंतु त्यांची अंमलबजावणी व्यवस्थितपणे होत नाही. मला सांगण्यास अतिशय खेद,खंत आणि लाज वाटते की, या भगिनींच्या शेतकरी पतीने आत्महत्या केलेली असतानाही त्याच्या जमिनीवर पत्नीचे नाव लावण्याबाबत सरकार निर्णय का घेऊ शकत नाही हा एक महत्वाचा प्रश्न आहे. त्यांच्या कुटुंबातील मुली लग्नाच्या वयाच्या झालेल्या आहेत. बिकट परिस्थितीत मुले शिक्षण घेत आहेत. यांच्यासाठी शासनाकडून कोणत्याही प्रकारची योजना राबविली जात नाही. मुलींचे वय लग्नाचे झालेले आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांवर अवलंबून असलेल्या विधवा महिलांची

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

संख्या एका लाखापेक्षा जास्त आहे असे विदर्भ जन आंदोलन समितीने सर्व्हे केलेला आहे. या विधवा महिलांसाठी शासन कोणत्याही प्रकारच्या योजना राबवित नाही ही एक अतिशय खेदाची गोष्ट आहे. या गंभीर बाबीकडे जन आंदोलन समितीने लक्ष वेधलेले आहे. या विधवा महिलांच्या बाबतीत शासन कोणत्याही प्रकारचा कार्यक्रम हाती घेत नाही. त्यांच्यासाठी विशेष कार्यक्रम शासनाने हाती घ्यावा अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय, माजी विधान परिषद सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल यांनी एक लेखी निवेदन सर्वांना दिलेले आहे. त्यांचे ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवणे हे माझे कर्तव्य आहे असे मी समजते. या वेळी ते या सभागृहाचे सदस्य नाहीत. ते या सभागृहाचे सदस्य असते तर त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्येच्या बाबतीत अतिशय पोटतिडकीने विषय मांडला असता. सरकारी यंत्रणेला एखाद्या शेतकऱ्याने आत्महत्या केली तर सरकारी यंत्रणेचे अधिकारी त्या मृत शेतकऱ्यांच्या विधवा पत्नीला पहिला प्रश्न विचारतात की, तुमचा पती दारु पीत होता काय? दु:खात बुडालेली ती महिला हो सांगते की नाही सांगते याचा विचार न करता आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबास अपात्र ठरवितात. या कारणावरुन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची संख्या कमी झालेली आहे असे दिसून येते. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची संख्या कमी झाली म्हणून शासन आपली पाठ थोपटून घेत असते. शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्येमुळे ज्या महिला विधवा झाल्या आहेत त्यांच्यासाठी माननीय मंत्र्यांनी तसेच सभागृहातील सदस्यांनी आपल्या वेतनातून एक दिवसाचे वेतन कापून तो निधी या विधवा महिलांना दिला तर आम्ही माणूस म्हणवून घेण्यास पात्र ठरु. धन्यवाद.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, आपण मला बोलण्यास संधी दिल्याबद्दल आपले प्रथम आभार मानते.

सभापती महोदय, मागच्या अधिवेशनात या ठिकाणी राज्य शासनाकडून कबूल केले गेले होते की, धानाची आणेवारी काढत असताना ज्या काही चूका झालेल्या आहेत, त्या दुरुस्त करण्यासाठी एक कमिटी निर्माण करण्यात येईल. माननीय डॉ.पतंगराव कदम यांनी आपल्याच अध्यक्षतेखाली या बाबतीत कमिटी करण्याचे ठरविले आहे, ती कमिटी लवकर निर्माण करावी व त्या कमिटीचा अहवाल मार्चपर्यंत तयार करुन नवीन आणेवारी जाहीर करावी अशी मी या निमित्ताने मागणी करते.

सभापती महोदय, विदर्भातील नद्यांवर वीज कंपन्यांना पाण्याचे रिझर्व्हेशन दिलेले आहे. हळूहळू शेतकऱ्यांच्या जमिनीसाठी लागणारे पाणी वीज कंपन्यांना देत आहात. विदर्भात 13 टक्के सिंचन आहे. ते सिंचन भविष्यात शून्य टक्यांवर जाण्यासारखी परिस्थिती निर्माण झालेली आहे.शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यासाठी शासनाने दरबार मोकळा करुन दिला आहे की काय असे यावरुन वाटावयास लागले आहे. पावर प्रोजेक्टसाठी लागणाऱ्या पाण्यासंदर्भात नव्याने नियोजन करुन विदर्भातील शेतकऱ्यांना वाचविण्याचे काम शासनाच्या माध्यमातून करण्यात येईल काय याचा माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात खुलासा करावा. धन्यवाद.

-----------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, या महत्वपूर्ण चर्चेत मी फक्त एकच मुद्दा मांडणार आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दर हंगामाच्या सुरुवातीला त्यांना रास्ता रोको सारखे आंदोलन करण्याची येणारी वेळ, त्यावेळी त्यांच्यावर झालेला गोळीबार त्यानंतर शासनाने घेतलेला निर्णय या बाबतीत एवढेच सांगू इच्छितो की, पश्चिम महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊस शेती आर्थिक दृष्टया परवडत नाही. दर वेळेला ऊस उत्पादनात होणारी घट वा वाढ ही फक्त ऊसाच्या दरावर अवलंबून राहते. ऊस उत्पादनाच्या खर्चावर दर निर्धारित करण्याची पध्दत महाराष्ट्रात रुढ केली तर ऊस शेतीचा मोठया प्रमाणात बचाव होईल याकडे माननीय कृषि मंत्र्यांनी गांभीर्याने लक्ष घालावे अशी विनंती करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (कृषी मंत्री ) : सभापती महोदय, या सभागृहात आज अंतिम आठवडा प्रस्ताव मांडण्यात आला आहे व त्या चर्चेस माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सुरुवात केली. या चर्चेस सुरुवात करताना त्यांनी राज्य शासनाच्या उदासिनतेबाबत चिंता व्यक्त केली तसेच काही महत्वाच्या सूचना देखील केल्या आहेत. प्रत्येक अधिवेशनात या विषयावर चर्चा होते असते. हा विषय पुन्हा सभागृहात चर्चेला येऊ नये म्हणून शासन भविष्यात काय उपाययोजना करणार आहे अशीही त्यांनी या निमित्ताने विचारणा केली आहे.

महोदय, या प्रस्तावावरील चर्चेत सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, ज्येष्ठ सदस्या श्रीमती शोभा फडणवीस, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी सहभाग घेतला. त्यांनी या चर्चेत सहभागी होताना काही चांगल्या सूचना देखील केल्या आहेत. नागपूर अधिवेशनात विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न नेहमी चर्चेला येतो. विदर्भातील सिंचनाच्या बाबतीत नेहमी सभागृहात चर्चा होत असते. कापूस आणि धानाच्या भावा बाबतही या ठिकाणी चर्चा होते. वेगवेगळया माध्यमातून विदर्भातील शेतकऱ्यांना जे पॅकेज जाहीर झालेले आहेत, त्या पॅकेजच्या अंमलबजावणी बाबत चर्चा होते. सभापती महोदय, अंमलबजावणीमध्ये काही त्रुटी निश्चितपणे राहतात हे मी मान्य करतो. विदर्भातील शेतकऱ्याला कसा आधार देता येईल या बाबतीत गांभीर्याने विचार झाला पाहिजे अशी सभागृहाची धारणा आहे.

महोदय,राज्यातील शेतकरी आत्महत्या करीत आहे ही कोणत्याही शासनाला भूषणावह गोष्ट नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र आपल्या राज्यातच आहे असे नसून शेजारच्या राज्यातही असे सत्र सुरु आहे. शेतकऱ्यांनी आत्महत्या करु नये म्हणून प्रत्येक राज्य आपापल्या परीने प्रयत्न करीत असतात. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची आकडेवारी सांगून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. परंतु या गोष्टीची तीव्रता पाहून या देशाचे माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग आणि युपीएच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांनी या विभागासाठी काही विशेष उपाययोजना करता येतील काय म्हणून केंद्र सरकारने काही पॅकेज दिले. राज्य सरकारने त्याच्यामध्ये सहभाग दिला. शेती व्यवस्थेमध्ये मुलभूत बदल असावयास पाहिजे या संबंधीच्या उपाययोजना करताना 2005 पासून आज पर्यंत पाहिले तर शेतकऱ्यांच्या आत्महत्येची आकडेवारी झपाटयाने कमी होताना दिसून येत

6...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील...

आहे. शेतकरी आता विकासाची नवीन दृष्टी समोर ठेवून शेती व्यवस्थेमध्ये बदल करावयास लागला आहे. विदर्भात पर्जन्यमानाचे प्रमाण जास्त आहे.....

यानंतर श्री. भोगले....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील........

परंतु विदर्भातील 11 जिल्हयांमधील सरासरी पाहिली तर धान उत्पादन करणाऱ्या गडचिरोली, भंडारा, गोंदिया व चंद्रपूर जिल्हयामध्ये अधिक आहे. याच भागात खोब्रागडे नावाच्या सर्वसामान्य शेतकऱ्याने एचएमटीची नवीन जात विकसित करुन क्रांती केली. कापूस, सोयाबीन आणि तुरीच्या उत्पादनावर अवलंबून असणारे शेतकरी अमरावती विभागातील आहेत. त्यांच्या प्रश्नाबाबत आपण अनेकदा सभागृहात चर्चा केली. सिंगल क्रॉप इकॉनॉमीवर या क्षेत्रातील शेतकऱ्यांना अवलंबून ठेवता कामा नये. कृषी विद्यापीठाकडे बघितले तर त्यांचे शास्त्रज्ञ चार भिंतीच्या पलीकडे पहावयास तयार नाही असे दिसून येते. आज संशोधन चांगल्या प्रमाणात होत आहे. परंतु विस्तार शिक्षण विद्यापीठात पूर्णपणे ठप्प झाले आहे. अनुदानित योजनांपुरते विद्यापीठांकडून संशोधन केले जाते. त्या त्या भागातील शेतकऱ्यांना संशोधनाचा फायदा मिळाला पाहिजे, ते घडले नाही.

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

सभापती महोदय, केंद्र सरकारची कॉटन रिसर्च इन्स्टिट्यूट नागपूर येथे आहे. मी मंत्री झाल्यानंतर सातत्याने त्या संस्थेकडे विचारणा केली. एवढी मोठी संस्था उभी करुनही गेल्या दहा वर्षामध्ये आपले काय योगदान आहे, जेणेकरुन आमचे शेतकरी अभिमानाने तुमच्या संस्थेने नाव घेतील. आज कापसाच्या विविध जाती वापरात आलेल्या आहेत. बी.टी.कॉटनला सर्वप्रथम मी विरोध केला होता. केंद्र सरकारने याबाबत ऑर्ग्युमेंट केले की, हा विषय केंद्राच्या अखत्यारितील असल्यामुळे मिनिस्ट्री ऑफ बायो टेक्नॉलॉजीने पुढाकार घेतला आहे. म्हणून राज्य सरकारांनी हे धोरण स्वीकारावे. त्याच वेळी यात जे धोके होते ते लक्षात आले होते. शेतकऱ्यांना विकसित तंत्रज्ञ ाानाच्या नावाखाली आपण कोणत्या दिशेला घेऊन जाणार आहोत याबाबतीत तत्कालीन सचिव श्रीमती मंजू शर्मा यांना उत्तर देता आले नाही. केंद्र सरकारने धोरण स्वीकारले म्हणून राज्य सरकारांनी स्वीकारावे ही त्यांची भूमिका होती. आज बी.टी.कॉटनमुळे कंपन्या मोठ्या झाल्या. मोठमोठया भांडवलदारांनी गुंतवणूक करुन संशोधनाचे एक मोठे मायाजाल आपल्यासमोर उभे केले. त्यातून उत्पादकता किती वाढली?

सभापती महोदय, आपण ग्रामीण भागात कार्यकर्ता म्हणून काम करतो. बी.टी.कॉटनबाबत सांगितले होते की, बोंड अळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ही नवीन जात आणली आहे. आज

..2..

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील........

बी.टी.कॉटनच्या रोपांवर देखील वेगवेगळ्या किटक नाशकांची फवारणी करावी लागते. व्हाईट फ्लॅगचे मोठे संकट कापूस उत्पादक शेतकऱ्यांवर आलेले आहे. कमी पावसामुळे लाल्या रोगाचा प्रादुर्भाव होतो, अधिक पाऊस झाला तरी सध्याची व्हरायटी यशस्वी होत नाही. बागायती क्षेत्रात अमेरिकन कॉटन हायब्रीड म्हणून मोन्सॅन्टोच्या कंपनीच्या रुपाने आपण स्वीकारले. आज सगळयात जास्त बियाण्यांची निर्मिती आंध्रप्रदेश आणि गुजराथमध्ये होते. परंतु बागायती कापसाचा विचार करुन संशोधन व्हावयास पाहिजे. दुर्दैवाने तसे घडले नाही. किंमती वाढवून मोठमोठया जाहिराती करणे आणि जाहिरातींच्या रुपाने शेतकऱ्यांची फसवणूक करणे असे प्रकार राज्यामध्ये आणि देशामध्ये घडले. बोगस बियाण्याच्या नावाखाली आपण कंपन्यांविरुध्द कारवाई करीत होतो तो भाग वेगळा आहे. मूळ शेती पध्दतीमध्ये आपण बदल केला पाहिजे. 1999 साली डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीच्या निमित्ताने नागपूरला वर्कशॉप आयोजित केले होते. त्या ठिकाणी चर्चा झाली होती. सिंगल क्रॉप इकॉनॉमीमधून शेतकऱ्यांना बाहेर आणले पाहिजे. कापसाला आपण पांढरे सोने म्हणण्यास सुरुवात केली. कापूस एकाधिकार खरेदी योजनेमुळे शेतकऱ्यांचे परावलंबित्व अधिक वाढले. शेतकऱ्यांची मानसिकता अशी झाली की, फक्त कापसाचे उत्पादन घ्यायचे, कारण सरकार हमी भाव देणार आहे. त्या त्यावेळच्या राज्यकर्त्यांनी प्राप्त परिस्थितीतून शेतकऱ्यांना बाहेर आणले पाहिजे होते. त्या काळात ते धोरण कदाचित योग्य असेल. पंरतु सिंगल क्रॉप इकॉनॉमीच्या धर्तीवर शेती व्यवस्था अवलंबून ठेवली गेली. दरवर्षी खरेदी केंद्रे सुरु करण्यात आली. देशात कोणत्याही शेती उत्पादनाला निर्यात बंदी नाही. चीन देशाचा विचार केला तर 80 लाख गाठड्या ओपनिंग बॅलेन्स म्हणून त्यांच्याकडे उपलब्ध आहेत. आज ऑस्ट्रेलिया, अमेरिका देशामध्ये मोठया प्रमाणात कापसाचे उत्पादन होते. आज निर्यात बंदी नसताना एकाही गाठडीचा कमॉडिटी मार्केटमध्ये सौदा झालेला नाही. या बाबीचा विचार करताना आपल्याला नवीन पध्दतीने कापसावर संशोधन केले पाहिजे होते. लांब धाग्याच्या कापसाची निर्मिती आपण करु शकलो नाही. सर्व प्रश्नाचे उत्तर मी माझ्या भाषणातून देऊ शकलो तरी त्यातून हे प्रश्न सुटणार आहेत का हा महत्वाचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, पारंपारिक धान उत्पादन करणारा शेतकरी विदर्भातील आहे. उत्तम प्रकारच्या नॉन बासमती राईसचे तो उत्पादन करतो. त्याचे उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न झाला

..3..



श्री.राधाकृष्ण विखे-पाटील........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पाहिजे. धान उत्पादक, कापूस उत्पादक शेतकऱ्यांची भाव वाढीची मागणी का येते हा एक महत्वाचा प्रश्न नेहमी चर्चेला येतो. याचे कारण असे की, उत्पादकता कमी झाली आहे. ज्यांचे उत्पादन एकरी 15-16 क्विंटल व्हावयास पाहिजे, ते 2 क्विंटलवर आले आहे. उत्पादकता कमी झाल्याने भाव वाढवून मिळाला पाहिजे अशी भावना निर्माण होते. परंतु 80 टक्के क्षेत्रामध्ये होणारा कापूस जिरायती आहे. पूर्णपणे पावसावर अवलंबून आहे. कोरडवाहू शेतीवर 82 टक्के कापूस उत्पादन घेतले जाते. धान उत्पादनाबाबत तीच परिस्थिती आहे. धानाची शेती पूर्णपणे पावसावर अवलंबून आहे. आज नॉन बासमती व्हरायटीचे उत्पादन प्रयत्न करुनही का वाढवित नाही? भंडारा, गोंदिया जिल्हयातील बाजारामध्ये धानाच्या नॉन पॉलिश जातीला 1200 ते 1400 रुपयांना विकत घेतले जाते. मार्केटिंग फेडरेशनकडून खरेदी केंद्रे सुरु केली जातात. आदिवासी भागामध्ये आदिवासी विकास महामंडळाकडून खरेदी केली जाते. परंतु शेतकऱ्यांना पर्याय नसतो. पॉलिश तांदूळ देशांतर्गत बाजारामध्ये, विशेषतः भंडारा आणि गोंदिया जिल्हयामध्ये 1800 ते 2200 पर्यंत कधी भाव मिळाला नव्हता. शेतकऱ्यांची अडवणूक केली जाते. पुण्याच्या बाजारामध्ये त्याच धानाला 3200 रुपये भाव मिळतो. हा कशाचा परिणाम आहे? वितरण व्यवस्था पूर्णपणे संपली आहे.

सभापती महोदय, कृषी उत्पन्न बाजार समित्यांची परिस्थिती काय आहे? शेतकऱ्यांच्या शेतमालावर सेस मिळविला जातो. एखाद्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मागील पाच वर्षात एकूण किती माल आला, त्यात शेतकऱ्यांचा माल किती होता, राज्यांतर्गत किती माल विकला गेला, राज्याबाहेर किती माल गेला याची चेअरमनना माहिती नाही. सचिवांचा तर याच्याशी काही संबंधच राहिलेला नाही. वितरण व्यवस्थेसाठी आपण कृषी उत्पन्न बाजार समित्यांची निर्मिती केली. आज त्या कोणाच्या ताब्यात गेल्या आहेत? असे अनेक प्रश्न आहेत. या सर्व व्यवस्था सक्षम करण्याकरिता आम्ही काम हाती घेतले आहे. शेतीमालाची वितरण व्यवस्था सक्षम करणे, शेतक-यांना त्यातून अधिक भाव मिळवून देणे, त्यांची उत्पादकता वाढली आणि त्याला भाव वाढवून देण्यामध्ये चेन रिॲक्शन सुरु झाली तर त्यातून शेतकऱ्यांमध्ये असणारे नैराश्य आपल्याला दूर करता येईल.

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील......

सभापती महोदय, विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न नेहमी चर्चेला जातो. काटोल-मोर्शी येथे संत्रापिकाच्या संदर्भात प्लँट काढले गेले व त्यामध्ये अधिकाऱ्यांनी पैसे खाल्ले. शेवटी अधिकारी निवृत्त होऊन जातात, त्यांची चौकशी चालू राहते, परंतु यामध्ये शेवटी शेतकऱ्याचेच वाटोळे होत असते. त्या पैशाच्या वसुलीमागे आपण लागलेलो आहे. संत्रा उद्योग सुरु करण्याबद्दलचे धोरण राज्य शासनाने यापूर्वीच घेतले होते. वरुड येथे संत्रा पिकावर प्रक्रिया करणारा एक छोटा प्रकल्प आपण सूरु करीत आहोत. घाटघर, कारंजा येथेही एक प्रकल्प सुरु केलेला आहे. यावर्षामध्ये आपण त्या ठिकाणी प्रक्रिया करण्यास सुरुवात केलेली आहे. शेती तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना असावी यासाठी आपण क्लस्टर ॲप्रोचची भूमिका स्वीकारली आहे. पंजाबराव कृषी विद्यापीठातील संशोधन केंद्रामध्ये, कृषी तंत्र विद्यालय आहे, कृषी चिकित्सालय आहे. या वर्षापासून विदर्भातील 11 जिल्हयातील 350 गावे या विद्यापीठांनी दत्तक घेतलेली आहेत. या 350 गावांमध्ये कृषी आणि पणनचे कन्व्हर्जन केलेले आहे. मॉडेल व्हीलेजचा परिणाम आपल्याला त्या गावांमध्ये दिसून येईल.

सभापती महोदय, आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाचे पुनर्वसन करण्यासाठी आम्ही पाऊल उचलले आहे. आत्महत्येची कारणे काहीही असतील त्या कारणांची कारणमीमांसा करुन आम्ही त्या शेतकऱ्यांचा अवमान करु इच्छित नाही. शेवटी शेतकरी हा राज्याचा मालक आहे. राज्याला आधार देणारा बळीराजा हा सर्वात मोठा घटक आहे. शेतकऱ्यांमध्ये नवीन आशा निर्माण करण्यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत.

सभापती महोदय, मध्यंतरीच्या काळात आम्हाला कृषी विभागाच्या काही अधिकाऱ्यांवर कारवाई करावी लागली, 450 लोकांना नोटीसा काढाव्या लागल्या, 70 लोक निलंबित करण्यात आले, काही लोकांची चौकशी सुरु आहे. यामध्ये शेतकऱ्यांना निकृष्ट दर्जाचे साहित्य गेल्यामुळे राज्यामध्ये मोठया प्रमाणात टीका झाली होती. शेतकऱ्यांच्या संदर्भात केंद्रशासन आणि राज्य शासन प्रयत्न करीत असतांना त्या व्यवस्थेला छेद देण्याचा प्रयत्न काही मंडळी करतात, त्यामुळे आपल्या प्रयत्नांना कोठे तरी गालबोट लागते व त्यामुळे सरकारची बदनामी होते. या प्रकरणामध्ये अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई आपण केलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2...

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील......

सभापती महोदय, बीटी कॉटन बियाण्याच्या संदर्भात सभागृहात चर्चा करण्यात आली आहे. यामध्ये आपल्याला 100 टक्के यश मिळाले आहे असा दावा मी करणार नाही. आपल्याला यामध्ये जवळ जवळ 70 टक्के यश मिळाले आहे. मोन्सेंटो कंपनीवर आपण कारवाई केलेली आहे. शेतकऱ्यांना नाडण्याचे काम या मोन्सेंटो कंपनीने केले होते त्यामुळेच आपण त्यांच्यावर कारवाई केली आहे. ही मल्टीनॅशनल कंपनी आहे, कारवाई केली तर आपल्याला बियाणे मिळणार नाही अशीही भीती घालण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. राज्य शासनासाठी शेतकरीच मोठा घटक आहे. कंपनी कितीही मोठी असली तरी शासनाच्या दृष्टीने ती छोटीच आहे. शासनाने या कंपनीवर कारवाई केल्यामुळे राज्यातील सर्व बियाणे तयार करणाऱ्या कंपनीने शासनाला लेखी आश्वासन दिले आहे की, यापुढे सरकार ज्या पध्दतीने सूचवेल त्या पध्दतीने आम्ही काम करु, कोणत्याही प्रकारची तक्रार येणार नाही याची खबरदारी घेऊ असे बियाणे कंपनीच्या असोशिएशनने लेखी आश्वासन शासनाला दिलेले आहे.

सभापती महोदय, आपल्याकडे खत वाटपाच्या संदर्भात नेहमी तक्रारी असायच्या. शेतकऱ्यांना चढया भावाने खत विकत घ्यावे लागत होते. त्यामुळे बांधावर खत उपलब्ध करुन देण्याची योजना आपण यावर्षी सुरु केली. या योजनेचा परिणाम असा झाला की, काही ठिकाणी एमआरपीपेक्षाही कमी दराने व्यापाऱ्यांना खते विकावी लागली आहेत. हा प्रकार पहिल्यांदाच घडलेला आहे. आपण विदर्भातील कोणत्याही गावामध्ये गेला तर त्या ठिकाणी आपल्याला खताची कमतरता दिसून येणार नाही. यावर्षी जादा भावाने शेतकऱ्यांना बियाणे विकत घ्यावी लागली नाहीत हे मी आपल्याला खात्रीने सांगू शकतो. यामध्ये जी किडलेली व्यवस्था होती ती सुधारल्यामुळे बियाणे आणि खते शेतकऱ्यांना योग्य दरात उपलब्ध झाली आहेत. विपणन व्यवस्था सक्षम करणे, क्लस्टरच्या माध्यमातून शेतीमध्ये होणारे बदल शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्याचे काम आपण केलेले आहे.

सभापती महोदय, ठिबक सिंचनाखाली अधिकाधिक क्षेत्र आले पाहिजे असे माननीय मुख्यमंत्र्यांचे प्रयत्न असल्यामुळे या वर्षी आपण सूक्ष्म सिंचनाचे ग्लोबल टेंडर काढले असून त्यामध्ये

...3...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील......

आपण एकंदर 20 कंपन्या निश्चित केलेल्या आहेत. त्यामुळे गेल्यावर्षी पेक्षा या वर्षी ठिबक सिंचनाचे दर 30 टक्क्याने कमी आले आहेत. यामुळे ठिबक सिंचनाचा प्रसार आणि प्रचार निश्चित होणार आहे. आपल्याकडे पाणी उपलब्ध आहे, धरणात पाणी आहे, नवीन धरणे होण्यासाठी काही वर्षेही लागतील परंतु उपलब्ध पाण्याचा सूक्ष्म सिंचनाद्वारे उपयोग करण्याचा राज्य शासनाने पुढाकार घेतलेला आहे.

सभापती महोदय, पीक विम्याच्या संदर्भात राज्य शासनाने नवीन धोरण स्वीकारले आहे. गेल्यावर्षी फळपिकांच्या संदर्भातील पीक विम्याच्या संदर्भात 27 कोटी प्रिमियमच्या अगेन्स्ट आपण 52 कोटी रुपये शेतकऱ्यांना मिळवून देऊ शकलो. यावर्षी आपण 2 लाख हेक्टर फळबाग पिकाच्या बाबतीत योजना आणणार आहोत. खरीप आणि रब्बी हंगामाच्या पिकांची मर्यादा 60 टक्क्यावरुन 80 टक्क्यांपर्यंत वाढवल्यामुळे यावर्षी रब्बी पिकाच्या शेतकऱ्यांना 135 कोटी रुपये मिळाले. पुढच्या वर्षी खरीपाकरिता आपण अजून मोठी योजना आणणार आहोत. या विषयाच्या संदर्भात शासनाने स्वामीनाथन समितीने केलेल्या शिफारसी तसेच अन्य लोकांकडून ज्या काही सूचना आल्या होत्या त्याही स्वीकारलेल्या आहेत. 2100 महसूल सर्कलमध्ये ॲटोमॅटीक वेदर यंत्र बसविणार आहोत. त्यामुळे शेतीच्या संदर्भातील तसेच हवामानाच्या संदर्भातील माहिती शेतकऱ्यांना मिळू शकणार आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी कोरडवाहू मिशनची स्थापना केली होती. त्यासाठी 10 हजार कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला असून त्यासाठी एक समितीसुध्दा गठीत करण्यात आलेली आहे. यावर्षी कोरडवाहू मिशन योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या कामास सुरुवात होणार आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सावकारी कायद्याचा उल्लेख काही सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. सावकारी बंदी कायदा आपल्या सभागृहाने मंजूर करुन तो केंद्र शासनाकडे पाठविला होता परंतु त्यामध्ये काही त्रृटी राहिल्या होत्या आता त्या त्रृटींची पूर्तता करुन आता हा कायदा माननीय राष्ट्रपती महोदयांकडे सादर करण्यात आलेला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या पुढाकाराने त्याचा पाठपुरावा सुरु आहे. सावकारी कायद्याला आता लवकरच मंजुरी मिळणार आहे. राज्याला

...4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील......

सावकारीचा जो कलंक लागला आहे तो पुसून टाकण्यात या कायद्यामुळे निश्चित मदत होणार आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्यासंदर्भात कृषी,पणन व जलसंपदा विभागामार्फत कार्यवाही केली जात आहे. माननीय मुख्यमंत्र्यानी आज विधानसभेत अनुशेष ग्रस्त भागासाठी काही विशेष योजना सुरु करण्याची घोषणा केलेली असून त्यास अनुसरुन कृषी व पणन विभागाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे सक्षमीकरण करण्याचे काम सुरु असून त्या माध्यमातून अनुशेषग्रस्त भागातील शेतकऱ्यांना नवीन दिशा देण्याचा आमचा प्रयत्न सुरु आहे. या प्रस्तावाच्या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्यासंदर्भात शासनाने योग्य पाऊल उचलले आहे व त्याचा सदृष्य परिणाम येत्या काही दिवसात आपल्याला दिसेल अशी खात्री देऊन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्याच भावना माननीय मंत्रीमहोदयांनी रिपीट केलेल्या आहेत. कृषी विद्यापीठे संशोधन करीत नाहीत, त्यासंदर्भात ते काही करु शकत नाही, कापूस धान उत्पादकांची दुरवस्था आहे, संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचीही दुरवस्था आहे हे माननीय मंत्री महोदय मान्य केलेले आहे. अधिकारी भ्रष्टाचार करतात त्यांच्यावर आम्ही कारवाई करतो, त्यामध्ये शेतकरी मरतात.

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

आम्ही ज्या ज्या शेतकऱ्यांच्या अडचणी मांडल्या त्या त्यांनी मान्यच केल्या आहेत. त्या अडचणी सोडविण्यासाठी शासन काय करणार आहे ? स्वामीनाथन समितीने राज्य शेतकी आयोगासंबंधी उल्लेख केला आहे. त्यासंबंधी आपण काही विचार केला आहे काय ? कोरडवाहू मिशनसंबंधी घोषणा झाली. गेल्या वर्षी 200 कोटी रूपये दिले. परवा 50 कोटी देण्याचे मान्य केले. मागे निधी देता आला नाही. किमान पुढे निधी देणार आहोत., त्यासंबंधी योजना आहे असे काही तरी उत्तर येणे अपेक्षित होते. गेल्या वर्षी बियाण्यांचे ॲडव्हान्स बुकींग केले, तसेच या वर्षी देखील बियाण्यांचे ॲडव्हान्स बुकींग केले आहे. त्याची यादी आमच्याकडे आहे. त्यांच्या विरूद्ध आपण कोणती कारवाई करणार आहात ? गेल्या वर्षी आपण म्हणाला होता की, ॲडव्हान्स बुकींग मुळे बियाण्यांचा काळा बाजार वाढतो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कोट्याचे नुकसान होते हे आपणच म्हटले आहे. त्यामुळे ॲडव्हान्स बुकींग बंद करून संबंधितांवर कारवाई करू असे आपणच म्हटले होते. त्याबाबत आपण काहीच घोषणा केली नाही. मॉन्सेंडरवर कारवाई केली ती गोष्ट वेगळी आहे. याबाबत कोणती कारवाई करणार आहात ते आम्हाला अपेक्षित होते. पण त्यासंबंधी शासनाकडून काहीच उत्तर आले नाही. आम्हाला जे अपेक्षित असते ते आले नाही की, मग आम्ही गोंधळ करतो, सभात्याग करतो. सत्ताधारी पक्षातील माननीय सदस्य आम्हाला विदर्भावर बोलायचे आहे असे पहिल्या आठवड्यामध्ये म्हणत होते. पण आता सत्ताधारी पक्षातील मागची बाके रिकामी दिसतात. सगळे आपापल्या गाड्या पकडून गेले वाटतात. विदर्भाच्या विषयावर बोलले पाहिजे, कामकाज चालवा, कामकाज चालवा असा बॅनर घेऊन येथे सर्वजण आले होते. पण आज तेथील सर्व बाके रिकामी आहेत. या महत्वाच्या विषयावर आपल्याकडून एखाद दुसरा सन्माननीय सदस्य बोलले असेलतील बाकीचे बोलले की नाही हे मला माहीत नाही. अशी जर त्यांच्या सन्माननीय सदस्यांची आणि नेतृत्त्वाची अवस्था असेल तर सारखा सारखा सभात्याग करण्यात काहीही अर्थ नाही. या प्रस्तावाबाबत शासनाने काहीच केलेले नसल्यामुळे आम्ही तीव्र शब्दात नापसंती व्यक्त करतो आणि काही तरी करण्याची सुबुद्धी देव आपणास देवो आणि शेतकऱ्यांना वाचवो एवढेच बोलून मी माझे बोलणे संपवितो.

**सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आजच्या कामकाज पत्रिकेत दाखविण्यात आलेले अशासकीय पुर:स्थापनार्थ विधेयक पुढील सत्रात प्रथम घेण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : ठीक आहे. ..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## महाराष्ट्र विधान परिषद तिसरे अधिवेशन 2012 संबंधी आढावा

**सभापती** : हिवाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजचे दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपले आहे. मी या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवतो.

एकूण बैठकांची संख्या - 10 मंत्री उपस्थित नसल्यामुळे वाया गेलेला वेळ 55 मिनिटे, गणपूर्ती अभावी वाया गेलेला वेळ 10 मिनिटे, अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ 14 तास प्रत्यक्षात झालेले कामकाज 62 तास रोजचे सरासरी कामकाज 6 तास 12 मिनिटे.

**तारांकित प्रश्न**

एकूण आलेले तारांकित प्रश्न 3300 कार्यवाहीसाठी घेतलेले तारांकित प्रश्न 2592

स्वीकृत प्रश्न 1118 सभागृहात तोंडी उत्तरित झालेले तारांकित प्रश्न 82

उत्तरित झालेला अल्पसूचना प्रश्न 1

**नियम 93 अन्वये सूचना**

एकूण प्राप्त झालेल्या सूचना 102 स्वीकृत सूचनांची संख्या 59

सभागृहात निवेदने झालेल्या सूचनांची संख्या 2

**औचित्याचे मुद्दे**

एकूण प्राप्त झालेले औचित्याचे मुद्दे 32 सभागृहात मांडण्यात आलेले औचित्याचे मुद्दे 29

**लक्षवेधी सूचना**

प्राप्त झालेल्या सूचना 971 मान्य झालेल्या सूचना 272 चर्चा झालेल्या सूचना 34

विशेष उल्लेखाच्या मांडण्यात आलेल्या सूचना 37

**नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा** : चर्चा झालेल्या सूचना 2

**नियम 46 अन्वये निवेदने** : 2

**शासकीय विधेयके संमत** : 9 ( परिषद 3 सभा 6 )

**नियम 260 अन्वये प्रस्ताव**

चर्चा झालेल्या सूचनांची संख्या : 3

**अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाली**

----

..3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा

**सभापती** : मी खालील घोषणा करतो.

"राज्यपालांना अशी शिफारस करण्याचे ठरले आहे की, महाराष्ट्र विधानपरिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक 11 मार्च  2013 रोजी, विधान भवन, मुंबई येथे घेण्यात यावे."

--

..4.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सत्र समाप्तीसंबंधी घोषणा

**सभापती** : सभागृहापुढील कामकाज आता संपले आहे. राज्यपालांकडून पुढील प्रमाणे संदेश आला आहे.

"मी के. शंकरनारायणन् महाराष्ट्राचे राज्यपाल, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174, खंड (2), उपखंड (क) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन याद्वारे बुधवार, दिनांक 21 डिसेंबर, 2012 रोजी होणा-या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्ती बरोबरच महाराष्ट्र विधानपरिषदेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे."

(यानंतर राष्ट्रगीत झाले.)

(सायंकाळी 5.26 वाजता सत्र संस्थगित झाले.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही